

# श्री नृसिंह सरस्वती उर्फ दीक्षित स्वामी महाराज

## (नरसोबावाडी) यांचे चरित्र

॥ श्री सद्गुरवे नमः ॥

# श्रीनृसिंहसरस्वती उर्फ दीक्षितस्वामी महाराज

## (नरसोबावाडी)

यांचे चरित्र


**मूळ लेखक**

श्री. रा. रा. शामराव परशूराम नवरे
धोपेश्वर
पोस्ट राजापूर, रत्नागिरी.

**सुधारणा व अल्प विस्तार पूर्वक प्रत तयार करणार -**

श्रीवासुदेवानंद सरस्वती पीठ
अमरापूर, औरवाड
ता.शिरोळ, जि. कोल्हापूर.

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रकाशन दिवस :

गुरुपौर्णिमा, शके १९३३
शुक्रवार, दि. १५ जुलै २०११

मुखपृष्ठ :

सुरेन्द्र शिंदे

मुद्रक :

रमा एन्टरप्राईझेस
३९, स्वामी समर्थ नगर,
बंडू गोखले पथ, गिरगांव, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : २३८५ २८४६
भ्रमणध्वनी : ९३२२३२९१०३४

प्रकाशक :

श्री वासुदेवानंद सरस्वती पीठ (ट्रस्ट)
रजि. नं. अे १२३ कोल्हापूर
द्वारा- श्रीदत्त अमरेश्वर मंदिर,
अमरापूर-औरवाड
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर
दूरध्वनी : ०२३२२-२७०४४१

|| श्रीसद्गुरवे नमः ||

## अर्पण पत्रिका

जगदादि स्वतोऽनादि यदेकं चाद्वितीयकं ।
तत्स्वशक्ति समावेशात् त्रिगुणं विश्वकारणम् ||

प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराज

हे सद्गुरो!

स्वतः अनादि असून जगाला कारण असणारा, निर्गुण, निर्विकार, एकमेवाद्वितीय, सच्चिदानंद स्वरूपी आपल्या मायारूप शक्तिचा अंगीकार करून सत्व,रज,तम, संज्ञक तीन गुणांनी ब्रह्मा, विष्णु, महेश्वर त्रयमूर्ती होऊन विश्वाची उत्पत्ती, स्थितीलय करणारा स्थिर-चर व्यापून अलिप्त राहणारा ब्रह्मादि पिपीलिकांत स्थिर चर नानाविध स्थूल-सूक्ष्मादी विचित्र रूपे धारणारा बहूरूपी दयाळू रघुनाथ विश्वंभर जो तू त्या तुझ्या चरणीं हे तुझेच चरित्र अत्यंत लीनपणे अर्पण करीत आहे.


आज मुक्काम-
श्रीनृसिंहवाडी

तुझा दासानुदास -
शामराव परशूराम नवरे


नोव्हेंबर १९३९



श्रीं ची उत्सव मूर्ती - नरसोबावाडी -
श्री दीक्षित स्वामी महाराजांनी सलग १७ वर्षे यांची पूजा सेवा केली




"तीन गोटे प्रसाद" श्री दत्तत्रिमूर्ती सदलगा
(श्री दीक्षित स्वामी महाराजांच्या पूर्वजांना वाडीच्या
संगमावर श्री हस्ते मिळालेला प्रसाद)




अमरापूर – औरवाड स्थापित श्रीमहागणपती




अमरापूर – औरवाड पीठातली उत्सव मूर्ती



अमरापूर – औरवाड स्थापित श्री विग्रह श्री दत्त अमरेश्वर




अमरापूर – औरवाड "श्री पीठ गाभारा श्री स्वामींचे देव"




अमरापूर – औरवाड स्थापित श्री चौसष्ट योगिनी –
प्रतिकात्मक ८ मूर्ती व पादुका




श्री दीक्षित स्वामी महाराज अमरापूर मठात पादुका रुपाने स्थिर आहेत.




"श्री गुरुस्वामी" श्री प. प. श्रीमद् वासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामी महाराज




श्री रामचंद्र योगी महाराज यांची संजीवन समाधी




श्री नारायण स्वामी महाराज




श्री कृष्णानंद स्वामी महाराज




श्री गोपाळ स्वामी महाराज यांची संजीवन समाधी




श्री मौनी स्वामी महाराज नरसोबावाडी




प. पू. श्री. वक्रतुंड महाराज कवीश्वर




सौ. सरस्वती आईसाहेब व प.पू. श्री. धुंडीराज महाराज कवीश्वर



चरित्रनायकाचे गुरुबंधू श्री. प. पू. वामनरावजी गुळवणी महाराज पुणे



प्रिय शिष्यवर्य - श्री. प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर – पुणे – जालना




श्री नारायणानंद सरस्वती यती महाराज (उगार चे स्वामी)

# मनोहर पादुका




भवतारक या तुझ्या पादुका वंदीन मी माथा ।
करावी कृपा गुरुनाथा ।।

श्री मनोहर पादुका - नरसोबावाडी



योगाभ्यासा साठी गुरु तू धरिले मौनाला लोकशिक्षणार्थ योगाचरणं
श्री दीक्षित स्वामी महाराज






"श्री गुरु पूजनातील तद्रूपता" शांभवी मुद्रेत श्री दीक्षित स्वामी महाराज



प्रेरयत् तीर्थयात्रायै, तीर्थरुपोपि यःस्वकान् भक्तांसह तीर्थस्नान करताना श्री दीक्षित स्वामी महाराज



नृसिंह सरस्वती श्री दीक्षित स्वामींचे हस्ताक्षर पत्र

श्रीचरणीं वंदन.

श्रीचरणीं दृढभावभक्ति राहून वाईट वासनेचा समूळ नाश व्हावा हे दासाची प्रार्थना पूर्ण करणार श्रीनरसिंह आहेत. हजारो नेक वंदन.

दासनरसिंहसरस्वती.


श्री दत्त ओं - वे - १०

उत्तर


नारायण चारित्र्य पावले सं
श्री प्रमाणे वाचतां येईल
मानतर आज्ञाय थे आले
शंकरानंद गोपाळ स्वामी
आदि करून पावले १० उन्नता
सखाराम बुवा व सर्व पूना
री पंड श्री सत्यनारायण
प्राय: ध्यान स्तोत्राचा पाठ
पडेल कळवावे

नारायण

नृसिंह सरस्वती श्री दीक्षित स्वामींच्या पत्रास
प.प. श्री. वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांचे आशीर्वाद उत्तर



श्री वाडी क्षेत्राचे वैभव "श्री कृष्णावेणी माता" मूर्ती तथा जळ प्रवाह
(पाठीमागे श्री दत्त अमरेश्वर मंदिर)



श्री दत्त अमरेश्वर मंदिर औरवाड
(श्री वासुदेवानंद सरस्वती पीठ धारासह कृष्णेकाठचे दर्शन)

## प्रकरण पहिले

# मनोदय

देव नाना मौजा करितो ॥

नाथ निरंजन

खरंच या देवाच्या मौजा पाहिल्या कीं मनुष्याची मती गुंग होऊन जाते यात शंका नाही.

गेल्या जेष्ठ महिन्यात मी काही मंडळीं बरोबर नरसोबाच्या वाडीला आलो. तेथील नित्याचा कार्यक्रम पाहून मनाला मोठी मौज वाटली. एक दिवस मौजेनेच संध्याकाळी कृष्णातटाकी बसलो असता समोर पलीकडे काय आहे? अशी चौकशी केली. व पलीकडे औरवाड नावाचा गाव समजले. नुसत्या औरवाड मधे और काय वाटणार !

एक दिवस असाच गप्पा मारत असता गुरुचरित्रातील घेवड्याच्या वेलाची जी गोष्ट घडली ते स्थान पलिकडे आहे व तेथे अमरेश्वराचे मंदीर आहे व यालाच अमरापूर-औरवाड म्हणतात इ. समजले व लगेच दुसरे दिवशी ते स्थान पाहण्याकरीता अमरापुरला गेलो. मंदीरात जाताच मला इतके समाधान वाटले, इतकी मौज वाटली की एक तास नुसते तेथे बसून राहिलो. पुन्हा काही मंडळींसोबत दुसरे दिवशी तेथे गेलो आणि तेथील समाधानाची लूट केली. काय असेल ते असो. तेथे गेले म्हणजे त्या जागे बद्दल एक तऱ्हेची आपुलकीची भावना उत्पन्न होई. हे असे का व्हावे? मी पुष्कळ विचार केला. पण काही केल्या कोडे उलगडे ना. तेथे समाधान वाटून मन मोठे प्रफुल्लित होत असल्यामुळे तेथेच बसावे असे वाटु लागले. नंतर तेथील **'श्रीवासुदेवानंद सरस्वती पीठाची'** चौकशी करता **'श्री टेंबे स्वामी'** म्हणून जे प्रख्यात दत्तावतारी होऊन गेले त्यांचे शिष्य-

**'श्रीदीक्षित स्वामी'** म्हणून वाडीचेच राहणारे होते व त्यांनीच या **पीठाची स्थापना केली.** हे स्वामी प.प. टेंबेस्वामींचे एकमेव दंडी शिष्य, असे असूनही यांच्या विषयी काहीच माहीती मला नव्हती.

नंतर माझ्या २-४ खेपा अमरेश्वराच्या मंदिरात झाल्या. ज्या ज्या वेळी दीक्षित स्वामींचा फोटो माझे नजरे समोर येई त्या त्या वेळी मी त्यांचे कडे बराचवेळ पहात बसे. पण त्यांच्या शांत गंभीर चेहऱ्याचे निरीक्षण करीत असता विशेष समाधान वाटत असे. यांचे काही चरित्र लिहिले आहे की काय? या बद्दल मठात चौकशी केली पण अद्याप लिहिले नसल्याचे त्यांनी सागितले. नंतर ज्या ज्या वेळी मला संधी मिळे त्या त्या वेळी त्यांचे विषयी मी चौकशी करु लागलो. आपण यांचे चरित्र लिहावे असे वरचे वर मनात येवू लागले.

पुढे काही दिवसांनी पीठाचे मुख्य व्यवस्थापक रा. हरिभाऊ कडेकर यांची गाठ घेतली आणि त्यांना मनोदय कळविला व त्यांनीही आनंदाने चरित्र लिहिण्यास परवानगी दिली.

नंतर बरेच दिवस खटपट करुन त्यांच्या घराण्याची माहिती जमविली पण पुढील माहिती पुष्कळ जणांकडे अनेक खेपा घालूनही मिळेना? मग लिहिणे कसे होणार? आणि प्रथम जे मला चरित्र लिहिण्याचे सोपे काम वाटत होते ते किती तरी कठीण वाटू लागले इतकेच नव्हे तर आपण उगाच या भानगडीत पडलो असेही वाटू लागले आणि आता पुढे  काय व कसे लिहावे ही विवंचना लागली. अशा स्थितीत एके रात्री 'एक स्वामी महाराज देवाजवळच्या एका ओवरीत बसले असता मी तेथे गेलो आणि त्यांना सहज नमस्कार केला' मी आत आलेला पाहताच 'काय हो ? तुम्ही महाराजांचे चरित्र लिहावयाला घेतले ना? कुठ पर्यंत आले?' असे त्यांनी विचारले.

'कुठले चरित्र आणि कुठले काय? इतके दिवसांत फक्त त्यांच्या घराण्याची माहिती लिहिली पण पुढे काहीच आधार मिळत नाही' मी निराशेनेच म्हटले.

'तुम्हाला आधारच का पाहिजे आहे ? मी देतो हा पहा' असे म्हणून त्यांनी एक चोपडी हातात घेऊन उघडली व तो आधार मला दाखवू लागले व मी ही जरा पुढे वाकून तो आधार पाहू लागलो आणि थोड्या वेळाने मी सांगितले, 'वा: ! ठिक आहे हा आधार, मला हे सर्व अक्षर लागतील. ते माझ्याकडे द्या'

'घ्या तर' असे म्हणून त्यांनी ती चोपडी माझ्या हातात टाकली व मी चटकन जागा झालो. पण माझ्या डोळ्यासमोर बराच वेळ पर्यंत ते स्वामी आणि ती काळी चोपडी मात्र दिसत होती.

आणि मौजेची गोष्ट म्हणजे दुसऱ्या दिवशी संध्याकाळी एक वृध्द गृहस्थ माझ्याकडे आले आणि म्हणाले, काय हो, 'तुम्ही दीक्षित स्वामी महाराजांचे चरित्र लिहिता आहात असे ऐकले ते खरे काय?'

'होय, घराण्याचा इतिहास लिहून झाला आहे. आता त्यांचे चरित्र लिहावयाला घेणार आहे' मी उत्तरलो.

'वा ! फारच स्तुत्य प्रयत्न. पुष्कळ दिवसापूर्वी काही मंडळी आपण लिहिणार असे म्हणत होती पण अद्याप पर्यंत योग आला नाही. आता आपण चरित्र लिहावयाला सुरवात केलेली ऐकून मला फार समाधान झाले. आणि ही आमच्या घरच्या वहीत काही माहिती त्यांच्या विषयीची पुष्कळ दिवसापूर्वी लिहून ठेवलेली आहे. यातील काही टाचणे व्यवस्थित नाहीत. पण बघा तुम्हाला याचा उपयोग झाला तर !' असे म्हणून त्यांनी ३-४ चोपड्या माझ्या स्वाधीन केल्या व ते निघून गेले आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या चोपड्यातही

एकच काळी चोपडी होती आणि ही साधन सामुग्री पाहून मला किती आनंद झाला हे सांगता येणार नाही. हे चरित्र महाराज माझ्याकडून पुरे करुन घेणार याबद्दल शंका राहिली नाही.

त्या चोपडीच्या आधारे व जी इतर विश्वसनीय माहिती मिळाली ती मी एकत्रित करुन यथामती लिहून पुरी केली आहे. माझा संकल्प त्यांनीच पुरा करुन घेतला आहे ही मौजेची व आनंदी गोष्ट आहे.

त्यांचा भक्तगण बराच मोठा असून खान्देश, वऱ्हाड, मध्यप्रांत इकडचे बाजूस लांबवर पसरलेला आहे. या पुस्तकाच्या वाचनाने त्यांनाही आपल्या महाराजांच्या गोड सहवासाचे स्मरण होईल, अशी आशा आहे.

सदर प्रसिध्द केलेल्या गोष्टीत व चरित्रात खरी माहिती देण्याविषयी शक्यतो मेहनत घेतलेली आहे. पण लोकांच्या सांगण्यावर विश्वास ठेवूनच संगती लावावी लागते. अशा स्थितीत काही चुका होणे अपरिहार्य आहे.

वास्तविक पाहूं गेले तर श्रीदीक्षित महाराजांचा मी भक्त नाही. त्यांना कधी पाहिले नाही. त्यांच्या गोष्टी ऐकल्या नाहीत अशा स्थितीत निमित्त मात्र मला पुढे करुन ही जी सद्‌गुरु सेवा घेतली यात काहीतरी रहस्य आहे.

अगदी लहानपणी श्रीगुरुंनी **'श्री समर्थ काका महाराज'** (पुराणीक, धोपेश्वर) यांचे रुपाने अगदी अल्प का होईना पण प्रत्यक्ष सेवा घेतली व अद्यापही थोडी बहूत घेत आहेत पण एखादे चरित्र लिहून श्रीगुरुंना अर्पण करावे असा माझा मनोदय आज पुष्कळ वर्षे होता. माझी दोन पुस्तके (कादंबऱ्या) 'मातृदेवोभव'

'पितृदेवोभव' यांना अर्पण केलेली पाहून पूज्य प्रख्यात भागवत् भक्त व खंदे लेखक श्री. 'गोविंद सुत' अमळनेर. यांनी मागे एकदा विनोदाने सांगितले होते की 'आता पुस्तक अर्पण करण्याची पाळी 'आचार्यदेवोभव' यांची आली आहे. त्यांना कादंबरीच का तुम्ही अर्पण करणार ? त्यांना साजेसे वाचन व मनन ठेऊन त्यांना योग्य असे एखादे चरित्र अर्पण करता येईल. इ.' त्यांनी सांगितले व मी ही विनोदानेच ऐकले. कारण ही गोष्ट मजकडून तडीस जाईल ही गोष्ट मात्र संभवनीय दिसेना. पण श्रीगुरुंचीच इच्छा झाल्यावर काय होणार नाही ? ते काय करुन घेणार नाहीत ? मला काही तरी निमित्त करुन मौजेनेच आपल्या ह्या **'दत्तसिध्द नगरात'** आणले आणि दोन तीन महिन्यांत आपल्याच एका अवताराचे मौजेनेच चरित्र लिहून घेतले.

मजकडून सेवा न होता सुध्दा श्रीगुरुंनी ही मौजेची कृपा केली, यांचे कारण म्हणजे मी त्यांचा ग्रामस्थ आहे.

श्रीदत्त गुंरुची स्वारी रोज आमच्या गावी धोपेश्वरी मृडानि तीरावर भस्म लेपना करिता येत असते अर्थात ती ओळख ठेऊन त्यांनी वत्सलता प्रगट केली. अशीच मौजेची कृपा दृष्टी असो अशी श्रीचरणी नम्र प्रार्थना करुन वाचकांची रजा घेतो.

सत्संग कार्यालय नं.१<br>
शांतता-मंदीर, धोपेश्वर.

श्रींचा दासानुदास<br>
शामराव परशूराम नवरे

## गुरु प्रशस्ती

### कवि-सच्चिदानन्द

सर्वात्मा गुहरेक एवरहसि ध्यायाम्यहं श्रीगुरुं ॥
धन्योहं गुरुणा कृतोस्मि गुरवे सर्वं ददेऽहं परम् ॥
तत्वं नास्ति गुरोर्गुरो: पदपथ: सेवेमनोमे गुरौ ॥
स्थैर्यंयातु गुरोगुरोऽहमितितं संबोधयेत्सर्वदा ॥ १ ॥

श्रीहरि जसा सुखावे अत्यंतचि गुरु गुणानुवादानें ।
न तपे न पुरश्चरणे वेदाध्ययने व्रते न वा दानें ॥ १ ॥
गुरुच्या स्तोत्रे तोषा अन्यानें मी न बालका लाहें ।
काशीक्षेत्रीं वदले वचन श्री विष्णु दीपकाला हें ॥ २ ॥
किंबहुना शिवसांगे मजहूनहि गुरुच थोर यास्तव हो ॥
हीच मदिच्छा गुरुचा दुष्कर यद्यपि मयाभति स्तव हो ॥ ३ ॥

## वाडी(अमरापुर) हे स्थान श्री दत्तगुरुंनी कां पसंत केले?

मनोहरं अनुपम मविमुक्त पुरीसमं ।
प्रयागवत्संगमंच दृष्टवा तस्यौ परात्पर: ॥ १ ॥
कैलासवासी गिरिजा विलासी
काशीनिवासी अमरेश्वरोसौ ॥ १ ॥
श्री काशीगंगा मणिकर्णिका चा ऽ
मरापुरे सर्वतीर्थे वसंति ॥ २ ॥

श्री दत्तगुरु यात्रेच्या निमित्ताने जरी ठिकठिकाणी फिरत होते तथापि त्यांचा हेतू नुसता यात्रा करण्याचा नव्हता तर यात्रा करिता करिता आपद्ग्रस्त पण भाविक मंडळी जी असेल त्यांचा

उध्दार व्हावा हाच हेतू मुख्यत्वें करुन होता, या पृथ्वीच्या पाठीवर कितीतरी महत्वाची तीर्थे, क्षेत्रे-स्थाने काही प्रसिध्द काही अप्रसिध्द आहेत. त्यातील काही स्थानांचे महत्व लोकांना पटवून देऊन आचार-धर्म मार्गाचे महत्व दाखवून, मंडळींनी त्या मार्गाचे अवलंबन करुन, आपल्या देहाचे सार्थक करावे, हा भवसागर तरुन जावा याच वात्सल्याने त्यांनी इतक्या लांब ठिकाणी प्रवास केला. मूळ शिवस्वरुपी आपले जे भू कैलास गोकर्ण क्षेत्र तेथील महत्व त्यांनी वर्णन केले आहे. औदुंबर, गाणगापूर, कुरवपूर इ. ठिकाणी जी तीर्थे गुप्त होती ती प्रगट करुन तेथील महिमा लोकांना सांगून व आपण प्रत्यक्ष आचरण करुन दाखविला आहे.

कृष्णा, पंचगंगा संगमावर अमरापुर नावाचे क्षेत्र आहे व तेथें अमरेश्वर नावाचा देव आहे. काशी क्षेत्रात ज्या प्रमाणे गंगा भागीरथी त्याच प्रमाणे अमरापुरात पंचगंगा संगम थोर आहे. त्या अमरेश्वरा जवळ ६४ योगिनी राहातात. तेथे शक्तितीर्थ आहे. अमरेश्वर लिंग आहे. प्रयागी माघस्नान करितां जे पुण्य मिळते त्यापेक्षा शतपट जास्त पुण्य एका स्नानाचें येथे मिळते. त्याच प्रमाणे नदी संगमाचे ठिकाणी प्रयागासारखे पुण्य आहे. कारण या ठिकाणी परब्रह्म अमरेश्वर रहात असल्यामुळे येथे कोटी तीर्थे येऊन राहिलेली आहेत. येथे गंगा वेणी सहीत दक्षिणी वहात आहे. त्या सर्व तीर्थाचा महिमा पुष्कळच आहे. पण त्यातल्या त्यात आठ तीर्थे कृष्णा प्रवाहांत मुख्य आहेत. उत्तर दिशेला कृष्णा पश्चिम मुखी वाहात आहे. येथे शुक्ल तीर्थ आहे आणि औदुंबराजवळ पापविनाशी, काम्य आणि तिसरे सिध्द वरद अमरेश्वरा जवळ आहे. पुढे संगमषट् कुळांत प्रयाग तीर्थ आहे. शक्तितीर्थ, अमरतीर्थ, कोटितीर्थ आणि असे हे रम्य पुण्य पावन क्षेत्र म्हणून श्रीदत्तगुरु तेथे राहिले.

कृष्णा आणि वेणी मिळून दोन नद्या आणि पुढे पाच मिळून सात नद्यांचा संगम मोठा पुण्यकारक आहे. एका स्नानानें ब्रह्महत्यादि पापे नाश पावतात. येथील क्षेत्राच्या दर्शनाने सुध्दा अभीष्ट कामे होतात. मग स्नानाचे फल काय विचारावयास पाहिजे ? तेथील औदुंबर वृक्ष-साक्षात् कल्पवृक्ष आहे आणि एवढ्याच करिता श्रीगुरुंनी ही जागा पसंत केली.

दत्तगुरु या स्थानी रहावयाला आल्यानंतर ते नित्य गावात अमरापुरला दुपारी भिक्षेला जात असत. त्या गावात एक वेदाभ्यासक ब्राम्हण राहात होता. त्याची स्त्री पतिव्रता असून सुशील होती. तो कोरान्न मागून पंच महायज्ञादी कर्ममार्गाचे आचरण करुन सात्वीक वृत्तीने रहात होता. त्या ब्राम्हणाचे अंगणात एक मोठा घेवड्याचा वेल पसरलेला होता. त्या शेंगांवर त्यांचा पुष्कळसा निर्वाह होई. एखाद्या दिवशी जर भिक्षा पुरेशी न मिळाली तर शेंगावरच त्याची वेळ जाई. तो श्रीगुरुंची पूजा नित्य करुन अतीत अभ्यागत प्रेमाने करी. श्रीगुरुला तो घेवड्याची भाजी अत्यंत भक्तिने अर्पण करी. एके दिवशी श्रीगुरुंची स्वारी त्याचे कडे जाताच त्याने आनंदाने त्यांचे स्वागत करुन त्यांना जेवायला ठेवून घेतले. त्याच्या कडील जेवणाने व आदरतीथ्याने श्रीगुरुंना परम संतोष होऊन प्रसन्न मनाने म्हणाले, 'बाबारे, तुझे दारिद्र्य दोष जे होते ते सर्व नाहिसे झाले' इ. बोलून तो ज्या ठिकाणी वेल होता तेथे गेले आणि त्यांनी त्या घेवड्याचे मूळ उपटून टाकले व आपण संगमावर गेले.

इकडे वेल उपटून टाकल्यामुळे त्या ब्राम्हणाची स्त्री अत्यंत शोकाकुल होऊन आपल्या पतीला म्हणाली, 'आमचे व आमच्या पोरांचे अन्न या योग्याने कां काढून टाकिले ? आम्ही त्याचे असे वाईट काय केले होते.' तेव्हा तो ब्राम्हण म्हणाला, 'आपले 'प्रारब्ध' म्हणून त्याला तशी बुध्दी झाली. हा सर्व आपल्या नशिबाचा दोष आहे. तू आपले अन्न

गेले म्हणून हाका मारतीस पण त्याची काळजी आपणास नको. सिंहासारख्या क्रूर पशूंच्या व मुंग्या सारख्या अगदी लहान गरीब जीवांच्या आहाराची ज्याने सोय केली आहे, तो आमची सोय केल्याशिवाय थोडीच रहाणार ? ज्याने आपणाला जन्म दिला तोच त्याची काळजी करणारा. म्हणून शांत मनाने त्यालाच शरण जावे. देवाला दोष देऊन काय होणार ? इ.' तीची समजूत करुन तोडलेला तो वेल त्या झाडावरचा काढून टाकून ती जागा साफ करण्याकरिता तो तेथे खणू लागला.

इतक्यात त्या वेलाच्या बुडाशी त्याला द्रव्याचा हंडा असलेला दिसला . मग काय विचारतां ? त्याला अत्यंत आनंद झाला. तो हंडा उचलून त्याने घरात नेला आणि स्त्रीला म्हणाला, 'अग, योगेश्वराने आपले व आपल्या मुलाबाळांचे अन्न काढले नसून ते उलट आम्हाला भरपूर दिले ते आपल्यावर प्रसन्न झाले बरे.' 'तुझे दारिद्र्या दोष गेले.' म्हणून त्याने तो भरलेला हंडा तिला दाखविला.

दोघांनाही हा मनुष्य नसून परमेश्वर आहे अशी खात्री होऊन हे वर्तमान त्या गुरुला सांगण्या करिता धावतच ते दांपत्य संगमावर गेले.

योग्याला सर्व हकीकत सांगून त्यांनी त्याची पूजा वगैरे केली. त्यावेळी योगी म्हणाला, 'ही गोष्ट तुम्ही कोणाला सांगू नका म्हणजे ही लक्ष्मी तुमच्या घरी वंशोवंशी राहील आणि जर प्रगट कराल तर मात्र ती जाईल.' असे सांगून आपला जो गृहस्थाश्रम आहे त्याप्रमाणे वागून तुम्ही-आनंदाने-समाधानाने वागून पुत्र पौत्रांसहीत आनंदाने नांदा असा आशीर्वाद देऊन त्यांना घरी पाठविले.

श्रीगुरुंनी अशा या रम्य व पुण्य पावन संगमावर १२ वर्षे तपश्चर्या केली. अमरापुरांतील ब्राम्हणाचे दारिद्र्य घालविले. दुसरा

त्यांचा भक्त गंगानुज याची सेवा पाहून संतुष्ट झाले आणि आपण ज्या व्याघ्रचर्मावर बसले होते ते आसन त्याला घट्ट धरावयाला सांगून त्यांनी मनोवेगाने सकाळी गमन करुन प्रयाग, काशी व गया अशी त्रिस्थळीची यात्रा त्याला दाखवून संध्याकाळी पुन: त्याला संगमावर आणून सोडले इ.

वरील चमत्कार करुन दाखविल्यानंतर त्यांनी आपण आता येथून गुप्त व्हावे असा विचार करुन अमरेश्वराला विचारुन ते दुसरीकडे जावयाला निघाले. त्यावेळी चौसष्ट योगिनींनी येऊन प्रार्थना केली की, 'आपण येथून दुसरीकडे जाऊ नका' त्यावर श्रीगुरुंनी सांगितले की, अमरापुरांतल्या पश्चिमतीराला जो औदुंबर आहे तेच आमचे आवडते स्थान. आम्ही तेथे नक्की आहोत. हे स्थान पुढे प्रसिध्दीस येईल. अन्नपूर्णेलाही येथेच ठेविले आहे. तुमच्या सह औदुंबर आणि आमच्या 'मनोहर' पादुका यांची जो भक्ती श्रध्देनें पूजा अर्चा करील त्याला तुम्ही साह्य करावे म्हणजे त्याच्या सर्व कामना सिध्द होतील.' असा योगिनींना वर देऊन श्रीगुरु भीमातीराला (गाणगापूर) गेले.

यांचे नाव श्री नृसिंहसरस्वती स्वामी, जन्म नाव नरहरी व म्हणून नरहरी-नरसोबा म्हणूनच या क्षेत्राला नरसोबावाडी असे नाव पडले व  वाडी हे क्षेत्र प्रगट झाले. पूर्वी येथे सर्व जंगल होते.

श्रीगुरुंनी ज्या आपल्या 'मनोहर पादुका' येथे ठेवल्या आहेत त्यांच्या पूजनाने अलीकडे सुध्दा हजारो लोक अनुभव घेऊन दु:ख मुक्त होत असलेले आजही आपण पाहात आहोत आणि या मनोहर पादुकांच्या समोर नदी पलीकडे अमरापूर आहे त्याला औरवाड असेही म्हणतात. तेथे अमरेश्वर व चौसष्ट योगिनी आहेत.

## श्रीनृसिंहवाडी येथे वास्तव्य केलेले सिध्द पुरुष.

१. श्री रामचंद्र योगी
२. श्री नारायण स्वामी
३. श्री काशीकर स्वामी
४. श्री गोपाळ स्वामी
५. श्री मौनी स्वामी
६. श्री गोविंद स्वामी
७. श्री टेंबेस्वामी
८. श्री दीक्षितस्वामी
९. श्री प. पू. वक्रतुंडमहाराज कवीश्वर
१०. प. पू. श्री धुंडीराज महाराज कवीश्वर
११. प. पू. श्री गुळवणी महाराज
१२. प. पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर
१३. प. प. श्री नारायणानंद यती महाराज (उगारस्वामी)

### १. श्री रामचंद्रयोगी

श्रीरामचंद्रयोगी हे तर श्रीदत्त नृसिंहसरस्वतींच्या पूर्वीच वाडीत येऊन त्यांच्या सहवासाकरिता त्यांची वाट पहात राहिले होते. किंबहुना या योगीश्वरांची आपणावरील ही उत्कट प्रेमभक्ति ओळखूनच त्यांना भेट देण्याकरितांच दत्तप्रभू त्यांना हुडकीतच जणू या संगमावरील जंगलात प्रथम आले असे म्हंटले तरी चालेल. कारण प्रभू तसा भक्तांचा लोभीच आहे. वृध्द लोक असे सांगत की, ज्या वेळी श्रीगुरु येथे येऊन श्रीरामचंद्रयोगीं पुढे उभे राहिले, त्या वेळी त्यांनी प्रभूंना बसण्यासाठी मृगासन त्यांच्या पुढे मांडिले. प्रभूंनी आपल्या भक्ताचा बहुमान करावा या हेतूने 'मला कशाला आसन देता तुम्हीच यावर बसा' असे प्रेमोद्गार काढले. त्यासरशी रामचंद्रयोगी लगेच त्या आसनावर स्वत: बसले, तेंव्हा त्यांना प्रभू म्हणाले, 'योगिराज ! आंम्हाला दिलेल्या आसनावर तुम्हीच बसलां?' योगी म्हणाले, 'प्रभुजी ! मी आपल्याकडून मला येथे आसन मिळावे म्हणून तपश्चर्या करीत होतो, तिचे फळ मला मिळाले. आपल्या आशीर्वादाने मी आता येथे स्थिर झालो, मला आता भय नाही.' देव म्हणाले तुम्ही आपली

सोय करून घेतलीत. पण आता आम्ही कोठे बसावे? योगिराज म्हणाले, आपले स्थान औदुंबरतरुतळी ठरलेलेच आहे. त्याला आपणच तसा वर दिलेला आहे. याप्रमाणे प्रेमसंवाद भक्ताबरोबर करून श्रीनृसिंहप्रभु औदुंबराखाली जाऊन राहिले. पुढे काही काळाने रामचंद्रयोग्यानी प्रभूंच्या हस्ते जिवंत समाधि घेतली. त्या वेळी त्यांना नृसिंहप्रभूंनी प्रेमाने वरदान दिले की, 'तुमची सेवा कोणी केली असता ती आम्हाला पोचेल व तिचे फळ सेवकाला आम्ही देऊ' म्हणून कित्येक सेवेकरी दत्तापाशी गर्दी असल्यास रामचंद्रयोग्यांच्या मंदिरालाच प्रदक्षिणा घालतात व त्या आपण दत्तालाच घातल्या असे समजतात. यांना दहिभाताची पूजा बांधण्याची भक्तांची प्रथा आहे.

ज्या वेळी कट्ट्यावर पाणी असते त्यावेळी तेथील सर्व सेवा या योगीराजांकडे करावयाची. ती श्रीदत्तगुरुंना पोहोचते. असा अद्यापही अनुभव आहे.

ज्येष्ठ व.१४ ला यांचा उत्सव होत असतो.

## २. श्री नारायणस्वामी

ज्याप्रमाणे वारकरी संप्रदायाच्या पारमार्थिक इतिहासामध्ये संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचे स्थान ध्रुवपदाप्रमाणे अढळ आहे, त्याप्रमाणे संतश्रेष्ठ नारायण स्वामींचे श्रीक्षेत्र नृसिंहवाडीतील स्थान ध्रुवाप्रमाणे अढळ आहे. श्री दत्तात्रेयांनी या आपल्या अंतरंग एकमेवाद्वितीय शिष्याला व त्यांच्या उत्कट भक्तीला प्रसन्न होऊन 'अग्रपूजेचा' अधिकार बहाल करून त्याप्रमाणे आजही दत्तात्रेयांच्या पूर्वी त्यांची पूजा प्रथम केली जाते.

नारायण स्वामींचा जन्म विसापूर (कर्नाटक) गावातील गार्ग्यगोत्री जोशी कुटुंबात झाला. उपनयनानंतर वेदशास्त्रांचा सांगोपांग अभ्यास केला. नेहमी ब्रह्मकर्मात रमणाऱ्या स्वामींनी 'जन्मभर अपराजित राहीन', अशी महत्त्वाकांक्षा मनाशी ठेवून काशी

क्षेत्री प्रयाण केले. तेथील सद्गुरुंच्या कडून ज्ञान प्राप्त करुन घेतले आणि गुरुंनी त्यांच्या कडून **'आजन्म कोणाशीही वाद घालणार नाही असा संकल्प सोड'** अशी गुरुदक्षिणा घेतली आणि आशीर्वाद दिला, 'पुढे साक्षात् श्रीदत्तप्रभू तुंम्हाला संन्यास देऊन कृतार्थ करतील.' त्यामुळे त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली.

सद्गुरुंच्या आशीर्वादाने अत्यानंदित झालेले नारायणशास्त्री कोल्हापुरात आल्यानंतर ते वाडीस श्रीदत्त दर्शनास आले. कृष्णा पंचगंगा तीरावरील निवासी भक्तकामकल्पद्रुम श्रीनृसिंहसरस्वती महाराज तुमच्यावर कृपा करुन स्वत:च तुम्हाला चातुर्थाश्रमाची दीक्षा देऊन कृतार्थ करतील. या महालक्ष्मीच्याही आशीर्वादाप्रमाणे विरक्त वृत्तीने व दत्तभक्तीने प्रेरित झालेले हे विद्वान्शास्त्री, वाडीत पादुकारुपाने वास्तव्य करणाऱ्या श्रीनृसिंह सरस्वतींचे शिष्य बनले.

भक्ताच्या मनीची इच्छा जाणून घेणाऱ्या श्री नृसिंहसरस्वतींनी कृष्णा पंचगंगा संगमावर त्यांना घेऊन जाऊन संगमातील पाण्याखाली दिव्य मंदिरात संन्यास दीक्षा दिली. त्यासाठी आवश्यक प्रायश्चित्त देऊन, दंड, कमंडलू, काषायवस्त्रादि देऊन **'नारायण सरस्वती'** असे नांव ठेविले. नंतर वर येऊन संन्यासी वेषात गुरुपादुकांच्या दर्शनासाठी मंडपात येऊन पादुकांना परमप्रेमाने दंडवत केला. दंडधारी वेषात गावात आल्यानंतर पुजारी मंडळी शंकित झाली तेव्हा श्रीनृसिंहसरस्वती स्वामी दत्तप्रभूंनी पुजाऱ्यांना दृष्टांत देऊन सर्व हकिकत कथन केली. त्यानंतर **'नारायण स्वामी'** हे महापुरुष असल्याची साक्ष पटली व पुजारी मंडळी स्वामींना वंदनीय मानू लागली.

नारायण स्वामींची कीर्ती सर्वत्र पसरली. कोल्हापूरचे छत्रपती त्यांना मानीत असत. नृसिंहवाडीत चैत्र अमावस्येच्या दिवशी श्रीनारायणस्वामींना नेण्यास आकाशात किंकिणी विमान आलेले

श्रीगोपाळस्वामींनी पाहिले. त्याच पुष्पकारुढ विमानात आरुढ होऊन वैकुंठगमन केल्यानंतर, त्यांनी आपले परम शिष्य श्री कृष्णानंद स्वामींना आपुल्या पादुका स्थापून त्यांचे नित्य अर्चन करण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे दत्तगुरुंच्या पश्चिम भागी व श्री उत्सवमूर्तींच्या उजव्या बाजूस नारायण स्वामींच्या सुंदर अशा पादुका स्थापन केल्या. म्हणून उत्सवमूर्तींच्या सान्निध्यात त्यांना अक्षय असे ध्रुवपद दिले. आजही नित्य प्रात:काळी श्रीदत्तगुरुंच्या पूजेच्या आधी श्रीमन् नारायण स्वामींची पूजा करतात. हे स्थान अतिशय जागृत व कडक आहे. त्यांचे वास्तव्य वाडीत शाश्वत आहे, असे अनुभूतीतून सिध्द होते. अग्रपूजाधिकारी श्रीमद् नारायण स्वामींच्या सारख्या अवतारी पुरुषांच्या कृपाशीर्वादाने नरसोबावाडीतील मंडळी त्यांची सेवा करीत आहेत. अशीच सेवा वंशोवंशी आमच्याकडून करुन घेऊन निरंतर कल्याण करावे ही श्रीमद् नारायण स्वामींच्या पवित्र चरणी प्रार्थना!

श्री प. प. श्री नारायण स्वामींचे चरित्र १९६२ साली पुण्यात श्री प. पू. योगिराज गुळवणी महाराजांनी (गुरुमहाराज) प्रकाशित केले. श्री गुरुमहाराजांच्या घराण्याचे कुलगुरु श्री नारायणस्वामी होते. त्यावेळच्या स्वत: गुरुमहाराजांनी लिहिलेल्या प्रस्तावनेचा थोडा 'अमृतमयी मार्गदर्शक' अंश या संबंधाने पुनश्च सर्वांच्या ''चिंतना''साठी, कल्याणासाठी उद्घृत करीत आहे :-

''असोनि सर्वत्र गुरुप्रसादाविना न लाभे करिताही खेदा। भेदाची वार्ता करी जो अपार्थ, तो पूर्ण आनंद गुरुसमर्थ' याप्रमाणे सद्गुरु श्री वासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराज गुरुस्वरुपांचे महात्म्य वर्णन करीत आहेत. गुरुप्रसादानेच ईश्वराची सर्व व्यापकता, श्रीनामदेवासारखे श्रेष्ठ भक्त जाणू शकले हे प्रसिद्ध आहे. गुरुप्रसाद मिळविण्याकरिता काय साधने करावीत, साधकाने सिद्धावस्था प्राप्त झाल्यानंतरही भगवत्प्रेमातच कसे रंगून जावे, ज्ञानी पुरुष,

सगुणनिर्गुण उभयानंदाचा आस्वाद घेत राहूनही, लोकसंग्रहादि व्यवहारही भगवत्प्रेरणेने किती चोख रीतीने पार पाडू शकतो, भगवद्‌भक्ताचे ठिकाणी, अमानित्वादी ज्ञानसाधनांचा व अभयसत्वसंशुद्ध्यादि दैवी संपत्तीचा विकास, केवळ भगवद्कृपेनेच कसा होतो इत्यादि अनेक विषयांचे ज्ञान- ग्रंथचरित्राचे चिंतनाने सहज होईल. स्वकर्मसूत्राने जखडलेल्या जीवांना हे ज्ञान अत्यंत आवश्यक आहे. ते करुन देण्याकरिताच श्रीभगवंताचे व भगवद्विभूतिरुप संतांचे अवतार वेळोवेळी या भारतवर्षात होऊन राहिले आहेत. 'सन्निकर्षोऽन्नत्र्यानामनादरणकारणम्' अशी काहीशी स्थिती दुर्दैवाने आज भारतवर्षात दिसून राहिली आहे. ती दूर होऊन, 'ददामि बुद्धियोग तं येन मामूपयान्ति ते' अशा भगवत्कृपेची पात्रता अधिकारी सज्जनांना ईशकृपेने लाभावी आणि 'दुरितांचे तिमिर जावो। विश्वस्वधर्म सूर्ये पाहो। जो जे वांछील तो ते लाहो। प्राणिजात॥१॥ चन्द्रमे जे अलांछन मार्तंड जे तापहीन। ते सर्वांही सदा सज्जन। सोयरे होतूं ॥२॥ किंबहुना सर्वसुखी। पूर्ण होवोनि तिहीलोकी। भजिजो आदिपुरुषी अखंडित॥३॥''

**श्रीमन् नारायण स्वामिन् । दयाब्धे तारकपद दायिन् ॥**

## ३. प.प. श्री कृष्णानंद स्वामी (काशीकर स्वामी)

आदर्श गुरु सेवक म्हणून प्रसिद्ध असलेल्या संदीपक, आरुणी उपमन्यू इ. आदर्श शिष्यांच्या यादीमध्ये कृष्णानंदांचे नाव आवर्जून घालण्यासारखी प्रखर गुरुनिष्ठा त्यांच्या ठायी जन्मजात होती म्हणून नरसोबावाडीतील तपोनिधीच्या मालिकेत त्यांचे नाव आदर्श गुरु सेवक म्हणून आदराने घेतले जाते.

गुरु हेच अंतिम सत्य आहे. ह्या तत्वाचा अंगीकार करुन काया, वाचा, मनाने अष्टौप्रहर गुरुंची सेवा करणारे हे स्वामी

गुरुस्वरुप झाले. त्यांच्या कृतार्थ जीवनाचा महत्वाचा कालावधी श्रीक्षेत्री वाडीतच झाल्याने त्यांचे वाडीवर निस्सीम प्रेम होते. गुरुकृपेने महापुरुषांच्या सत्संगाने अनेक यात्रा सविधान पायी केल्या. नारायण स्वामींच्या कृपेने कडकडीत वैराग्य निर्माण होऊन ते ज्ञानाधिकारी बनले. ब्रह्मचर्यातूनच त्यांनी संन्यासाश्रम स्वीकारला. त्यांची धर्मनिष्ठा, शास्त्रनिष्ठा, गुरुनिष्ठा ह्या निष्ठात्रयीला प्रसन्न होऊन आपल्या आनंद साम्राज्यावर विराजमान करुन नारायणस्वामींनी गुरुसेवा हे साधन सर्वश्रेष्ठ आहे हे दाखवून दिले. त्यांच्या सारखी गुरुसेवा करण्यास कोणीही समर्थ नव्हते. दत्तसांप्रदायामध्ये 'गुरुसेवेस' अनन्य साधारण महत्व आहे. संन्यासधर्माचे पालन करुन गुरुपूजा, गुरुस्तुती, गुरुस्मरण करुनच गुरुरुप बनले.

यांनी संस्कृतामध्ये **'अज्ञान तिमिर दीपक'** नावाचा ग्रंथ लिहून त्यात वेदांत रहस्याची उकल केली आहे. ईश्वर प्राप्तीचा मार्ग शुद्ध वा सुबोध करुन सांगितला आहे.

असे अखंड सेवा करणारे श्री कृष्णानंद स्वामी गुरुकृपेने ''याची देही याची डोळा'' मुक्तिचा सोहळा पाहून शके १७४१ फाल्गुन व।। ७ शनिवारी प्रात:काली गुरुचरणी लीन झाले. कृष्णानंद सरस्वती स्वामी हे वाडीतील परंपरागत ५५० वर्षे दत्तगुरुंची अखंड सेवा करणाऱ्या पूजक मंडळींच्यासाठी प्रेरणाकेंद्र आहेत. त्यांनी केलेल्या आदर्श गुरुसेवेसारखी सेवा आमच्याकडून त्यांनी करुन घ्यावी हीच त्यांच्या चरणी विनम्र प्रार्थना!

श्री नारायणस्वामींचे एकनिष्ठ शिष्य म्हणून व गुरु-शिष्यांच्या उत्कट प्रेमाचे प्रतीक म्हणून नारायण स्वामींच्या मंदिराच्या डाव्या बाजूला श्री कृष्णानंद स्वामींच्या सुंदर पादुका स्थापन करण्यात आल्या. स्वामींचे पूजक मंडळींवर अत्यंत प्रेम होते. आजही या मनोहर पादुकांचे त्रिकाळ अर्चन केले जाते.

## ४. श्री गोपाळ स्वामी.

श्री रामचंद्र योगींच्यानंतर त्यांच्याच मार्गावरुन मार्गक्रमण करुन 'संजीवन समाधी' घेणाऱ्या श्री गोपाळ स्वामींचा ह्या क्षेत्राच्या उत्कर्षात बहुमोल वाटा आहे. त्यांनी संन्यासाश्रम घेऊन भरत खंडातील सर्व तीर्थक्षेत्रांना पावन केले. त्यानंतर नरसोबावाडी येथे येऊन, श्री दत्त पादुकांची त्रिकाळ सेवा करुन अष्टांग योग सिद्ध करुन ब्रह्मानंदामधे ते निमग्न होऊन राहिले.

गोपाळ स्वामी महाराज सर्वश्रेष्ठ अर्चक व भजक होते. तत्परता व दक्षता हे अलौकि गुण त्यांच्या ठायी होते. सकलगुण चक्रवर्ती महामहिम तपोनिधी होते. दत्तमहाराजांच्या कृपाशीर्वादाने प्राप्त झालेल्या काही जमीनीचे मालक श्रीपाद स्वामी असून त्यांचा विनियोग गुरुद्वादशी-च्यासाठी केला जातो. याबाबत तक्रार होऊन पुजारी मंडळींवर संकट आले.

औरवाड व गौरवाड हे बादशहाने देवाला दिलेले दोन इनामी गाव पुजाऱ्यांच्या वहिवाटीत असलेले, पेशवे सरकारने जप्त केले होते. त्यांचा वसूल ते आपणाच घेत असत ते सोडवून आणण्याकरिता देवाची आज्ञा घेऊन गोपाळस्वामी पुण्याला जात असता, वाटेत विरुध्द लोकांनी त्यांना मोठ्या संकटात पाडले तेव्हा श्रीदत्तप्रभू वाचून आपला कोणी वाली नाही असे जाणून त्यांनी उत्कंठेने प्रभूचा धावा केला. प्रभूंनी बैराग्याच्या रुपाने प्रगट होऊन त्यांच्या कपाळी विभूति लाविली व 'गोपाळा तुला अभय आहे. कार्यसिध्दि करुन ये' असा आशीर्वाद दिला. नंतर पेशव्यांच्या दरबारात जाऊन त्यांनी पेशव्यांची नीट समजूत करुन देऊन, ते दोन गाव सनदशीर पध्दतीने परत घेतले व पुजाऱ्यांचे पुजाऱ्यांना पूर्ववत वहिवाटीला दिले.

त्यावेळी हा प्रश्न दत्तगुरुंच्या कृपेने सुटला व त्यासाठी गोपाळस्वामींच्या मिळालेल्या प्रेमाशीर्वादावरुन त्यांचे असणारे प्रेम

दिसून येते. त्यावेळी पुजाऱ्यांची बाजू पुण्याला मांडण्यासाठी गेलेल्या गोपाळ स्वामींच्यावर आलेल्या मारेकऱ्यांच्या संकटातून श्रीपाद श्रीवल्लभांनी भस्म लावून जागृत केले व 'तुला अभय आहे' असा आशीर्वाद दिला. हे नेहमी समाधी लावून बसत असत. ब्रह्मविद्वरिष्ठ स्वामी दत्तात्रेयांच्या आज्ञेने **'संजीवन समाधी'** घेण्याचे ठरवून त्यांनी आपले समाधीस्थान नक्की केले. गुहेच्या रुपात ते दगडांनी बांधून घेतले.

दत्तात्रेयांच्या आज्ञेने वैशाख वद्य ॥ द्वादशी शके १६७४ मध्ये त्या पवित्र दिनी नित्याप्रमाणे आन्हिक करुन आपल्या शिष्यांना दयार्द्र अंत:करणाने भरपूर आशीर्वाद देऊन तृप्त केले. महापुरुषांचे अंत:करण कसे विशाल असते त्याचा प्रत्यय आला. स्वामी योगबळाच्या आधारे संजीवन समाधिस्थ झाले. त्या ठिकाणी एक शिवलिंग स्थापन केले. त्याची त्रिकाळ नित्य पूजा केली जाते.

श्रीमद् गोपाळ स्वामींनी नरसोबावाडीच्या दत्त देवांच्या नित्य नंदादीप, तूप, उत्सवादी कार्यक्रमासाठी १६ एकराची जमीन संपादित करुन ठेवली होती. या जमिनीला **'समाधी जमीन'** असे म्हणतात. ही जमीन शुक्लतीर्थाच्या काठावर आहे. याच ठिकाणी दर बारा वर्षांनी येणाऱ्या कन्यागत महापर्व काळासाठी श्रींची उत्सवमूर्ती स्नानासाठी जाते. तेथेच हा सोहळा संपन्न होतो.

श्रीमद् गोपाळस्वामींचा संजीवन समाधी दिन अभिषेक महापूजा इत्यादी कार्यक्रमांनी साजरा केला जातो. अशा या तपोभूमीत अनेक महामहिम सत्पुरुषांनी वास्तव्य करुन चिरंतन समाधी स्वरुपात राहून ह्या तपोभूमीचे पावित्र्य वृध्दिंगत केलेले आहे. आमच्या पूर्वजांच्या प्रमाणे दत्तात्रेयांची अष्टौप्रहर सेवा करणे हे आमचे आदिम कर्तव्य आहे.

काही वर्षापूर्वी एकाला दृष्टांत झाला की अश्वत्थाची एक मुळी माझ्या कानाला लागत आहे तरी ती काढून टाक त्या प्रमाणे त्यांनी खणून ती मुळी काढून टाकली पण त्यावेळी सुध्दा ते समाधी सुखात मग्न होते. नंतर पुन: त्याने पूर्ववत बांधून घेतले.

## ५. श्री मौनीस्वामी.

**'मौनव्याख्या प्रकटीत'** या आचार्योक्तिचे मूर्तिमंत स्वरुप असणारे श्रीमद् मौनी स्वामी श्रीक्षेत्र नरसोबावाडीतील प्रधान मंत्री मंडळातील आदर्श, विदेही, महापुरुष होते. सोलापूरातील एका पवित्र देशस्थ ब्राम्हण कुळात मौनीस्वामींचा जन्म झाला. जन्मत:च नित्य शुध्द, मुक्त, व सप्तम भूमीकारुढ अशी उत्तम पुरुष लक्षण असणारे ते एक अवलीया होते. सदाचार संपन्नतेने दत्तगुरुची उपासना करित पंचाग्नी सारखी दुष्कर साधने देहाची तमा न बाळगता परमेश्वर प्राप्तीसाठी केली होती. त्यासाठी 'मौन' हे अत्यंत प्रिय साधन असल्याने ते 'मौनी स्वामी' म्हणून चिरपरिचित होते.

उत्तम प्रकारे सेवा करुन सिध्दावस्थेत पोहोचलेल्या मौनीस्वामींनी २५ व्या वर्षी दत्तगुरुंच्या आज्ञेने चातुर्थाश्रम स्वीकारला. त्यानंतर श्रीमद् प.पू. प्रद्युम्नानंद सरस्वती या नावाने परिचित झाले. खडतर तपश्चर्ये मुळेच त्यांना वाचासिध्दी प्राप्त झाली होती. त्या सिध्दीने अनेक भक्तजनांचे कल्याण केले. शरण आलेल्या अनेक आर्त श्रध्दाळू भक्तांचा उध्दार दयाळू अंत:करणाने केला. पुजाऱ्यांना पूजेसाठी ते मौलीक मार्गदर्शन करीत असत.

आपल्या अलौकिक सामर्थ्याने अतिशय दुर्मिळ यज्ञ त्यांनी नृसिंहवाडीत अहिताग्नी भारतीबाबा कवीश्वर यांचे कडून करविला. त्यावेळी यज्ञासाठी आवश्यक असणारे गायीचे तूप यज्ञाच्या वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे सर्व मंडळी महाराजांना शरण गेली. त्यानुसार वाचासिध्दिच्या योगाने कृष्णामाईच्या पात्रातून भरुन नेलेल्या

घागरीमधे तूप निर्माण झाले. यावरुन त्यांच्या अंगी असणाऱ्या दैवी सत्वगुण संपत्तीची साक्ष पटते. शिष्यांच्या समोर त्यांनी आदर्श ठेवला. यामुळे त्यांची अलौकीक कीर्ती दूरवर पसरली.

प्लेग च्या साथीतून भक्तगणांना वाचविणारे मौनी स्वामी अनेक लीला घडवीत. आपल्या सामर्थ्याची जाणीव भक्तांना करुन देत असत. दत्तोपासनेचा विशेष प्रसार करण्यासाठी विविधक्षेत्री दत्त मंदिरे उभी केली. कृष्णा पंचगंगेच्या संगमावर कृष्णावेणी मातेचा उत्सव यांनीच सुरु केला. ती प्रथा आजही चालू आहे. आपल्या आदर्श जीवनात शरण आलेल्या अनेक श्रध्दाळू असणाऱ्या भाविकांचा त्यांनी उध्दार केला.

सप्तम भूमीकेवर आरुढ झालेले विदेही महापुरुष श्रीमद् मौनीस्वामी मार्गशीर्ष शु. ९ या दिवशी दत्तात्रेय चरणी लीन झाले. श्री गुरुंच्या आज्ञेने त्यांच्या पादुका स्थापन केल्या. त्यांच्या जवळ स्वामींनी स्थापन केलेल्या उजव्या सोंडेच्या सिध्दीविनायकाचे स्थान आजही कडक व जागृत आहे.

दत्तस्वरुप मौनीस्वामींनी पुजारी मंडळींवर विशेष प्रेम केले. वाडीत स्वामींच्या आज्ञेने श्रीकृष्ण जन्मोत्सव साजरा केला जातो.

## ६. श्री गोविंद स्वामी

हे तेलंगी स्वामी होते यांचे नाव ब्रह्मय्या. पण यांना गोविंद स्वामी म्हणत. नृसिंहवाडी क्षेत्रातील तपोनिधींच्या मालिकेतील श्रीमद् गोविंद स्वामी हे मोठे ब्रह्मनिष्ठ महापुरुष होते. त्यांचे ब्रह्मानंदांच्या मठातच वास्तव्य होते. हे गुरुचरित्र उत्साह मूर्ती जवळ वाचीत असत. स्वारी नेहमी यांचे बरोबर बोलत असे.

श्रीमद् वासुदेवानंद सरस्वती हे गोविंद स्वामींना गुरु स्थानी मानत असत. श्रीमद् गोविंदस्वामींचे श्री वासुदेवशास्त्री (प.प.

वासुदेवानंद सरस्वती) च्यावर अत्यंत प्रेम होते. श्रीमद् गोविंद स्वामींनी निर्वाणकाळी वेदांतांचे रहस्य श्रीवासुदेव शास्त्रींना सांगून त्यांना अनेक दुर्मिळ मौल्यवान ग्रंथ दिले. दशोपनिषदे ही समजावून सांगितली. तसेच श्रीदत्तप्रभूंनी श्रीवासुदेव शास्त्रींना दर्शन देऊन मंत्र सांगितला. त्याचे विधानही बसल्या जागेवरुनच श्रीगोविंदस्वामींनी शास्त्रीबुवांना सांगितले. श्रीदत्तप्रभू व श्रीगोविंदस्वामी अक्षरश: अभिन्न होते.

श्रीमद् गोविंद स्वामी ज्या ठिकाणी ध्यानास बसत त्या स्थानाला 'गोविंदपूर' म्हणतात. त्या गोविंदपूरावर एक अश्वत्थ वृक्ष आहे. येथे पादुका असणारी २-३ मंदिरे आहेत.

श्रीमद् वासुदेवानंद सरस्वती स्वामींच्या अलौकीक जीवनात श्रीमद् गोविंदस्वामींचे स्थान अढळ आहे.

वासुदेव शास्त्री ब्रह्मचारी असतानांच गोविंद स्वामींनी दशोपनिषद् वगैरे ग्रंथ समजावून सांगितले. हे उत्सव मूर्तीला उन्हाळ्यात वारा घालीत असत. गोविंद स्वामी गुरुचरित्र वाचीत असताच त्यांची मध्येच केव्हा तरी समाधी लागे आणि मग उत्थान झाले की यांचे वाचन सुरु होई. त्यामुळे यांना माधुकरीला वेळेवर जाता येत नसे. यांची काही घरे माधुकरीची ठरलेली होती. तिथे ते जरी उशीरा गेले तरी त्यांची माधुकरी नीट झाकून ठेवलेली असे.

गोविंद स्वामींची तब्येत ठीक नव्हती. वासुदेव शास्त्री त्यांची सेवा-चाकरी करीत असत. सकाळी स्नान घालून हे त्यांच्या छाट्या धुण्या करिता गंगेवर गेले आणि इकडे गोविंद स्वामींचे जास्त झाले. त्यांची वाणी बंद झाली. त्यांचे मनातून वासुदेव शास्त्री बुवांना काही तरी सांगावयाचे होते. पण तसेच राहून गेले. मंडळी जवळ जमली. 'अरे हे एकाएकी काय झाले?' असा विचार सुरु झाला. वासुदेव शास्त्री देवाच्या समोर घाटावर छाट्या धुवीत असता देवळातून शब्द

झालेला त्यांचे कानी आला की, 'गोविंद स्वामींची वाणी बंद झाली आहे. धावत वामन बड्डा कडे जा आणि तेथे येडूरचे वैद्य आलेले आहेत त्यांच्या कडील मात्रा घेऊन ये.'

वैद्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांनी मात्रा दिली व ते जरा शुध्दीवर आले. त्यांच्या मनातील विचार शास्त्रीबुवांना सांगून त्यांचेच मांडीवर श्री गोविंद स्वामींनी देह ठेवला. नंतर त्यांना रितीप्रमाणे जल समाधी देण्यात आली. पुढील त्यांचे सर्व और्ध्वदेहिक कार्य श्री वासुदेव शास्त्रींनी यथा विधान वाडीतच केले.

## ७. श्री वासुदेवानंद सरस्वती उर्फ टेंबे स्वामी महाराज

रत्नागिरी जिल्ह्यातील सावंतवाडी संस्थानात माणगाव या नावाचा एक लहानसा गाव आहे. या गावातून निर्मला (पाप हरण करणारी) नावाची नदी वाहात आहे. या गावात गणेशभट टेंब्ये म्हणून एक प्रसिध्द वैदीक सदाचार संपन्न असे राहात होते. त्यांना संतती वगैरे नसल्यामुळे व स्वभावतःच विरक्त असल्यामुळे हे कुटुंबाशिवाय यात्रेला निघून गाणगापूरला सेवा करित राहीले.

तेथे एकनिष्ठपणे सेवा करित असताना, 'आता आपण संन्यास घ्यावा' असे त्यांचे उद्गार वेळोवेळी निघू लागले. हे त्यांचे उद्गार ऐकून त्यांची पत्नी पू.सौ. रमाबाई यांना फार दुःख होई. पण काय करणार? अखेर बरेच दिवस विचार करुन त्यांनी श्रीगुरुंची प्रार्थना केली की, 'हे सद्गुरो, पोटी संतान नसल्यामुळे आपला पति विरक्त होऊन संन्यास घेत आहे. तरी आपण कृपा करुन संन्यास घेण्याची त्यांची तीव्र इच्छा नाहीशी करावी.

ही सती पू.सौ. रमाबाईंची प्रार्थना ऐकून दत्तगुरुचे अंतःकरण कळवळले. त्यांनी स्वप्नात येऊन गणेश भटजींना सांगितले की, 'तू संन्यास घेऊ नकोस. घरी आपल्या गावी जाऊन आपल्या गृहस्थाचारा

प्रमाणे अतिथी अभ्यागतादी पंचमहायज्ञ करुन समाधानी वृत्तीने रहा. जगदोध्दारार्थ तुमच्या कडे मला अवतार घ्यायचा आहे.

गणेश भटजी जागे होताच त्यांनी ही आनंदाची हकीकत आपल्या पत्नीला कळविली. त्या वेळी उभयतांना किती आनंद झाला असेल याची कल्पनाही करता येणार नाही. नंतर गणेश भटजींनी तेथील यात्रेची सांगता करुन ते दत्ताज्ञे प्रमाणे आपल्या गावी निघून गेले.

पुढे थोडेच दिवसात पू.सौ. रमाबाई गरोदर राहून सदासर्वकाळ ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी बोलू लागल्या व सर्व जग ब्रह्ममय दिसू लागले. कोणीही त्यांच्याकडे जावो त्या आत्मानात्म विचारात रंगलेल्या असत. ही पू.सौ.रमाबाईंची स्थिती पाहून गणेश भटजींच्या मनात शंका येऊ लागली की हीला एखाद्या ब्रह्मसमंधाने तर पछाडले नसेल. नंतर श्रीगुरु यांच्या स्वप्नात आले व

'माला कमंडलुरध: करपद्मयुग्मे । मध्यस्थ पाणियुगुले डमरु त्रिशुले ।
यस्यस्त ऊर्ध्वकरयो: शुभशंखचक्रे । वंदे तमत्रि वरदं भुजषट्क युक्तं ।'

असे दर्शन देऊन सांगितले, 'मीच हिच्या उदरी येत असल्यामुळे ती ज्ञानाच्या गोष्टी सांगत आहे. हिच्या संबंधाने काही काळजी करु नको.'

नंतर नवमास पूर्ण होताच शके १७७६, आनंद नाम संवत्सर, श्रावण वद्य पंचमी संध्याकाळी शुभवेळी पू.सौ. रमाबाई प्रसूत होऊन पुत्ररत्न झाले. गोकुळाष्टमीच्या अवतारातच हा भगवंताचा अवतार झाल्यामुळे श्रीगणेश भटजींनी जात-कर्मादी यथाविधी संस्कार करुन बाळाचे नाव वासुदेव असे ठेवले.

ज्या भगवंताने जगदोध्दाराकरिता मनुष्य रुप धारण केले त्याने आपल्या बालवयात आपल्या आई-बापांना किती व कशा प्रकारे

सुख दिले असेल याचे वर्णनच करिता येणार नाही. याप्रमाणे आठ वर्षे बाल क्रीडा होताच वासुदेवाचे मौजी बंधन करण्यात आले व या आश्रमात वेद वेदांगे षट्शास्त्रे यांचे अध्ययन केले. हे वैदिक घराणे गावातील काही विद्यार्थी यांचे कडे म्हणावयाला येत होती. त्यावेळी अवतारी वासुदेव आजोबांच्या मांडीवर व त्यांच्या आजूबाजूस खेळत असावयाचा व आजोबा जी संथा इतर विद्यार्थ्यांना देत त्याच वेळी याचे सर्व पाठ होई. पण मुंज झाली नसल्यामुळे तो म्हणून दाखवित नसे इतकेच. मुंज झाल्या नंतर एकदा संथा घेणे व अभ्यास कसा करावयाचा याचे जगास शिक्षण देणे एवढाच हेतू. लहानपणापसून यांना पूजेचा नाद, शास्त्रीय पध्दतीनेच वागण्याची आवड, एक तपामध्यें सर्व शास्त्राध्ययन वेद, षडंगासहित षट्शास्त्रे, याज्ञीक, मंत्र, तंत्र, यंत्र शास्त्र पारंगतता प्राप्त झाली व यांनी ज्योतिषाचा अभ्यास आपल्या गुरूंपाशी सुरु करुन चाळिसाव्या दिवशी ग्रंथ पुरा करुन आता पुढे काय? असा प्रश्न केला, अशी असामान्य बुध्दीमत्ता होती. त्याच प्रमाणे अष्टांग योगाचा अभ्यास समाधी पर्यंतचा झाला व अशा तऱ्हेने अभ्यास करीत असतानाही गायत्री पुरश्चरण केले. त्यांच्या गावापासून जवळच असलेल्या डोंगरात एक गुहा होती. तेथे हे जाऊन बसत असत व केव्हा तरी कोणी, ‘बाबा, इतके शिकलास तरी कुणाजवळ आणि केव्हा ?’ असे विचारले तर त्या गुहेत दत्तगुरुंनी हे शिक्षण दिले म्हणून सांगत. ब्रह्म विद्येची प्राप्ती मात्र यांना या ‘नृसिंहवाडीत’ गोविंदस्वामी यांचे कडून मिळाली.

आपण लग्नाच्या भानगडीत पडू नये अशी त्यांची फार इच्छा होती. पण श्रीदत्तगुरुंनी गृहस्थ धर्म आचरण करुन जगास मार्ग घालून दिला पाहिजे असे सांगितल्यामुळे, केवळ त्यांचे आज्ञेवरुन त्यांनी रा. गोडे यांचे मुलीशी विवाह केला. तिचे नाव अन्नपूर्णा.

यांनी स्मार्ताग्नी ठेविला होता. यांनी सर्व आश्रम यथाविधी पालन केले.

यांनी केलेली संस्कृत प्राकृत रचना जर पाहिली तर ही मानवी कृती नव्हे असे कळून येईल. ही रचना म्हणजे तेजस्वी ऋतंभरा प्रज्ञेचाच अविष्कार आहे असे समजेल. शिवाय आसेतु-हिमाचल पर्यंत संपूर्ण भरत खंडात पायी संचार करुन हजारो लोकांना आपल्या स्वधर्माचरणाचे महत्व पटवून शिक्षण दिले आणि आधी व्याधी पासून रक्षण करुन स्वधर्मी बनविले व त्यांचा उध्दार केला.

यांनी सर्व जगात जो प्रवास केला तो अगदी अनवाणी आणि किती जलद होई याचा तर पत्ताच कुणास लागत नसे.

श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराज म्हणजेच **'थोरले महाराज'**. त्यांचे जीवन म्हणजे कलियुगातील एक अद्‌भुत चमत्कार. प्रत्यक्ष भगवान दत्तात्रेय त्यांचेशी बोलत असत, त्यांना सतत मार्गदर्शन करत असत. जणू त्यांना स्वत:चे मन नव्हतेच. दत्तगुरुंनी उठ म्हटले की उठले, बस म्हटले की बसले. उत्तरेकडे चल म्हटले की निघाले. या गावी थांब म्हटले की थांबले. आज भिक्षा नाही म्हटले की उपवास. या गावी मुक्काम नको म्हटले की तत्क्षणी पुढील प्रवासाला सिध्द. मग दिवस असो, रात्र असो, पाऊस, ऊन, वादळ, अरण्यातला रस्ता, कशाचीही त्यांनी पर्वा केली नाही. कारण दत्तगुरु बरोबर आहेत ही त्यांना पुरेपूर खात्री होती व त्यांच्या सान्निध्यात त्यांना परमानंदाचा अनुभव होता. देवभक्ताचे असे सान्निध्य खरोखर दुर्लभ.

त्यांचे २४ वर्षांचे संन्यासी जीवन म्हणजे एक अत्यंत खडतर तपश्चर्या होती. त्याकाळात त्यांनी सबंध भारतवर्षभर हिमालया पासून

रामेश्वर पर्यंत असे तीन वेळा, पायी अनवाणी भ्रमण केले. कुठल्याही वाहनाचा वापर केला नाही. संन्यासाश्रमाच्या नियमांचे अत्यंत कठोरपणे पालन केले. सदैव भिक्षान्नावर निर्वाह केला. भिक्षा घेण्यास योग्य ठिकाण नसले की उपवास. प्रकृति स्वास्थ्यासाठी त्यांना ताक पिण्याची आवश्यकता असे. पण कित्येक दिवस तेही मिळत नसे. एकवेळी तर प्रवासात एका महीन्यात फक्त तीन दिवस भिक्षा मिळाली. इतर सर्व दिवस केवळ जलपान करुन काढले. असेही घडले. चार लंगोट्या, दोन छाट्या, देवाची संबळ, पोथी व दंडकमंडलू एवढेच सामान सदैव त्यांचे बरोबर असे. सबंध २४ वर्षांच्या संन्यास जीवनात लोकाग्रहास्तव व देवांनी परवानगी दिली म्हणून त्यांनी दिवाळीच्या दिवसात केवळ चार-पाच वेळा गरम पाण्याने स्नान केले. अत्यंत कडाक्याच्या थंडीत सुध्दा ते दिवसातून तीन वेळा जवळपासच्या नदीत स्नान करीत असत. कित्येक वेळा तर त्यांनी १०-१० वेळा सुध्दा थंड पाण्याने स्नान केले. बहुधा एखाद्या देवळात त्यांचा मुक्काम असे. सदैव ध्यान, तपश्चर्या आणि लेखन, प्रवचन असा त्यांचा कार्यक्रम असे. रात्रीची सुमारे २ तासांची झोप त्यांना पुरी होत असे.

एकदा एके ठिकाणी त्यांच्या पायातील २०-२२ काटे काढावे लागले. त्यावेळी पाय अत्यंत दुखत होता. तरी त्यांच्या तपश्चर्येत कुठलाही कमीपणा त्यांना चालला नाही. खरोखर त्यांच्या संन्यास जीवनाचा विचार केला तर जीवाचा थरकाप होतो. आदिशंकराचार्यांनंतर वैदिक धर्माने आखून दिल्या प्रमाणे संन्यासाश्रमाचे पालन करणारे ते कदाचित अखेरचेच संन्यासी होते.

थोरल्या महाराजांचे वाङ्मय हाही एक चमत्कारच आहे. लौकीक पध्दतीने त्यांचे शिक्षण झाले नव्हते. पण संस्कृत भाषेवर

त्यांचे असामान्य प्रभूत्व होते. त्यांच्या वाङ्मयावर आधारीत एक प्रबंध पुणे विद्यापीठात सादर झालेला आहेच. पण असे अनेक प्रबंध तयार होतील असा त्यांच्या वाङ्मयाचा विस्तार व गुणवत्ता आहे व ते ज्या ठिकाणी जात तेथील क्षेत्रदेवता त्यांच्या भेटीला येत. मग महाराज त्यांची स्तुती करणारी स्तोत्रे लिहीत. शिवाय दत्तसंप्रदायावरील त्यांचे लिखाण अफाट आहे. पण 'हे वाङ्मय मी लिहीले आहे' असे त्यांनी कधीही म्हटले नाही. 'मला अक्षरे दिसतात तशी मी उतरवून घेतो.' असे ते म्हणत. या बाबतीत त्यांची तुलना वेदवाङ्मय लिहिणाऱ्या ऋषींशीच होऊ शकते. 'मंत्रगर्भ स्तोत्रे' हे एक त्यांचे खास वैशिष्ट्य. एखाद्या स्तोत्रातील प्रत्येक ओळीतील पहिले अक्षर घेतले की एक मंत्र. तिसरे अक्षर घेतले की दुसरा मंत्र. पाचवे अक्षर घेतले की आणखी एक मंत्र. अशा अनेक अद्‌भुत रचना त्यांनी केल्या आहेत. उदा. त्यांनी लिहीलेल्या 'श्रीसप्तशती गुरुचरित्रसार' या ग्रंथातील प्रत्येक ओवीतील तिसरे अक्षर घेतले की गीतेतील संपूर्ण १५ वा अध्याय तयार होतो.

एकदा गरुडेश्वरी यांचा मुक्काम असता वाडीचे काही पुजारी व त्यांच्या बरोबर एक दोन म्हाताऱ्या बाया अशी मंडळी त्यांच्या दर्शनास गेली. वाडीकर मंडळींना हे थोरले महाराज असे वाटून एक तऱ्हेचा आपुलकीचा अभिमान वाटे आणि श्रीमहाराज वाडीकर मंडळी म्हणजे साक्षात् श्रीदत्तप्रभूच आहेत असे समजत असत. असो. त्या स्त्रिया महाराजांजवळ गेलेल्या पाहून तेथे एक स्वामी बसले होते त्यांना फार राग आला आणि ते त्या स्त्रियांना पुष्कळ टाकून बोलले. हे महाराजांना समजताच त्यांनी त्या स्वामींना सांगितले 'ही वाडीकर पुरुष मंडळी ही सर्व दत्तरूप आहेत आणि स्त्रिया अनसूया माता

आहेत. त्याचा अपमान तुमच्याकडून आणि इथे व्हावा फारच वाईट गोष्ट ! आधी त्यांची माफी मागा.' यावरुन यांचे वाडीकरांवरील नि:सिम भक्ती व प्रेम प्रकट होते.

हे लहानपणी अग्नीची व गायत्रीची उपासना करीत पण यांच्या गुरुंनी गोविंदस्वामींनी या नरसोबावाडीचे क्षेत्रात दत्त उपासक बनविले आणि ते प्रत्यक्ष दत्तरुपच झाले.

यांची शिष्य शाखा-भक्तगण सबंध हिंदुस्थानभर आहे. यांनी नर्मदातीरी गरुडेश्वर क्षेत्रामध्ये शके १८३६ आनंदनाम संवत्सरी आषाढ शुध्द १ रोजी मर्त्य शरीराचा त्याग करुन निजानंदपदी गमन केले.

असा हा 'नृसिंह वाडीचा' महिमा आहे. आणि यांचेच पट्टशिष्य ज्यांचा जन्मच वाडी नगरात सिध्द पुरुषांच्या पोटी झाला आणि ज्यांनी जन्मापासून सिध्द उपासना चालविली व सिध्दांची पूजा केली व ज्या सिध्द पुरुषांनी महावाक्याचा उपदेश केला तेच हे सिध्द शिष्य

## ८) श्री नृसिंह सरस्वती दीक्षितस्वामी
## साक्षात श्री दत्तगुरुच
## प्रस्तुत पुस्तकाचे नायक

अशी या नगराची अद्याप पर्यंत परंपरा चालत आलेली आहे. या वाडी क्षेत्रातील थोर विभूतींची माहीती आपण पाहिली. याशिवाय अनेक सिध्द पुरुष येथे होऊन गेले जे प्रसिध्दीस आले नाहीत. अशा या सिध्द नगरात ज्ञानेच्छूंनी दत्तभक्तीचा अनुभव जरुर घ्यावा.

--------*****---------

## १) प. पू. श्री वक्रतुंड महाराज

कवीश्वर घराणे आणि श्रीक्षेत्र नरसोबावाडी यांचा तीन पिढ्यांचा अतूट संबंध आहे. त्यांचे मूळ आडनांव दिक्षित पण त्यांच्या आजोबांनी नरसोबा वाडीला राहायला आल्यावर रोज ५ श्लोक रचून ती स्तुतिसुमने श्रीदत्तांच्या चरणी अर्पण करण्याचा परिपाठ ठेवला. त्यांच्या उत्कृष्ट व प्रासादिक काव्यप्रतिभेवरुन लोक त्यांना कवीश्वर म्हणू लागले. दत्तप्रभुंच्या अनुमतीने ते वाडीत स्थायिक झाले. कागवाडच्या फणसळकरांनी कृष्णाकाठचा तीन मजली वाडा दान दिला, पुढे कुरुंदवाड संस्थानिकांकडूनही कांही जमीन जुमला मिळाला.

बालपणापासूनच वक्रतुंडमहाराजांचा देवभक्तीकडे ओढा होता. मुंज झाल्यावर आपल्या विद्वान वडिलांजवळ त्यांनी वेद, शास्त्र, पुराण वगैरे परंपरागत शिक्षण घेतले. वाडीत देवासमोर पुराण सेवा करायची प्रथा त्यांच्यापासून सुरु झाली. वाडीतील थोर अधिकारी सत्पुरुष गोविंदस्वामींकडून त्यांना मंत्रोपदेश झाला.मोठे महाराज (प. पू. श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज) प्रथम वाडीला आल्यापासून वक्रतुंड महाराजांचा आणि त्यांचा संबंध आला. देवांनी मोठ्या महाराजांना पार्थिव पूजा करण्याची आज्ञा केली. त्या पूजेचे विधान कवीश्वरबुवांकडे मिळेल असे सांगितले. त्याप्रमाणे बुवांनी ते विधान मोठ्या महाराजांना दिले.

यांना अनेक अपत्ये होऊन गेली. शेवटी गोविंद स्वामींनी त्यांच्या स्वत:जवळची छोटी दत्तमूर्ती प्रभावळीसह बुवांना देऊन सांगितले, या पुढे तुझी संतती वाचेल आणि तुला एक अलौकिक पुत्र होईल. त्याप्रमाणे पुढे त्यांच्या कृपेने धुंडिराजमहाराजांचा जन्म झाला.

श्री वक्रतुंड महाराजांपासून श्रीदत्तमहाराजांपर्यंत हा संबंध अखंड टिकून राहिला होता. या महात्म्यांचा विशेष असा की ईश इच्छेनुसार या तीनही महात्म्यांचा संचार कोकण वगळता सर्व महाराष्ट्रात झाला

पण त्या सर्वांचे प्रिय स्थान श्रीनरसोबावाडी हेच होते. परंपरागत या घराण्यात श्रीगणेशाची उपासना चालत आली होती. पण वाडीत स्थिरावल्यापासून श्रीदत्तप्रभुंच्या भक्तीची तिला जोड मिळाली. वाडीमध्ये त्यांची परंपरागत निवासी वास्तूही आहे जिचा अंशत: जीर्णोद्धार झाला आहे.

प.प. वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांचे वारंवार वाडीला येणे होत असे. त्यावेळी कवीश्वर पिता पुत्र म्हणजे श्रीवक्रतुंड महाराज व श्री धुंडिराजमहाराज त्यांच्या कृपाछत्राखाली आले. श्रीस्वामी महाराज श्री वक्रतुंड महाराजांना त्यांच्या योग्यतेमुळे फार मान देत असत. श्री वक्रतुंड महाराजांचा भारतीय परंपरागत धर्म शास्त्राचा गाढा अभ्यास होता. त्याच्या जोडीला धर्माचरण अत्यंत शुद्ध होते. त्यामुळे श्री स्वामीमहाराजांची कृपा झाली नाही तरच नवल.

त्यांनी वाडीला एकदा एक यज्ञ करायला आरंभ केला. हवनाला साजूक तूप वेळेवर आले नाही तेव्हां मुहूर्ताची वेळ चुकू नये म्हणून त्यांनी श्रीकृष्णामाईला प्रार्थना केली आणि तिचे पवित्र तीर्थ आणून तेच हवनाला तूप म्हणून वापरले आणि यज्ञ संपन्न झाला.नंतर जेव्हा खरे तूप आले तेव्हा त्यांनी ते कृष्णामाईला अर्पण केले. श्री नारायण स्वामींच्या पुण्यतिथी उत्सवात व अन्य उत्सवांच्या वेळी देवासमोर ते पुराणसेवा करीत असत.

श्रीस्वामीमहाराजांच्या प्रेमकृपेला पात्र ठरल्यामुळे श्री महाराजांचा वाडीत निकटचा सहवास आणि मार्गदर्शन त्यांना लाभले. श्रीमहाराजांच्या अंतरंग भक्तांशी म्हणजे प. पू. श्रीदीक्षित स्वामीमहाराज, पू. श्री गुळवणीघराण्याशी जवळून संबंध आला आणि पुढे तो वृद्धिंगत झाला. वाडीमध्ये मोळा या स्थानात झालेल्या उत्सवात श्री वक्रतुंडमहाराजांनी पुराण सांगितले. श्री स्वामीमहाराज हे साक्षात दत्तप्रभूंचे अवतार असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले होते.

विदर्भातील देऊळगांवराजा येथे श्रीबालाजीमहाराजांचे प्रसिद्ध स्थान आहे.त्या स्थानाची माहिती गोळा करून पोथीस्वरुपात श्रीबालाजी महाराजांचे माहात्म्य प्रकाशित केले.

संचार करीत ते अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातल्या खर्डा या गांवी आले आणि एका मंदिरात राहू लागले. मंदिरात ते सर्व प्रकारची सेवा करीत. त्यांच्या साधी राहणी, मितभाषी व विनम्र स्वभावामुळे ग्रामस्थांना आरंभाला त्यांची योग्यता समजली नाही. ते श्रीमहाराजांना एक सात्विक ब्राह्मण म्हणूनच ओळखत होते. एकदा त्या मंदिरात श्री भागवत सप्ताह आयोजित केला होता आणि भागवतकथाकार कांही अपरिहार्य कारणामुळे आयत्यावेळी येऊ शकले नाहीत. संयोजकांची पंचाईत झाली. आता करायचे काय अशा संभ्रमात ते पडले असता श्री महाराजांनी विनम्रपणे त्या ग्रामस्थांना श्रीभागवत सप्ताह करण्याची तयारी दाखवली. त्यांनीही ती दिली आणि त्या प्रसंगाने श्रीमहाराजांची विद्वत्ता, ज्ञान, अधिकार सर्वांना समजला.

त्या वेळी एक उल्लेखनीय प्रसंग असा घडला की सप्ताह समाप्तीनंतर प्रथेप्रमाणे श्रीभागवताची मिरवणूक निघाली आणि ती मशिदीवरुन जाताना मुसलमान लोकांनी त्याला आक्षेप घेतला. तेव्हां श्री महाराजांनी त्यांच्या तिथल्या धार्मिक नेत्याला बोलावून असा आक्षेप कसा धर्मबाह्य व चुकीचा आहे हे त्यांच्या पवित्र धार्मिक ग्रंथाच्या म्हणजे कुराणाच्याच आधारे पटवून दिले आणि त्या प्रसंगापासून मुसलमान मंडळीही श्रीमहाराजांना मानू लागली. असे ऐकण्यात आले आहे की श्री दत्तमहाराजांपर्यंत ती परंपरा पुढे चालू होती. श्री दत्तमहाराज खर्डा गांवात मुक्कामाला गेले की एक दिवस मुसलमान मंडळीना दर्शनाला दिला जात असे व ते येऊन श्री महाराजांची योग्य ती संभावना करीत.

एका गणेशचतुर्थीच्या दिवशी त्यांनी आपल्या पत्नीला पूजेतील श्रीगणेशाची मूर्ती त्यांच्या बिछान्याजवळ आणून ठेवण्यास सांगितले आणि नामस्मरण करीत देह ठेवला.

## १०) प. पू. श्री धुंडिराजमहाराज कवीश्वर

चार पांच पिढ्यांपासून वैदिक प्राच्य संस्कृत विद्या, श्रौतस्मार्त यागानुष्ठान, मंत्र तंत्र शास्त्र, महाभारत, भागवत इत्यादिंवर प्रभुत्व असलेल्या, ईशसेवेत रममाण होणाऱ्या व ईश्वरी कृपा असलेल्या पवित्र, ज्ञानी व थोर शास्त्री घराण्यात श्री धुंडिराज महाराजांचा जन्म झाला. श्रीमहाराजांचे प्राथमिक शिक्षण वाडीत वडिलांजवळ आणि परंपरागत शिक्षण वाडीच्याच श्रीकृष्णशास्त्री वष्ट यांच्या पाठशाळेत झाले. पुढचे शिक्षण घेण्याकरता ते इंदौरला जाऊन राहिले होते. वेद वेदांत, धर्म शास्त्र, काव्यालंकार आणि न्यायशास्त्राचे त्यांनी उत्तम अध्ययन व पुढे अध्यापन केले. त्यांनी आयुष्यभर श्रीगणेशाची, श्रीदत्तप्रभुंची व कुलस्वामीनी श्री रेणुकामातेची उपासना केली. आपल्या वडिलांप्रमाणेच त्यांनाही बालपणापासून प. प. श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांचा सहवास लाभला आणि आपल्या दैवी गुणसंपदेने ते महाराजांच्या पूर्ण कृपेला पात्र ठरले. साहजिकच श्रीस्वामीमहाराजांचे अधिकारी शिष्य प. प. श्रीगुळवणी महाराज व प. पू. श्रीदीक्षित स्वामीमहाराज यांच्याशीही त्यांचा निकटचा संबंध आला. या दोघांचेही वाडीवर फार प्रेम होते. श्रीदीक्षित स्वामीमहाराज तर बराच काळ वाडीतच राहात असत. पुढे ते नदी पलिकडच्या श्रीक्षेत्र अमरेश्वर येथे राहाण्यास गेले.

ईश्वरी अनुग्रह, ईशसेवा तप, अध्यात्मिक ज्ञान, ज्ञातेपणा न मिरवणारी लीनता, निरभिमान, निरपेक्षता, निर्लोभता, मौन, आर्जव, विनय शुचिता, दया वगैरे सर्व गुणसंपदा श्री महाराजांच्या ठिकाणी पहायला मिळत होती. श्रीस्वामीमहाराजांच्या आज्ञेने त्यांनी वाडीत

वेदपाठशाळा सुरु केली होती. वाडीतील मुलांना उपनयनानंतर इथे वेदाध्यनाकरता पाठवले जाई. एकीकडे आपल्या उपास्य देवतेची उपासना बालपणापासूनच सुरु व्हावी व दुसरीकडे त्यांना संस्कृत भाषेच्या व्याकरणाचा अभ्यास सुलभरीत्या करता यावा म्हणून श्रीस्वामीमहाराजांनी मुद्दाम "त्रिशतीकाव्य" या वेदपाठशाळेकरता पाठ्यपुस्तक म्हणून लिहून दिले.

त्यांच्याजवळ एक छोटी श्रीदत्तूबाळाची म्हणजे श्रीदत्तात्रेयांची बालस्वरुपातील मूर्ती असे (जी सध्या श्रीदत्तमहाराजांच्या पूजेत आहे.) त्या मूर्तीचा ते बाळ म्हणूनच सांभाळ करीत, कोणाला अनुग्रह देताना दत्तूबाळाला जवळ ठेवून त्याच्या आज्ञेने ते मंत्र देत. थंडीच्या दिवसात त्याला स्वेटर घालतात. त्याचे स्वतंत्र दागिनेही केलेले आहेत.

श्री धुंडिराजमहाराजांनी श्रीस्वामीमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे धर्मसिंधूत दिलेला जप विधिपूर्वक करुन होम हवनाने त्याची सांगता केली. वाडवडिलांची पुण्याई, धुंडिराजमहाराज व त्यांच्या पत्नीची श्रद्धा, भक्ती, तपश्चर्या आणि श्रीस्वामीमहाराजांच्या कृपाप्रसादाने इ. स. १९१० माघ वद्य ६ ला श्रीदत्तमहाराजांचा जन्म झाला.

श्री धुंडिराज महाराजांनी श्री स्वामीमहाराजांचा धारवाडला मुक्काम असताना स्वत: स्वैपाक करुन श्री स्वामीमहाराजांना भिक्षा केली. श्रीस्वामीमहाराज गरुडेश्वर येथे स्थिरावल्यावर श्री धुंडिराजमहाराज छोट्या दत्तमहाराजांना घेऊन गरुडेश्वराच्या दर्शनाला गेले होते. त्यावेळी त्यांना श्री स्वामीमहाराजांनी मोठ्या प्रेमाने बरेच दिवस ठेऊन घेतले.

श्रीक्षेत्र नरसोबा वाडीतील प्रदीर्घ वास्तव्यानंतर वृद्धापकाळात श्रीमहाराज विदर्भातील देऊळगांवराजा येथे राहाण्यास आले. तिथे त्यांनी श्रीबालाजीमहाराजांची अखंड सेवा केली. ते परंपरागत पुराण

सांगत. प्रसंगाने प्रवचन करीत. विदर्भ, मराठवाडा वगैरे भागात यांचे हजारो शिष्य झाले भक्तांच्याबद्दलचा त्यांचा लळा व जिव्हाळा विलक्षण होता. त्यांच्याकडे समामजातील सर्व स्तरातील दु:खी, पीडीत लोक सतत येत आणि महाराजांनी सांगितलेल्या साध्या सोप्या उपायांनी दु:खमुक्त होत. या निमित्ताने ते लोकांना ईशभक्तीकडे वळवत. मंत्रशास्त्रज्ञ असल्याने दैवी संकटावर ते अचूक पण साधे सोपे उपाय सांगत. सर्वांना ज्ञान, उपदेश, मार्गदर्शन व संकट निवारण करुन महाराजांनी असंख्य जीवांना उपकृत केले. त्यांच्या ईश शक्तीचे व दैवी सामर्थ्याचे त्यांच्या भक्तांना आजही अनुभव येतात. अखंड ईश्वर चिंतन, भक्ती करीत असल्याने आत्मज्ञान संपन्न व साक्षात्कारी असूनही त्यांच्या लीनता , विनम्रता, निगर्वी सरळ स्वभावामुळे त्यांच्याकडे आलेली व्यक्ती फार प्रभावित होत असे.

श्री धुंडिराजमहाराजांच्या पत्नी सौ सरस्वतीबाईही धार्मिक आचरण व पूजा अर्चा, व्रत वैकल्ये, निरनिराळी अनुष्ठाने अखंड करीत असत. त्या श्रीमहाराजांच्या कार्यात पूर्णपणे समरस झाल्या होत्या. त्यांनी विदर्भातील सुलतानपूर येथे देह ठेवला. त्यांचे तिथे समाधी मंदिर बांधले आहे. श्री प. पू. श्री वासुदेवानंद सरस्वतींच्या प्रकाशित वाङ्मयाच्या प्रसारासंबंधी इ. स. १९५० ते ५४ या काळात त्या घरोघरी फिरल्या व दत्तभक्तीचा प्रसार केला. त्या वाडीत असताना श्री मनोहर पादुकांना रोज ५०० प्रदक्षिणा करीत असत.

## ११) प. पू. श्रीगुरुमहाराज
## (श्री प.पू. वामनरावजी गुळवणी महाराज)

प. पू. श्री नागेश भटजी गुळवणी हे घराण्यातील सर्व दृष्टीने थोर पुरुष. भगवत् भक्त प. प. श्रीनारायणस्वामीमहाराज हे गुळवणी घराण्याचे  कुलगुरु. यांची कृपा गुळवणी घराण्यावर होती. गुळवणी घराणे दत्तभक्त. यांच्या कृपेने श्री नागेश भटजींना पुत्रप्राप्ती झाली

म्हणून या मुलाचे नाव नारायण असे ठेवले. नारायण अत्यंत सात्विक, आचारसंपन्न होते. यांना चार मुलगे व तीन मुली झाल्या. यांचे ज्येष्ठ पुत्र दत्तात्रेय हे गुरुमहाराजांचे पिताजी. गुरुमहाराजांच्या आईची-मातोश्रींची इच्छा होती की आपल्याला वाडी येथील मनोहर पादुका श्री नृसिंहसरस्वती स्वामीमहाराजांकडून समक्ष प्रसादरुपी पादुका मिळाव्यात. त्याकरता उमाबाईंनी उपोषण सुरु केले. त्यांना दिवस गेले होते व दुसरीकडे पादुका प्रसादाची तळमळ वाढत होती. त्यांच्या मनाची ही ओढ दत्तप्रभुंना समजली आणि एकदा ध्यानाला बसल्या असताना अष्टगंधयुक्त चांदीच्या पादुका त्यांच्या ओटीत पडल्या. एक संन्यासी एकदम समोरुन अदृष्य झाल्यासारखे दिसले. आणखी एक शुभ शकून झाला, दत्तंभटजी देवावर पाणी घालत असताना शब्द ऐकू आले "मी तुझ्यावर प्रसन्न आहे" अशा रीतीने दत्तप्रभुंच्या कृपेने आणि मातापित्यांच्या पुण्याईने गुरुमहाराजांचा जन्म झाला. हेच म्हणजे श्री वामनरावजी गुळवणी महाराज. (जन्म मार्गशीर्ष वद्य १३, इ. स. १८८६)

इ. स. १९०७ च्या श्रीगुरुद्वादशीला वाडीत वयाच्या २१ व्या वर्षी गुरुमहाराजांना थोरल्या महाराजांचे म्हणजेच प. प. श्रीमत् वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांचे दर्शन झाले. गुरुमहाराजांचे थोरले बंधू शंकरशास्त्री वाडीला आले होते. त्यांची व थोरल्या महाराजांची भेट झाली होती. त्यांनी महाराजांना विचारले, "वामन कोल्हापूरला आहे, त्याला दर्शनाला बोलावू का?" थोरल्या महाराजांनी परवानगी देऊन सांगितले की येताना श्रीदत्तांची प्रतिमा काढून त्यामध्ये गळ्यात श्लोकबद्ध हार घातल्याचे दाखव. कोणता श्लोक हारात लिहायचे तेही सांगितले. तो श्लोक त्रिशतीकाव्यातला आहे.

गुरुमहाराजांनी सर्व सूचना लक्षात घेतल्यावर ते अंतर्मुख झाले आणि त्यांना आपल्या हृदयाकाशात एकमुखी दत्तात्रेयांचे दर्शन

झाले. गुरुमहाराजांनी जसे दर्शन झाले तसे चित्र काढून ते श्लोकयुक्त हारबद्ध केले. आणि ते चित्र घेऊन गुरुमहाराज वाडीला आले. थोरल्या महाराजांना अत्यंत भक्तीभावाने वंदन करुन ते चित्र पुढे ठेवले. स्वामींनी चित्र हातात घेऊन नीट पाहिले. ते निर्दोष झालेले पाहून त्यांना अत्यंत समाधान वाटले.

या सेवेचे फळ म्हणून थोरल्या महाराजांनी कोणतीही बाधा होऊ नये म्हणून गुरुमहाराजांच्या हातात सतत बांधण्याकरता एक मंत्र यंत्रात बंदिस्त करुन चांदीच्या पेटीत आणि ती पेटी स्वहस्ते महाराजांच्या हाताला बांधली. या यंत्रामुळे संपूर्ण आयुष्यात गुरुमहाराज कोणत्याही मायेत सांपडले नाहीत. या प्रसंगाचे कृतज्ञतापूर्वक स्मरण ठेवण्याकरता गुरुमहाराजांनी गुरुद्वादशीला वाडीची वारी सुरु केली.

१९०९ साली वडिलांच्या वियोगानंतर शंकरशास्त्रींना स्वामीमहाराजांच्या दर्शनाची फार ओढ लागली आणि स्वामीमहाराज पवनीला आहेत समजल्यावर ते तिकडे गेले. स्वामीमहाराजांचे दर्शन भेट झाल्यावर त्यांच्या आज्ञेने घरी पत्र पाठवून त्यांनी आई बहिण व गुरुमहाराजांना पवनीला बोलावून घेतले. आजेगांवहून शंकरकाकाही आले होते. गुरुमहाराजांचा आणि शंकरकाकांचा इथे प्रथम परिचय झाला. इथेच गांडामहाराज, सीताराम महाराज, गोविंदराव पंडितांचाही परिचय झाला इथल्या चातुर्मासात स्वामीमहाराजांनी गुरुमहाराज व त्यांच्या कुटुंबीयांना मंत्रदीक्षा दिली. तो दिवस अनंत चतुर्दशीचा होता. पवनीच्या मुक्कामात स्वामीमहाराजांच्या कृपेने उदंड अन्नदान झाले. ते स्वत: मात्र रोज भिक्षा मागून आणत असत. शेवटच्या दिवशी सर्वांना अमाप वस्त्रदान झाले.

पवनीहून परतल्यावर गुरुमहाराज नोकरीच्या शोधात मुंबईला आले पण त्यांच्या मनासारखी नोकरी मिळाली नाही. मग उगीच

व्यर्थ काळ दवडण्यापेक्षा कांही पुण्यकर्म करण्याच्या हेतुने ते गाणगापूरला आले आणि श्रीगुरुचरित्राचे सात सप्ताह करण्याचे ठरवले. सातवा सप्ताह आटोपल्यावर पुन्हा स्वामीमहाराजांच्या शोधार्थ निघाले. स्वामीमहाराजांचा सतत संचार चालू असल्याने ते कुठे असतील हे समजायला कठिण होते. तरी मिळालेल्या माहितीच्या आधारे गुरुमहाराज सीतामनी, मदिहाळ, गदग, धारवाड वगैरे ठिकाणी शोध घेत हावनूरला येऊन पोहोचले आणि सर्व श्रमाचे सार्थक होऊन स्वामीमहाराजांचे दर्शन झाले.हा सर्व जवळ जवळ १४०० कि. मी. चा प्रवास पूर्ण पायी अत्यंत खडतर अवस्थेत केला. त्यांचा तिथे चातुर्मास होणार होता व त्यांनी गुरुमहाराजांना त्यांच्या सहवासात राहण्याची अनुमती दिली. या मुक्कामात स्वामीमहाराजांनी गुरुमहाराजांना आसने करुन दाखविली, प्राणायाम शिकवला, गीतेची आणि विष्णुसहस्त्रनामाची संथा दिली, ‘‘अजपा’’ जपाचा संकल्प सांगून लिहून दिला, नित्योपासना काय करायची हे समजावले. वडिलांचे श्राद्ध असल्याने गुरुमहाराजांना स्वामींचा सहवास सोडून कुडुत्रीला परतावे लागले. निरोप घेताना गुरुमहाराजांनी स्वामींना ‘‘आता पुन्हा दर्शन कधी?’’ असे विचारल्यावर स्वामीनी स्वत:कडे बोट दाखवून म्हणाले, ‘‘हे असे लक्षात ठेव म्हणजे झाले.’’ तेथेच श्री स्वामींचे शरीर पारदर्शक होऊन त्यांना एकमुखी व्याघ्रांबरधारी दत्तप्रभूंचे दर्शन झाले. पुढे यांचेच चित्र स्वहस्ते त्यांनी काढले. त्याच चित्रावर स्वामी महाराज गरुडेश्वरला असताना पूजा होत असे. आजही ते चित्र वासुदेव निवास पुणे येथे आहे.

त्यानंतर पुन्हा श्रीस्वामीमहाराजांची भेट १९११ साली मराठवाड्यातील पिंपरी येथे झाली. तिथून श्रीस्वामीमहाराजांच्या-बरोबर औंढ्या नागनाथला येताना गुरुमहाराजांनी कांही अवघड

आसने करुन दाखविली. स्वामीमहाराजांनी प्रसन्न होऊन सिद्धासन व पश्चिमोत्तानासनाचा अभ्यास वाढविण्यास सांगितला

पुढील वर्षी स्वामीमहाराजांच्या आशीर्वादाने औदुंबर येथे श्रीदत्तमालामंत्राचे अनुष्ठान निर्विघ्नपणे पार पडले. आणि नंतर गुरुमहाराज गरुडेश्वरला गेले. इथे त्यांना स्वामीमहाराजांची अनेक प्रकारे सेवा करायची संधी मिळाली. स्वामीमहाराजांची दांत घासायची, स्नानाची, पर्णकुटी झाडून स्वच्छ करणे, स्वामीमहाराज सांगतील त्याप्रमाणे पत्र लेखन करणे, आलेली पत्रे वाचून दाखविणे अशी विविध सेवा घडली. स्वामीमहाराजांनी गुरुमहाराजांना धौती शिकवली. ही त्यांची शेवटची संधी ठरली कारण ते घरी आल्यानंतर लवकरच (१९१४) स्वामीमहाराजांनी अवतार समाप्ती केली.

इ. स. १९१४ ते १९१७ पर्यंत लौकिक इंग्रजी शिक्षण पूर्ण केले. चित्रकलेची अभिजात आवड आवडीने वाढवली. मुंबईच्या जे जे स्कूल ऑफ आर्टसमधून ते चित्रकलेची परिक्षा उत्तीर्ण झाले. फोटोग्राफीमधे प्राविण्य मिळवले आणि बार्शीच्या माध्यमिक शाळेत चित्रकला शिक्षक म्हणून नोकरी धरली. त्यांना अमेरिकेला जायची संधि अनायासे चालून आली पण ते अमेरिकेला गेले नाहीत. योगमार्गातच पुढे प्रगती करायची तळमळ वाढत गेली आणि ईशेच्छेने त्यांची होशंगाबादमध्ये १९२२ साली प.प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराजांची भेट झाली. गुरुमहाराजांना हवी असलेली शक्तीपात दीक्षा हे देतात असे त्यांना समजल्याने त्यांना अतिशय आनंद झाला. त्यावेळी गुरुमहाराजांबरोबर सर्वश्री शंकरकाका, बाबा महाजन आणि वैद्य मास्तर ही मंडळी होती. इथे एका सुमुहूर्तावर श्री लोकनाथतीर्थस्वामीमहाराजांनी गुरुमहाराजांना शक्तीपात दीक्षा दिली. बलवत्तर पूर्व संस्कारांमुळे शुद्ध आचरण व त्याचे फळ म्हणून मन:शुद्धी व शरीरशुद्धी यामुळे इतर कोणाहीपेक्षा गुरुमहाराजांवर

दीक्षेचा सर्वात जास्त सुपरिणाम दिसू लागला. गुरुमहाराजांची तयारी आणि योग्यता पाहून स्वामीमहाराजांनी त्यांना इतरांनाही दीक्षा द्यायचा अधिकार आपण होऊन दिला.

पुढे १९२६ मध्ये गुरुमहाराज बार्शी सोडून कायमच्या वास्तव्याकरता पुण्यात येऊन राहिले. त्यांनी नारायण पेठेतल्या गोवईकरांच्या चाळीत बिऱ्हाड केले. नूतन मराठी विद्यालयात ड्रॉईंग मास्तर म्हणून नोकरी करु लागले.

श्रीगुरुमहाराजांचे थोरले बंधू श्री शंकर दत्तात्रेय गुळवणी यांना थोरल्या महाराजांचे कडून प्रेरणा मिळाल्याने 'श्रीगुरुप्रसाद' हा सात अध्यायांचा ग्रंथ लिहीला. यामध्ये नरसोबावाडी येथील पुजाऱ्यांचा मूळपुरुष वे. बहिरंभट्ट यांच्या श्रीनृसिंसरस्वती स्वामीमहाराजांनी कृपा करुन वृद्धावस्थेत (८० वर्षाच्या वयात) पुत्र दिला व त्याचाच विस्तार होऊन पुजाऱ्यांची २०० घरे झाली याची रसाळ कथा आहे. हा ग्रंथ श्री गुरुमहाराजांनी शके १८५१ ला प्रकाशित केला.

पुढे श्री शंकरशास्त्रींनी संन्यास घेतला व ते वाडीतच राहू लागले. शेवटपर्यंत ते वाडीतच होते. त्यांच्या सेवेत शेवटली वर्षे त्यांची बहिण गं.भा. भगिनी गोदुताई होत्या. ही सर्व मंडळी अत्यंत आचारसंपन्न व महान दत्तभक्त होते. गुरुमहाराजांचे चित्रकला, क्रेपची फुले भरणे, फोटो काढणे, पडदे रंगविणे, शाडूच्या मातीच्या मूर्ति करणे सुतारकाम करणे यात अत्यंत प्राविण्य होते. त्या काळात या कलांचे कौतुक लोकमान्य टिळकांपासून ते ब्रिटीश, स्कॉटीश मिशन तर्फेही केले गेले. त्यांच्या जुन्या उत्तम चित्रांचे फोटो आजही जपून ठेवले आहेत. पुढे त्यांनी हे सर्व सोडले. जाणते लोक म्हणत ते जर याच विश्वात (चित्रकलेत) राहिले असते तर राजा रविवर्मालाही मागे टाकले असते.

पुण्यातच श्री दत्तमहाराजही आले आणि दोघांचा अंतरंग बहिरंग, सत्संग संबंध उत्तरोत्तर वृंद्धीगत होत गेला. श्री गुरुमहाराज फारसे बोलत नसत. प्रवचन भाषण अजिबात नाही. परंतु त्यांच्या वतीने श्री. प. पू. दत्तमहाराज बोलत असत. श्रीदत्तमहाराज म्हणजे त्यांचे पूर्ण कार्याध्यक्षच होते. त्यांचे मुख्य होते. पुढे त्यांनी शक्तिपात, भक्तिमार्गाचे, उत्तराधिकारी म्हणून दत्तमहाराजांना नेमले. १९५० ते ५४ या काळांत त्यांनी श्री. प. पू. श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांचे पूर्ण वाङ्मय १२ खंडात प्रकाशित केले. याकार्यात प. पू. श्रीदत्तमहाराजांचा अतुलनीय सहभाग होता. या दोघांमुळेच आज आपण या रसरशीत दत्तसाहित्याची गोडी चाखू शकतो. कल्याणच्या अंकात शक्तिपात योगाने कुंडलिनी जागृती हा एकमेव महाराजांचा लेख प्रसिद्ध झाला आणि त्यातून श्री गुरुमहाराजांची महती, योगमार्गातील श्रेष्ठत्त्व, अवतारित्त्व भारतभर पसरले. त्यांची गुणवत्ता, आर्जव, मार्दवता, अमानित्व, अखंडस्वरुपानुसंधान, भक्तिभाव, हे गीतेत सांगीतल्याप्रमाणेच होते.

पुढे त्यांचे विविध शांति समारंभ झाले. १९६३ साली पानशेतच्या पुरानंतर राहते घर उध्वस्त झाले. श्रीदत्तप्रसाद पादुकांची कायम सोय व्हावी या हेतुने, श्री दत्तमहाराजांच्या आग्रहाने श्री वासुदेव निवास या वास्तूची निर्मिती झाली श्री गुरुमहाराजांनी कार्यपरत्वे असंख्य तीर्थयात्रा केल्या, चारीधाम झाले. असंख्य लोकांना मुमुक्षूंना मार्गस्थ केले सतत प्रवास हा दत्तावताराचा विशेष आहे तो श्री गुरुमहाराज व श्री दत्तमहाराज यांचे चरित्रात दिसतो.

गरुडेश्वरला पुरात घाटाचे नुकसान झाल्यावर स्वत: तिकडे जाऊन भक्त जमवून तेथील घाटाचे पुनरुज्जीवन केले. त्यांची प्रतिवर्षी गुरुद्वादशीचीची नरसोबा वाडीची वारी कधीही चुकली नाही. वाडीला भक्तांच्या सोयीसाठी, सुलभता यावी यासाठी १९७१

साली मोठा कायमस्वरूपी सभामंडप बांधला, घाट दुरुस्त केला. श्री एकनाथ महाराजांनी वाडीलाघाट बांधला होता. त्यानंतर हे मोठे काम श्री गुरुमहाराजांनी केले व तसेच अमरापूरला श्री दत्तअमरेश्वराचा जीर्णोद्धार व घाट हे कार्य श्री दत्तमहाराजांनी केले. ही तिघांच्या चरित्रातील साम्य स्थळे आहेत.

पुढे १९७४ साली पौष व॥ ८ ला श्री दत्तमहाराजांना सर्वाधिकार देऊन अवतार समाप्ती केली.

त्यांच्या अनन्यसाधारण गुरुभक्तिविषयी गुरुप्रेमाविषयी आणि त्यांच्या योगअधिकारासंबंधी श्री. रामकवि श्री वामन त्रिपदीत असे लिहितात.

वसिष्ठांसी जैसा श्रीराम। सांदिपनीसी मेघश्याम।
तैसा वासुदेवा निष्काम। वामन शिष्य लाभला॥
उद्धव जैसा श्रीकृष्णांसी। एकनाथ स्वामी जनार्दनासी।
कल्याण श्रीरामदासांसी। तैसा वासुदेवांसी वामन॥

यातच त्यांचे अवतार श्रेष्ठत्व दिसून येते.

## १२) प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर

श्रीमहाराजांचे आजोबा प.पू. श्री. वक्रतुंड महाराज व पिताजी प.पू. श्रीधुंडिराज महाराजांचे श्रीक्षेत्र नरसोबावाडी येथे दीर्घकाळ वास्तव्य झाल्याने श्री महाराजांचा जन्म वाडी येथे माघ वद्य ६ शके १८३१ (२ मार्च १९१०) रोजी झाला. जगन्नियंत्याच्या इच्छेने त्या वेळी प.प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज वाडीतच होते आणि त्यांनी श्रीमहाराजांच्या घरी येऊन त्यांच्यावर कृपादृष्टी टाकून मंगल आशीर्वाद दिला. आणि त्याचवेळी श्रीमहाराजांची योग्यता सर्वांना सांगितली. श्री स्वामी महाराजांच्या मांडीवर बाळाला ठेवले असतांना स्वामीजी म्हणाले ''काय बुवा राहिलेले कार्य पूर्ण

करण्यासाठी नातू म्हणून आलात ना? आपण पांढऱ्या वेषात नि आम्ही भगव्या वेषात. एवढाच काय तो फरक ?'' असे म्हणून श्री स्वामी महाराज प्रसन्नतेने हसले, बाळाला कुरवाळले. सर्व अंगावरुन हात फिरविला. श्रीमहाराजांचे बालपणही वाडीतच गेले. परंपरागत पद्धतीने त्यांचे शिक्षण झाले. वेद , वेदांत, धर्मशास्त्र, काव्य, न्यायशास्त्रासारख्या गहन विषयांचे त्यांना पूर्ण ज्ञान होते. त्याच्या जोडीला श्रीगणेश व श्री दत्तात्रेयांची अखंड उपासना त्यांनी केली. श्री दत्तमहाराजांच्या मातोश्रीही अत्यंत पतिनिष्ठ, धर्माचरणी, दैवीगुणसंपन्न होत्या. या दोघांना प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामी महाराजांचे कृपाछत्र लाभले होते. त्यांच्या आज्ञेप्रमाणेच पुत्रप्राप्तीसाठी जे या उभयतांनी जपजाप्य, यज्ञयागादि अनुष्ठान केले त्याचा प्रसाद म्हणून श्रीदत्तमहाराजांचा जन्म झाला.

श्रीदत्तमहाराजांचे बालपण व प्राथमिक शिक्षण वाडीत झाले. प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांचे प्रिय शिष्य श्री दीक्षितस्वामी महाराजांचा त्यावेळी वाडीत व औरवाड येथे निवास होता. त्यामुळे श्रीदत्तमहाराजांना त्यांचेही मार्गदर्शन व कृपाछत्र लाभले. श्रीदीक्षित स्वामी श्री दत्तमहाराजांचे दीक्षा गुरु होते. श्रीदीक्षित स्वामीमहाराजांनी वाडीतल्या लहान मुलांवर ईशभक्तीचे संस्कार खोलवर रुजवले.

पुढचे शिक्षण श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्य जेरेस्वामी महाराजांच्या संस्कृत पाठशाळेत झाले.अत्यंत कुशाग्र बुद्धिमत्ता असल्याने कोणताही विषय ते अल्पावधीत आत्मसात करीत. ते श्रेष्ठ गुरुभक्त होते. श्रीमहाराजांनी पहिला श्रीमत् भागवत सप्ताह औरवाड येथे वयाच्या १६ व्या वर्षी केला. श्रीदीक्षित स्वामींनी अत्यंत प्रसन्न होऊन त्यांना ''तुला पूर्ण ज्ञान होऊन तुझे सर्वतोपरि कल्याण होईल'' असा आशीर्वाद दिला. श्रीमहाराजांचे वाडीवर अत्यंत प्रेम होते.

आपले उर्वरित जीवन श्रीदीक्षित स्वामीमहाराजांच्या सेवेत जावे असा त्यांना ध्यास होता. १९८६ मध्ये श्रीवामन निवास पूर्ण झाल्यावर त्यांची श्रीदीक्षितस्वामीमहाराजांच्या आज्ञापत्राप्रमाणे औरवाडला जाऊन कायम वास्तव्य करायची तीव्र इच्छा होती व त्यांनी ती अनेकांजवळ बोलूनही दाखविली होती. त्यासंदर्भात त्यांनी एकदा गुरुद्वादशी उत्सवाच्या काळात मुंबईच्या काही भक्त मंडळींजवळ बोलताना असे म्हटले होते, "पिताजी म्हणत असत, मोठ्या विस्ताराच्या वृक्षावर पक्षी राहतात. पहाटे ते चारा पाण्याकरता उडून जातात पण संध्याकाळी न चुकता परत त्याच वृक्षावर येऊन राहतात. तसे हे स्थान आहे. नोकरीच्या निमित्ताने कुठेही राहावे लागले तरी शेवटी इथे येऊन राहायचे आहे."

१९८९ सालपर्यंत ते न चुकता दर वर्षी वाडीला एकदा श्रीनारायणस्वामी महाराजांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने आणि गुरुद्वादशीच्या निमित्ताने जाऊन ८-१० दिवस राहात असत. तिथे ते परंपरागत पुराण सेवा करीत.

श्रीमहाराजांचा व्याकरणादि विषयांचा अभ्यास सांगलीच्या श्री अभ्यंकरशास्त्रींकडे व पुढील सर्व शास्त्रांचे अध्ययन धारवाडच्या श्री नागेशशास्त्री उप्पेनबेटगिरींकडे झाले.त्यांची प्रखर बुद्धिमत्ता पाहून श्रृंगेरीच्या आचार्यांनी "आपल्या विद्यावंशामध्ये दत्तात्रेयशास्त्री हे प्रदीपक शिष्यरत्न आहे" असे प्रशंसोद्गार काढले होते.

तत्कालीन प्रथेप्रमाणे योग्य वयात त्यांचा विवाह होऊन सौ लक्ष्मीआईसाहेबांची त्यांना शेवटपर्यंत उत्तम साथ मिळाल्याने प्रपंचही श्रीसमर्थ रामदासांनी सांगितल्याप्रमाणे "नेटका" उत्तमरीत्या झाला.

पुढे पुण्यात आल्यावर मीमांसा विद्यालयातील श्री सुब्बाशास्त्रीं-जवळ श्रीमहाराजांचे मीमांसाशास्त्राचे अध्ययन झाले.

नंतर त्यांनी निवृत्तीकाळापर्यंत टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अध्यापन केले. कोणताही क्लिष्ट विषय सोपा करून सांगण्याची त्यांची हातोटी होती. त्यांच्या एका विद्यार्थ्याने सांगितले की जरी पहिल्यांदा समजावल्यावर त्यांना तो समजला असला तरी ते महाराजांच्या शिकवणूकीची गोडी अधिक घेण्यासाठी तो विषय समजला नाही असे सांगत म्हणजे महाराज पुन्हा तो विषय वेगळ्या रीतीने समजावीत. विद्यार्थ्यांना महाराजांच्या समजावण्याचा आनंद मिळे. संस्थेत अध्यापकाला काय सोयी, गैरसोयी आहेत याचा विचार न करता ते विद्यादानसारखे दान नाही या भावनेने सदैव विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनाकरता झटत असत. त्या काळात सर्वत्र मोठ्या प्रमाणावर घरोघरी फोन नव्हते. अचानक कांही कामानिमित्ताने त्यांना जर दुसऱ्या दिवशी त्यांचा तास घेता येणे शक्य नसेल तर विद्यार्थ्यांचा वेळ फुकट जाऊ नये म्हणून आधल्या दिवशी ते स्वत: प्रत्येक विद्यार्थ्याच्या घरी जाऊन त्याला तसे सांगत. दुसऱ्या विद्यार्थ्याने अशी आठवण सांगितली की जरी एकीकडे विद्यार्थ्यांना एखादा विषय समजावीत असले तरी दुसरीकडे त्यांचे वेगळे चिंतन चालू असे. अध्यापनाच्याबरोबरच दैनंदिन उपासनेत कधीही खंड पडला नाही.

पुढे प.प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांचे प्रिय शिष्य प. पू. श्रीगुळवणी महाराजांशी पूर्व परिचयामुळे निकटचा संपर्क आला आणि श्रीगुळवणीमहराजांनी श्री दत्तमहाराजांची योग्यता जाणून त्यांना शक्तिपात अनुग्रह दिला व दीक्षा गुरुत्वाचे अधिकारही प्रदान करून सर्वार्थाने आपला उत्तराधिकारी नेमले.

श्रीदत्तमहाराजांचे जीवन विविध प्रकारच्या कार्याने भरलेले आहे. श्रीगुळवणीमहाराजांच्या आज्ञेने त्यांनी १९५४ साली प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांचे समग्र वाङ्मय एकत्रित करून संपादित करून १२ खंडांमध्ये प्रसिद्ध केले. हे अत्यंत कठिण

कार्य होते. त्याकरता श्रीमहाराजांनी अथक परिश्रम केले. श्री स्वामीमहाराजांच्या वाङ्मयाची उत्तम जाण असल्यामुळेच श्रीगुळवणीमहाराजांनी श्रीमहाराजांची या कार्याकरता निवड केली होती.

''वेदांत पारिजात सौरभ'' या निंबार्काचार्यांच्या ब्रम्हसूत्रावरील भाष्याचा मराठी अनुवाद केला. या ग्रंथाला श्रीदत्तमहाराजांनी लिहिलेली प्रदीर्घ प्रस्तावना त्यांच्या वेदांताच्या सखोल अभ्यासाच व विद्वत्तेचा परिचय करून देणारी आहे. यामध्ये सर्व दर्शनांचा परामर्श घेऊन वैदिक दर्शनाचे श्रेष्ठत्त्व प्रतिपादित केले आहे.

''सर्वदर्शन संग्रह'' या ग्रंथावरही त्यांनी विद्वत्ताप्रचुर टीका लिहिली आहे.

१६ व्या वर्षापासून ते ८२ व्या वर्षापर्यंत त्यानी महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर असंख्य श्रीमत् भागवत सप्ताह केले. त्या द्वारे भक्तिमार्गाचा प्रसार केला

प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांच्या अभंगांवर त्यांनी अनेक प्रवचने केली आणि प्रवचनांच्या माध्यमातून ईशभक्तीचे वर्धन केले, सामान्य लोकांना सन्मार्गाला लावले, समाज प्रबोधन केले.

त्यांच्या ठिकाणी भक्तीचा त्रिवेणी संगम पहायला मिळतो. कुलपरंपरेप्रमाणे श्री धुंडिराजमहाराजांचे व पुढे श्रीगुळवणी महाराजांचे उत्तराधिकारी म्हणून त्यांनी भक्तोद्धाराचे अखंड कार्य केलेच पण त्याचबरोबर त्यांची स्वत:चीही शिष्य परंपरा निर्माण झाली.

त्यांच्या विद्वत्तेचा किर्ती सुगंध फक्त भारतातच नव्हे तर देशोदेशी पसरला होता. त्यामुळे नुसते भारताच्याच नव्हे तर जगाच्या कानाकोपऱ्यातून जिज्ञासू त्यांच्याकडे मार्गदर्शनाकरता येत आणि कृतार्थ होऊन जात.

ज्याप्रमाणे प. पू. गुळवणीमहाराजांनी आपल्या गुरुंच्या चिरंतन स्मृतीकरता "श्रीवासुदेवनिवास" बांधला त्याचप्रमाणे श्रीदत्तमहाराजांनी श्रीगुळवणीमहाराजांवरच्या गुरुभक्तीचे प्रतीक म्हणून पुण्यात श्रीवामन निवास ही भव्य वास्तू बांधली. १९८६ साली श्रीगुळवणी महाराजांच्या जन्मशताब्दिचे औचित्य साधून याचे उद्‌घाटन झाले. त्याकरता टिळक महाराष्ट्र विद्यापीठातून निवृत्त झाल्यानंतर वयाची व स्वत:च्या प्रकृतीची पर्वा न करता अनेक वर्ष त्यांनी गांवोगांव श्रीभागवत सप्ताह करुन आर्थिक मदत मिळवली. यात धार्मिक कार्यक्रमांच्या जोडीला मुख्यत्वे करुन समाजसेवेचा एक भाग म्हणून आरोग्य सेवा लोकांना उपलब्ध करुन दिली आहे.

ज्याप्रमाणे पुण्यात श्रीवामन निवास बांधला त्याचप्रमाणे त्यांच्या आशीर्वादाने औरवाड येथील श्रीदत्तअमरेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार झाला. शाश्वत निधीची तजवीज होऊन त्याची रीतसर व योग्य पद्धतीने कायमची व्यवस्था लागली. हे त्यांच्या जीवनांतले फार मोठे कार्य आहे.

आदि शंकराचार्यांच्या विचारप्रणालीला अनुसरुन त्यांनी शेवटपर्यंत ज्ञानदानाचे कार्य केले. त्याचबरोबर दु:खी आर्त जीवांचे दु:ख शास्त्रीय उपाय सांगून दूर केले व त्या निमित्ताने अनेक जीवांना त्यांनी ईशभक्तीकडे प्रवृत्त केले.

श्रीमहाराजांना मिळालेल्या असंख्य पदव्यांपैकी कांही प्रमुख पदव्या व सन्मान:

भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांच्या हस्ते भारत सरकारकडून संस्कृत भाषेतील असाधारण नैपुण्य मिळवल्याबद्दल "विद्यावाचस्पती" पदवी १९६१ साली मिळाली.

पुण्याच्या वेदशास्त्रोत्तेजक सभेने त्यांना "न्यायचूडामणी" पदवी बहाल केली.

द्वारका पीठाच्या श्री शंकराचार्यांकडून "महामहोपाध्याय" पदवी प्रदान करण्यात आली.

प्रयागच्या विद्वत् सभेने त्याना "ब्रम्हर्षी" पदवी दिली.

कांचीकामकोटी पीठाधीश्वर श्रीशंकराचार्यांकडून सुवर्ण कंकण व सन्मानपत्र प्राप्त झाले

भारत सरकारकडून "राष्ट्रीय शिक्षक" व "राष्ट्रीय पंडित" पुरस्कार मिळाला.

श्रीदत्तमहाराजांच्या व्यक्तिमत्वाचे पैलू प्रगट करणारे प्रसंग

१) त्यांच्या भक्तांना वाटायचे त्यांनी रेल्वेने प्रवास करताना फर्स्ट क्लासने किंवा वातानुकूल वर्गातून प्रवास करावा. भक्तांच्या भावना तर दुखवायच्या नाहीत आणि उच्च श्रेणीत प्रवासही करायचा नाही हे दोन्ही साधण्याचे त्यांचे कौशल्य होते. ते अत्यंत प्रेमाच्या स्वरात भक्तांना सांगत "अहो, आमची प्रकृती चांगली आहे. आम्हाला द्वितीय श्रेणीत प्रवास केल्याने त्रास होणार नाही. दुसरे असे की आम्ही एकटे त्या फर्स्ट क्लासमध्ये बसणार आणि तुम्ही सर्व मंडळी एकत्रित प्रवास केल्याचा आनंद घेणार. त्यापेक्षा आम्हालाही तुमच्या आनंदात सहभागी करुन घ्या ना. दुसरे असे की आमच्या फर्स्टक्लासच्या तिकीटात आणि सेकंड क्लासच्या तिकीटात जो भाड्याचा फरक असेल ती रक्कम आमच्या ऐवजी कांही पूजा, अभिषेक इ. करता खर्च केलीत तर आम्हाला जास्त आनंद आहे"

२) मुंबईच्या एका भक्ताने त्यांना कार्यालयाकडून पगारवाढीतील फरकाची रक्कम मिळाली ती रक्कम महाराजांना त्याच्या वैयक्तिक कारणाकरता खर्च करावी अशा इच्छेने मनी ऑर्डरने पाठवली. त्यांचे लगेच उत्तर आले, "आपण पाठवलेली मनी ऑर्डर मिळाली पण त्याचा विनियोग काय करायचा ते कळवले नाहीत. आश्रमात पूजा अभिषेक देणगी वगैरेपैकी काय करायचे ते कृपया कळवावे."

३) तसेच कोणी त्यांना भारी सोवळे किंवा वस्त्र दिले की लगेच त्यांच्या मनासमोर वाडीच्या पादुका येत आणि म्हणत ''देवांना हे किती छान दिसेल''

४) बहुतेक वेळा अनेक लोक आपले दु:ख अगतिक होऊन त्यांच्यासमोर मांडत आणि विचारत त्यांच्याच वाट्याला असे दु:ख का यावे वगैरे.महाराज त्यांना हरतऱ्हेने समजावताना म्हणत, ''संसारात दु:ख कष्ट हे आपल्या संचिताचे फळ असते. आपण त्याची तीव्रता कशी कमी करायची ते पाहू'' आणि त्याच्या दु:खावर फुंकर घालत, उपाय सुचवत.

५) ते दैनिक समाचार पत्र वाचीत असत. पुण्यात असताना सकाळी प्रादेशिक बातम्यांच्या आधी दिल्या जाणाऱ्या संस्कृत भाषेतील बातम्या ऐकत असत. जगात घडणाऱ्या महत्वाच्या घटनांची दखल घेत असत. स्थानिक, राज्यस्तरीय, राष्ट्रीय तसेच जागतिक पातळीवरच्या राजकारणाची त्यांना पूर्ण जाणीव होती, सखोल ज्ञान होते. मुंबईच्या एका बऱ्यापैकी वाचन असणाऱ्या गृहस्थाच्या मनांत एकदा सहज विचार आला महाराज तर संत, त्यांचा धर्मशास्त्राचा गाढा अभ्यास असेल पण त्यांना अमेरिका, रशिया यांचे काय डावपेच चालतात, शीतयुद्ध म्हणजे काय वगैरेची काय कल्पना असणार? पण ते त्यात गुंतलेले नव्हते. त्यांच्याशी थोडेसे बोलले की हे लक्षात यायचे. परंतु नंतर समजून चुकायचे की असे जरी असले तरी त्यांचा मूळ प्राणाधार गंभीर अनुभूतियुक्त अध्यात्मिक जीवन हाच, अन्य सर्व काही बाह्यत: क्षीण आवरण होते. त्यांचे मन सदासर्वदा उच्च भूमीवर विचरण करीत असूनही स्वत:ला ते संसारापासून पृथक समजत नसत. सामान्य जीवांच्या संसारातील दु:ख कष्ट दूर व्हावेत याकरता त्यांना तीव्र तळमळ आणि प्रबळ इच्छा होती.

६) कोणी जर त्यांच्या सहवासात राहाण्याची इच्छा प्रदर्शित केली तर ते समजूत काढत. गुरुंजवळ राहून त्यांची सेवा करणे प्रत्येक वेळी संभवनीय आणि फलदायी असत नाही. आपण जे कांही नोकरी धंदा करत असू तो प्रामाणिकपणे आणि निष्ठेने करणे हीच गुरुसेवा आहे. दीर्घकाल गुरुंच्या सहवासात राहिले तर बुद्धिभेद होण्याचा संभव असतो. कारण जर योग्य दृष्टी नसेल तर गुरु त्याला सर्व व्यवहार इतर चार चौघांसारखेच करताना दिसतात आणि त्यामुळे त्यांची महती कमी होऊ लागते. त्यापेक्षा चारित्र्याची पवित्रता, आत्मोत्कर्ष आणि सेवाभाव हेच त्याचे मापदंड आहेत. नियमित उपासना, साधना वगैरे करुन अध्यात्मिक उन्नती साधण्यासाठी गृहस्थाश्रमी भक्तांना सतत उपदेश करीत आणि दिखावटी धार्मिकता तसेच भ्रामक धर्मनिष्ठा या विरुद्ध सतत सावध करीत.

७) आश्रमात घडणाऱ्या बारीक सारीक घडामोडींची ते सावधानपूर्वक दखल घेत असत. संस्थेत राहाणाऱ्या सर्वांच्या सर्वांगीण कल्याणासाठी त्यांचे तळमळीचे प्रयत्न असत

८) त्यांचा स्नेह, प्रेम, शासन, अभय आणि उपदेश आजही त्याच्या सहवासात आलेल्या जीवांच्या जीवनांत प्रत्येक भावातून जीवनप्रेरणा देत आहे. आपसात बोलताना जेव्हां त्यांच्या आठवणी निघतात तेव्हां जाणवते ते आत्तासुद्धा या लोकांचे रक्षण करीत आहेत. माता, पिता, गुरु, इष्ट सर्व कांही त्यांच्यात एकवटलेले होते. त्यांची अतीत स्मृती, अभयदान, दर्शनाचा आनंद, आमचे अज्ञान, त्यांच्याकडे नेलेल्या तक्रारी, हर एक विषयातील जिज्ञासा आणि त्यांचे उत्तर हे सर्व पाथेय घेऊनच जीवनाची वाटचाल करीत आहोत. प्रत्येक बाबतीत ते भक्तांच्या जीवन नौकेचे कर्णधार होऊन ध्येयमार्गावरील सत्यवस्तूच्या प्राप्तीसाठी प्रेरणा देत आहेत.

९) श्रीवासुदेव निवासात किंवा त्यांच्या घरी गेले आणि जर ऐकायला मिळाली तर त्यांच्या अमृतवाणीचे आकंठपान करता येत असे. त्यांचे ते उपदेश आमच्यासाठी चिरकाल टिकणारी अमूल्य संपदा बनून गेले आहेत. ते भक्तांचे अंतरंग व बहिरंग पहाणारे अमर्याद अध्यात्मिक शक्तिसंपन्न पुरुष होते. आमच्यातील जे जितके ग्रहण करु शकत त्यांना त्याच तऱ्हेचा उपदेश व आदेश देत.

१०) पूज्यपाद श्रीमहाराजांचे दर्शन उद्दीपनापूर्ण वाणी, असीम हार्दिक आशीर्वाद, भक्तांच्या अंत:करणात अध्यात्मिक वन्हीचे उद्दीपन, आशा दिलासा तसेच मानसिक हिंमत प्रदान करणे, भक्तांचे दु:ख कष्ट आणि तापत्रय दूर करण्याची अपूर्व शक्ती, सर्वांना आश्रय प्रदान एवढेच नव्हे तर जाति वर्ण यांचा विचार न करता सर्वांप्रती प्रेमभाव प्रदर्शित करणे इ. आमच्या जीवनांतील अक्षय आणि अमूल्य संपत्ती ठरली आहे.

११) त्यांच्या बोलण्यात सतत पुढील उपदेश असे, - ईश्वराची तळमळीने प्रार्थना करा, त्याला सर्वार्थाने शरण जा, संतांची चरित्रे , संतांचे ग्रंथ वाचा, जमेल तशी साधना करा. शरणागतभाव महत्वाचा आहे. "तुजविण आम्हा असे कोण देवा..." हा त्यांचा आवडीचा अभंग होता आणि ते अत्यंत तळमळीने तो म्हणत. संतांची चरित्रे वाचली म्हणजे ज्यांनी सर्व समाजाला आंनद दिला सुख दिले त्यांनी स्वत: किती दु:ख भोगले हे आपल्याला समजते. जप तप ध्यान साधना आदि सर्व एक मात्र शरणागती निर्माण होण्यासाठी आहे आणि पुन्हा सर्वतो परी आवश्यक आहे ईश्वरकृपा. अनन्य चित्ताने त्याचे स्मरण मनन, ध्यान, चिंतन आणि प्रार्थना करीत राहिल्याने तो कृपा करतो. असे त्यांचे सांगणे असे.

१२) अनेक लोक त्यांना विचारीत, महाराज साधना कधी करु? ते सांगत, जशी जमेल तशी करा. एकाने विचारले किती

करावी ? ते हंसून म्हणाले, विहीर किती खणायची असे विचारले तर काय उत्तर देणार?

१३) गीतेच्या १६व्या अध्यायात भगवंतांनी जी दैवी गुणसंपदा सांगितली आहे ती सर्वार्थाने श्री महाराजांच्या ठिकाणी विकसित झालेली पहायला मिळे. त्याच्या अमानित्वाची मोजकी उदाहरणे वर्णन केल्याशिवाय राहावत नाही. श्रीमहाराजांना वाडीसारख्या तीर्थक्षेत्री गेल्यावर नमस्कारसुद्धा करुन घेण्यात संकोच वाटतो हे माहीत नसलेले एक गृहस्थ एकदा श्रीमहाराजांचा वाडीत मुक्काम असताना तिथे गेले. श्री महाराज मनोहर पादुकांसमोर उभे होते. हे गृहस्थ आपल्या गुरुभावनेने श्री महाराज दिसताक्षणीच त्यांना नमस्कार करायला वाकले. महाराज लगेच मनोहर पादुकांकडे इशारा करीत म्हणाले, अहो, हे काय करताहात. ते बसले आहेत ना? त्यांच्यासमोर आम्हाला नमस्कार करु नका.

१४) श्री प. पू. योगिराज गुळवणी महाराज हे स्वत: आपल्या सर्वोत्तम शिष्याविषयी म्हणजेच प. पू. श्री दत्तमहाराजासंबंधी असे लिहितात. (प्रसंग :- श्री प. प. श्री नारायणस्वामी चरित्र प्रकाशन इ. स. १९६२, प्रस्तावना स्वत: श्री गुरुमहाराज लिखित) आदरार्थी, अलंकारीक आणि प्रेमभावनेने गद्‌गद् असलेले हे उद्‌गार आहेत.

‘‘श्री दत्तमहाराज[१] व तदभिन्न संतशिरोमणि श्रीमौनिस्वामी महाराज यांच्या परमानुग्रहास पात्र झालेल्या कवीश्वरांच्या कुळांत आपल्या राहिलेल्या सत्कार्याकरितां पुन: प्रकट झालेल्या वक्रतुंड महाराज कवीश्वर स्वरुपी न्यायवेदान्तादिसर्वशास्त्रनिषणात विद्यावाचस्पती या सार्थपदवीने विभूषित अमानित्वादिगुणालंकृत दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर यांनीही या ग्रंथाच्या शुद्धीकरणादि सर्वच कार्यात श्रीमद्वासुदेवानंदसरस्वती ग्रंथप्रकाशनाप्रमाणेच अत्यंत आत्मीयतेने साहाय्य केले.’’

१ ‘येथे श्रीदत्तमहाराज म्हणजे प्रत्यक्ष श्रीदत्तप्रभू अभिप्रेत आहेत.’

१५) श्रीगुरुमहाराजांच्या एका अनुग्रहिताच्या मनांत एकदा विकल्प आला. श्रीमहाराज वासुदेव निवासात गुरुमहाराजांच्या खोलीत किंवा त्यांच्या आसनावर बसत नाहीत कारण आपली तेवढी योग्यता नाही असा त्यांना न्यूनगंड असावा. ही गोष्ट श्रीमहाराजांकडे नेहमी जाणाऱ्या एका गृहस्थाजवळ बोलून दाखवली एवढेच नव्हे तर हे असेच आहे की नाही हे श्रीमहाराजांना विचारण्यास सुचवले. त्या गृहस्थाने श्रीमहाराजांना हे स्पष्ट सांगितले आणि श्रीगुरुमहाराजांच्या आसनावर न बसण्याचे कारण विचारले. श्री महाराज हंसून म्हणाले, "श्रीमहाराज देहात असताना आम्ही कधी त्यांच्यासमोर सुद्धा बसलो नाही. आज ते नाहीत असे आम्ही मानत नाही. ते अव्यक्त रुपाने इथे आहेतच मग ते असताना आम्ही त्यांच्या आसनावर कसे बसायचे?"

१६) श्रीवासुदेवनिवासात गेल्यावर जर एखाद्याने एक हार नेला तर तो स्वत: घालून न घेता श्रीगुरुमहाराजांना घालायला सांगत. तसेच त्यांच्या समोर साधनेला बसायला आग्रह धरला तर श्री गुरुमहाराजांच्या खोलीत साधनेला बसायला सांगत

१७) त्यांच्या प्रतिभाशक्तीला वाङ्मय निर्मिती करणे काय अशक्य होते? त्यांनी करायचे ठरवले असते तर आदि शंकराचार्यांप्रमाणे वाङ्मय निर्मिती केली असती पण परंपरेचा त्यांनी मान राखला. प. पू. श्रीगुरुमहाराजांनी कांहीही लिखाण केले नाही याचे कारण सांगताना ते म्हणत त्यांच्या गुरुंनी म्हणजे प.प. वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांनी इतके काही लिहून ठेवले आहे की ते आणखी काय वेगळे लिहीणार? तीच परंपरा श्री महाराजांनी चालू ठेवली. योग्यता व पूर्ण शक्ती असूनही कांही वाङ्मय निर्मिती केली नाही.

१८) दादरच्या श्री जुवेकरांकडे प. पू. श्रीनानामहाराज मुक्कामाला आले होते. त्यांनी श्री महाराजांना बोलावले. दोघांनाही आसने तयार केली होती. श्री नानांनी श्री महाराजांचे यथायोग्य स्वागत केले आणि आसन ग्रहण करण्यास सांगितले पण महाराज त्यावर बसेनात. कां तर ती दोन्ही आसने एकाच उंचीची होती. शेवटी श्री नानांच्या आसनापेक्षा कमी उंचीचे आसन घेऊन श्री महाराज त्यावर बसले.

१९) असाच प्रसंग एका भक्तांच्या हरिहरेश्वर येथील घरी घडला होता. प. पू. महाराजांच्या बरोबर एक संन्यासी स्वामीही आले होते. त्यांच्या घराच्या मागच्या अंगणात श्री महाराजांकरता एक खुर्ची ठेवली होती आणि समोरच्या औदुंबराच्या पारावर संन्याशाची बसण्याची सोय केली होती. श्री महाराज खुर्चीवर न बसता एक पाट घेऊन खाली बसले. श्रीमहाराज त्या खुर्चीवर कां बसत नाहीत हे सुरवातीला कोणाच्या लक्षात येईना. नंतर समजले की संन्यासी कसाही असला तरी वंदनीय असतो. श्री महाराजांचा अध्यात्मिक किंवा ज्ञानाचा अधिकार कितीही मोठा असला तरी ते गृहस्थाश्रमी होते म्हणून ते पारापेक्षा इंच दोन इंचाने उंच असलेल्या खुर्चीवर बसले नाहीत. अशी असंख्य उदाहरणे देता येतील.

२०) श्रीवामन निवासाकरता निधी जमा केला जात होता. कधी लोक श्री महाराज दौऱ्यावर असले तर त्यांच्याबरोबर न जाता पुण्यात थांबलेल्या व्यक्तीजवळ पैसे देत असत आणि मग श्रीमहाराजांची भेट झाल्यावर त्यांना तसे सांगत. एकदा असेच एका बाईने श्री महाराजांना त्यांच्या दौऱ्याच्या काळात कोणाजवळ पैसे आणून दिले ते महाराजांना येऊन मिळाले का विचारले. श्री महाराजांच्या लक्षात आले की त्या गृहस्थानी ते पैसे श्री महाराजांनाही सांगितले नाही आणि आश्रमातही जमा केलेले नाहीत. श्री महाराजांनी त्या बाईंना

पैसे मिळाल्याचे सांगितले पण नंतर स्वत:जवळची तेवढी रक्कम आश्रमात जमा करुन त्या बाईंना पावती दिली. ज्यांनी त्या पैशाचा अपहार केला ते गृहस्थ महाराजांना चांगल्या प्रकारे माहित होते. त्यांची शोभा करण्यापेक्षा प्रकरण मिटवणे आणि संस्थेचे लज्जा रक्षण करणे हे महत्वाचे होते. ते गृहस्थही इतके निर्ढावलेले होते की त्यांना महाराजांनी या पूर्वीही अशी गैरकृत्य न करण्याबद्दल समजावूनसुद्धा आणि महाराजांनी पैसे भरले हे समजूनसुद्धा पश्चात्ताप झाला नाही व त्यांनी आपली चूक कबूल केली नाही.

२१) कोणी शक्तीपात दीक्षा ग्रहण करण्यातकरता आला तर ते त्याला त्याच्या उपास्य देवतेचे नांव विचारीत किंवा श्री गुरुमहाराजांचा फोटो आहे का विचारीत. त्याने होकार दिला की दीक्षेचा मुहूर्त सांगून फोटोसमोर दीक्षा ग्रहण करण्यास बसण्यास सांगत. पुढे म्हणत तेच तुम्हाला दीक्षा देणार आहेत. एका चिकीत्सक गृहस्थाने महाराजांना विचारले, मग तुम्ही काय करता? ते चटकन म्हणाले आम्ही फक्त त्या जीवाचे कल्याण व्हावे म्हणून प्रार्थना करतो. त्यांच्या या प्रार्थनेतच किती सामर्थ्य होते ते आपण पाहिलेच आहे.

२२) अनेकांनी त्यांना त्यांच्या पायात घातलेल्या पादुका मागितल्या. त्यांनी त्या कधीच दिल्याचे ऐकीवात नाही. हिंगोलीच्या श्री देवरांनी भक्तीभावाने चांदीच्या पूर्ण आकाराच्या पादुका करुन त्या महाराजांच्या पायात घालूनच घ्यायचा निर्धार केला होता. महाराज त्यांच्या घरी आले असता त्यांनी महाराजांना त्या पादुका पायात घालण्यास सांगितले. महाराजांनी चतूरपणे त्या मस्तकावर धारण करुन त्यांच्या बरोबर पाद्यपूजेकरता ज्या चांदीच्या परंपरागत पादुका होत्या त्यांच्या शेजारी ठेवून दोन्ही पादुकांचा एकमेकांना स्पर्श करविला. कोणाला ते काय करतात हे लक्षातच आले नाही.

नंतर जेव्हा यजमान त्या मोठ्या पादुका पायात घालायचा आग्रह करू लागले तेव्हां म्हणाले पूजेतल्या पादुकांचा स्पर्श ज्यांना झाला आहे त्या पायात कशा घालता येतील? त्या आता पूजेतच ठेवल्या पाहिजेत. यजमानाना काय बोलावे समजेना. महाराजांकडून पुजेकरता त्यांना पादुका तर मिळाल्या होत्या हे नाकारता येत नव्हते.

२३) मुंबईच्या कांही भक्त मंडळींसमवेत ते काशी यात्रेला गेले होते. त्या वेळी तिथल्या ब्राह्मणांनी त्यांच्या प्रथेप्रमाणे लोकांना महाराजांच्या अपरोक्ष सांगितले, ''इथे अमूक अमूक श्राद्ध वगैरे विधी केलेत की पुन्हा तुम्हाला कधी श्राद्ध करायला नको.'' पण ते विधी करण्याकरता ते सामान्य माणसांच्या शास्त्राबद्दलच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन भरपूर पैसे उकळत. त्यांचे म्हणणे जेव्हां महाराजांना सांगितले तेव्हां निंदेचा किंवा टीकेचा शब्द न उच्चारता ते म्हणाले, ''आम्ही दरवर्षी श्राद्ध पक्ष करतो.''

२४) अवज्ञा जर एखाद्याकडून अजाणतेपणाने झाली तर त्याला न दुखवता ते त्याची चूक समजावून देत. ते जालन्यात एकदा एका भक्ताच्या घरी उतरले होते. त्या घरासमोर पोस्टाची छोटी टांगलेली पत्र पेटी होती. श्री महाराजांनी त्यांच्याबरोबर आलेल्या व्यक्तीला पत्र लिहून त्या समोरच्या पेटीत टाकायला सांगितली. तो जेव्हां पत्र टाकायला निघाला तेव्हां यजमानीणबाईंनी त्याला सांगितले, ''त्या पेटीत कशाला टाकता, बरेच वेळा चार चार दिवस ती पेटी उघडत नाहीत. माझ्याकडे द्या. मी आमच्या नोकराला मेन पोस्ट ऑफिसात जाऊन पत्र टाकायला सांगते.'' यालाही त्यात कांही गैर वाटले नाही. याला वाटले जर दीक्षेच्या तारखा देणारी पत्रे असतील आणि या भाभी सांगतात त्याप्रमाणे जर ही पेटी चार चार दिवस उघडलीच गेली नाही तर? या विचाराने त्यानेही भाभींना संमती दिली. दोन

दिवसांनी महाराजांनी त्याला आठवणीने त्याने पत्र कुठे टाकली ते विचारले. त्याने खरे ते सांगितले. त्यावर ते एवढेच म्हणाले, ''आम्ही यापूर्वी त्या पेंटीत टाकलेली पत्रे लोकांना वेळेवर मिळाली होती.''

२५) विद्यार्थ्यांनी झटून अभ्यास करुन यश संपादन करावे यावर त्यांचा भर होता. तसेच नोकरी करणाऱ्याने आपली जबाबदारी लक्षात घेऊन  निष्ठेने, प्रामाणिकपणे करावी तीच गुरुसेवा आहे असे त्यांचे सांगणे होते. पूर्णपणे समर्पण भाव झाल्याशिवाय उगीचच आपण आपला सगळा भार गुरुंवर, देवावर टाकून निष्क्रिय राहाणे त्यांना पसंत नव्हते. त्याकरता ते श्रीमारुतीरायांचे उदाहरण देत. श्रीरामचंद्रांनी राज्यारोहण केल्यानंतर ज्यांनी ज्यांनी त्यांना सीतेचा शोध घेण्यात मदत केली त्या सर्वांचा यथा योग्य सन्मान केला. जेव्हा श्रीमारुतीयाय आले तेव्हां श्रीरामचंद्र त्यांना म्हणाले, ''तू जर सीतेचा शोध लावला नसतास तर पुढे कांहीच घडले नसते. त्यामुळे  मी तुझ्या उपकारांची परतफेडच करु शकत नाही. कारण जर प्रत्युपकार करायचा म्हटला तर तूं संकटात आला पाहिजेस आणि तू संकटात यावास अशी इच्छा मी करु शकत नाही.तेव्हा हा तुझा उपकार माझ्या ठायीच जिरो'' इ. त्यावर श्रीमारुतीराय म्हणाले, ''देवा, झाडाच्या एका फांदीवरुन दुसऱ्या फांदीवर उड्या मारणारा मी एक सामान्य वानर आहे. केवळ आपल्या शक्तीनेच समुद्र पार करुन जाऊ शकलो.'' महाराज म्हणतात, असे असावे. आपल्या प्रयत्नांनी यश मिळवावे आणि मिळाल्यावर त्याचे श्रेय आपल्या उपास्य देवतेला द्यावे. वास्तविक पाहता श्रीमारुतीरायांनी योगाभ्यास करुन सिद्धी मिळवल्या होत्या. त्या सिद्धीच्या सहाय्याने शरीर मोठे करुन ते समुद्र पार करुन गेले पण त्यांनी स्वत:कडे कोणतेही कर्तृत्व घेतले नाही. अशी आपली भावना असावी. सर्व कर्तृत्व ईश्वराचे आहे हाच गीतेचा महत्वाचा सिद्धांत आहे.

२६) श्री महाराजांचा भिवंडी येथे श्रीभागवत सप्ताह चालू होता. मुंबईतल्या एका साधकाची मुलगी १० वीच्या परिक्षेला बसणार होती. त्यांच्या गुरुबंधूला सहजभावाने वाटले तिला महाराजांच्या दर्शनाला नेऊन आणावे म्हणजे त्यांचे आशीर्वाद मिळतील. त्याच्या आग्रहास्तव ते तिघे भिवंडीला गेले. श्रींच्या खोलीच्या दारात ती पाऊल टाकताच श्री म्हणाले, "तुम्ही इथे आलात म्हणजे आज तुमचा संध्याकाळचा क्लास बुडला" यावरुन त्यांना काय म्हणायचे होते हे आपल्या सहज लक्षात येईल की आमच्या दर्शनापेक्षा तुमचा अभ्यास महत्वाचा आहे, आमचे आशीर्वाद सदैव तुमच्या पाठीशी आहेतच.

२७) भारतीय संस्कृतीत निराशावाद नाही हा त्यांचा पक्का सिद्धांत होता आणि तो व्यावहारिक जीवनाचे मार्गदर्शन करतानाही अनुभवास येत असे. सुमारे तीस वर्षांपूर्वीची घटना आहे. गिरिश नांवाच्या एका तरुणाने मुंबईतील एका सरकारी खात्यात नोकरीचा अर्ज केला होता. पुढे वर्ष दोन वर्ष कांही त्याला कॉल आला नाही. श्रीनी त्याच्या अर्जाचे काय झाले हे त्याला विचारल्यावर तो वैतागून म्हणाला त्याने अर्ज केला होता पण कांही उपयोग झाला नाही. श्रींनी त्याला त्याने परत अर्ज केला का किंवा चौकशी केली का असे विचारल्यावर तो आणखीनच चिडून म्हणाला, परत कशाला अर्ज करायचा, तिथे जागा नाही इ. त्यावर श्री म्हणाले, तुम्ही जेव्हा अर्ज केलात तेव्हां तिथे पद रिक्त नव्हते हे आम्ही मान्य करतो पण गेल्या दोन वर्षात कोणी निवृत्त झाले असेल, कोणाची बदली झाली असेल किंवा कोणाला बढती मिळाली असेल, थोडक्यात जागा रिकामी झाली असेल प्रयत्न करुन बघायला काय हरकत आहे.

२८) श्री जेव्हां १९८३ साली काशीयात्रेला गेले होते तेव्हां परतीच्या प्रवासाबद्दल बोलणे झाले. काशीहून जी महानगरी एक्स्प्रेस

सुटते तिला पुण्याचा एक डबा जोडतात आणि तो मनमाडला सोडून दुसऱ्या गाडीला जोडून पुण्याला आणतात. रेल्वेच्या गलथान कारभारामुळे कधी कधी तो पुण्याचा डबा काशीत महानगरीला जोडला गेला नव्हता हे बरोबरच्या एकाने श्रींच्या निदर्शनास आणले अणि ते जेव्हां परत निघतील त्या दिवशी असे झाले तर काय करायचे अशी भीती व्यक्त केली. त्यावर श्री एवढेच म्हणाले, ''तुम्ही एवढेच म्हणता त्याप्रमाणे घडलेही असेल पण ते आपल्या प्रवासाच्या वेळी घडेल असे आपण कां धरुन चालायचे?''

२९) या काशीयात्रेला जाण्यापूर्वी अनेकांनी त्यांना जे सोनेनाणे, वस्त्र इ. अर्पण केलेली होती ते सर्व जमा केले होते आणि काशीला गेल्यावर त्या सोन्याच्या वस्तू प्रत्येक वेळी दर्शनला गेल्यावर शिवलिंगावर अर्पण करून मोकळे होत नंतर पुजाऱ्यांनी झडप घालून ते घेतले वगैरे कडे त्यांनी लक्ष दिले नाही. त्यावर एक शब्द काढत नसत. तसेच तिथल्या विद्वानांना विद्वत्सभेच्या निमित्ताने सुवर्ण व वस्त्रदान करीत. जेव्हां ते पुण्याला परत यायला निघाले तेव्हां त्यांनी त्यांची व्यवस्था पाहणाऱ्याला सोबतच्या गृहस्थाला विचारले, ''आता कांही रिक्षाभाडे किंवा प्रासंगिक कांही खर्चाशिवाय पैसे शिल्लक नाहीत ना?'' त्याने नकार दिल्यावर मोठ्या कृतार्थतेने म्हणाले गंगामैय्याने सर्व दानधर्म करुन घेतला.

३०) आपल्याला आता व्यावहारिक गोष्टी सोडून फक्त भक्तीमार्गावरच वाटचाल करुन उत्तम साधना करायंची आहे असा निश्चय करुन महाराजांची दीक्षा घेतलेल्या एका गृहस्थाचे थोड्याच दिवसात मन चंचल झाले आणि कांही प्रशैक्षणिक अभ्यासक्रम करावा असे त्याला तीव्रतेने वाटू लागले आणि तशी परवानगी घेण्याकरता त्याने महाराजांना पत्र लिहिले. महाराज उत्तरात म्हणतात, ''जीवनोपयोगी कुठलीही विद्या शिकायला हरकत नाही पण तसे

करताना आपण स्वेच्छेने जो मार्ग निवडला आहे, जे ध्येय ठरवले आहे त्याच्याशी प्रतारणा तर होणार नाही एवढा विचार करून निर्णय घ्यावा''

३१) मुंबईचे एक गृहस्थ दीक्षा झाल्यावर दोन तीन दिवस वासुदेवनिवासात राहून परत गेले आणि महाराजांनी त्यांना पत्रात लिहिले, ''...आपल्या सहवासात राहल्याने आमची मनाची गडबड थांबली, गोंधळ दूर झाला'' हे वाचून समाधान वाटले. श्रीवासुदेव निवास येथे श्रीमहाराजांचा (म्हणजे प. पू. श्रीगुळवणी महाराजांचा) साक्षात् निवास आहे अशी आमची भावना आहे आपलीही तशीच असावी.''

३२) तीर्थक्षेत्री गेल्यावर काय करावे असे विचारल्यावर ते म्हणत, जेवणाचा व झोपेचा वेळ वजा जाता तन मन धनाने जास्तीत जास्त देवाची सेवा करावी. तीर्थक्षेत्री केलेल्या कोणत्याही पुण्यकर्माला लक्षपट फळ आहे.

३३) बाहेरचे हॉटेल वगैरेमधले खाणे खाऊ नये हे महाराजांनी एका प्रसंगाने फार खुबीने सुचवले. मुंबईचे एक साधक पुण्याला श्रीवासुदेवनिवासात मुक्कामाला गेले आणि त्यांना दुसऱ्या दिवशी सकाळी पुण्याहून एस. टी. ने कोकणात जायचे होते. महाराजांनी त्यांना आधल्या दिवशी आश्रमातून घरी जाताना म्हटले उद्या सकाळी इथे पोहे वगैरे खाऊन निघा. घरी पोहोचायला उशीर होईल तोपर्यंत वाटेत काही खायला मिळणार नाही.

३४) स्टेट बँकेत नोकरी करणाऱ्या एका साधकाने महाराजांना म्हटले की दिवाळी दसरा वगैरे सणासुदीला बँकेशी संबंधित कांही व्यापारी व इतर व्यावसायिक ग्राहक भेट वस्तू किंवा मिठाईचे पुडे वगैरे आणून देतात ती स्विकारण्यास नकार दिला तर इतरांचा रोष ओढवून घेतला जातो आणि मन तर स्वीकार करायला तयार नसते अशा वेळी काय करावये? महाराज तत्काल म्हणाले, जर तुम्हाला

ते मनापासून नको असेल तर त्याला स्पर्शसुद्धा करू नका. तुमच्या ऑफिसातल्या ज्यांना त्याचा हव्यास आहे अशा लोकांना ते परस्पर उचलून घेऊन जाण्यास सांगा.

३५) त्यांच्या ध्वनिमुद्रित प्रवचनाची प्रत एका दीक्षिताला त्यांच्याकडून तपासून हवी होती. महाराजांचा वेळ वाचावा म्हणून त्याने फक्त जिथे शंका होती तिथे खुणा करून तेवढेच महाराजांनी तपासून द्यावे अशी प्रार्थना केली. महाराजांनी ते लिखाण ठेऊन घेतले आणि लवकरच परत केले तेव्हां त्याचा पानन् पान आणि शब्दन् शब्द त्यांनी तपासला होता.

३६) त्यांना चमत्कार करण्याची आवश्यकता वाटत नव्हतीपण प्रसंगाने त्यांच्या दैवी शक्तीचा आविष्कार सहज पहायला मिळत असे. श्री महाराज खर्ड्याला आहेत समजल्यावर शनिवारी ऑफिस सुटल्यावर कांही महत्वाच्या प्रश्नावर बोलण्याकरता मुंबईहून तिकडे कारने जायचे असे त्यांच्या कांही भक्तांनी गुरुवारी रात्री ठरवले आणि त्याप्रमाणे शनिवारी ते दुपारी निघणार होते पण शनिवारी सकाळीच त्यांच्यापैकी एकाला महाराजांचे खर्ड्याहून पत्र आले आणि त्यात महाराजांनी ही मंडळी येण्यापूर्वीच ते पुढच्या मुक्कामाला जाणार असल्याचे यांची खेप फुकट जाऊ नये म्हणून कळवले होते.

३७) कलीयुगात संघ शक्तीला महत्व आहे अशी त्यांची धारणा होती आणि संस्थेकरता चांगले कार्यकर्ते तयार करण्यावर त्यांचा भर होता. ते कुशल संघटक होते आणि व्यक्तिमत्व घडवणे हा त्यांचा हातखंडा होता. त्यांनी अनेक लोक सांघिक कार्याकरता घडवले, त्यांच्याकडून भरघोस कार्ये करून घेतली. अशा वेळी सर्वात महत्वाचा भाग असतो महाराजांसारख्या अधिकारी महात्म्याचा पाठींबा. ज्याच्यावर जबाबदारी सोपवली आहे त्याच्याकडून जर यदा कदाचित चूक झालीच तर ते खंबीरपणे त्याच्या पाठीशी उभे

राहून स्वत: ती नैतिक जबाबदारी स्वीकारीत. सत्तेच्या केंद्रिकरणापेक्षा विकेंद्रिकरणाकडे त्यांचा भर होता. असेच एका स्थानात कांही बांधकाम चालू होते. तिथल्या अधिकारी व्यक्तीने प्रत्येक गोष्ट विचारायला महाराजांकडे पाठवायला सुरवात केली. महाराज त्या गृहस्थाला म्हणाले, ''असे सारखे कशाला येता? तुम्हाला योग्य वाटेल तो निर्णय घ्या. जरी कांही कमी जास्त झाले तरी आम्ही सांगू तो आमचा निर्णय होता.'' अशा आश्वासनामुळे सुदैवी भक्त कोणतीही जबाबदारी स्वीकारायला तयार होत.

३८) गुरुभक्त श्री नागलेंची श्रीवामननिवासाच्या बांधकामाकरता नियुक्ती झाल्यावर श्री महाराजांनी एक अधिकार पत्र स्वत:च्या सहीने तयार करुन संबंधितांना दिले. त्यात त्यांनी म्हटले की श्री. नागले यांनी बांधकामासंबंधी घेतलेला कोणताही निर्णय त्यांचा निर्णय समजावा.

३९) त्यांना सदैव दुसऱ्या माणसाचा विचार असे. दुसऱ्याला कमीत कमी त्रास कसा होईल हे ते पहात असत. एकदा मुंबईच्या एका भक्ताला कांही अनुष्ठान करण्याकरता महाराजांचे आशीर्वाद हवे होते म्हणून तो पुण्याला आला पण त्यावेळी नेमके महाराज दौऱ्यावर होते.पुढच्या रविवारी भेट झाल्यावर महाराजांनी येण्याचे कारण विचारले. याने सांगितले. यावर ते म्हणाले, ''कशाला इतक्या लांब भाडे खर्च करुन यायचे. एक पोस्ट कार्ड टाकले असते तरी काम झाले असते. हरकत नाही. आता या पुढे लक्षात ठेवा तुम्ही कोणतेही पुण्य कर्म, सत्कर्म करा ईश्वराचे सद्‌गुरुंचे आशीर्वाद सदैव तुमच्या पाठीशी आहेत. पुन्हा तेवढ्याकरता विचारायला येऊ नका.'' हे शाश्वत स्वरुपाचे मार्गदर्शन दिले.

४०) त्यांच्याप्रमाणे समोरच्या व्यक्तीचे मन सांभाळणे इतरांना कोणाला जमणार नाही. मुंबईला एकदा एका गृहस्थांच्या घरी ते

प्रसंगाने मुक्कामाला गेले. त्यांची जागा लहान होती. त्यांनी श्रींना म्हटले, जागा लहान असल्याने आपली पाहिजे तशी सोय होऊ शकली नाही वगैरे. त्यावर हंसत श्री म्हणाले, अहो, कानडीत एक म्हण आहे. जागा लहान असली तरी हरकत नाही पण मन मोठे असले म्हणजे झाले.

४१) त्यांच्या समोरच्याला आनंद देण्याचे असंख्य उदाहरणांपैकी एक उदाहरण असे सांगता येईल. एकदा ते श्रीभागवत सप्ताहाकरता जालन्याला चालले होते. औरंगाबादमध्ये राहणाऱ्या श्री भाऊसाहेब क्षीरसागरांचे व त्यांचे फार पूर्वीपासून घनिष्ठ संबंध होते. श्रींनी वाटेत त्यांचे घर आल्यावर कार थांबवली आणि उभ्या उभ्या भाऊसाहेबांना भेटायला गेले. भाऊसाहेब व माईंना तर श्री अचानक आल्यावर किती आनंद झाला असेल याची कल्पनाच केलेली बरी. त्यांनी श्रींना, आता, जेवूनच जा, असा आग्रह केला. श्रींनी त्यांना समजावले की भगवतीस्वरुप सौ. ताईमहाराजांच्याकडे जायचे असल्याने आत्ता कांही स्वीकारता येणार नाही पण ते मुद्दाम परत येतील. ते पुढे म्हणाले, असे म्हणतात देवदर्शनाला एकदा बाहेर पडल्यावर एका खेपेत चार मंदिरात जाऊ नये. गणपतीचे दर्शन करुन घरी यावे परत दत्ताच्या देवळात जावे. तिथून परत घरी येऊन पुढच्या देवाच्या दर्शनाला जावे. तसे आम्ही स्वतंत्र तुमच्याकडे येऊ की. आत्ता अगदीच दारावरुन चाललो होतो तसे जाववेना म्हणून आलो. त्या उभयतांना श्रींची ही आत्मीयता पाहून काय वाटले असेल!

४२) सुरवातीला म्हटल्याप्रमाणे श्रीमत् भगवत गीतेच्या १६ व्या अध्यायात वर्णन केलेले सर्व दैवी गुण श्रींच्या ठिकाणी पूर्णपणे विकसित झाल्याचे ज्यांना पहायला मिळाले ते भाग्यवान. प्रत्येक गुणाचा पूर्ण विकास झालेला त्यांच्या व्यक्तिमत्वात पहायला मिळाला. त्यांना जीवनांतल्या आनंददायी, चांगल्या प्रत्येक गोष्टीत

रुची होती. अतिशय अभिरुचीसंपन्न ते होते. त्यांचा कशाचा अभ्यास नव्हता हाच प्रश्न पडावा. साहित्यवाचन म्हटले तर त्यांना साहित्याचार्यच म्हणावे लागेल. प्राचीन आणि अर्वाचिन दोन्ही उत्कृष्ट साहित्य त्यांनी वाचले होते. संगीताची त्यांना सखोल जाण होती. पुण्यातल्या गंधर्व संगीत संमेलनाला ते आवर्जुन जात असत. ते स्वत: उत्कृष्ट तबला वाजवत. दरबारी कानडा हा त्यांचा आवडता राग होता. अणि स्वत: रागदारीतही भजने म्हणत असत. अगदी वृद्धावस्थेतही ते प्रसंगाने कोणी आग्रह केला तर अभंग म्हणत. लहानपणी कसून व्यायाम केल्यामुळे त्यांच्या भव्य शरीरयष्टीला मजबूती होती. कृष्णेच्या पुरात पोहोणारे होते. अहिंसा, त्याग, सत्यवचनी, दया, मार्दव, क्षमाशीलता वगैरेंची असंख्य उदाहरणे देता येतील पण विस्तारभयास्तव टाळावे लागेल.

श्री दत्तमहाराज सतत दौऱ्यावर असल्याने (प्रसंगानुरूप प्रवचने भागवत यामुळे भक्तोद्धारासाठी) घरातील सर्व व्यवहार, कामे प. पू. सौ. आईसाहेब लक्ष्मीबाई कवीश्वर यांनाच पहावे लागे. त्या कर्तव्यदक्ष, प्रेमळ, स्पष्टवक्त्या, भगवद्भक्त पतिव्रता होत्या. त्या खंबीर राहिल्यामुळेच श्री दत्तमहाराज भक्तांचा प्रपंच (व्यावहारीक आणि आध्यात्मिक) चालवू शकले, परंतु त्यांचा प्रपंचाकडे स्वत: श्रीगुरुमहाराज (गुळवणीमहाराज) लक्ष देत असता त्यांच्या प्रत्येक सुखदु:खात गुरुमहाराज साक्षी होते सहभागी होते. स्वत: आईसाहेबही महान् गुरुभक्त होत्या. सासुबाईंचा ५०० प्रदक्षिणेचा नेम वाडीला असेतोपर्यंत त्यांनीही चालू ठेवला. प. पू. सौ. ताईमहाराज त्याना ''वैभवलक्ष्मी'' असे म्हणत. त्या सर्वार्थाने प.पू. श्रीदत्तमहाराजांच्या सर्वसमर्थ सहधर्मचारिणी होत्या. पुढे १९९९ साली गुरुमहाराजांच्या पुण्यतिथीच्या दिवशी म्हणजे पौष व. ८ ला त्यांच्याच स्वरुपात विलीन होऊन आपले कार्य संपविले.

## १३) यतिराज प.प. श्रीनारायणानंद सरस्वती स्वामी महाराज

या थोर गणेशभक्ताचा जन्म वाई येथे १२ सप्टेंबर १९१५ रोजी (श्रीगणेश चतुर्थीला) झाला. आयुर्वेदाचार्य झाल्यावर त्यांनी कांही वर्ष वैद्यकीय व्यवसायही इचलकरंजी येथे केला. पण लहानपणापासून त्यांना गणेश उपासनेची आवड होती व उत्तम स्वधर्माचरण करुन मानवी जीवनाचे सार्थक करावे असा त्यांना ध्यास लागला होता.त्यामुळे संसाराच्या फापट पसाऱ्यात न अडकता समजायला लागल्यापासूनच अध्ययन व पुढे व्यवसायाच्या व्यतिरिक्त जप, तप, ध्यान धारणा, अनुष्ठाने व इतर उपासना यातच ते जास्त रममाण होत असत. त्यांची वैद्यकी उत्तम चालू असता त्यांना अत्यंत तीव्रतेने संन्यास घेण्याची प्रेरणा झाली.

त्यांच्या वडिलांनी त्यांचे मन वळवण्याचे पुष्कळ प्रयत्न केले आणि तो मार्ग किती कठिण आहे याची त्यांना कल्पना दिली तरी त्यांचा निश्चय दृढ होता.सुरवातीला त्यांनी श्रीरामाच्या पदस्पर्शाने पवित्र झालेल्या गोदावरीच्या तीरावरील तीर्थ क्षेत्र नाशिकला जाऊन गायत्रीपुरश्चरण करायला आरंभ केला. ते पूर्ण व्हायच्या आधी त्यांचे पिताजी त्यांना भेटायला नाशिकला आले. यांची प्रगती पाहून त्यांना एवढा आनंद झाला की त्यांनी यतिमहाराजांना, यतिमहाराजांचा निर्णय योग्य असून आपले मत बदलले असल्याचे सांगितले. एवढेच नव्हे तर त्यांनी यतिमहाराजांना त्यांचे उर्वरित आयुष्य दिले. घरी परत गेल्यावर महिन्याच्या आतच त्यांनी देह ठेवला.

त्यानंतर यतिमहाराजांनी कांही काळ सज्जनगडावर प. प. श्रीश्रीधरस्वामींच्या बरोबर वास्तव्य केले. पुढे ''रेवा तीरे तपम् कुर्यात्'' या उक्तीप्रमाणे नर्मदातीरावर दोन वर्ष तप केले आणि त्यांच्या आदर्श असलेल्या प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराजांच्या समाधि स्थानी गरुडेश्वर येथे प. प. श्रीजनार्दन

सरस्वती महाराजांकडून संन्यास दीक्षा घेतली आणि चातुर्थाश्रमाचा आदर्श या कलीयुगात प.प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांच्या नंतर सर्वांसमोर ठेवला.

ईश्वरावर पूर्ण भरवसा ठेवून संपूर्ण भारताची दोन वेळा तीर्थ यात्रा केली. संन्यास घेतल्यापासून द्रव्याला देहत्यागापर्यंत कधी स्पर्श केला नाही. प्रवासाला निघाले की स्टेशनवर कोणाला तरी प्रेरणा होऊन तो त्यांच्या तिकीटाची व्यवस्था करीत असे. सुरवातीला त्यांनी भिक्षान्न घेतले पण लवकरच त्यांच्या लक्षात आले की युगप्रभावामुळे आचारधर्माचा लोप झाला आहे आणि योग्य शास्त्रीयरीत्या स्वैपाक होत नसल्याने भिक्षान्न घेणे हितावह नाही म्हणून ते अन्नत्याग करुन सुरवातीला फक्त सातूचे पीठ पाण्यात कालवून घेत. संवय नसल्याने त्यांना सुरवातीची दोन वर्ष खूप त्रास झाला पण त्यांनी आचारधर्मपालनापुढे त्याची पर्वा केली नाही. पुढे तेही सोडले आणि फलाहार व दूधावरच राहू लागले.

त्यांनी पंडित लक्ष्मणशास्त्री मुरगुडकर, कल्याणपंत कुलकर्णी, प. पू. श्रीधुंडिराजमहाराज, पं. जेरेशास्त्री यांच्याकडे संस्कृत व शास्त्राचा अभ्यास केला. प. पू. श्रीगुळवणीमहाराज, प.पू. श्रीदत्तमहाराज यांच्याशी त्यांचा अतूट प्रेमसंबंध होता. जीवनाच्या उत्तरार्धात वाडीपासून कांही अंतरावर असलेल्या उगार या गांवी स्थिरावले. त्यामुळे पुढे त्यांची प्रसिद्धी उगारचे स्वामी म्हणून झाली. पुण्यात आल्यावर प. पू. दत्तमहाराजांबरोबर सत्संग करीत असत. आद्य शंकराचार्यांच्या ग्रंथांचा त्यांचा विशेष व्यासंग होता. कांची काम कोटीच्या शंकराचार्यांनी यांचा ''यति धर्मपालनाचा आदर्श'' या शब्दात विशेष गौरव केला होता आणि त्या प्रसंगी उगारला नारायण यतीच्या सहवासात येऊन राहात असत. यांच्याकडून मार्गदर्शन घेत. ते कांचीला असताना कांही संन्याशांना यति महाराजांकडे शंका

निरसनाकरता पाठवत. यतिमहाराजांच्या अधिकारामुळे व प्रेमामुळे कांची कामकोटीचे प. प. श्री चंद्रशेखर सरस्वती महाराष्ट्राच्या दौऱ्यात उगारला तीन महिने राहिले होते. उगार येथे दीर्घकाळ वास्तव्य केल्यावर शेवटची दोन वर्ष त्यांनी आपल्या आवडत्या स्थानात म्हणजे श्रीक्षेत्रनरसोबावाडीत मुक्काम केला होता आणि सर्वांचा निरोप घेऊन ते उत्तरेला काशीक्षेत्राकडे गेले. प.प. श्री नारायण यतिमहाराजांनी १९९९ च्या एप्रिल महिन्यात वाराणसी येथे देह ठेवला. जवळच्या भक्तांना त्यांनी त्याच्या महासमाधिची तारीख, वेळ सांगून ठेवली होती. या दिवशी संकष्टी चतुर्थी होती. ते स्वामी गणेशाचे महान उपासक होते. तथापि नंतर त्यांच्या लक्षात आले की तो चतुर्थीचा योग सदोष आहे. त्यामुळे त्यांनी पुढे दशमीपर्यंत देह धारण केला व दशमीच्या मुहूर्तावर ईश स्वरुपी विलीन झाले.

यतिमहाराजांनी तीन तपाहून अधिक काळ साधकांना मार्गदर्शन केले. गणेश, दत्त उपासनेचा प्रसार केला. उपासनेवर त्यांचा विशेष भर होता. आत्मज्ञान प्राप्तीनेच माणसाला शांती-सुख-समाधानाचा लाभ होतो असे त्यांचे स्वानुभवावर आधारीत सांगणे होते.

त्यांनी स्वत:च्या तपोबलाने पुढिल दोन मंत्र सिद्ध केले-

मंगलमूर्ति विघ्नहरा दुरितनाशना कृपा करा ॥<br>
आणि<br>
श्रीपादश्रीवल्लभनरहरि दत्तात्रेया दिगंबरा ।<br>
वासुदेवानंद सरस्वती सदगुरुनाथा कृपा करा॥

-----------*****----------

## प्रकरण दुसरे

न जातु कामान्न भयान्न लोभात् । धर्मंत्यजेत्जीवितस्यापि हेतोः ।
धर्मोनित्याःसुखदुःखे त्वनित्ये । जीवो नित्यःहेतुरस्य त्वनित्यः ।

असे 'भारत सावित्री' नामक ग्रंथात व्यासांनी सांगितले आहे. साधुसंत वगैरे आजपर्यंत जे अवतारी पुरुष होऊन गेले तेही हेच सांगतात की, 'बाबांनो धर्मापासुन भ्रष्ट होऊ नका' तुमच्यावर कोणाचाही कसलाही प्रसंग येवो कितीही आपत्ती येवो तथापि, स्वधर्माचा त्याग करु नका. इतकेच नव्हे तर प्रत्यक्ष प्राण जाण्याची वेळ आली, प्राण द्यावा लागला तरी धर्माचा आश्रय सोडू नका'

इतका हा सर्वांचा धर्मावर कटाक्ष का ? याचे कारण असे की, सर्व जगाचा आत्मा धर्मच आहे. देव हा सुध्दा धर्माचा मूर्तिमंत पुतळा-नव्हे, धर्म म्हणजेच देव, आणि तो कसा आहे, तर नित्य-शाश्वत असा आहे. सुख दुःखेही अनित्य, नाश पावणारी आहेत. जीव आणि धर्म ही शाश्वत टिकणारी आहेत. म्हणूनच धर्माचे रक्षण-आचरण करा. त्याचे जर तुम्ही रक्षण कराल, त्याला सांभाळाल, तर तोच तुमचा सांभाळ करील-तुमचे रक्षण करील. म्हणूनच 'धर्मोरक्षतिरक्षितः' असे वचन प्रसिध्द आहे.

सद्धर्माने वागून अनन्य भावाने ईश्वर-सद्गुरु चरणीलीन झाल्यास ईश्वर त्या मनुष्यावर प्रीती करीत असतो. त्याचा उध्दार करीत असतो. ही गोष्ट आजपर्यंत जे साधुसंत अवतारी पुरुष होऊन गेले, याचे वरुन स्पष्ट दिसत आहे. असे अवतार आजपर्यंत कितीतरी होऊन गेले. आज होत आहेत व पुढेही होतील. सद्गुरुची कृपा संपादन केली असता मुक्त होऊन शाश्वत निरतिशयानंद सुखाचा आस्वाद कसा घेता येतो, हे ज्यांनी प्रत्यक्ष आपल्या कृतीने जगास दाखविले, अशा एका प्रसिध्द घराण्याची व त्यातील महात्म्यांचीच गोष्ट सांगण्याचा आमचा विचार आहे.

नरसोबावाडीहून सुमारे ९-१० मैलावर 'सदलगे' या नावाचे एक खेडे आहे. तेथील स्मार्त या उपनावाचे एक गृहस्थ दर पौर्णिमेला वाडीला दर्शना करिता येत असत. आजकाल जशा मोटारी, वाटेल तिकडे जावयाला मिळतात, तशा त्या पूर्वी नव्हत्या. इतकेच नव्हे तर त्यावेळी हल्ली दिसत असलेल्या मोठ्या सडकाही नव्हत्या. लहान रस्ते व तेही वाकडे तिकडे जंगलातून गेलेले. पण अशा अडचणींना न जुमानता दर पौर्णिमेला 'दत्तदर्शन' घेतल्यावाचून जेवावयाचे नाही, असा त्यांचा नियम असे. अशा स्थितीत बरीच वर्षे निघून गेली. पण पुढे जसे वार्धक्य आले तसे त्यांना दिवसानुदिवस ही वारी करण्याला जास्त कष्ट पडू लागले.

पुढे एके दिवशी, ही स्वारी संगमावर स्नान करीत असताना एक सिध्द त्या ठिकाणी येऊन म्हणाला की, 'तुझ्या या वारीने परमेश्वर संतुष्ट झाला आहे. तर तू आता येथे येण्याचे श्रम कशाला घेतोस ? तू आता नाही आलास तरी चालेल. आता तुझे वय झाले आहे, तर तब्येतीकरीता जपले पाहिजे. तू आता आपली वारी पुरी कर, नदीत बुडी मारताच मी तुझ्या हाती लागेन. मला आपल्या घरी घेऊन जा व माझी पुजा कर. तुझ्यावर व तुझ्या घराण्यावर माझी कृपा आहे.'

त्याने संगमात बुडी मारताच त्याच्या हाताला काही लागले. त्याने ते तसेच वर आणले, पहातो तो ते ३ लहानसे गोटे होते. अर्थात ही सर्व सद्‌गुरुंची कृपा असे समजून त्याने भक्तिभावाने त्यांना वंदन केले आणि दर्शन घेऊन परत आपले घरी गेला.

घरी गेल्यानंतर थोडी जागा चांगली करुन ते गोटे तेथे ठेविले आणि ह्याच अलौकिक अशा तीन मूर्ति समजून त्यांचे दर्शन घेऊन तेथेच पुजू लागला.

श्रीगुरुचे तेथे वास्तव्य झाल्यामुळे थोडेच दिवसात त्यांचे दारिद्र्य जावून त्याला उत्तम दिवस आले. त्याचा मुलगाही पुढे मोठा

दत्तभक्त निघाला व वडिलांनी जे देव घरी आणले त्यांची सेवा एकनिष्ठपणे करुन पुष्कळ संपत्ती मिळवली.

पुढे याचे मुलगेही चांगले सदाचार संपन्न होऊन आपल्या घराण्याचा लौकिक वाढविणारे असे झाले. एकाने तर मोठा यज्ञ करुन आपणास व आपल्या कुलास कायमचे 'दीक्षित' करुन टाकले आणि त्या वेळेपासूनच यांचे घराण्यास सर्व लोक दीक्षित असे म्हणू लागले.

'बीज तसा अंकूर' या न्यायाने या दीक्षितांचे मुलगेही विव्दान, ईश्वर भक्तिविषयी तत्पर असे होते. यांची विद्वत्ता व यांचा आचार विचार पाहून यांना माणकापूर पैकी काही भाग अग्रहार म्हणून मिळाला आहे. त्याच प्रमाणे लक्ष्मी शेत व मळ्याचे शेत ही वंश परंपरेने यांचे कडे अद्याप चालू आहेत. यांचे पैकी नरहर दीक्षित हे सहकुटुंब सद्‌गुरु सान्निध्यात राहाण्याकरिता म्हणूनच या सिध्द नगरात आले. यांच्या एकंदर येथे वाडीत ५ पिढ्या झाल्या पण अलिकडील तीन पुरुष एकापेक्षा एक तेजस्वी निर्माण होत गेल्यामुळेच पुढील तीन पुरुषांची माहिती थोडक्यात देत आहे.

या दीक्षित घराण्यावर श्री दत्तगुरुंची पूर्ण कृपा, यात काही संशय नाही आणि म्हणूनच एका घराण्यात असे एकेक पुरुषोत्तम जन्मास आले. 'नारायण दीक्षित हे पट्टीचे वैदिक असून संस्कृतातही चांगलेच नाणावलेले होते. यांनी वाडीला एक पाठशाळा चालविलेली होती, धर्मशास्त्र हा त्यांचा आवडता हातखंडा विषय. यांनी एकदा शास्त्रार्थ दिल्यानंतर त्याच्यावर 'हे असे काय?' म्हणण्याची कोणाचीही प्राज्ञा नव्हती. इतके ते प्रसिध्द विद्वान होते.

ज्या कुलामध्ये तेजस्वी, वंदनीय पुरुष प्रसिध्दिस येतो, ते तेज बहुतेक त्याच्या पुरतेच असते, फार झाले तर आणखी एखादा दुसरा पुरुष त्याच्या इतका नसेना, पण जरा खालोखाल तरी

निर्माण होतो, अशी घराणी पुष्कळ पहावयास मिळतात, पण या दीक्षित घराण्याचे याच्या अगदी उलट असलेले दृष्टीस पडते. मूळ पुरुषाने देव घरी आणले. तर त्यांच्या पुढच्या पिढीतील काही पुरुषांनी यज्ञादिक कर्मे करुन दीक्षित ही पदवी घेतली. त्याच्या पुढच्यांनी सद्‌गुरुच्या क्षेत्रात वास करुन त्याची सेवा केली व काहींनी पाठशालांदि स्थापन करुन विद्यादानाची खैरात केली. यांना तीन मुलगे होते आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे ते तिघेही एकापेक्षा एक बुध्दिमान, सदाचारी असे निर्माण झाले आणि यांच्याच एका नातवानी तर 'नराचा नारायण कसा होतो' हेंच आपल्या चोख वर्तनानें त्यांनी जगास पटवून देऊन आपल्या कुलाचा उध्दार केला, तेच आमच्या प्रस्तुत पुस्तकाचे चरित्र नायक होत.

नारायण दीक्षित यांना लक्ष्मण, नरहरी व सखाराम दीक्षित हे पुत्र विद्वान सदाचार संपन्न असून आपल्या कुलाला शोभणारे असे होते. मधला मुलगा नरहर दीक्षित हे मोठे ब्रह्मनिष्ठ होते. यांचे लग्न झालेले असून हे आजन्म ब्रह्मचारी होते. कारण यांचे बायकोला रजोदर्शन मुळीच झालेले नाही. हे ज्ञानी असून अगदी शांत स्वभावाचे होते. यांना राग कसा तो मुळीच येत नसे, पोरांचे आणि यांचे फार चांगले जमे. पोरांना सुध्दा आपण यांच्या जवळ जावे, बसावे खेळावे असे वाटे. घरातील व्रात्य मुले जास्तच गडबड करु लागली म्हणजे हे त्यांना माडीवर घेऊन जात, आणि भिंतीला टेकून बसवून त्यांची समाधी लावीत व घरच्या मंडळींनी 'हं मुले खाली पाठवा' म्हटले की, लगेच हे त्यांना शुध्दीवर आणून खाली सोडीत. मुलांविषयी यांना जास्त राग आला म्हणजे हे जमिनीवर थापटी मारीत असत. बस्स, हाच कायतो यांचा राग. यांनी हात जमिनीवर आपटला कीं लोक समजत यांना आता राग आलेला आहे. आणि तस बघायला गेल तर यांना एकदाच राग असा आला होता, त्याची हकीकत थोडी मनोरंजक असल्यामुळे खाली देत आहे.

यांची स्त्री स्वभावानें अगदी साधी भोळी अशी होती आणि हे विरक्त. मग तो यांचा संसार कसा रंगत असेल याची वाचकांनीच कल्पना करावी. हे फक्त दुपारी जेवणापुरते घरी जावयाचे. बाकी रात्रंदिवस स्वारी नारायण स्वामीचे शेजारी जे विठ्ठल मंदिर आहे त्यांत असावयाची.

एके दिवशी या विठ्ठल मंदिरांत एक ब्राम्हण थोड्या उशीराने परगावाहून आला. स्नान वगैरे करुन माधुकरीला गेला. पण गावातील जेवणे खाणे आटोपल्यामुळे दोन चार घरात काहीच मिळाले नाही आणि पुढेही असाच अनुभव येणार. मग उगाच आता फिरण्याचे तरी श्रम कशाला घ्या ? असा विचार करुन तो तसाच परत देवळात आला आणि स्वस्थ पडून राहिला.

पुढे थोड्याच वेळांत नरहर दीक्षितांची स्वारी तेथे आली. पहातात तो एक भटजी झोपलेले ! कुठले कोण काय? केंव्हा आलेत? इ. विचारुन जेवणाखाणाची त्यांनी मोठ्या आगत्याने चौकशी केली आणि त्या ब्राम्हणाने सर्व घडलेली हकीगत त्यांना सांगितली. यावर नरहर दीक्षितांनी त्याला आपल्या घरच्या खाणाखुणा सांगून तेथे जावयास सांगितले म्हणजे तुझी सोय होईल. यावर तो ब्राम्हण नको कशाला आता असे म्हणत होताच पण यांच्या आग्रहामुळे तो चौकशी करीत यांचे घरी गेला.

त्यावेळी दुपारची जेवणे आटोपून बायका मंडळी इकडे तिकडे नुकतीच कोठे विश्रांती घेत होते. त्यांचा पुतण्या बलवंत हा एके बाजूला निजलेला होता. पण त्याच्या पर्यंत या पाहुण्याचा प्रवेशच झाला नाही आणि घरात याची कोणी दाद घेतली नाही. त्यामुळे तो तेथे थोडावेळ उभा राहून पाहुणा परत विठ्ठल मंदिरात आला.

दीक्षितांनी त्याची सर्व हकीगत ऐकून घेऊन पुन्हा त्याला अत्यंत आग्रह करुन सांगितले की, 'तुम्ही तेथे पुन्हा जा आणि मी

पाठविले आहे असे सांगा म्हणजे तुम्हांला तसेच परत यावे लागणार नाही.' इ. सांगून त्याला घरी पुन्हा पाठवून दिले. पण काय? पहिल्याच खेपे प्रमाणे त्याची दाद न लागल्यामुळे त्याला परत यावे लागले.

ही हकीगत दीक्षितांना कळताच त्यांनी आपला देवळांतला पोथ्यांचा सर्व संसार आवरला आणि मी काशीला जातो म्हणून ते देवळांतून निघून मार्गास लागले.

त्यांचा पुतण्या बलवंत दीक्षित घरी जो स्वस्थ निजलेला होता. तो एकदम दचकून जागा झाला. त्याच्या छातीत कळ आल्या सारखी होऊन त्याला दोन तीन रक्ताच्या गुळण्या झाल्या. त्याने डोळे पांढरे केले. घरातील सर्व मंडळी जागी झाली. अरे हे एका एकी असे काय झाले? हे कोणालाच काही समजेना. लगेच आजू बाजूची मंडळी जमून धांवपळ सुरु झाली. इतक्यात काही मंडळी श्री विठ्ठल मंदिरांत नरहर दीक्षित यांना ही हकीगत सांगण्या करिता निघाले. इकडे नरहर दीक्षित रागावून मी काशीला जातो इथे कशाला राहू, माझे काय आहे इ. बडबडत त्यांनी रस्ता धरला. ही गोष्ट काही मंडळींच्या नजरेस येताच त्यांनी धावत जाऊन त्यांचे पाय धरले व तुम्ही वाडी सोडून का जाता? इ. विचारु लागले व थोड्या वेळानंतर त्या मंडळीना कारणही समजले. इतक्यात बलवंत दीक्षिताची हकीकत काही मंडळींनी धावत येवून त्यांच्या कानावर घातली व सर्वांनी त्यांचे पाय धरुन क्षमा मागून गावाच्या बाहेर जो अश्वथ्थाचा पार आहे, तेथून त्यांना परत आणले व देवळाकडे जाता जाता बळवंतला एकवार पाहून चला असे म्हणताच ते घरी गेले. बळवंत अगदी आसन्नमरण स्थितीत होता. यांनी त्याच्या जवळ जाऊन त्याच्या अंगावरुन हात फिरविला व काय रे तुला होत आहे? सांग पाहू इ. काही तरी विचारु लागले. थोड्याच वेळांत बलवंत चांगला शुध्दीवर

येऊन उठून बसला व आता मला बरे वाटत आहे असे त्याने सांगितले व ब्राम्हण परत गेला ही हकीकत आपणास मुळीच माहीत नाही इ. सांगून त्याने व घरच्या मंडळींनीही त्यांची क्षमा मागितली व नरहर दीक्षितांची स्वारी एकदाची शांत होऊन देवळात आपल्या मुक्कामावर आली.

वाडीतील पुजाऱ्याची एक मुलगी कवठ्याला गुळवणी यांजकडे दिलेली होती. तिला एकच मुलगा होता व तो लहान असतानाच त्याचे आईबाप इहलोक सोडून गेले आणि तो अनाथ झाला. पण त्याचे आईबाप ही नरहर दीक्षिताकडे वरचेवर येत असल्यामुळे हा अनाथ मुलगा यांचेचकडे राहू लागला.

या दीक्षित मंडळींच्या सहवासाने त्याचेही मनात वैराग्य उत्पन्न होऊन तो ही परमार्थ मार्गाकडे लागला. नरहर दीक्षितांची सेवा चाकरी करुन त्याचा काल चाललेला होता. एके दिवशी हे देवघरात बसलेले असताना तेथे मुलाने येऊन नमस्कार केला. त्यांनी त्याला खाली बसावयास सागितले आणि त्याच्या मस्तकावर हस्त ठेवताच त्याची समाधी लागली. पुढे एक तासाने तो शुध्दीवर आला. त्याने लगेच नरहर दीक्षितांचे पाय धरले आणि 'महाराज हे सुख मला निरंतर मिळावे ' अशी प्रार्थना केली. यावर दीक्षित म्हणाले 'बाबारे हे सुख तुला कसे असते ते मी दाखविले आहे. तुला ते पाहिजे असेल तर ते स्वत:च्या कष्टाने मिळवावे लागते. दुसऱ्याने दिलेले किती दिवस पुरणार?'

नंतर त्याचं शुध्दाचरण व उत्कृष्ठ गुरुनिष्ठा पाहून त्यांनी त्याला अल्पवयांत म्हणजे २० वर्षाचे सुमारास त्यांनी त्याला एके दिवशी शुक्लतीर्थावर नेला आणि त्यातीर्थाचे स्नान करवून मंत्रोपदेश देऊन त्यांचे शांताश्रम असे नाव ठेवून त्याला काशीला पाठविले. त्याने गुरु आज्ञेप्रमाणे काशीला सप्ताह पध्दतीने भागवताचे १००

सप्ते केले. त्याचा वाडीला असताना संस्कृतचा अभ्यास झालेला नाही. तथापि शांताश्रम भागवत असे उत्तम सांगत की, बोलून सोय नाही. काशी येथील प्रसिध्द तारक मठाचे हे काही दिवस महंत होते. तेथील कॉलेज मधील नेपाळचे प्रख्यात नित्यानंद पर्वतीय पंडितासारखे जाडे पंडीत, आपले वयाची ७६ वर्षे होऊन गेली असता आपणाला शांतता प्राप्त व्हावी म्हणून मुद्दाम कराडला दर्शनाकरिता आले होते. ते यांच्याशी फार बेताबेताने बोलत असत. इतकी विद्वत्ता, इतका बहुश्रुत पणा, इतकं सामर्थ्य एका सद्‌गुरु कृपेनेच प्राप्त झाले. चाळीस वर्षानंतर म्हणजे साठी उलटून गेल्यावर ते वाडीस आले होते. त्यांच्यावर पुष्कळ मंडळींची श्रध्दा होती. त्यांचे जाणे येणे विशेष कऱ्हाडला होते व तेथे त्यांची भक्तमंडळीही फार असल्यामुळे त्यांनी आपला नश्वर देह तिथेच कृष्णा तटाकी ठेविला. त्यांची समाधी तिथे कऱ्हाडला आहे.

नरहर दीक्षितांचे वडील बंधू लक्षुमण दीक्षित हे मोठे तपस्वी होते. यांच्या स्त्रीचे नाव अहिल्या. ही खरोखरीच पंचकन्येत शोभणारी अहिल्या होती. ही वाडीतील पुजाऱ्यांची मुलगी. लक्षुमण दीक्षितांचा संस्कृत अभ्यास वाडीलाच झाला होता. पण थोडेसे काव्य होताच हे पुराण सांगू लागले. हे देवाकडे पुराण सांगतात याची माहिती वडिलांना विशेष नव्हती. एकदा सहज यांना कोणीसे म्हटले की, तुमचा लक्षुमण उत्सवमूर्तीजवळ पुराण सांगत असतो. पण त्यावेळी यांची कल्पना अशी झाली की, कोणीतरी याला थट्टेने पुराण सांगावयास सांगितले असेल व हा बसलाहि असेल.

एके दिवशी उत्सवमूर्ती जवळ भागवताचा एकादश स्कंध सांगण्याला लक्षुमण दीक्षितांनी सुरवात केली आणि थोड्याच वेळांत मिरज येथील प्रख्यात विरक्त पुरुष तात्या गोखले तेथे येऊन बसले. एकादश स्कंदासारखा विषय आणि सांगणारा लहान मुलगा अर्थात

त्यांना अत्यंत आश्चर्य वाटले. पुढे पुराण संपवून लक्ष्मण दीक्षित आपल्या घरी निघून गेले.

तात्या गोखले देव दर्शन वगैरे घेऊन संध्याकाळी ते नारायण दीक्षित यांचे कडे गेले. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यानंतर तात्या आश्चर्याने म्हणाले, 'अहो दीक्षित तुमचा लक्ष्मण चांगलाच पुराण सांगतो.'

'कशावरुन?', दीक्षितांनी विचारले. 'अहो आज मी स्वत: त्याचे पुराण ऐकले. मला अत्यंत आश्चर्य वाटले आणि नंतर हा कोणाचा मुलगा म्हणून मी चौकशी केली तर तो तुमचा आहे असे समजले. पोर फार चांगला आहे. आज या वयांत याची जर इतकी विद्वत्ता आहे तर पुढे हा चांगलाच नावरुपास येईल. मी केव्हातरी तो पुराण सांगतो असे ऐकले होते, पण हा म्हणजे इतका तुम्ही स्तुती करण्यासारखा सांगत असेल अशी माझी कल्पना नव्हती आणि हा असा शिकला तरी काय आहे?' असे नारायण दीक्षित म्हणाले.

'अहो हे शिक्षणावर नाही, हा एकेका घराण्याचा गूणच असा असतो' तात्या गोखले म्हणाले.

हा बाहेर चाललेला दोघांचा संवाद लक्ष्मण दीक्षितांनी ऐकला पण तिथपासून त्यांनी पुराण सांगावयाचे अजीबात सोडून दिले. कारण मात्र काहीच सांगता येणार नाही, सोडले हे खरे.

श्रीलक्ष्मणशास्त्री दीक्षित पुराण, कीर्तन आदि करितां आसपास च्या प्रांतात जात असत. त्यांची ख्याती दूरवर पसरलेली होती. उन्हाळा दिवस वैशाख महिना असताना ते वाडीहून ७-८ कोसावरील गावी गेलेले होते. दुपारी प्रसाद भोजनाला मंडळींसह शास्त्रीबुवा पानावर बसले. नित्याप्रमाणे समोर आलेल्या अन्नाचा नैवेद्य श्री मनोहर पादुकारुपी श्रीगुरुंना निवेदन करु लागले. बराच वेळ त्यांचे डोळे मिटलेले होते. बाकीची मंडळी खोळंबून पाहात होती. अचानक मिटल्या डोळ्यांनी शास्त्रीबुवा उद्गारले, 'अरे! पादुकांवर

पाणी?' त्या नंतर त्यांनी डोळे उघडून मंडळींकडे पाहिले व 'भोजनास आरंभ करा' म्हणाले. तेथील यजमान जे होते त्यांना शास्त्रीबुवांच्या वरील उद्गाराचे नवल वाटून त्यांनी वाडीला घोडेस्वार पाठविला. त्याजकडून नंतर कळले की भर वैशाखात उन्हाळ्यात अचानक कोठेतरी बरीच वृष्टी होऊन कृष्णामाईला पूर आला आहे व श्री मनोहर पादुका पाण्याखाली गेल्या आहेत.

आपल्या इष्ट देवतेबरोबरचे शास्त्रीबुवांचे तादात्म्य किती श्रेष्ठ भक्तीपूर्ण होते त्याची प्रचीती आली.

अशाच एका प्रसंगी श्रीलक्ष्मणशास्त्री दीक्षित कुटुंब व लहान मुले यांसह पायी प्रवास करीत होते. वाटेत अंधार पडला व वाट चुकल्यामुळे पुढचा मार्ग दिसेनासा झाला. सर्वजण एका ठिकाणी थांबले. इतक्यात कुठून तरी एक बैलगाडी त्या बाजूने जाता जाता यांच्या जवळ थांबली. चौकशी केल्यावर कळले की जवळच कोणीतरी इनामदारांचा वाडा आहे व बैलगाडी त्यांचीच आहे. त्यांच्या सोबतीनी ही मंडळी वाड्यापर्यंत पोचली. वर्दी जाताच कारभारी समोर आले व शास्त्रीबुवांना रात्रीचा मुक्काम वाड्यात करण्याची विनंती केली. रात्रीची वेळ व सर्वजण थकलेले पाहून यांनी संमती दर्शविली. त्यानंतर राजेशाही थाटातील सर्व व्यवस्था झाली. स्नान भोजन करुन मऊ गाद्यांवर विश्रांतीची सोय केली होती. सर्व जण सकाळी उठून स्नान आन्हिक उरकून पुढील प्रवासास निघाली. वाटेत बाळ गोपाळांची चर्चा वाड्यातील सुखसोई संबंधीच सुरु होती. पुढच्या मुक्कामाला पोहोचल्यावर सहाजीकच तेथील मंडळींच्या कानावर गेले की शास्त्रीबुवा रात्री कुणी इनामदारांच्या वाड्यात मुक्कामास होते. त्या ग्रामस्थांनी सांगितले अहो ! येथून आसपास ८-१० कोसाच्या परिसरातही कुठलेही इनामदार राहात नाहीत व कुठलाही असा वाडा वगैरे नाही ! धन्य ती भगवंताची, सद्गुरुंची श्रेष्ठ भक्तासाठीची लीला !

शेतातील धान्य घरी आणण्यासाठी मुलाला बरोबर घेऊन श्रीलक्ष्मणशास्त्री बैलगाडीने शेतावर गेले होते. सर्व पोती भरुन देऊन मजूर निघून गेले व हे दोघे गाडी घेऊन परत निघाले. वाटेत एका वळणावर गाडी एकदम कलली (वाकडी झाली) धान्याची पोती रस्त्यावर पडली. निर्मनुष्य ठिकाण व वर्दळ नसणारी वाट असा प्रसंग आला. बैलगाडी वर घेऊन सर्व पोती पुन्हा भरायला मदत कुठे मिळेल तर पाहण्यासाठी मुलाला जवळच्या खेड्याकडे पाठविले. शास्त्रीबुवा एका वृक्षछायेत श्रीगुरुंचे चिंतन करीत बसले.

बऱ्याच वेळाने मुलगा कोणी सहाय्याला बरोबर घेऊन परत आला. पहातो तर बैलगाडी नीट रस्त्यावर उभी होती व धान्य पुन्हा व्यवस्थित भरुन ठेवलेले होते. शास्त्रीबुवा मात्र त्याच झाडाखाली चिंतनमग्न डोळे मिटून शांत बसलेले होते.

मुलाने हाक मारल्यावर ते उठले. गाडी पुन्हा व्यवस्थित झालेली पाहून उभयतांना आश्चर्य वाटत होते. कोण आले व काम करुन गेले ते कळलेच नाही.

'आपल्या वडील व मातोश्रीस घेऊन काशी यात्रेस गेल्याचे पुण्य फार मोठे आहे', असे लक्षुमण दीक्षितांना कोणीतरी चांगल्या मनुष्याने सांगितले होते व त्याप्रमाणे ते आपल्या आईबापांना बरोबर घेऊन काशीस गेले. अत्यंत भक्तिभावाने त्यांनी गंगास्नान करुन पुन:स्वारी घरी यावयास परतली पण एक गोष्ट वरचेवर त्यांचे मनात येई की मी जो इतका लांब वडील मातोश्रींना घेऊन आलो. गंगेचं स्नान काहि दिवस केले पण त्याचा माझ्या शरिरावर कोणता फरक घडून आला ? कोणताही नाही. मग इतकी मेहनत कशाला घेतली ? इ. हा विशेष विचार येण्याचे कारण म्हणजे प्रवासांतील त्यांची पुंजी संपुष्टात आली होती आणि आतापुढे आपल्याघरचा पल्ला कसा येतो ही त्यांना विवंचना लागली होती. अशा मनस्थितीत याचा प्रवास सुरु

असताना मध्ये एक संस्थान लागले. प्रसंग पडला म्हणजे युक्ती सुचते म्हणतात ते काही खोटे नाही. संस्थानात मुक्काम होतांच आपण राजाकडे जाऊन 'हरदास आहो' असे सांगताच आपली काहीतरी संभावना होईल असे त्यांना वाटले व जे काय मिळेल त्यावर पुढील प्रवास करावा, असा बेत करुन ते राजवाड्यात गेले.

राजवाड्यात जाऊन यांनी कारभाऱ्यांची भेट घेतली व आपला हेतू कळविला यावर कारभारी म्हणाले, 'वा: फारच चांगली गोष्ट ! वाडी क्षेत्रातील तुम्ही हरिदास अहात.' तुम्ही आमच्या काही खाजगी मंडळीत अगोदर कीर्तन करावे ते आंम्हास पसंत पडले म्हणजे मग सरकार स्वारीकडे शिफारस आपली करणेस बरे पडेल आणि येथील संस्थानी रिवाजही असाच आहे. अखेर त्याच दिवशी रात्री कीर्तनाचा त्यांनी बेत ठरविला.

त्यांनी कीर्तनाचा बेत ठरवला खरा पण आख्यान कसे तयार करावयाचे याचीच त्यांना माहीती नव्हती. ते चांगले विद्वान होते संस्कृत जाणत होते. गायनाचा त्यांना नाद होता पण कीर्तन-आख्यान त्यांच्या जवळ नव्हते. आता त्यांनी काही कीर्तने ऐकलेली होती पण ती तशी त्यांच्या लक्षात कशी राहणार ? असो -

त्यादिवशी संकष्टी होती आणि वडिलांचा उपवास असल्यामुळे हे दूर्वा काढण्याकरिता बाहेर गेले आणि दूर्वा काढता काढता त्यांनी एका आख्यानाची रुपरेखा तयार केली व त्या प्रमाणे रात्री त्यांनी कीर्तन केले सद्‌गुरुंची कृपा ! यांनी जरी आख्यान नवे तयार केले होते. तथापि त्या कीर्तनास असा काही रंग भरला की बोलून सोय नाही. जमलेल्या सर्व मंडळींनी त्यांची वाहवा केली.

इतकेच नव्हे तर तुम्ही खरोखरीच पंडित आहात. विषय प्रतिपादन करण्याची शैली काही और आहे. पण तुम्हाला 'हरिदास या नात्याने जगापुढे कार्यकरावयाचे आहे असे दिसते' इ. स्तुति

गाऊन त्यांना भरपूर दक्षिणा दिली व आपल्या विद्वत्तेच्या मानाने ही दक्षिणा फार कमी आहे असे हि त्यांनी बोलून दाखविले व त्यांना अत्यंत आग्रह करुन चार दिवस आपल्या येथे राहून घेतले.

चार दिवसांनी राजवाड्यात खास सरकार स्वारी करिता त्यांचे कीर्तन झाले. राजे सरकारही संतुष्ट होऊन अगदी सढळ हाताने त्यांनी या हरिदास बोवांची संभावना केली आणि यांना जी प्रवासांतील खर्चाची काळजी लागली होती ती सर्व कल्पनेच्या बाहेर दूर झाली. पण हा 'गंगास्नानाचा प्रभाव की काय? अशी शंकाही त्यांच्या मनांत चमकून गेल्याशिवाय राहिली नाही. पण त्यांचे समाधानकारक उत्तर त्यांना मिळाले काय?'

पुढे काही दिवसांनी ही त्रिवर्ग मंडळी वाडीला आली. अलिकडे लक्षुमण दीक्षितांचे वैराग्य ही वाढू लागले होते. अशा स्थितीत काही दिवसांनी बाळंभट गाडगीळ हे वाडीला आले.

नाशिक येथील प्रख्यात सिध्दपुरुष रघुनाथभटजी (भृगुऋषींचा अवतार) यांचे शिष्य हे बाळंभट गाडगीळ होत व निरंजन रघुनाथांचे गुरुबंधू अशी ही गुरु परंपरा आहे.

रघुनाथ भटजी नाशिकला असताना गोदे पासून काही अंतरावर त्यांची एक पर्णकुटिका होती. यांचा तेजस्वी चेहरा पाहून एका बाईच्या मनात आले की, आपण यांची काही तरी सेवा करावी पण जवळ जाऊन विचारण्याचा तिला काही धीर होईना ? अखेर तिने असा नियम केला की यांच्या पर्णकुटिपासून गंगेवर जो रस्ता जातो तो ती नियमितपणे पहाटे झाडून टाकू लागली. या प्रमाणे रोज रस्ता पहाटे स्वच्छ होई. हे काम कोण करते हे काही त्यांना समजले नाही. याप्रमाणे ४/६ महिने झाल्यानंतर एके दिवशी हिचा रस्ता झाडून होण्याच्या सुमारास रघुनाथभटजी तेथे तयार झाले.

पहातात तो एक स्त्री. 'बाई' त्यांनी विचारले. 'हा रस्ता झाडण्याचे रोज काम तू का करीत आहेस ?'

'उगाच काही सेवा घडावी म्हणून.' 'तुझं आणखी इथ कोण आहे ?'

'कोणि नाहीं.' ती हात जोडून नम्रपणे म्हणाली. 'माझे लग्न लहान पणीच झाले व लग्न होताच नवरा कुठे निघून गेला त्यांचा अद्याप पत्ता नाही. आईबापांचे पश्चात कोणाकडे तरी कामकरुन खात बसण्यापेक्षा जमल्यास क्षेत्रातराहून आपल्यासारख्यांची सेवा घडून जर देवास दया आली तर आपला कार्यभाग होईल अशी आशा धरुन सेवा करीत आहे.'

ही बाईची हकीगत ऐकत ऐकत ते चालले होते. थोड्यावेळाने ते म्हणाले, 'ठीक आहे. तू गंगेवरच येत आहेस ना?' 'हो'.

ते गंगेवर आले व त्यांनी नदीत स्नान करुन ते जो वर येतात तोच एका बैराग्याने येऊन त्यांना वंदन केले. 'तुंम्ही कोण काय?' वगैरे विचारताच त्याने आपली सर्व हकीगत सागितली. 'आपण काशीत कायमचे रहावयाचे असे ठरविले असताही अलीकडे काही दिवस मनाची तळमळ सुरु झाली व पुन: तेथून एक महिन्यापूर्वी निघून इकडे आलो. येथे येऊन मला आठदिवस झाले. मी रोज या खालच्या बाजूलाच स्नान करीत असतो. पण मन अगदी कासावीस होऊन मला काही सुचत नाही. आता मला आपल्या दर्शनाने कितीतरी समाधान वाटत आहे तरी आपली कृपा असावी एवढीच प्रार्थना आहे.'

रघुनाथभटजी त्या स्त्रीला उद्देशून म्हणाले, 'बाई' हा तुझा पति घे.' आणि त्याला उद्देशून म्हणाले, 'ही तुझी स्त्री-धर्मपत्नी' हिचे पालन नीट करीत जा. यातच तुझे सर्व कल्याण आहे.' अशा तऱ्हेचे हे रघुनाथभटजी अधिकारी होते. यांचा नाशिक येथे पुलाजवळ मठ असून तेथे पाठशाला आहे. यांचे शिष्य बाळंभट गाडगीळ हे हि

आचार संपन्न असून अत्यंत निस्पृह होते. पण अधिकारी होते. कृष्णा काठावर एका पडक्या ओसाड जागी रहात असत. त्या गल्लीतील बायका त्या जागेवर उष्ट्या पत्रावळी टाकीत असत. यांनी पहाटे उठून त्या सर्व पत्रावळी गोळा करुन जाळून टाकावयाच्या आणि तेथे सडासंमार्जन करुन नंतर स्नान करावयाचे. हे तिथे रहात असतात असे पाहिल्यावर बायका पत्रावळी जरा दूर टाकू लागल्या. पण वाऱ्याने त्या उडून तिकडे जात आणि ती जागा बहुतेक रोज त्यांना अशीच साफ करुन घ्यावी लागे व ते आनंदाने घेत. लक्ष्मण दीक्षितांचे बंधु नरहर दीक्षित यांचे ही हेच गुरु होत.

या खेपेला लक्ष्मण दीक्षितांचे वैराग्य पाहून त्यांनीच यांना उपदेश दिला व त्यांना कृतार्थ केले. नंतर काही दिवसांनी गाडगीळ सहज म्हणाले, 'बाबा, तुझ्या गंगास्नानाच्या पुण्याईमुळे मला श्री गुरुंनी तुझ्याकडे यावयास सांगितले. या उद्गाराने लक्ष्मण दीक्षितांची खात्री झाली हे काही निराळे सांगावयास नकोच आणि लक्ष्मण दीक्षितांना जो आनंद-आनंदाचा ठेवा मिळाला तो हि गुरुकृपेनेच होय.'

अलीकडे लक्ष्मण दीक्षितांचा धंदा म्हणजे कीर्तन करणे हाच झाला होता. त्यांच्या जवळ तालसुराचे ज्ञान कंठ माधुर्यता, समय सूचकता, कवित्वशक्ती विद्वत्ताही चांगल्या प्रकारची होती. तशांत सद्‌गुरु कृपा. इतक्या गोष्टी एकत्रित असल्यावर त्यांच्या कीर्तनास रंग कसा येईल व आबाल वृध्द स्त्री-पुरुष त्या भक्ती रसांत कसे रंगून जात हे काय निराळे सांगावयास पहिजे ! त्यांच्या कीर्तन श्रवणाचा लाभ घेतलेली अद्यापही काही वृध्द मंडळी दृष्टीस पडतात. ते इथे गावात असले म्हणजे कट्ट्यावर कीर्तन करीत, व लोकाग्राहास्तव कधीकधी ते लांब फिरावयालाही जात. त्यावेळी

त्यांचे बरोबर त्यांचे दोघे मुलगे विष्णु, दत्तु आणि मिरजेचा प्रख्यात मोरु गुरव ही मंडळी असत.

लक्ष्मण दीक्षितांना गोव्याचे आंबे फार आवडत असत. त्यांची काही भक्त मंडळी गोव्याला होतीच. एकदा उन्हाळ्यात दीक्षित हे गोव्याला गेले असता एका भक्ताने काही उंचे आंबे त्यांचे पुढेत आणून ठेविले आणि विस्मरणाने त्यांनी नैवेद्य न दाखवितांच त्यातील आंबे खाल्ले. त्या रात्री त्यांना झोप लागल्यावर स्वप्नात एक संन्यासी येऊन तो कोपऱ्यात टाकलेल्या कोया घेऊ लागला. हे दृश्य पहाताच हे पुढे होऊन म्हणाले, 'अहो महाराज आपण संन्यासी आणि या उष्ट्याकोया कशाला घेता ? आत जा तुम्हाला चांगले आंबे मालक खावयाला देतील.'

यावर तो संन्यासी म्हणाला, 'अरे उष्ट्या कोया घेऊ नको तर काय करु? मला संन्याशाला कोण देतो?' जागृति येताच आपण आज आंबे नैवेद्य दाखविल्या शिवाय खाल्ले. यांचे त्यांना स्मरण झाले. अशा यांच्या अप्रुप कितितरी गोष्टी लोक सांगत असतात.

हे काव्य चांगल्या तऱ्हेचे करीत असत. यांच्या संस्कृत प्राकृत पुष्कळ कविता असून त्या बहुतेक वेदांतपर आहेत. यांनी वयाचे ७० वर्षाचे शेवटी वाडीतले मौनीस्वामी होते त्यांचे कडून संन्यास दीक्षा घेतली व ते घरीच राहात होते. यांनी भूमानंदपाद यांचे पासून शांकर भाष्य श्रवण केले.'

देहावसानाचे पूर्वी काही वेळ यांनी घरातील सर्व मंडळी बोलावून, 'कुणाला काय पाहिजे ते सांगा. तूर्त पोते सोडलेले आहे.' असे सांगितले. त्यावेळी त्यांच्या ३ कन्यांनी आपणास सद्गती पाहिजे म्हणून प्रार्थना केली . त्यांचा काल त्याप्रमाणे चांगल्या क्षेत्रात झाला. यांची एक मुलगी वावड्याचे जहागीरदार अमात्य यांना दिलेली होती.

अंतकाळी ते मुलांना म्हणाले, 'अरे हे काय वाजत आहे? अहो ! ती पहा विमानात रामसीता मारुती दिसत आहे. एकदा त्यांना नमस्कार करा.' इ. यांनी लहानपणी १३ कोटी रामनाम जपाचे उदक सोडले होते व काही केलाही होता . पण पुढे सद्‌गुरुची गाठ पडल्यानंतर त्यांना उपासना निराळीच लागली होती.

अखेर शके १८१२ विकृति नाम संवत्सरे श्रा.शु.११, सोमवारी दुपारी शुभवेळी यांनी आपला जड देह वाडी क्षेत्रात ठेविला. त्यावेळी पुरामुळे देवाची स्वारी गावात आली होती.

श्री लक्षुमण दीक्षित यांना दत्तु, विष्णु, अण्णा व नारायण असे चार मुलगे व सहा मुली होत्या. त्यापैकी पहिले २ मुलगे दत्तक दिलेले होते. तिसरे अण्णा दीक्षित. अण्णांचे संस्कृत शिक्षण वाडीतच वे.शा.सं.रा. कृष्णशास्त्री वष्टे यांचे जवळ झाले होते. हे पुराण सांगण्यात मोठे प्रवीण होते. यांच्या पुराणाला बसलेला मनुष्य कधीच आळसात अगर झोपेत आढळावयाचा नाही. इतके यांचे पुराण गोड रसाळ होते. खुद्द प.प. वासुदेवानंद सरस्वती महाराज यांनी ही यांचे पुराण ऐकून, 'अण्णा खरोखरीच तुमचे पुराण फार चांगले होते. मी इतका देश फिरलो पण तुमच्या सारखा मधुर पुराण सांगणारा मला अद्याप आढळला नाही.' असे उद्गार काढले होते. हे उदार स्वभावाचे असून अल्पसंतुष्ट होते. काही मंडळींनी, ' तुम्ही कोल्हापुरला अंबाबाईचे देवळात सप्ताह करा. एक हजार रुपये मिळवून देण्याचे काम आमचे कडे लागले.' असे सांगितले. पण वाडी सोडून त्यांना बाहेर जाणे प्रशस्त वाटले नाही. हे चातुर्मास पुराण आपल्या घरी सांगत आणि आठ महिने कट्ट्यावर देवा समोर सांगत असत. 'यदृच्छालाभतुष्टस्यतेजो विप्रस्यवर्धते' हे काही खोटे नाही.

शांताश्रम म्हणून जे प्रसिध्द संन्यासी होऊन गेले (त्यांच्या चुलत्याचे शिष्य) त्यांनी यांना सांगितले की, 'अण्णा हा सर्व पोटाचा

धंदा ठीक झाला पण स्वार्थ जर काही साधावयाचा असेल तर तुम्ही पंढरपुरला जाऊन १०८ भागवताचे सप्ते करा व याने तुमचे अंतीम साध्य होईल.' पुढे काही दिवसांनी अण्णानी येथील घरचा प्रपंचाचा भार मुलांवर सोपवून ते पंढरपुरला गेले व शांताश्रमांच्या सांगण्याप्रमाणे त्यांनी तेथे ९२ सप्ते स्वत: केले व बाकीचे ब्राम्हणांकडून करवून त्यांना भरपूर दक्षिणा दिली. यांच्या पुराणाला ४-६ हजार समुदाय जमत होता.

पंढरपुरला अण्णांचा लौकीक चांगलाच वाढला. त्यांचे पुराण फार लोकप्रिय होऊन त्यांना पैसाही चांगलाच मिळाला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांनी तो पैसा बहुतेक तेथेच विठोबाची पूजा ब्राम्हण भोजन इ. दान धर्मात खर्च केला नंतर ते वाडीला आले होते. पण जास्त दिवस राहिले नाहीत. वाडीलाही त्यांनी महारुद्र ब्राह्मण भोजन वगैरे केले आणि ते मिरजेला निघून गेले.

पखवाज वाजविण्याची कला त्यांना उत्तम साधली होती. इंदुरचे जे प्रख्यात नानासाहेब पानसे हेच यांचे गुरु. वाडीत पुष्कळ पखवाज वाजविणारे होऊन गेले. पण यांचा हात धरणारा कोणी आलेला नाही. यांचे दोन मुलगेही आपला वडिलोपार्जीत पुराणाचा धंदा अद्याप चालवीत आहेत. ही गोष्ट त्यांना भूषणावह आहे.

अण्णा दीक्षित जे मिरजेला गेले ते बरेच आजारी होते. नंतर त्यांनी तेथे संन्यास घेतला आणि वेदमूर्ती गोविंदभटजी दीक्षित पटवर्धन यांचे घरी शके १८४९ चैत्र व.१३ ला ते ब्रह्मीभूत झाले.

घराण्याचा इतिहास समाप्त

-------------*****------------

## प्रकरण तिसरे

मागील एकंदर भागाचे सिंहावलोकन केले असता हे वरदी दीक्षित घराणे व त्यांतील लक्ष्मण दीक्षितांची योग्यता किती होती? हे देवाचे किती आवडते होते हे मागील कथानकांवरुल वाचकांच्या सहज लक्षात येण्यासारखे आहे. लक्ष्मण दीक्षितांना एकंदर चार मुले झाली. त्या सर्वात लहान जो नारायण जन्मास आला. ज्याने आपल्या भक्तीने श्रीगुरुंना वश करुन घेतले. बालपणीच्या खेळात सुध्दा गुरुचरित्राची पारायणे केली व आपल्या मित्र मंडळींकडून करविली. मनांत इच्छा नसताना सुध्दा ज्यांने केवळ वडिलांच्या शब्दाला-आज्ञेला मान देऊन गृहस्थाश्रम स्वीकारला. जो संसारात असून देहाविषयी उदासीन, ज्याने रसनादिक इंद्रिये जिंकून आपल्या आचार धर्माचे कडक पालन करुन श्रीगुरुंचे मन अगोदर पासुनच आपल्याकडे ओढून घेतले. ज्याने जीवाचे व देहाचे लाड केले नाहीत. परनिंदा व स्तुति याचे कडे पाठ करुन ज्याने आपले भर तारुण्य देवघरात बसून गुरु प्राप्ती करिता अहर्निश ध्यास घेऊन गुरुंना खेचून आणले.

चित्तशुध्दीकरिता स्मार्ताग्नी ठेऊन शुक्लवृत्ती धारण केली व काही दिवसांनी अयाचित वृत्ती स्वीकारली. प्लेग सारख्या बिकट प्रसंगी पंचमहायज्ञ व अतीथी अभ्यागतादी याचकांना आपण काही दिवस उपवास काढून अन्न संतर्पण केले आणि शारिरीक क्लेश सहन करुन भूतदयेचा मार्ग जगास घालून दिला. स्त्री पुत्रादिकांचा जन्म मृत्यू ज्याने शांतपणे सहन केला, लोक लज्जा व मानापमान गुंडाळून ठेऊन जो सद्‌गुरु चरणी लीन झाला व सद्‌गुरु प्राप्ती होताच एकनिष्ठपणे-निरलसपणे स्वत: सद्‌गुरु सेवाकरुन गुरुंचे व सर्वांचे मन आकर्षण करुन घेतले व ध्येयपूर्ती करिता याने २४ तास उभे राहून गुरुच्या गुरुंचेहि मन ज्याने वळविले. सर्वांशी समत्वाने वागून

सर्वांचे प्रेम संपादन करुन घेतले. भक्तजनांचा मोह पडताच दोन वर्षे योगिचर्येचा आश्रय करुन ज्याने प्रेमसंन्यास केला व भक्तगणांवर संकट आले असता आपण देह दंड-उपोषणे करुन त्यांची मुक्तता केली. सद्‌गुरु कृपा संपादन करुन ज्याने आपल्या अंगी ईशत्व-ईश्वरी सामर्थ्य बाणवून घेतले. केवळ इच्छामात्रेकरुन भक्तांच्या कामना परिपूर्ण केल्या. ज्याने अमरापुरला आपल्या गुरुचे 'वासुदेवानंद सरस्वतिपीठ' स्थापन केले. अखेर जो गुरु स्वरुप झाला. त्या सद्‌गुरुस्वरुपी नारायणाला श्रीनृसिंहसरस्वतिला वंदन करुन त्यांचेच चरित्र यथामती सांगण्याचा आमचा विचार आहे.

वसुदेव पत्नी देवकी बंदिशाळेत असता ती गरोदर राहिली की तिला अत्यंत भय वाटे. कारण नवमास ओझे बाळगून मुलाला जन्म देताच तो चांडाळ मुलाचा मामा त्याला मारणार. यामुळे तिला रात्रंदिवस झोप लागत नसे. अशा विवंचनेत ती प्रसूत होऊन पुत्र त्याच्या स्वाधीन करावयाचा म्हणजे तिला त्यावेळी काय वाटत असेल ? त्यावेळी तिची मनःस्थिती कशी होत असेल हे आम्हास सांगता येणार नाही पण असे काही प्रसंग तिने भोगले ही गोष्ट खरी.

पण भगवान श्रीकृष्णाचा गर्भ संभव होताच देवकीची सर्व वृत्ती एकदम पालटली. नेहमीची भित्रीवृत्ती नाहिशी होऊन तिची वृत्ती धीट बनली. बहूतेक गोष्टी म्हणजे युध्दाच्या ती मोठमोठयांदा बोलू लागली. बिचारा वसुदेव भिऊन जाऊन तिची समजूत घालण्याचा आपल्याकडून वाटेल तितका प्रयत्न करी. पण छे ! तिचा त्वेष इतका वाढे आणि ती त्या आवेशांत 'त्या कंस चांडाळाला माझ्या समोर आणा. आत्ताच त्याला ठार मारतो. यम सदनास पाठवितो. माझ्या हातात शस्त्र द्या. काय नाही देत ? चालेल. मी त्याच्या सोबत मल्लयुध्द करीन.' असे आवेश युक्त बोलून दंड थोपटून मल्लाच्या पवित्रात उभी राही. नंतरच भगवान अवतीर्ण होऊन त्यांनी तेच

कार्य केले. तात्पर्य काय ? या एकंदर डोहळ्यावरुन बालक कोणच्या स्वरुपाचे जन्माला येणार याचा अंदाज सहज करता येतो म्हणतात ते काही खोटे नाही.

नारायण दीक्षितांच्या वेळी, मातोश्री साध्वी अहिल्या बाई गरोदर असताना, नेहमी त्या मोठ्या आनंदात असावयाच्या. 'मनुष्याने स्वधर्माचरणाने वागावे. गुरुचे ठिकाणी दृढ निष्ठा ठेवून कितीही श्रम पडोत ते कष्ट आनंदाने सहन करुन मनुष्य देहाचे सार्थक करावे. सर्व चराचर वस्तुमात्राचे ठिकाणी परमेश्वर परिपूर्ण भरलेला आहे. असे समजून सर्वांवर सारखे प्रेम ठेऊन परोपकार करण्याविषयी नेहमी तत्पर असावे.' इ. उच्च विचार त्यांचे तोंडून प्रगट होऊ लागले.

तिच्या गरोदरपणाच्या आत्तापर्यंत कितीतरी खेपा झाल्या होत्या. पण असा वेदांत, निर्भय वृत्ती, श्रीगुरुविषयीची निष्ठा कोणत्याच खेपेला प्रगट झाली नव्हती. ही त्यांची स्थिती अवलोकन करुन लक्षुमण दीक्षित यांना स्मरण झाले की आपल्या पूर्वजाला श्रीगुरुंनी वर दिला आहे की, 'तुमचे वंशात मी जन्म घेईन.' या एकंदर सुलक्षणावरुन तो समय हाच असावा. अशी त्यांची खात्री होऊ लागली. भगवान आपले उदरी येणार ? केव्हढे आपले महत्भाग्य?

पुढे पूर्ण दिवस भरताच, शके १७८८ फाल्गुन वद्य अमावस्या, रोजी शुभ वेळी अहिल्याबाईंना चतुर्थ पुत्ररत्न झाले. हा अवतारी लीला नाटकी नारायण आहे. हा नर असून नारायण कसे होता येते याचा धडा घालून द्यावयास आला आहे. असे पाहून लक्षुमण दीक्षितांनी याचे नाव नारायण असे ठेविले. त्यावेळी तेथे काही ज्योतिषी मंडळी आली होती. लक्षुमण दीक्षितांनी मुलाची वेळ सांगून त्याचे ग्रह कसे काय आहेत' म्हणून विचारले. त्यावेळी 'हा बालक अत्यंत बुध्दीमान असून स्वधर्मावर श्रध्दा ठेवणारा, परोपकाररत असा होईल. शिवाय याच्या कुंडलीत संन्यास योग आहे. संन्यास घेतल्या नंतर याची

ईश्वरांशाची, याच्या तेजाची व कीर्तीची वृध्दी होईल. असे बलवान ग्रह आहेत.' हे मुलाचे भविष्य ऐकून लक्ष्मण दीक्षितांना किती धन्यता वाटली असेल हे काही सांगावयास नकोच.

आधीच मूल म्हटले म्हणजे आईबापाला अत्यंत आवडते. मग त्याचा वर्ण कसाही असो. रुप कसेहि असो. अत्यंत लाडके असावयाचेच आणि हा तर प्रत्यक्ष परमेश्वरच. ज्याची आपले पूर्वज भक्ती करीत आले, जे आपले आराध्य दैवत, ज्याची आपण नेहमी पूजा, जप करितो, तोच हा, ही भावना झाल्यानंतर त्याच्या विषयी काय वाटत असेल ते त्यांच्या सारख्या भाग्यवानांनाच कळणार. इतरांनी आपआपल्या कल्पने प्रमाणे समजूत करुन घ्यावी, हेच ठीक होईल.

श्रीकृष्णाचे बालरुप पाहून राधा अगदी वेडी होऊन जाई. तिला वाटे कृष्ण नेहमी आपल्याजवळ असावा. इतके भाग्य आपले नाही. तथापी थोडावेळ जरी आपल्या कमरेवर बसला तरी देखिल पुष्कळ झाले. निदान लांबून जरी त्याचे दर्शन झाले तरी देखील आपली पुण्याई जन्माला आली, असे म्हणायला हरकत नाही आणि हा तिचा भाव ओळखून दयाघन प्रभू राधा येण्याचे वेळी काही तरी हट्ट धरुन रडत असावयाचे आणि मग यशोदा मातेने लटके पणाने म्हणावे, 'राधे, जा गं त्या कार्ट्याला जरा कुठे तरी घेऊन. अगदी भलताच हट्ट धरुन रडत बसतो.'

तो गोकुळातील अवतार होता. राधेने घेण्याकरीता त्याला त्यावेळी रडावे लागे आणि हे पडले दत्तनगर. येथे नारायण जरी उगाच असला तरी देखील त्याला खाली कोणी ठेवण्यास कबूल नसे. यालाच जेंव्हा मनुष्याचा सहवास नको वाटायचा म्हणजे याने रडावयाला लागावे. याला लोकांनी खाली ठेवावा. अशी परिस्थीती लक्ष्मण दीक्षीतांची होती.

साधारण मूल हुषार व तरतरीत असले तर गावातील मंडळी त्याचे कौतुक करितात. हा तर ईश्वरी अंश याला घ्यावा याच्याशी विनोद करावा अशी इच्छा लोकांना होणे अगदी सहाजीकच आहे. जशी ज्याची पुण्याई, त्याप्रमाणे त्याला यांचा सहवास घडतही होता. अशा रम्य बालपणांत नारायणाचे दिवस कसे गेले असतील याचा विचार करावा.

नारायण आठ वर्षाचा होताच त्याचे मौजीबंधन झाले. हा बटुवेष नारायणाला फारच चांगला शोभत होता. मस्तकाला तो भस्माचा त्रिपुंड कमरेला मेखला, छोटीशी कौपीन, गळ्यात ते शुभ्र यज्ञोपवीत आणि संध्यावंदना ची आवड यामुळे सकौतुक कोणाचीही नजर त्याचेकडे वेधे.

यांचे प्राथमिक शिक्षण वाडीत बेलवेलकर नावाचे प्रख्यात पंतोजी होते, त्यांचे देखरेखी खाली झाले. लहानपणा पासून याचे अभ्यासात लक्ष कमी. वृत्ती हूड. बाकी देवाधर्माच्या गोष्टी ऐकण्यात स्वारी मोठी पटाईत. बेलवलकर पंतोजीही थोडे देव भोळे होते. ते आपले या प्रेमळ शिष्याला मधल्यावेळेत आपल्या जवळ घेऊन एकनाथी भागवत वाचीत व त्याला त्यातील गोष्टी सांगत असत आणि या मास्तरनी सांगितलेल्या गोष्टी मुलांच्या मनावर कशा पटतात याचा दाखला इतिहासात ही आढळतो. ही भावीपिढी निर्माण करण्याचे खरोखरीच श्रेय त्याच्या गुरु कडेच असते  आणि पूर्वीचे गुरु ते आपले कर्तव्य योग्य रीतीने पार पाडीत असत. शिष्याचे सर्वतोपरी कल्याण व्हावे. त्याच्या मानसिक विचारांची वाढ चांगल्या प्रमाणात व्हावी, याकडे त्यांचे लक्ष असे.

नारायणाच्या वयाच्या १४ वर्षापर्यंत वाडीत मराठी शिक्षण होऊन नंतर स्वारी मिरजेला हायस्कूलमध्ये इंग्रजी शिक्षण घेण्याकरिता दाखल झाली. ४ वर्षांनी मिरजेचा इंग्रजी शिक्षणक्रम

पुरा झाला. नारायण वाडीला येऊन दाखल झाला. वयाच्या १८ वर्षापासून वे.शा.सं. कृष्णशास्त्री वष्टे यांचे कडे संस्कृत शिक्षण घेण्यास त्याने सुरवात केली. अभ्यास साधारणच करी. पण गुरुजींनी श्लोक विचारताच मात्र बरोबर म्हणत असे. याच्या बरोबरच्या काही मंडळींनीही हा अभ्यास करीत नाही आणि आपल्या बरोबर खेळायला ही येत नाही, पण श्लोक मात्र पाठ म्हणतो. आपण अभ्यास पुष्कळ करुनही आपल्या चुका निघतात. याचे वैषम्य बरोबरच्या मुलांना वाटणे सहाजीकच आहे. शिवाय एकलकोंड्या स्वभावाचा विशेष कोणाबरोबर बोलावयाचा नाही. अर्थात आपली चतुराई खर्च करुन याला आपल्या खेळण्याच्या कटांत घेऊन त्यालाही खेळण्याची गोडी लावूया असा विचार करुन त्याच्या काही दोस्त म्हणविणाऱ्या मंडळींनी त्याला आग्रह केला व १-२ वेळा खेळावयाला बसविले. पुढे नारायणाला बोलावयाची फुरसत हातातील पुस्तक बाजूला ठेवून तो चटकन् खेळावयाला बसे. एकदा तर या मंडळींनी असे रात्र जागरण करुन ४-६ दिवस नुसत्या खेळण्यातच काढले.

पण या सहवासात नारायण जो एकलकोंडा त्याला विशेष बोलावयाला नको इ. जे आरोप त्याच्यावर त्याची स्नेही मंडळी करीत होती ती आपली चूक आहे असे त्यांना आढळून आले व तो अगदी मंडळीतला आहे, आपल्या पेक्षा सवाई आहे अशी त्यांची खात्री झाली. सहाजीकच एकतऱ्हेचे प्रेम त्यांचे नारायणवर बसले.

पुढे एके दिवशी नारायण म्हणाला, ‘अरे आता आपण एक गम्मत करावी असे माझ्या मनात येत आहे. तर त्याला किती आसामी अनुकूल आहेत ते सांगा पाहुया बरं ! ’ बहुतेकांनी ‘आम्ही तुझ्या गमतीत सामील होतो. तू सांगशील ते आम्ही आनंदाने करितो.’ असे सांगितले. यावर नारायण म्हणाला, ‘आपल बहुतेक सर्वांचं शिक्षण जवळ जवळ सारखच झालेलं आहे. पण लवकर वाचता कुणाला येत ते आपण पाहू या.’ प्रत्येकाने या गोष्टीला संमती दिली आणि

प्रत्येकजण आपापल्या परी एकेक पुस्तकाचे नाव घेऊ लागले. यावर नारायण म्हणाला, 'ही तुम्ही आपल्या आवडीची पुस्तके सांगितली व ती तुम्ही कित्येकदा वाचली असतील तर त्या पुस्तकाचेच वाचन न ठेविता आपण सर्वांनी गुरुचरित्र वाचावयाला घेऊ या व कोणाचा सप्ताह किती वेळात संपतो ते पाहूया.'

मुलांचीच हुल्लड ती. सर्वांनी ती गोष्ट कबूल करुन दुसऱ्या दिवशी ती मंडळी सर्व सप्त्याला बसली. नंतर रोज जे आपण वाचले त्यातील गोष्टी सांगावयाच्या व त्याचीच चर्चा करावयाची इ. कार्यक्रम त्यांचा काही वेळ सुरु असे. तात्पर्य काय ? असे कित्येक सप्ते नारायणाने केले व लोकांकडून करविले. यावरुन एक गोष्ट उघड होते की नारायणाला बरोबरच्या मित्र मंडळींची खरी कळकळ वाटत होती आणि एवढ्याचसाठी आपले तत्व-हेतू बाजूला ठेवून तो मंडळीत मिसळला. त्याने आपली छाप त्यांच्यावर टाकून युक्तीने त्यांना चांगल्या मार्गावर आणले. आपण सर्वांबरोबर न वाहता, सर्वांना आपल्या बरोबर वाहून नेणे ही सामान्य गोष्ट नाही. यालाही दैवी कृपा-तेज लागते.

मूल औषध घेत नसले म्हणजे,'बाळ तुझा खोकला जाईल व ताप बंद होईल. तो जर काढा घेऊन तुझे तोंड कडू झाले तर मी तुला मोठा खडीसाखरेचा खडा देईल इ.' या मृदु भाषणाने माता मुलाची समजूत पाडून त्याला औषध पाजते व रोग बरा करिते. ते हृदय-वात्सल्य नारायणाचे ठिकाणी होते. आपण तरुन जाणे यांत तर विशेष असे काहीच नाही. पण दुसऱ्याला तारुन नेणे यांतच काय ते खरे रहस्य आहे.

या प्रमाणे ४-६ वर्षे वाडीत आपले कर्तव्य स्नान संध्यादी ब्रह्मकर्म, अग्नि कार्य, श्रीगुरुचरित्र ग्रंथाचे वाचन इ. क्रम त्याचा सुरु होता, शिवाय अभ्यास. याप्रमाणे आपले ब्रह्मचर्य यथाविधी पालन करुन त्याने गायत्री पुरश्चरण केले. त्या गायत्री पुरश्चरणाचे तेज

म्हणा अगर पुढे उदय होणाऱ्या चंद्राचा तो संधिप्रकाश म्हणा. नारायणकडे पाहताच कोणालाही त्याच्या विषयी अत्यंत आदर वाटू लागे. वय लहान पण गंभीर वृत्ती, मित भाषण, सदाचार इ. योग्य वर्तन पाहून लोक 'आहे काही तरी यात पाणी आहे.' असे जो तो मनाशी समजू लागला. त्याच्याशी बोलण्याचा प्रसंग आल्यास 'अरे' शब्द न वापरता 'का हो नारायण दीक्षित' इ. त्यांना बहुवचन मिळू लागले. मुलाचे ते गांभीर्य व तेज पाहून आईबायांना जितका आनंद होई, तितकीच त्यांना त्याची भिती ही वाटू लागली. याचे नेहमी सद्ग्रंथ वाचन व एकांत प्रिय या गोष्टी पाहून त्यांना अशी काळजी पडली की, हा आता लग्न कार्य करुन संसारात राहतो की बैरागी होऊन कुठे निघून जातो ? नारायणाच्या लग्नाविषयी तशी लक्ष्मण दीक्षितांना काळजी वाटत होती. त्याच प्रमाणे नारायणावर खरे प्रेम करणारी हित पाहाणारी जी काही वडिल मंडळी होती त्यातील एकाने सहज नारायणाजवळ लग्नाची गोष्ट काढली. त्यावर नारायण म्हणाला, 'या माया मोहात गुरफटून पडण्यापेक्षा सद्गुरुंची जोड मिळून त्यांची कृपा संपादन करावी, आत्मानात्म विचार पहावा आणि या नर देहाचे खरे सार्थक करावे, अशी माझी इच्छा आहे.'

ही नारायणाची इच्छाही थोड्याच दिवसांत लक्षुमण दीक्षितांच्या कानावर गेल्या शिवाय राहिली नाही. मग काय विचारता? त्यांना जास्तच काळजी वाटू लागली.

या प्रमाणे वडिलांचे मन शंकित झाले असता एकदाचा सोक्षमोक्ष करुन घ्यावा. असा निश्चय करुन लक्षुमण दीक्षितांनी त्याला एके दिवाशीं आपल्याजवळ बोलाविले. थोड्या इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलून, 'अतांसाली मजकूर तुझे लग्न करावे असा आमचा विचार आहे. तरी तुझी इच्छा काय आहे ती स्पष्ट सांग.' असा प्रश्न केला. अलीकडे १-२ वर्षे घरांत बायकामंडळीत या लग्नाची चर्चा

चाले व कधीकधी ओझरती ती यांचे कानावर येई. पण यांनी मुळीच तिकडे लक्ष दिले नाही आणि तिकडे लक्ष देण्याला त्यांना फुरसत तरी कोठे होती ?

पण आता वडिलांनीच प्रत्यक्ष गोष्ट काढल्यामुळे त्यांचा अगदी नाईलाज झाला. अत्यंत नम्रतेने पण स्पष्ट त्यांनी मार्गदर्शीत केलेले आपले सद्‌विचार प्रकट केले. आणि 'मी माझे विचार आपल्या जवळ मांडले आहेत. आपण जी आज्ञा कराल ती मला मान्य आहे. मी ती आनंदाने पाळीन.' असे सांगितले.

'नारायणा तुझे विचार चांगले आहेत. तू आमच्या कुळाचा उध्दार कर्ता आहेस. तुला मी सांगावे असे नाही. तथापि मोहामुळेच मी बोलत आहे.'

'बाबा रे ! अनाश्रमी राहाणे अप्रशस्त आहे. एकदम विषयसुखाचा त्याग करणे ही इतके हितकारक नाही. त्यांच्या ठिकाणी आसक्त होऊन राहणेही चांगले नाही. तर विधीने-कर्तव्य बुध्दीने विषय सुखाचा उपभोग घ्यावा व मोक्षार्थ क्रिया-उपासना आचरावी. याला श्रुतीचाही आधार आहे. या सर्व गोष्टींचा हेतू मोक्ष आहे. आणि मोक्ष ज्ञानाशिवाय मिळत नाही. हे सर्व तू जाणत आहेस पण हा लौकिकी विचार म्हणून मी तुला सांगत आहे. आधी धर्मार्थ, काम संपादन कर. तुला विवाह करणे आवश्य आहे. तो करून देवर्षीपितृऋण तू आधी फेडावेस. यातच तुझे खरे कल्याण आहे. प्रत्येक आश्रम आचारपूर्वक पाळून एकनिष्ठपणाने सद्‌गुरुची जोड मिळून देहाचे, नर देहाचे खरे सार्थक करता येईल. अशी माझी खात्री आहे. आणि तूं जो श्रीराम चंद्रासारखा माझ्या वचनास मान देऊन तुझी इच्छा नसता, तू लग्नास तयार झालास यांत तुझे कर्तव्य स्पष्ट दिसत आहे आणि याचे सर्व श्रेय तुला मिळेल. तुझे अभीष्ट साधेल असा माझा तुला आशीर्वाद आहे.

पुढे थोडेच दिवसात रेंदाळ येथील प्रख्यात कवी एकनाथ पांडुरंग कुलकर्णी यांची बहीण वधू नेमस्त करून लक्ष्मण दीक्षितांनी लग्नाचा बार उडवून टाकला व तीचं नाव 'वाराणशी' असे ठेविले आणि आमचे नारायण दीक्षित हे गृहस्थाश्रमी झाले.

लग्न झाल्यानंतर स्त्रीच्या मोहामुळे यांचे पूर्वीचे विचार बदलून जातील असे कित्येकांस वाटले होते. कारण अशी उदाहरणे किती तरी बघावयाला मिळतात. लग्न होण्यापूर्वी, 'मला लग्नाचं कर्तव्य नाही. ही बायको मला आवडत नाही. वडिलांच्या आग्रहामुळे मी उभा राहिलो. मी आपली आता दुसरीच करणार आहे.' इ.कितीतरी तरुणांच्या वायफळ गप्पा ऐकावयाला येतात आणि वर्ष सहामहिन्यांत त्याच नावडतीचे हे दास बनतात. इतकेच नव्हे तर मग आपली जन्मदाती आईबापच वाईट स्वभावाची अशी खात्री होऊ लागते.

पण आमच्या नारायण दीक्षितांचे वैराग्य इतक्या हीन प्रतीचे नव्हते. अगर स्त्रीच्या संगतीने ते न वाहता उलट त्याला दृढता आली. स्त्रीचं संगोपन करणे हे ही आपल्या या आश्रमातील एक मुख्य कर्तव्यच आहे. अशीच त्यांची पक्की समजूत होती व ते योग्य तऱ्हेने कर्तव्याचे पालन करीत होते.

अलिकडे शिक्षणा करिता केव्हा तरी शास्त्रीबुवांच्या इथे जात असत. पण बहुतेक पहाटे कृष्णामाईचे स्नान करून हे देवाकडे स्नान संध्येला बसत व आपले आन्हिक १२ वाजता संपवून घरी जात. जेवण झाल्यावर ते खोलीच्या दरवाजा बंद करून आत्मानात्म विचारात व वेदांत ग्रंथ अवलोकनात, मननात समय घालवीत असत.

सावंतवाडी कडील माणगावचे वासुदेव शास्त्री टेंबे (प.प. टेंबे स्वामी महाराज) हे वरचे वर नरसोबावाडीला येऊन काही दिवस रहात होते. त्यांचा वाडीला मुक्काम असला म्हणजे लक्ष्मण दीक्षित यांजकडे येतच. दोघेही अधिकारीच. त्यांच्या गोष्टी म्हणजे बहुतेक

वेदांताच्या चालावयाच्या. लक्ष्मण दीक्षितांनी शंका काढावयाच्या आणि त्यांचे निरसन वासुदेव शास्त्री यांनी आपल्या अधिकार वाणीने करावयाचे. या वेळी आमचे नारायण दीक्षित आपल्या खोलीत दार लावून बसलेले असावयाचे. पण सगळे लक्ष मात्र त्यांच्या बोलण्याकडे. शास्त्रीबुवा एकदा विषय प्रतिपादन करु लागले म्हणजे यांना मोठी मौज वाटावयाची आणि ते जरी अगदी सहज बोलत असले तथापि श्रोत्यांचे लक्ष वेधून घेण्याची कला फार चांगली होती. वासुदेव शास्त्री असामान्य बुध्दीचे ! दुसऱ्याची समजूत पाडून सांगण्यात अत्यंत कुशल. या मुळे नारायण दीक्षिताचे मन त्यांचे कडे सहाजीकच ओढ घेऊ लागले. त्यांचे मनात येई की असा बृहस्पती सारखा आपल्याला गुरु पाहिजे. पण ही गोष्ट घडावी कशी ? आपण त्यांच्या जवळ गोष्ट काढणे शक्य नाही. आपणाला धीर होत नाही. केव्हा केव्हा मनात येई हे ईश्वरी अवतारी असावेत. आज पर्यंत येथे शास्त्री काही थोडे थोडके येऊन गेले नाही. किती तरी आले. पण यांच्या इतका सर्व शास्त्रात पारंगत असा मनुष्य आपल्या ऐकिवात नाही. मग पाहण्यात कुठला ? आणि ही तरी एका जन्मातील मानवी तयारी असणे शक्य नाही. केव्हा केव्हा अशी मौज होई की नारायण दीक्षितांनी रात्री विचार करिता करिता काही शंका उत्पन्न व्हाव्यात आणि त्यांची उत्तरे नेमकी शास्त्रीबुवांच्या तोंडून दुसरे दिवशी त्यांच्या कानी येत. मग यांना वाटे हे खास अंतर्ज्ञानी असले पाहिजे. इत्यादि कितीतरी विचारतरंग यांचे उठत असत आणि अभ्यासापेक्षा सुध्दा वासुदेव शास्त्र्यांच्या गोष्टी कडे ते जास्त लक्ष देऊ लागले. पण हे कुठ पर्यंत ? शास्त्रीबुवा वाडीला असत तो पर्यंत.

अलिकडे दिवसानुदिवस नारायण दीक्षितांचे वैराग्य फारच वाढू लागले. वृत्ती शांत दिसू लागली. प्रापंचीक कोणत्याच गोष्टीकडे त्यांचे लक्ष नाही असे झाले. जेवण खाणापुरते यांनी मंडळीत यावे आणि पुन: आपला आवडता एकांत धरावा अशा स्थितीत काही

दिवस गेल्यानंतर वासुदेव शास्त्री पुनः आपल्या नियमा प्रमाणे नारायण स्वामींचे उत्सवाला आले. त्यांचा मुक्काम ब्रह्मानंद स्वामींचे मठात माडीवर होता. त्यांचा स्मार्ताग्नि असल्यामुळे त्यांचे कुटुंबही त्यांचे बरोबर होते. आपले सर्वकर्म नित्य यथासांग करून दोन प्रहरा नंतर ते लक्ष्मण दीक्षित यांचे कडे भेटावयाला गेले. पुष्कळ दिवसांनी शास्त्रीबुवा आलेले. मग काय विचारता ? लक्ष्मण दीक्षितांनी अगदी आनंदाने त्यांचे स्वगत करून अत्यंत आदराने त्यांनी त्यांना आसनावर बसवून क्षेमकुशल एकमेकांनी एकमेकांना विचारले. थोडावेळ जाताच त्यांच्या इतर काही गोष्टी सुरु झाल्या.

एकदा असेच दोन प्रहरानंतर वासुदेव शास्त्री अगदी रंगात आले आहेत असा समय पाहून लक्ष्मण दीक्षितांनी हलकेच गोष्ट काढली. ते म्हणाले, 'शास्त्रीबुवा हल्ली मला एक नवी काळजी लागली आहे व काय करावे हे काहीच सुचत नाही. अशी माझ्या मनाची द्विधा स्थिती झाली आहे'. 'का बर ? कसली काळजी ?' शास्त्री बुवांनी जरा घाईने विचारले, ' हे पहा आमचा नारायण आहे ना तो अलीकडे अगदी विरक्त बनत चाललेला आहे. त्याला तुमच्या स्वाधीन करावा अशी फार इच्छा आहे. अहो, तो लग्न करीत नव्हता. त्यांची इच्छा नव्हती पण केवळ मी सागितले म्हणून तो लग्नाला उभा राहिला. मी मनात विचार केला की, ही याची पंचविशी आहे. न जाणो हा आज जरी लग्नकार्य नको म्हणत असला तथापि एकदा का याचे पायात १ मणाची बेडी अडकविली म्हणजे हा चांगल्या तऱ्हेने संसार करू लागेल. पण तो माझा अंदाज साफ चुकला. त्याचे वैराग्य काही वर पांगी नाही. अलीकडे बरीच वर्षे एकांत फार प्रिय होऊ लागला आहे. मागे मी याला एकदा आमच्या यमुताई जवळ ठेऊन दुसऱ्या गावी गेलो होतो. १५ दिवसांनी घरी येताच अगोदर नारायणाची चौकशी केली. तो आपला देवघरात दार लावून देवासमोर बसलेला. यमुताईने सांगितले, तो जेवणाला अगर अगदी हाक मारली तर तेवढ्यावेळ

पुरता तो बाहेर येतो नाही तर आपला सदोदीत देवघरात -खेळण्यात गप्पा गोष्टी मारण्यात अगर चैन करण्यात त्याचे मुळीच लक्ष नाही. फार काय सांगावे? एकदा तीने दोडक्याची भाजी केली होती. हा जेवावयाला बसला. त्या दिवशी त्याने भाजी पुष्कळ खाल्ली. हिला वाटले आज कितीतरी दिवसांनी बंधूराज आवडीने भाजी खात असलेले पाहून तिला आपली भाजी चांगली झाल्या बद्दल अभिमानही वाटला आणि ती भाजी आपणाला ही न ठेविता सगळी त्याला वाढली पण या भाजीवरुन याला कशी आवडते हे समजेल व आपण त्याप्रमाणे रोज भाजी करु. असा विचार करुन तिने नुसता नमुना म्हणून पाहण्याकरिता दोन फोडी एके बाजूला काढून ठेविल्या होत्या. ती जेवावयाला बसली आणि तिने त्यातील एक फोड तोंडात घातली. पहावे तर अगदी कडू जहर भाजी! नंतर तिचे जीवाला ती गोष्ट फार लागली. पण नारायणाला त्याचे काही वाटले नाही. उलट संध्याकाळी जेंव्हा तिने नारायणाला म्हटले, 'नारायण, का रे? दुपारची भाजी इतकी कडू झाली असता तू का खाल्लीस?' त्यानेच उलट प्रश्न केला,'भाजी कडू झाली होती! माझ्या काही लक्षात नाही.' इतके याचे लक्ष देहावर असते आणि म्हणून मला अशी काळजी वाटते, मनात येते की तुमच्या सारख्या योग्य मनुष्याच्या स्वाधीन याला करावा म्हणजे मी माझ्या कर्तव्यातून मोकळा होईल.

त्यावर शास्त्रीबुवा संतोषाने म्हणाले, 'इतकी का त्याची तयारी आहे? बोलवा त्याला इकडे. पाहूया एकदा कसा काय आहे तो ?'

'नारायणा, जरा इकडे येऊन जा पाहू!' लक्ष्मण दीक्षित म्हणाले. 'बाकी !' वासुदेवशास्त्री बोलू लागले. 'इथे मी पुष्कळांच्या तोंडून मनुष्य फार चांगला आचार विचार पाळणारा आहे, असे ऐकतो. पण प्रत्यक्ष मात्र त्याची गाठ अद्याप पर्यंत पडलेली नाही. बाकी त्याला धूपारतीच्या वेळी किंवा संध्यावंदन करित असताना घाटावर केंव्हातरी त्याला पाहातो आणि त्याला पाहिल्या बरोबर

त्याच्याशी बोलावे असे मला वाटते. काय असेल ते असो. तुमच्या नारायणाकडे माझे मन ओढ घेते यात शंका नाही. पाहू या बरं, स्वारी कशी काय आहे ती ?'

इकडे वासुदेवशास्त्री बाहेर आले आणि त्यांच्या लक्ष्मुमण दीक्षितां बरोबर चर्चा सुरु झाल्या की नारायण दीक्षितांनी सगळ्या गोष्टी ऐकावयाच्याच. आज ही ते सर्व गोष्टी ऐकत होते. 'इतक्यात मला वडिलांनी त्यांच्या स्वाधीन करितो म्हणताच, शास्त्रीबुवांनीही एकदम आपली संमती दिली. 'माझेही मन त्यांच्याकडे ओढ घेतं', हे शब्द शास्त्रीबुवांचे ऐकताच, नारायण दीक्षितांना एकदम आनंद झाला आणि झाले आता माझा ते खास स्वीकार करतील. आज केवढे माझे भाग्य उदयास आले ? अखेर दत्त महाराजांनी माझे गाऱ्हाणे ऐकले ! किती कनवाळू श्रीगुरु आहेत. आता मला मनाप्रमाणे सद्गुरुंची जोड मिळणार. व या नश्वर देहाचे सार्थक होणार ! 'या आनंदात स्वारी जागेवरुन उठून खोलीत खेपा घालू लागली.' आज कित्येक दिवस जी जीवाला सारखी तळमळ लागून राहिली होती, ती एकदम दूर झाल्यामुळे आज आपण धन्य झालो. 'स्वर्ग अगदी हाती आला अशा आनंदात वडिलांनी हाक मारली आहे व आपणास तिकडे जावयाचे आहे हेही ते पार विसरुन जाऊन आपल्याच आनंदात सारख्या खेपा घालू लागले.'

'अरे! अद्याप नारायण कसा आला नाही ?' याचे आश्चर्य वाटून हा कुठे दुसरीकडे गेला की काय ? अशा कल्पनेने त्यांनी पुन्हा जरा मोठ्याने हाक मारली. त्याबरोबर नारायण दीक्षित भानावर येऊन आपल्या हातून किती हलगर्जीपणा झाला हे ध्यानात येताच ते एकदम दार उघडून बाहेर ज्या ठिकाणी वडील व शास्त्रीबुवा होते तेथे आले आणि त्यांनी शास्त्रीबुवांना साष्टांग नमस्कार करुन अत्यंत नम्रतेने हात जोडून उभे राहिले.

इकडे शास्त्रीबुवांच्या आणि दीक्षितांच्या गोष्टी चाललेल्या होत्या. त्यामुळे नारायणाकडे कोणाचे लक्ष गेले नाही. किंवा गेले आहे असे कोणी दर्शवले नाही म्हणा. अशा स्थितीत सुमारे अर्धा तास त्या दोघांचा वेळ गेला. नंतर वासुदेवशास्त्री म्हणाले, 'या नारायणा.'

त्यावर नारायण दीक्षित म्हणाले, 'सद्गुरु हा हीन दास आपल्याला शरण आला आहे. तरी याचा अंगिकार करुन याच्यावर कृपा दृष्टी असावी.' असे कसे तरी अडखळत बोलून त्यांनी एकदम वासुदेव शास्त्र्यांचे पायावर डोके ठेविले व प्रेमाश्रूंनी त्यांना न्हाऊ घातले.

नारायणाचा शुध्दभाव पाहून वासुदेव शास्त्र्यांचे अंत:करण कळवळले. त्यांनी दोन हातांनी त्याचे मस्तक वर करुन त्याला जवळ अगदी आपल्या हृदयाजवळ घट्ट धरले आणि नारायणा तूं माझा प्राण आहेस असे म्हणून त्यांनी डोळे मिटले. एवढे मोठे विरक्त शास्त्रीबुवा पण त्यांच्या सुध्दा नेत्रांत अश्रू आले. व थोडावेळ दोघांचीही समाधी, अगदी पूर्ण समाधी लागली.

ही स्थिती पाहून लक्षुमण दीक्षित ही थोडे भिवून गेले. अरे, आपण करावयाला गेलो काय आणि हे झाले काय ? दोघांचे श्वास ही काही वेळ बंद झाले. ही हरीहरांची भेट हे नर-नारायणांचे ऐक्य-मीलन पहावयाचा ज्या लक्षुमण दीक्षितांना योग आला ते किती बरे भाग्याचे ? नाहीतरी जोरकस पुण्याई असल्याशिवाय असे अलौकीक देखावे थोडेच दृष्टीस पडतात.

पाच सात मिनीटानंतर दोघेही शुध्दीवर आले. नारायण दीक्षित जरा दूर बसले. बराच वेळ भाषण कोणीच केले नाही. गुरु शिष्याचे मुखावलोकन करित होते आणि शिष्य गुरुचे चरण अवलोकन करित होते. गुरुजी शिष्याच्या मुखावरुन हा योगी आहे

की विरागी आहे हे बारीक तपासत होते. शिष्य हे चरण हे सद्‌गुरु चरण आपले अभिष्ट सिध्दीस नेण्याकरिता कीती समर्थ आहे याचा विचार करीत होते.

नंतर थोड्यावेळाने नारायणाचे लक्षण पाहून झाल्यावर लक्षुमण दीक्षित यांनी नारायणाचा हात आपल्या हातात धरुन म्हणाले 'शास्त्रीबुवा' आत्मावै पुत्रनांमासी' या श्रुती वाक्यानुसार हा माझा प्राण-पुत्र तुमच्या चरणी अर्पण केला आहे. आता आई-बाप, इष्ट-मित्र याचे सर्व काही आजपासून तुम्ही आहात. तुम्ही उदार आहात व जीवांचा उध्दार करण्याकरिताच अवतार आहे. हे ही मी जाणतो आणि आता तर हा नारायण तुमचाच शिष्य झाला. याची काळजी आता मला कशाला ? असा सुपुत्र मला मिळाल्यामुळे, मी देवाचा अत्यंत ऋणी आहे. तुम्ही एकदां का त्याच्यावर कृपा केली तर तो माझा उध्दार करील. ज्ञानी पुरुष जर कुलामध्ये निर्माण झाला तर त्या कुळाचा उध्दार होतो. हे आपणास माहित आहेच आणि म्हणुनच हा नारायण तुमचे चरणी अर्पण केला आहे. नारायणा, मी तुझ्या वरील माझे स्वत्व काढून घेतले आहे. आता या पुढे हे श्रीगुरुचरण तुला सेव्य आहेत. ते सद्‌गुरु तू शिष्य, ते स्वामी तू नोकर, ते उपास्य तू उपासक तू पूजक ते देव. या श्री गुरु चरण सेवनाने जी-जी अभिलाषा तुझे मनात येईल ती-ती तुझी पूर्ण होईल.

'अहो दीक्षित!' शास्त्रीबुवा मधेच म्हणाले. 'तुम्ही भक्त असून जीवन्मुक्त अहात. श्री दत्तगुरुचे लाडके भक्त अहात. हे मी कशाला बोलून दाखवूं ! तुमचे वरदी घराणे आहे. हा तुमचा नारायण पुढे केवढ्या थोर पदास जाईल. हे मी आत्ताच कशाला सांगू ? आणि तुम्ही सुध्दा हे सर्व जाणतच अहात. मी तुम्हाला आज किती दिवस तरी ओळखतो. पण आज प्रसंगच आला म्हणून हे बोलतो. आज तुम्ही मला केवढी तरी मोठी देणगी दिली आहे.

आणि ते खरेच आहे. आजकाल किती तरी गुरु दृष्टीस पडतात. पण ते शिष्य संतापहरण करणार नसून शिष्य वित्तापहरण करणारे असतात. म्हणून शंकर पार्वतीला सांगतात, हे मृडानी देवी, 'गुरवो यद् वसंति, शिष्य वित्ताप हारका। दुर्लभो यं गुरुर्देवो, शिष्य संतापहारका: ।' शिष्यांचा त्रिविध ताप-संताप हरण करणारे गुरुच दुर्लभ आणि म्हणुनच सत्शिष्याला गुरुचा शोध पुष्कळ उपासना करुन मिळवावा लागतो. म्हणजे त्याची गाठ पडते आणि सद्गुरु ही चांगल्या चांगल्या शिष्याचे शोधार्थ असतात. कारण जर त्यांनी एखादा मठ स्थापन केला अगर आपली परंपरा चालू केली तर त्याला शिष्य पंगतीला कितीतरी मिळतील पण एकनिष्ठपणाने सेवा करणारा मुमुक्षू शिष्य मात्र दुर्लभ आहे आणि असा शिष्य मिळाल्या शिवाय गुरुचेही समाधान होणे शक्य नाही. त्यांनाही आपल्याकडे जवळचे ज्ञान भांडार कधी एकदा योग्य शिष्याच्या हवाली करितो अशी उत्कंठा लागलेली असते आणि असा योग्य नारायणासारखा विरक्त शिष्य मिळाला लक्षुमण दीक्षितांनी दिला. ही मोठी देणगी वासुदेव शास्त्र्यांना वाटली तर त्यांत नवल नाही.

नंतर संध्येचा काल झाला असे पाहून वासुदेवशास्त्री उठले व जाताना नारायण दीक्षितांना म्हणाले, 'तुम्ही ही आपल्या फुरसती प्रमाणे मठांत येऊन जे काही विचारावयाचे असेल ज्या शंका असतील अगर येतील त्या खुशाल विचारा. मला जेवढे समजेल तेवढे मी आनंदाने सांगेन,' असे सांगून ते मठांत निघून गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी आपले आन्हीक आटपून नारायण दीक्षित ब्रह्मानंदस्वामींच्या मठात माडीवर गेले. माडीवर जाताच त्यांना प्रथम गुरुपत्नींचे दर्शन झाले. लगेच त्यांना दीक्षितांनी वंदन केले आणि चवकशी केली, की 'गुरुमहाराज काय करित आहेत?'

बाहेर कोणीतरी बोलत आहे असे वाटताच स्वत:च वासुदेव शास्त्री बाहेर आले व नारायणाला पहाताच हास्य मुखाने ते आपल्या

पत्नीला म्हणाले, 'काल मी जो लक्ष्मण दीक्षितांच्या मुलाबद्दल बोललो होतो तो नारायण हाच बरं.' नारायण दीक्षितांनी पुन्हा त्या उभयतांस नमस्कार करून ते आत गेले व काही वेळ बोलणे होऊन नारायण दीक्षित बाहेर आले. दुसऱ्या दिवसापासून मात्र नारायण दीक्षित वासुदेवशास्त्रीं करिता त्यांच्या अग्निकार्यासाठी समिधा, देवाला फुले, तुळशी, बेल व शमी आणुन देऊ लागले. इतकेच नव्हे तर देवाची उपकरणी, यांची भांडी घासून स्वच्छ ठेवणे. देवघर सारवून त्यावर रांगोळी काढणे. पाट मांडून देवाची व यांची वस्त्रे नीट धुवून व वाळलेली निऱ्या काढून ठेवणे. पूजेचे आवरून ठेवणे व मुख्य म्हणजे वासुदेवशास्त्र्यांनी केलेली पदे, फुरसतीच्या वेळी देवाजवळ बसून पण हळूच मनोभावे म्हणणे. गुरुजींचे जेवण झाल्यानंतर आपण जेवणे इ. क्रम त्यांचा सुरु झाला.

त्याचप्रमाणे रात्रीची आरतीची व्यवस्था करून गुरुजी झोपल्यानंतर आपण झोपणे व त्यांचे अगोदर उठून, स्नान आवरून गंधादी सर्व तयारी करून देणे व दुपारी जेवण होताच मधल्या वेळात गुरुजी सांगतील तो आचार धर्म ऐकणे इ. याप्रमाणे ही नर-नारायणांची जोडी गुरु-शिष्य नाते घेऊन जगदोध्दारा करिता वावरु लागली.

एकदा नारायण दीक्षित आणि काही मंडळी एके ठिकाणी बसली असता, नारायणावर प्रेम करणारे एक गृहस्थ दुसऱ्यास उद्देशून म्हणाले, 'सूर्य उदयाला आल्या नंतर त्याला तू उजेड पाड असे सांगावे लागत नाही. त्याचप्रमाणे मनुष्य स्वतःच्या आचरणानेच महापुरुष म्हणून प्रसिध्दीस येतो. त्याचे तेज लपून राहात नाही.' इत्यादी नारायणाची स्तुती करून काय नारायणा मी म्हणतो ते खरे ना?' असे त्या गृहस्थांनी विचारले. ही स्वतःची स्तुती नारायणांना सहन झाली नाही. ते नम्रपणाने म्हणाले, 'आपण म्हणता तसे मी मोठा नाही. माझ्या हातून सद्‌गुरु सेवा व्हावी तशी मुळीच होत नाही आणि

समजा पाषाणात जे देवत्व येते ते मंत्र सामर्थ्याने येते. माझे जर वर्तन सुधारले असेल तर त्याचे मोठेपण माझ्याकडे नसून त्याचे कर्तृत्व श्रीगुरुचरणाकडे आहे. जीवाला ब्रह्मभाव आणणे हा सद्‌गुरु चरणाचाच प्रभाव. कागदाचे कपटे रस्त्यात अगर घरात कितीतरी पडलेले असतात. पण त्याच्यावर जर राजमुद्रा असेल तर तेच कपटे पूज्य होऊन मग ते कितीही लहान व जुने असो ते तिजोरीत नीट जपून ठेवतात. अर्थात हा कागदाचा चांगुलपणा किंवा मोठेपणा नसून त्यावरिल मुद्रांचा आहे.' असे उत्तर देऊन ते तिथून दुसरीकडे निघून गेले.

या खेपेला वासुदेवशास्त्र्यांचा मुक्काम वाडीला असे पर्यंत त्यांनी नारायण दीक्षितांना शम-दमादी साधन चतुष्टय याचा विचार, उपासनादी कर्म विचार, आचार धर्म, स्वत: केलेला पंचपाक्षिक प्रश्न फलाचा ग्रंथ इत्यादी नीट समजावून सांगितले आणि तुला जर या मार्गाचे अवलंबन करायचे असेल तर प्रथम मानापमानादी गुंडाळून ठेवायला पाहिजे. इष्टमित्रांचे वाग्‌बाण सहन करावे लागतील. त्याची तयारी ठेव. कारण जर त्यांच्या बोलण्याने तुला विषाद वाटला तर सर्व कर्म फुकट जाईल हे लक्षात ठेव. नीट विचार कर. मग या मार्गाला लाग आणि श्रीदत्तगुरु पदाचे चिंतन करुन समाधानी अंत:करणानी राहा. कितीतरी गोष्टी अगदी कळवळ्यानी त्यांनी सांगितल्या आणि मला आता दत्तगुरुंची आज्ञा झाल्यामुळे मी उत्तर दिशेला जात आहे. पण तुला भेटण्याकरिता पुन्हा नक्की काही कालानी येणे होईल. असे सांगून त्यांनी जाण्याची तयारी केली.

त्यांच्या जाण्याचा दिवस उजाडला. त्यावेळी पुष्कळ मंडळी पोहोचवण्या करिता आली होती. कित्येकांनी निरांजनी ओवाळून 'लवकर येण्याचे करा' असे सांगून गहिवरुन त्यांना निरोप दिला व वासुदेवशास्त्र्यांनी ही जमलेल्या समाजास आशीर्वाद देऊन व तेथे जे संन्यासी होते त्यांचा 'नारायण' घेऊन ते निघून गेले.

वासुदेवशास्त्री उत्तरेच्या बाजूस गंगाखेडला गेले. थोडेच दिवसात त्यांच्या अर्धांगिनी आजारी पडल्या व त्यांचा अंतकाल समीप आला असे पाहून त्यांनी तिला प्राणायाम करण्यास सांगितला. स्वस्वरुप दर्शन दिले आणि योग मार्गाने तिला सद्गती दिली. तिच्या चौदाव्या दिवशीच त्यांनी संन्यासाश्रम घेतला आणि उज्जैनीला दंड घेतला. आजन्म अनवाणी पायाने श्रीदत्तगुरुंच्या आज्ञेने भारतभर संचार केला.

मी तुमच्या बरोबर येतो असे एक-दोन वेळा नारायण दीक्षित शास्त्रीबुवांना म्हणाले होते. पण 'तू स्वधर्माने नीट वागलास म्हणजे तुला सगळे काही मिळेल.' असे सांगितल्यावरुन केवळ गुरु वचन मान्य करुन नारायण दीक्षित येथेच वाडीत राहिले.

पुढे थोडेच दिवसात नारायण दीक्षितांनी वडिलोपार्जित काहीच घ्यावयाचे नाही असे ठरवले आणि स्मार्ताग्नि घेऊन शुक्ल वृत्तीने राहू लागले. ते नियमाने घरे घेत. प्रथम त्यांना भिक्षा बेतानेच मिळू लागली. पण त्यातही पंचमहायज्ञ अतिथी सत्कार त्यांचा सुरु होता. पण यांची ही वृत्ती थोडेच दिवसात ग्रामस्थांच्या लक्षात येऊन त्यांना भिक्षा जास्त मिळू लागली. पण त्यांनी संग्रह मुळीच केला नाही. सकाळी भिक्षेला जे मिळेल ते दोन प्रहरी शिजवून टाकावयाचे आणि ब्राम्हण भोजन माधुकरी घालून ते मोकळे होत. यांची वस्त्रे म्हटली म्हणजे, एक नेसलेले दुसरे अंगावरचे, तिसरे जर मिळाले तर ते लगेच गरिबाला देऊन टाकत. एखाद्याने जर अग्नि जवळ दक्षिणा ठेवली तर संध्याकाळ पर्यंत एखादा चांगला विद्वान विप्र दृष्टीस पडताच, त्याच्या हातात ठेवून नमस्कार करायचा.

त्यांचा नित्य क्रम म्हणजे प्रात:स्नान, अग्निकार्य, गुरुचरित्र वाचन, भिक्षा मागणे, माध्यान्ह संध्या, पंचमहायज्ञ, अतिथी सत्कार, माधुकरी घालणे, नंतर जेवण. दोन प्रहरी परमार्थाला पोषक अशा

स्वशाखोपनिषदाचा पाठ, गीता, विष्णु सहस्त्रनाम, ग्रंथाचे वाचन, एखादा कोणी योग्य मनुष्य भेटल्यास याच ग्रंथावर काही बोलणे होई. सायंसध्या झाली म्हणजे पंचोपचार पूजा, रात्री पंचपदी दत्त भजन, पदे, अभंग, प्रार्थना इ. गुरुंना मान्य उपासना व एकांती बसून गुरु ग्रंथाचे अवलोकन, मनन असा यांचा काल जाई.

दिवसें दिवस देहाविषयी उदासीनपणा राहून वैराग्य वाढू लागले. त्याचे तेज मुखावर सहजच झळकू लागले. पुढे पुढे ध्यानच त्यांना आवडू लागले. त्यामुळे त्यांची शुक्ल वृत्ती सुटली आणि अयाचित वृत्ती धरली आणि रोज ईश्वर भजनात, गुरु उपासनेत काल घालवू लागले. 'योगक्षेमं वहाम्यहम्' सर्व भार परमेश्वरावर टाकला म्हणजे तो तयारच आहे. लोक त्यांच्या घरी जिन्नस आणून देऊ लागले. त्यांनी नको म्हटले तरी ते जिन्नस ठेवून जात. ह्यांच्या कडे असे जिन्नस येऊ लागताच आपणास लागणारा जिन्नस तेवढा घेऊन बाकी गोर-गरीबांना वाटून टाकत असत.

एकदा वाडीला प्लेगची साथ आली. दोन-तीन दिवसात मनुष्याला लागण होऊन तो मरण पावू लागला. अशा वेळी पुष्कळ मंडळी वाडी सोडून गेली. पण जे एकनिष्ठ सेवक होते ते मात्र तसेच चिकाटीने जीवावर उदार होऊन राहिले. तथापि गावातील मंडळीच बाहेर गेल्यामुळे ज्यांची उपजीविका माधुकरीवर होती त्यांची फारच पंचाईत पडू लागली. त्यात आणखी एखाद्या पुजाऱ्याकडे जर सोयर अथवा सुतक आले म्हणजे बोलावयासच नको. पण मग उर्वरित इतर लोक जे होते त्यांच्यावरच सर्व भार पडे व ते शक्य ते जाणून माधुकरी घालीतही पण अशा किती ते घालणार ? त्यावेळी नारायण दीक्षित हे देवाजवळच्या धर्मशाळेत सहकुटुंब राहात होते. त्यांनी मंडळींना सांगितले होते की अलीकडील काळ मोठा कठिण आला आहे. तथापि परमेश्वरावर भार ठेवून तुम्ही राहा. काही चिंता करु नका. त्यावेळी ते आग्रहाने माधुकऱ्यांना बोलावीत. त्यांना अन्न देत असत.

इतर भिकारीही त्यांच्याकडून अन्न घेऊन जात. त्यामुळे यांचे अन्नग्रहण कमी झाले. असे चार-सहा महिने चालले होते. आता कोणी नाही असे म्हणून त्यांनी जेवायला बसायचे ठरविले तोच 'श्रीगुरुदेवदत्त' असा शब्द कानी यावा. लगेच तेच अन्न त्याला वाढून द्यावे. त्यामुळे यांना वारंवार उपवास घडू लागले. हे गावचे दुर्दैव पाहून नारायणरावांना अत्यंत काळजी वाटू लागली. पण परमेश्वराचे मनात अद्यापही अंत पाहायचा होता. गावचीच घरे ओस पडल्यामुळे यांचीच भिक्षा कमी झाली. अन्न यांच्याकडे आनंदाने मिळते ही कीर्ती झाल्यामुळे त्यांच्यासारख्या कडील भिक्षा-प्रसाद थोडातरी आपणास मिळावा म्हणून पुष्कळ लोक यांचे कडे येऊ लागले. ते स्वत: अर्धपोटी-उपाशी राहून लोकांना अन्न देऊ लागले. दोन-चार दिवस त्यांना अगदीच उपोषण झाले. सौभाग्यवतीने, 'आपण असे करु नये. पोटभर नसेना का पण थोडेतरी खावे' असे सांगावे. पण ते त्यांना रुचले नाही. उलट हे धोतराने पोट घट्ट बांधून नित्याप्रमाणे वागू लागले. त्यामुळे त्यांची पत्नीही कशी खाणार. पण यांनी अगदी तिला शपथच घातल्यामुळे त्या साध्वीने त्यांच्या आज्ञेकरिता पानात एकदा वाढले तेवढेच खाल्ले. आपले पती उपाशी आहेत हे पक्के माहित असता तिला अन्न जाणे शक्य आहे का ? आणि पुन्हा ही गोष्ट तोंडाबाहेर कुठे काढायची नाही अशी तिला सक्त ताकीद असे. नंतर ५-६ दिवसात यांची शक्ती अगदी क्षीण होत चालली. धड चालताही येईना. रस्त्यानी तोल जाऊ लागला. चेहरा काळवंडू लागला. दृष्टी मंद झाली. मुखावरील हास्य शुष्क झाले. अशा परीस्थितीत एके दिवशी नारायणराव नदीवर स्नानास गेले. स्नान करुन कसेतरी पायऱ्यांवर चढताना अंधारी येऊन पडले. जवळच्या मंडळींनी त्यांना हाका मारल्या. पण तरी हूं-की-चूं नाही. श्वास मंदावला. सर्व मंडळींना काळजी वाटू लागली. त्यातील काही लोकांनी हे वृत्त धावत जाऊन अण्णा दीक्षितांना व त्यांच्या सौभाग्यवतींना सांगितले. आपले पती

रस्त्यात पडले आहेत असे ऐकताच त्या पतिव्रतेला काय वाटले असेल हे सांगता येणार नाही. त्यांच्याही डोळ्यापुढे अंधारी येऊन त्याही पडल्या. मस्तकावर पाणी टाकताच शुध्दीवर आल्या व तशाच धावत घाटाकडे निघाल्या. जाताना श्रीदत्तगुरुंना 'आपले पती सुखरुप असोत. मी एक लाख प्रदक्षिणा घालीन.' असा नवस केला. त्याच प्रमाणे आपल्या कुलदेवतेला, 'माझे सौभाग्य राख, मी तुझी ओटी भरेन' इ. नवस बोलल्या. पती जवळ जाताच त्यांच्या अंगावरुन हात फिरवून रडू लागली. इतक्यात अण्णा दीक्षितही आले. त्यांनी उचलून धर्मशाळेत आणून पांढऱ्या घोंगडीवर निजवले आणि त्यांना मात्रा वगैरे दिली. थोड्यावेळात त्यांनी डोळे उघडले.

नंतर अण्णा दीक्षितांनी भावजयीला विचारले की, नारायण तर आजारी नव्हता मग त्याला इतका अशक्तपणा कसा आला ? त्यावर ती बिचारी काय म्हणणार ? ती रडू लागली. त्यावर अण्णा म्हणाले, 'तुम्ही सांगितल्या शिवाय मला कसे कळणार? आणि तुला जर नारायणाने बोलू नको म्हणून सांगितले असले तरी मी विचारतो आहे. मला सांगावयाला काहीच हरकत नाही.' नंतर तिने नाईलाजाने सर्व हकिकत सांगितली. दोघाबंधूंनी एकमेकांकडे पाहिले. नारायणराव हसले. नंतर अण्णा म्हणाले, 'नारायणा, तू वासुदेवशास्त्रींचा शिष्य ईश्वरी अवतार आहेस. आमच्या कुलाचे तू भूषण आहे. हे मी जाणतो. पण बाबारे आधी शरीर संरक्षण करुन मग धर्म करावा. आताच पहा कसा प्रसंग आला होता?' बरं तर बरं, परमेश्वराने कृपा केली म्हणून. नाहीतर भलतीच वेळ आली होती. त्या दिवसापासून नारायणराव अन्नसेवन करु लागले. अण्णांचे त्यांच्या खाण्यापिण्याकडे लक्ष होते. नंतर आस्ते-आस्ते त्यांची तब्येत सुधारु लागली.

संन्यास घेण्याविषयी त्यांना अनिवार इच्छा होऊ लागली. पुढे थोडेच दिवसात दोन-तीन दिवसाच्या आजारपणात त्यांच्या पत्नीने

इहलोकाची यात्रा संपवून संन्यास घेण्याचा मार्ग मोकळा करुन दिला. त्यांना एक मुलगा व एक मुलगी अशी दोन अपत्ये झाली होती. परंतु दोघेही काही कालातच देवाघरी गेली. ईश्वराने सर्व पाशातून यांना मोकळे केले. हे जरा कुठे स्थिर-स्थावर होत आहे तोच त्यांना प्लेगने गाठले. ताप सपाटून आला. लोक सर्व भिऊन गेले. हे मात्र अगदी शांत होते. यांची सर्व कर्मे जागच्याजागी राहीली. फक्त श्री वासुदेवशास्त्री कृत नवरत्नमालास्तोत्र याचा जप अष्टौप्रहर सुरु केला. हे शारीरीक भोग कोणालाच सुटत नाही. वेदधर्मा, श्री रामदास स्वामी, श्री टेंबेस्वामी इ. हे मोठे मोठे प्राचीन व अर्वाचीन संत होऊन गेले त्यांनी देखिल भोग कमी जास्त प्रमाणात भोगून सोडले आहे. तात्पर्य भोग हा भोगावाच लागतो. आता ज्ञानी आणि अज्ञानी यांत फरक इतकाच की ज्ञानी दुःख आनंदाने सहन करुन समाधानी वृत्तीने राहातो आणि अज्ञानी शोकाकूल होतो एवढाच. पुढे त्यांना त्रिदोष झाला. त्यात त्यांची बडबड सुरु झाली. 'आले गुरुमहाराज आले. यावे हे सुंदर आसन तयार करुन ठेवले. यावर बसा. मी आपल्याला पालखीत बसवून सर्व गावात मिरवून आणीन. अहो, असे पाहाता काय? महाराजांना ओवाळण्याकरिता आरत्या आणा.' इ. मंडळींना वाटले आता यांची घटका जाते न जाते. पण परमेश्वर पाठीराखा तेथे मृत्युतरी काय करणार ? थोडे दिवसात त्यांना आराम पडू लागला. अण्णा दीक्षित तिथे बसून असत व औषधोपचार करीत.

प्रकृती थोडी सुधारताच नारायणरावांनी अण्णांना सांगितले, 'मला आता संन्यास द्या. अनाश्रमी मला का ठेवता ?' अण्णा म्हणाले आधी तुमची तब्येत जरा स्वाधीन होऊ द्या. म्हणजे मी तुम्हाला संन्यास देतो.' नंतर थोड्याच दिवसात त्यांनी संन्यास घेतला. संन्यास घेतल्यानंतर ते ब्रह्मानंद स्वामींच्या माडीवर राहिले. रोज त्रिकाळ कृष्णा स्नान करुन उपनिषद पाठ, विष्णु सहस्त्रनाम, रुद्र, प्रणव जप, पुरुषसूक्त पठण इ. यतिधर्मानुष्ठान ते सतत करीत होते.

श्री गुरुंनी अभ्यास प्रकरणी जे जे सांगितले होते ते-ते नीट ध्यानात आणून त्याप्रमाणे आचरण करुन आत्मा-नात्म विचारात रंगू लागले. नंतर काही दिवसांनी ते अगदी एकांतात राहू लागले. व गुरु-भजन पूजन मनन या वाचून त्यांना काही सुचेना.

श्रीदत्तमाहात्म्यात कार्तवीर्यार्जुनाला भगवान श्रीदत्तप्रभू योगोपदेश करताना असे सांगतात,

## (अध्याय १५)

''अर्जुना अभ्यास जोंवरी । दृढ न झाला तोंवरी ।
वागावें अंधबधिरापरी । तरी अंतरी योग ठसेल ॥५३॥
स्वयें समर्थ असूनी । विषयांजवळी बसूनी ।
निद्रितापरी वागे मुनी । त्याला जगी मुग्ध म्हणती ॥५४॥
बसतां उठता किंवा चालतां । ज्याची दृष्टी चार हातां ।
सोडून दूर न जाई तत्वतां । तो आंधळा जाणावा ॥५५॥
हितकर किंवा अहितकर । मनोहर किंवा शोककर ।
वाक्य ऐकूनी न ऐके नर । योगी तो बधिर जाणावा ॥५६॥
हितकारक सत्य भाषण । बोले परिमित भाषण ।
जेवतां बरवें वाईट अन्न । नेणे तो जाण अजिव्ह ॥५७॥
मळमूत्रोत्सर्गार्थ जाणें । भिक्षार्थ ज्याचें फिरणें ।
यांवाचूनी फिरुं नेणें । तोचि पंगू जाणावा ॥५८॥
कुमारी आणि वृद्ध नारी । किंवा तरुणी सुंदरी ।
ह्या समान पाहूनि अंतरी । जो निर्विकारी तो नपुंसक ॥५९॥
यापरी वागूनी । योगचर्या धरुनी ।
जो अंतर्निष्ठ वागे मुनी । तो जनीं वनीं समान ॥६०॥

या सर्व वृत्ती त्यांनी अंगी बाणविल्या, मुरविल्या. त्याप्रमाणे वर्तन गृहस्थाश्रमात आणि संन्यासाश्रमात शेवटपर्यंत केले.

पुढे त्यांनी स्वामी महाराजांचा शोध घेतला असता, सध्या ते अयोध्येला गेल्याचे समजले होते. आपल्या गुरुंची भेट आपल्याला कधी होते ही त्यांना अहोरात्र काळजी लागून राहीली होती. 'वास्तविक आपण संन्यास घेतला तो त्यांच्या परवानगीनेच घ्यावयाला पाहिजे होता. पण प्लेगमधे मला माझ्या जीवाची आशा वाटेना. म्हणून घाईघाईने मला संन्यास घ्यावा लागला. त्याला मी तरी काय करावे? पण आता दंड मात्र गुरु महाराज मला आपणच दिला पाहिजे. कारण पूर्वाश्रमा पासून मी आपला शिष्य आहे. ही दासाची प्रार्थना आपण मान्य कराल ना ?' असे किती तरी उद्गार त्यांच्या तोंडून निघत.

इकडे लोकांना पत्रे पाठवून गुरुंचा तपास सारखा सुरु होता. परंतु निश्चित अमुक ठिकाणी आहेत असे कोणाकडूनच त्यांना समजेना. आपण स्वत:च त्यांच्या तपासाला निघावे असाही विचार त्यांच्या मनात येई. पण एकदा वाटे महाराजांनी ज्या अर्थी 'मी तुला भेटेन' असे निश्चयपूर्वक सांगितले आहे त्या अर्थी ते आल्यावाचून खास राहाणार नाही. मग हे दर्शन देण्याला उशीर का करित आहेत ? कदाचित ते जवळपास अगदी माझ्या आजूबाजूलाच कुठे तरी आले असतील. पण माझी उत्कंठा किती आहे हे यांना अद्याप पहावयाचे आहे असे दिसते. त्यांच्या शिवाय माझी अवस्था कशी झाली आहे हे त्यांना कळत नाही कां ? त्यांना कळत नाही असा कोणताच पदार्थ जगात नाही. मग हे अजून का बरं येत नाही ? हा एक एक क्षण मला युगासारखा वाटत आहे. मला जर पंख असते तर किती बरे झाले असते. उड्डाण करुन मी त्यांच्या चरणावर पडलो असतो. असे कितीतरी विचार त्यांच्या मनात येत असत. इतकेच नव्हे ते त्यांच्या शोधासाठी ही निघाले असते. पण थोडेच दिवसात त्यांचा चातुर्मास सुरु होणार होता. यतिधर्माचे उल्लंघन त्यांना करता येईना.

श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांचा मुक्काम गंगेकाठी ब्रह्मावर्ताला चातुर्मास निमित्त आहे असे खात्रीपूर्वक त्यांना समजले. मग काय विचारता ? भागवत पौर्णिमेलाच त्यांनी जाण्याची तयारी केली. वास्तविक पायी जाण्याचाच विचार होता. परंतु दिवस पुष्कळ लागतील तो पर्यंत महाराज कदाचित पुढे कुठे निघून जातील. असा संशय आल्यामुळे ते मिरजे मार्गे ब्रह्मावर्ताला निघाले. काशी, अयोध्या, प्रयाग, मथुरा इ. इतिहास प्रसिध्द तीर्थक्षेत्रे वाटेत लागली. पण एखाद्या ठिकाणी थांबावे असे त्यांना वाटले नाही. केव्हा एकदा गुरु चरण दृष्टीस पडतात असे त्यांना झाले होते. वाटेत शक्यतो संध्यावंदनादी करुन ते पुन्हा मार्गस्थ होत. चवथ्या मुक्कामात त्यांनी ब्रह्मावर्त स्थानक गाठले. स्थानक पाहाताच त्यांना अत्यानंद झाला. आता गुरुचरण खास दृष्टीस पडणार या आनंदात त्यांचा चार दिवसाचा प्रवासाचा शीण दूर झाला. इतकी त्यांना गुरुचरणाची आतुरता लागली होती. गाडीतून उतरताच पंडे मंडळी त्यांच्या सभोवार जमली. त्यांनी एकाला प्रथम 'इथे श्री टेंबेस्वामी महाराज आहेत काय?' असा प्रश्न केला. 'होय' एका वृध्द पंड्यांनी सांगितले. 'महाराज इथेच आहेत काय सांगू? या कलियुगात ते स्वामी महाराज म्हणजे प्रत्यक्ष दत्तावतारच आहेत. आम्ही त्यांना नवरात्र करुन जा. निदान आठ दिवस तरी राहून जा.' असे अगदी कमालीचा आग्रह करुन सांगितले. पण वाडीला कोणी नारायण दीक्षित म्हणून स्वामी आहेत त्यांना ताबडतोब जाऊन दंड देण्याविषयी श्री गुरुंची आज्ञा झाल्यामुळे, ते आज उद्यातच येथून निघणार आहेत. ही बातमी त्यांच्या तोंडून ऐकताच स्वामींना काय वाटले असेल हे मनानेच जाणावे. डोळयातून अश्रूंचा पूर लोटल्यामुळे त्यांना रस्त्यात डोळयात केर गेल्याचे निमित्त करुन उभे राहावे लागले.

ते जरा तोंड साफसूफ करीत उभे राहिलेले पाहून पंड्या म्हणाला, 'आपणास जर त्यांचेकडे जावयाचे असेल तर मी रस्ता

दाखवितो. आपणास जर वाटत असेल तर आपणाची दुसरीकडे उतरायची व्यवस्था मी करीन. माझा कोणताच आग्रह नाही. ''छे ! छे !'' दीक्षित स्वामी म्हणाले, ''मला त्यांचेचकडे जायचे आहे.'' नंतर ते भूदेव यांचेसह श्री टेंबे महाराजांचे मुक्कामावर गेले. पण काय ? टेंबे महाराज सकाळीच भेलश्याला निघून गेलेले समजले. आता या पुढे काय करायचे हा त्या भूदेवांना प्रश्न पडला. दीक्षित महाराज म्हणाले, ''ते एकाच मुक्कामावर गेले आहेत नां ? काही चिंता नाही. आम्ही असेच त्या मुक्कामावर जाण्यास निघतो. आपणास बरीच तसदी पडली. तो म्हणाला, 'तसदीचे काय ? मी आपणास रस्ता दाखवितो. प्रथम आपण थोडी विश्रांती घ्या.' स्वामी म्हणाले, 'विश्रांती नाही.' रस्ता दाखविल्याप्रमाणे गंगाकाठाने ते निघाले. दोन चार मैल गेल्यावर थोरले महाराज स्नान करुन परत आपल्या मुक्कामाला यायला निघालेले दिसले. वाटेतच दोघांची गाठ पडली. कित्येक वर्षांनी भेट झाली होती. दोघांचेही रुपांतर झालेले होते. त्या आनंदाचे वर्णन करता येणे शक्य नाही. दोघांचा मुक्काम एके ठिकाणी दोन-तीन दिवस होता. दीक्षित स्वामींनी दंडा विषयी प्रार्थना केली. श्री टेंबेस्वामी महाराज म्हणाले, 'आपण फार दमून आला. थोडी विश्रांती घ्या. सांगितल्या प्रमाणे तुम्ही सगळे करीत आहात. यातच सर्व धर्म आला. धर्माचरण करणे हीच आमची भक्ती आम्हाला पावते. व त्यापसून आम्हाला अत्यानंद होतो. तुम्ही आता पुन्हा वाडीला जा. मला आज्ञा झाल्याप्रमाणे मी वाडीला येतो. मग तुमचा हेतु पूर्ण होईल.' दीक्षित स्वामींची इच्छा गुरुमहाराजां बरोबर पायी यायची होती. स्वामी महाराज म्हणाले,'तुम्ही तब्येतीनी ही अशक्त झाले आहात. पायी झेपणार नाही. आल्या मार्गाने तुम्ही रेल्वेने चला.' त्याप्रमाणे दीक्षित स्वामी वाडीला आले.

नंतर काही दिवसांनी वाडीहून पाच-सहा मैल अंतरावर अर्जुनवाड गाव आहे, तेथे दत्तमंदीरात श्री टेंबेस्वामींची स्वारी आली

आहे अशी हकीकत वाडीला दीक्षित स्वामींना कळली. सर्वत्रांस आनंद झाला. दीक्षितस्वामी, भक्तमंडळी, पुजारी मंडळी असे सर्व जमून स्वामी महाराजांना वाजत गाजत आणण्याकरिता अर्जुनवाडला गेले. सर्वांनी स्वामी महाराजांचे दर्शन घेतले. त्यांनी धाकट्या (दीक्षित स्वामीं) महाराजांना आपणा जवळ बसावयास सांगितले. ते त्यांच्या जवळ जरा मागेच बसले. काही वेळाने ती सर्व मंडळी कृष्णेवर स्नानाला गेली. जमलेल्या सर्व मंडळींवर थोरल्या महाराजांनी स्वहस्ते पाणी प्रोक्षण केले. त्यावेळेचा तो देखावा अत्यंत अविस्मरणीय असा होता. श्रीस्वामीमहाराजांनी स्वहस्ते दीक्षितस्वामींनाही स्नान घातले. सर्वांना आनंदी-आनंद झाला. स्नान आटोपून दुपारी सर्वांनी प्रसाद घेतला व सर्व मंडळी ३-४ च्या सुमारास वाडीकडे यावयास निघाली. वाजत गाजत, 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा' च्या गजरात सर्व निघाले.

शिरोळास बाबूराव कुलकर्णी हे थोरल्या महाराजांचे भक्त होते. त्यांनी उभयता महाराजांना तेथील दत्तभोजनपात्र मंदिरात नेले. आणि उभय स्वामी महाराजांची पूजा करुन आरती केली. त्यावेळी दीक्षितस्वामींनी माझ्या दुखण्यात या बाबूरावांनी फार सेवा चाकरी केल्याचे सांगून त्यांच्यावर महाराजांनी कृपा करावी अशी प्रार्थना केली. नंतर थोरल्या महाराजांनी एक भोजन पात्राची आरती करुन ती बाबूरावांना दिली. जमलेल्या सर्व मंडळींना आशीर्वाद देऊन जरा घाईनेच पुन्हा वाजत गाजत निघाले. कारण संध्यावंदनाचा काल समीप येत होता. मिरवणूक वाडीला येताच शेकडो स्त्री-पुरुष सामोरे गेले. उभयता महाराजांचा आदर सत्कार करुन त्यांच्या सह सर्व मंडळी मनोहर पादुकांकडे दर्शनाला गेली. महाराजांनी आपल्या यतिधर्माप्रमाणे दंड वंदन केले. त्यावेळी त्यांच्या नेत्रातून अश्रूधारा वाहात होत्या. अशा स्थितीत त्यांनी 'समस्त दोष शोषणं' हे स्तोत्र केले आणि प्रदक्षिणा करुन स्वारी घाट खाली उतरुन कृष्णामाईच्या

दर्शना करिता गेली. घाटावरच दोघांनीही सायंसंध्या उरकली. दीक्षितस्वामींनी ब्रह्मानंदांचे मठात जाऊन त्यांची मुक्कामाची तयारी वगैरे झाली की नाही ते अवलोकन केले. ब्रह्मानंदांचे मठात महाराजांना बसवून सर्वांनी वंदन करुन त्यांचा जयजयकार केला.

दोन चार दिवस गेले. थोरल्या महाराजांचा नित्य क्रम सुरु झाला. पण दीक्षितस्वामींना दंड देण्याची गोष्ट ते काही काढीनात. प्रत्यक्ष विचारण्याचा धीर होईना. दीक्षितस्वामींनी त्यांच्या मर्जीतील एका माणसाकडे मन मोकळे केले आणि थोरल्या महाराजांना दंडाविषयी विचारण्यास सांगितले. एक दिवस स्वामीमहाराज आनंदात आहेत असे पाहून, वरील प्रश्न विचारला. 'दंड समारंभाची आम्हाला अत्यंत उत्कंठा लागून राहिलेली आहे.' असे ते म्हणाले. त्यावर थोरले महाराज जरा विचार करुन म्हणाले, 'या कलियुगात अधिकारी व अनधिकारी कोण? ह्याचा विचार कोण करित बसतो. श्रीगुरुंनी अमुक दिवशी दंड दे म्हणून आज्ञा केली की आपण त्या प्रमाणे वागावे. एवढेच मला माहीत आहे.' हे उत्तर ऐकून दीक्षितस्वामींना काय वाटले असेल याची वाचकांनी कल्पना करावी. दुसऱ्या दिवशी सकाळी स्नान-संध्यादी कृत्ये आटोपुन स्वामी महाराजांच्या खोलीत हात जोडून उभे राहिले आणि त्यांनी डोळे मिटून धावा सुरु केला.

१) दत्ता ये धांवूनि धांवूनि । माझा धांवा परिसूनि ॥१॥
मनोरथावरि बैसूनि नेसोनि । दिग्वसनाते महामुनी ॥२॥
अंगी विभूति चर्चूनि चर्चूनि । दंडकमंडलु घेऊनी ॥३॥
कृपाकटाक्षें पाहूनी सावरुनी । वासुदेवा करिं धरुनी ॥४॥

--------*****---------

२) गळा-टाळा फूटला बाहतां रे । कां न ऐकसी सांग नरहरे ।
कुठे तुझा सर्वज्ञपणा गेला । मला नेणसि काय म्हणूं तूला ॥१॥

न पाहसी मजला जरी दत्ता । सर्वसाक्षित्व राहील कसे आता ।
मद्विलापा नायकसी जरी । कसी राहे व्यापकता त्वदंतरी ॥२॥
न येसी ऐकुनी मद्विलापा । कृपालुत्व जाईल तुझे बापा ।
संकटी मी घायाळ असें देवा । धांवे पावे बा कृपालो सदैवा ॥३॥

--------*****---------

३) नको देवूं मज तूं देवा । त्रिभुवनाच्या वैभवा॥१॥
भव हरीना त्या कोण । व्यर्थ मागें घ्याया शीण ॥२॥
शीण जन्मजन्मांतरीचा । वारी लोभ धरुं त्याचा ॥३॥
त्या चाखूं इच्छी पदा । मज दावी तें गोविंदा ॥४॥
गोविंदा तुझ्या पदा । वासुदेवा दे सानंदा ॥५॥

--------*****---------

४) तापत्रयाने मम देह तापला । विश्रांति कोणी न च देतसे मला ॥
दैवे तुझें हे पद लाधलें मला । दत्ता कृपासाउलि दे नमूं तुला ॥१॥
कामादि षडवैरि सदैव पीडिती । दुर्वासना अंग सदैव ताडिती ॥
त्राता दुजा कोण न भेटला मला । दत्ता कृपासाउलि दे नमूं तुला ॥२॥
देही अहंता जडली न मोडवे । गृहात्मजस्त्री ममता न सोडवे ॥
त्रिदापदावानळ पोळितो मला । दत्ता कृपासाउलि दे नमूं तुला ॥३॥
अंगी उठे हा अविचार दुर्धर । तो आमुचे हे बुडवीतसे घर ॥
पापें करोनि जाळितों त्वरें मला । दत्ता कृपासाउलि दे नमूं तुला ॥४॥
तूंचि कृपासागर मायबाप तूं । तूं विश्वहेतू हरि पापताप तूं ॥
न तूजवाचूनि दयाळु पाहिला । दत्ता कृपासाउलि दे नमूं तुला ॥५॥
दारिद्र्यदावें द्विज पोळतां तया । श्री द्यावया तोडिसि वेल चिन्मया ॥
तयापरि पाही दयार्द्र तूं मला । दत्ता कृपासाउलि दे नमूं तुला ॥६॥
प्रेतासि तूं वाचविसी दयाघना । काष्ठासि तूं पल्लव आणिसि मना ।

हे आठवी मी तरि जीव कोमला । दत्ता कृपासाउलि दे नमूं तुला ॥७॥
ह्या अष्टकें जे स्तविती तयावरी । कृपा करीं हात धरीं तया शिरीं ।
साष्टांग घालूं प्रणिपात बा तुला । दत्ता कृपासाउलि दे नमूं तुला ॥८॥

। इति श्री.प.प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीविरचितं
श्रीगुरुदत्तात्रेयाष्टकं संपूर्णम् ।

--------*****---------

याप्रमाणे प्रार्थना सुरु केल्या. दंडाचा हेतू सफल झाल्या शिवाय बसायचे नाही. असा पक्का निश्चय करुन ते उभे राहिले. खाणे पिणे सर्व काही बंद. याप्रमाणे सबंध दिवस गेला. थोरल्या महाराजांनी यांच्या कडे पाहिलेही नाही व यांनी ही डोळे उघडले नाही. मुखाने धावा मात्र सुरु होता. याप्रमाणे तीन प्रहर रात्र निघून गेली. चौथ्या प्रहरी रात्रीला थोरल्या महाराजांच्या स्वप्नात, दंड कमंडलू करि घेऊन श्रीगुरुंची स्वारी आली. आणि म्हणाले, **'पुरे आता शिष्याची परिक्षा, आता त्याला दंड द्या, तो नारायण माझाच आत्मा आहे. मीच तो आहे मी त्याच्या पासून भिन्न नाही. तरी शिष्य या नात्याने माझा अंगीकार लवकर करा.'**

श्री टेंबे स्वामी महाराज उठून बसले. त्यांनी दरवाजा उघडला. समोरच दीक्षितस्वामी हात जोडून उभे असलेले दिसले. आनंद झाला आणि म्हणाले, 'तयारी करा. आज तुम्हाला दंड देण्याविषयी आज्ञा झाली आहे.' असे ऐकताच दीक्षितस्वामींनी थोरल्या महाराजांचे पाय घट्ट धरले. 'सद्गुरो, आज मी धन्य झालो.' आणि प्रेमाश्रुंनी चरणाभिषेक केला. सकाळी दंड ग्रहणाची सर्व तयारी केली. नारायणस्वामींच्या ओवरीत उत्सव मूर्ती समोर चांगले आसन मांडले. थोरल्या महाराजांच्या आज्ञेवरुन अण्णा दीक्षितांनी धाकट्या बंधूंची म्हणजेच दीक्षितस्वामींची षोडशोपचार पूजा केली. त्यावेळी सर्व

विद्वान मंडळी हजर असून नाना प्रकारची वाद्ये वाजत होती. अशा शुभवेळी थोरल्या महाराजांनी आपल्या अमोघ वचनांनी ज्ञानामृताचा अभिषेक केला. नंतर महावाक्याचा उपदेश केला. आपल्या जवळचे सारे ज्ञान शिष्याला दिले. त्यावेळी शिष्य महाराजांच्या मुखावरती तेज फाकले. त्या पूर्णानंदात दोघांचीही समाधी लागली. केवढा हा अधिकार ! गुरुंचा व शिष्याचा ! धन्य धन्य गुरुशिष्य जोडी. वाद्यांचा गजर, मंडळीचा गलबला पण दोघेही ब्रह्मानंदात निमग्न. अशा रितीने विधीपूर्वक दंड देऊन श्री नृसिंहसरस्वती असे नाव ठेविले. थोरल्या महाराजांनी आपल्या सबंध आयुष्यात फक्त यांनाच दंड व महावाक्योपदेश दिला. इतर कोणालाही नाही. नंतर श्री नृसिंहसरस्वतींनी भक्तीने दंड हाती घेऊन विधी पूर्वक गुरुंना वंदन केले.

वरील प्रसंगी थोरल्या महाराजांनी सर्व पुजाऱ्यांना उपदेश केला. तो कवीच्या शब्दातच देणे बरे. -

तेव्हा वासुदेव योगीश्वर । दत्त सांन्निध्य सर्वांसमोर ।
निज मुखे करिती उच्चार । मेघ गंभीर वाणीचा ॥१॥
वासुदेव म्हणती अखिलांसं प्रीती। मुख्यत्वे दत्त पूजकांप्रती ।
ऐका सावध होऊनी चित्ति । माझी उक्ती धरा मनी ॥ २॥
ज्यांच्या पादुका तुम्ही पूजिता । ज्यांचे चरित्र पठण करिता ।
ज्यांचे पुजारी आपणां म्हणवितां । श्रीदत्त तत्वता ते हेची ॥३॥
हे आमचे शिष्य नव्हती । आहेत आमची आराध्य मूर्ती ।
श्री नृसिंहसरस्वती । अवतार जगती तारक ॥४॥
आम्ही नवे नाही दिल्हे । त्यांचेच नाम त्यांना योजिले ।
तुम्हा सर्व विदीत केले । की हे नृसिंहसरस्वती दत्त ॥५॥
आम्हाहूनी नसती भिन्न । आहेत श्री दत्ताशी अभिन्न ।
आम्हामधे अंतरातून । भिन्नपणा मानू नका ॥६॥

या श्री दत्ताचे निजस्थानी । ठेवितो यांना आम्ही स्थापुनी ।
यांचे जवळी वागा जपुनी । समस्तांनी स्वहितार्थ ॥७॥
यांचे विचारे चालाल । तरीच कल्याण पावाल ।
सकळ जनी पूज्य व्हाल । अन्यथा हाल नि:संशय ॥ ८॥
स्वेछा कराल वर्तन । तरी पचणार नाही हे निधान ।
जाईल अन्यत्र येथून । यास्तव जतन करा यत्ने ॥९॥
तुम्ही दत्ताचे पुजारी । वर्तावे आपल्या विहीताचारी ।
श्री दत्त पूजा यथोक्त उपचारी । निरंतरी करीतजा ॥ १०॥
पूर्वज कैसे वागले । ते विचारुनी चांगले ।
तदनुरुप आपले । ठेवावे भले वर्तन ॥११॥
नूतन चाली रिती जनी । निघतील कली वर्तमानी
न घ्याव्या त्या तुम्ही मनी । देवस्थानी योग्य राहा ॥१२॥
यति तापसी सज्जन । यांचा करु नका अपमान ।
कैवारी तुमचा अत्रिनंदन । परंतु अभिमान दुष्ट नसावा ॥१३॥
सात्विक पणे असावे । इत्यादिक श्री वासुदेवे ।
सदुपदेश प्रेमभावे । केला तेधवा ग्रामस्थांशी ॥१४॥
बिघडलेले वर्तन । घेतले त्यांचे सुधारुन ।
दिधले काही नियम घालून । देव पूजे संबंधी ॥१५॥
चारी फडे पाचारीले । सर्वास नियम कळविले ।
कबूली पत्र लिहून घेतले । सहीसह दिधले ते त्यांनी ॥१६॥
चारी फडांचे पूजक । देते झाले कबूली लेख ।
वासुदेवानंद पावले हरिख । म्हणती सुरेख जाहले॥१७॥
आम्हास श्री दत्ते आज्ञापिले । त्या रीती आम्ही केले ।
आमचे कार्य पूर्ण झाले । निवांत राहिले बोलून ऐसे ॥१८॥

तो कबूली लेख लिखित । नृसिंह सरस्वतीं पाशी सुरक्षित ।
ठेविते झाले भगवंत । श्री वासुदेवानंद सरस्वती ॥१९॥
दंड दानाचा सोहळा । पुरा झाला त्या वेळा ।
आनंद झाला समस्ताला । जयजयकार केला तयांनी ॥२०॥
प्रसाद घेऊनी ते जन । अखिल गृहा गेले निघून ।
उभय यतिश्वर भगवान । दत्तासी वंदूनी मठी गेले ॥२२॥

असा हा दंड ग्रहणाचा समारंभ झाल्यावर बरेच दिवसांनी थोरले महाराज बाहेर निघून गेले. त्यानंतर उत्सवमूर्तीची पूजा धाकटे महाराज त्यांच्या आज्ञेने करु लागले. जवळ जवळ दीड तप त्यांनी पूजा केली. त्यांना पूजेला बराच वेळ लागे. एकेक उपचार अगदी सावकाश करायचा व देवाला जी-जी वस्तू अर्पण करायची, ती-ती अत्यंत चांगली अशी ते आणवीत असत व मिळवीत असत. त्याचप्रमाणे बहूतेक दर महिन्याला त्यांनी कसला ना कसला उत्सव शोधून करावयाचा. अशावेळी लघुरुद्र, ब्राम्हण भोजन, जवळच्या सर्व समाध्यांना अभिषेक, त्याचप्रमाणे समाध्यांना रंग देऊन सुशोभित करणे, कोणी विद्वान आल्यास त्याचा परामर्ष घेणे अशी कितीतरी कामे ते हौशीनी करित असत.

कोणीही त्यांच्याकडे जावे त्याला काहीना काही प्रसाद द्यायचाच. त्यांच्यापाशी पुष्कळ जिन्नसा खाण्याचे बहुतेक तयार असत आणि ते दुसऱ्याला देण्यातच संपत असत. स्वामी स्वत: त्यातील फारच थोडे खात. बऱ्याचदा त्यांची उपोषणेच असत. प्रसादाच्या निमित्ताने त्यांच्या कडे लहान मोठी मुले फार जमत असत. त्यांच्या कडून ते 'दिगंबरा' चे भजन करुन घेत असत. मुलांना निरांजन व नैवेद्याला वाटी देत असत. प्रसाद देऊन ते मुलांकडून भजन करुनच घेत. त्याशिवाय माडीवर कितीतरी नाम सप्ताह त्यांनी करुन घेतले. त्यांच्या कारकीर्दीमधे केव्हाही देवळाकडे जा 'दिगंबरा दिगंबरा' हा

शब्द कानावर नाही असे झाले नाही. कालांतराने त्या माडीला सुध्दा 'दिगंबरा'ची माडी असे नाव पडले.

थोरले महाराज निघून गेल्यानंतर या दत्तनगरावर एक मोठे संकट आले. याची हकीकत थोडक्यात पुढील प्रमाणे आहे.

शके १८३२ साली मुंबई कडील काही दैवज्ञ मंडळी जमून वाडीला आली. आम्ही दैवज्ञ ब्राम्हण आहोत. तुमच्या प्रमाणे आम्हीही देवावर पाणी घालणार. देवाची लेकरे त्याला सर्व सारखीच आहेत. त्यात भेदभाव मानण्याचे कारण नाही इ. आधुनिक वेदांत बडबडू लागले. येथील पुजाऱ्यांनी सांगितले, आपला वेदांत सर्व खरा असेल. पण आमचे येथे आजपर्यंत अशी वहिवाट नाही. चालू असलेली वहिवाट आम्ही मोडणार नाही व तुम्हास मोडू देणार नाही. पण ती मंडळी बेत करुनच आली होती. स्नान करुन दोन चार आसामी पाणी घेऊन आत जाण्याचा प्रयत्न करु लागली. पण जबर विरोधामुळे त्यांना आत जाता आले नाही. त्यांनी तोंडसुख मात्र भरपुर घेतले. ही हकीकत गावात समजली. जो तो देवाकडे जमू लागला. गावातील मंडळी व बनातील दैवज्ञ मंडळी यांच्यात बाचाबाची होऊन प्रसंग हातघाईवर आला. दोन्ही पक्षांनी एकमेकांना बडवले. पण ग्रामस्थांचा जमाव वाढताच ती मंडळी पळून गेली. मारामारी थोडी झाली पण त्या पेक्षा कितीतरी जास्त महत्व त्या गोष्टीला दैवज्ञ मंडळींनी आणले. त्यांनी शिरोळला धावत जाऊन पोलीसात वर्दी दिली. पोलीस आले. एकंदर १७ आरोपी होते. ही पोलीस केस, त्यावेळचे मंडलीक मॅजिस्ट्रेट यांचेकडे ८-९ महिने चालली. पौष वद्य १३, शनिवार २८-१-२१ दिवशी २०० रु. दंड व एक महिना सक्त मजुरी अशी शिक्षा सर्वांना मिळाली. हा हुकुम साधारण संध्याकाळी ५ च्या सुमारास झाला. त्यानंतर नकला मिळवून अर्ज करावयाला वेळच नव्हता आणि त्याच दिवशी वरीष्ठ अधिकारी चौगुले यांचाही मुक्काम त्यावेळी कोल्हापुरला नव्हता. दुसऱ्या दिवशी रविवार अशा अनेक अडचणी येऊन वाडीकर

मंडळी शनिवारी संध्याकाळी कोल्हापूर येथे रविवार पेठेतील तुरुंगात गेली. रात्री ही बातमी दीक्षितस्वामींना समजली. कुरुंदवाडला तार आली होती. दीक्षितस्वामी देवघरात जाऊन दरवाजा बंद करुन बसले. रविवारचा पूर्ण दिवस ते आत होते. त्यांचा देवाशी वाद चालला होता की थोरल्या महाराजांनी मला येथे वाडीकर पुजाऱ्यांच्या स्वास्थ्या करिता ठेविले असता तुम्ही हा प्रसंग त्यांच्यावर का आणला? तुम्ही आमच्या महाराजांचे काही ऐकत नाही. अर्थात आज मी तुमची पूजा आरती काही करणार नाही व मी ही जागेवरुन हलणार नाही. या वाडीकर मंडळींना शिक्षा झालेली पाहून महाराज मला काय म्हणतील? अशा परिस्थितीत रविवारची रात्र गेली. सोमवारी सकाळी कोल्हापूरला श्रीशाहू महाराज आपल्या मोटारीतून वाडीकर मंडळी कोठे ठेवली आहेत त्यांच्या शोधास लागले. रविवार पेठेतील तुरुंगात ते गेले. अचानक शाहू महाराज आलेले पाहून तेथील अधिकाऱ्यास आश्चर्य वाटले. त्याने पुढे होऊन काय आज्ञा आहे असे विचारले. महाराजांनी वाडीकरांची चौकशी करताच तो म्हणाला, 'त्यांना सक्त मजुरीची शिक्षा असल्याने लांब कामावर न्यावयाचे असल्यामुळे त्यांची मगाच तिकडे रवानगी झाली. सतरा पैकी १३ आरोपी तिकडे कामावर गेले होते, ४ वृध्द आजारी असल्यामुळे या सतरा जणांच्या स्वैंपाकाकरिता त्यांना ठेविले होते' लगेच महाराज मोटारीने शिक्षा स्थानाकडे गेले. त्यांना जवळ बोलावून घेतले आणि वकिलाकडून अपिल अर्ज लिहून आणावा. म्हणजे त्यावर तुम्हाला सोडून देण्याचा हुकुम करितो. असे सांगितले. पण हे पडले आरोपी ! वकिलास कोणी व कसे बोलवायचे? अखेर महाराजांनीच आपला मनुष्य मोटारीतून पाठवून बाबूराव करमरकर यांना बोलावून घेतले. त्यांचे कडून अर्ज घेऊन त्यावर रितसर विचार करिता निर्दोषी सबब सोडून दिले आहे असा हुकूम ३०.१.२१ रोजी केला व तो कागद वकिलाच्या स्वाधीन केला. नंतर रितीप्रमाणे सर्व गोष्टी होऊन कचेरी उघडताच प्रथम

वाडीकरांची सुटका झाली. सर्व मंडळी आनंदाने वाडीला हजर झाली. वाडीकरांविषयी श्रीशाहू महाराजांना इतकी सहानुभूती का वाटली? हे निराळे सांगण्याचे जरूर नाही. बुध्दीचा प्रेरक श्रीगुरुच आहे. मंडळी आल्यानंतर सोमवारी सकाळी दीक्षितस्वामी दार उघडून बाहेर आले. सर्वत्र आनंदी-आनंद झाला.

--------*****---------

यांप्रमाणे श्री. दीक्षित महाराजांचे संन्यास ग्रहणानंतरचे सुमारे १७ चातुर्मास पर्यंत वाडीत वास्तव्य झाले. या काळात गुरु आज्ञेनुसार वाडीच्या पुजाऱ्यांचे संरक्षण कले व त्यांना श्रीसेवा-उपासना-उत्सव साजरे करणे इ. विषयी वेळोवेळी मार्गदर्शन केले. भक्त कार्यही मोठे चालूच होते. स्वत: नियमितपणे उत्सवमूर्तीची पूजा व सेवा केली.

दरम्यान सद्‌गुरु श्री वासुदेवानंद सरस्वती गुरु महाराज नर्मदाकाठी गरुडेश्वर क्षेत्रात समाधिस्थ झाले. सद्‌गुरुंचे ''परिव्राजक'' व्रत पुढे चालवून जगदोद्धारार्थ परिभ्रमण करण्याची श्री. दीक्षित स्वामी महाराजांना इच्छा झाली.

वाडी क्षेत्रस्थ मंडळींची या परिभ्रमणासाठी अनुकूल भावना व्हावी असा प्रयत्न करुन कांही काळ योगीचर्या व मौनव्रत याचा दीक्षित महाराजांनी अंगिकार केला. त्यानंतर त्यांनी वाडीतून प्रस्थानाचा निश्चय केला.

श्री.प.प. श्रीनृसिंहसरस्वती दीक्षित स्वामी महाराजांनी वाडी सोडण्याची सर्व तयारी केली. श्रीगुरुवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांची त्यांनी आज्ञा मिळविली. तसेच श्रीदत्त स्वरुप असलेल्या वाडीचे पुजाऱ्यांची आज्ञा म्हणजे श्रीदत्त प्रभूंचीच आज्ञा योगीचर्या आचरणा नंतर मिळाली.

कन्यागत सालातील चातुर्मास भाद्रपद पौर्णिमेला पूर्ण झाला त्या दिवशी क्षौर स्नान दंड पूजन आदि नित्य नैमित्तिक कर्म आटोपून तसेच पूर्वी धारण केलेल्या मौनव्रताची सांगता केली. चातुर्मास समाप्ती नंतर यतिधर्माप्रमाणे सीमोल्लंघन करायचे होतेच. त्या प्रमाणे सीमोल्लंघनाचे निमित्ताने ते प्रथम वाडीतून निघाले. प्रवासातील एक मोठा कार्यक्रम म्हणून एकदा गरुडेश्वरला सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांची मिरवणूक घेऊन जायचे ठरले. म्हणून सद्गुरुंची मूर्ती सोबत घेतली. कृष्णामाईत नौका सिध्द करुन भक्त गण व सेवक स्त्रिया अशा मेळाव्यासह प्रथम दक्षिणेकडील त्रिस्थळी करायचे. त्यातील काशीक्षेत्र म्हणजे कृष्णा काठचे जुगूळ त्या दिशेने नौका निघाली. 'दिगंबरा' चा घोष अखंड सुरु होता.

सद्गुरु वासुदेवांच्या मूर्तीसह श्रीगुरु नृसिंह सरस्वती स्वामी महाराज दंड घेऊन काषाय रंगाची छाटी परिधान केलेली व भस्माचे त्रिपुंड या सह विशेष तेजस्वी रुपाने, प्रसन्न मुखकमलाने विराजमान होते. त्या दर्शनाने भक्तांचा उत्साह वाढत होता व नामसंकीर्तनाची लय लागली होती.

जुगूळ नामक दक्षिण काशी क्षेत्रात भक्तांसह विधिवत् तीर्थस्नान तीर्थपूजन केले. इतक्यात त्या क्षेत्राचे ग्रामजोशी तेथे आले. त्यांना आदले रात्री स्वामी महाराजांचे स्वप्नात दर्शन झाले होते व प्रसाद मिळाला होता. प्रत्यक्ष काशी विश्वेश्वरच श्री स्वामींच्या रुपात अवतरल्याचे त्यांनी सर्वांना सांगितले. श्रीस्वामी महाराजांनी त्यांचा दक्षिणा इ. देऊन सत्कार केला. तेथून समोरच खिद्रापूरला देवदर्शन करुन पुढे कोपनाथ, वीरभद्रेश्वर (येडूर गावी) या शिव स्थानात स्नान व पूजन केले. येडूरचे वझे नामक शिवभक्त तितक्यात तेथे आले. श्री स्वामी महाराजांना पाहताच त्यांनी वंदन केले. ते

मोठ्या आश्चर्याने व कौतुकाने सांगू लागले की ज्या दिवशी कन्यागत आरंभ झाले त्याच दिवशी त्यांच्या मुलाला श्री स्वामी महाराजांचे जागेपणी प्रत्यक्ष दर्शन वीरभद्रेश्वर लिंगाचे ठिकाणी झाले. 'आपण प्रत्यक्ष वीरभद्रेश्वर रुपी दत्त प्रभू आहात. माझा उध्दार करा.' अशी प्रार्थना त्यांनी केली. सर्व भक्तांसह श्रीस्वामी महाराजांना त्यांनी आपल्या घरी येण्यास विनविले. त्यांच्या संतोषासाठी श्रीस्वामी महाराज भक्त गणांसह त्यांचेकडे गेले. पूजा होऊन श्रीस्वामींची भिक्षा(फलाहार) व सर्व भक्तांना भोजन झाले.

या सीमोल्लंघनानंतर वाडीला परत जाऊन श्री स्वामी महाराज दुसरे दिवशी त्रिस्थली यात्रेची उर्वरित कोल्हापूर-प्रयाग यात्रा करण्यास वाडीहून नावेने प्रस्थान करुन प्रथम अमरेश्वर, (औरवाड) स्थानी आले. तेथे सर्व ग्रामस्थ व मुसलमानांसह सर्व जाती पंथाचे भक्तांनी 'श्रीं'चे दर्शन घेतले व स्वागत केले. त्यांना आशीर्वाद देताना श्रीस्वामींनी पुढील नवीन भजन स्वत: म्हणून त्यांचे कडून करुन घेतले.

**भजन** - ॥ श्री वासुदेवानंद स्वामी राजगुरु,
अमरेश्वर जय दत्तगुरु,
भज भक्तांचे कल्पतरु ॥

नंतर स्वहस्ते सर्वांना प्रसाद दिला. तेथे तात्पुरत्या उभ्या केलेल्या कुटीत मुक्काम झाला.

अमरापुरात अमरेश्वर स्थाना भोवती त्या काळी फडे निवडुंगाचे दाट जंगल होते. तेथे दत्ताबाई पाठक नावाची सेवेकरी भगिनी झोपडी बांधून राहात होती. ती वाडीला श्री स्वामींचे दर्शनाला जात असे. श्री स्वामी महाराज तिला अमरेश्वराच्या पूजेचे साहित्य तूप, तेल, अष्टगंध आदी देत असत व ती मनोभावे एकनिष्ठेने

अमरेश्वराची नित्य त्रिकाल पूजा करीत असे. भिक्षा मागून निर्वाह करीत असे. तिची ही सेवा अमरेश्वर स्वरुपी श्रीस्वामी महाराजांना आवडत असे. श्रीस्वामी महाराज अमरापूरला आल्याने दत्ताबाईला परमानंद झाला. भिक्षेत प्राप्त झालेले वाटीभर दूध व शेंगदाणे तिने 'श्रीं'ना अर्पण करुन स्तुती केली. 'श्रीं'नी त्या सेवेचा स्वीकार केला. 'श्रीवासुदेवानंद गुरु महाराज आता अमरापुरी आले आहेत. अशीच सेवा सुरु ठेवावी म्हणजे ते हृदयातही स्थिर होतील ' असा आशीर्वाद दिला.

दुसरे दिवशी कोल्हापूर व त्या अंतर्गत अमरापूर पंचक्रोशी यात्रा नावेतून आरंभ झाली. निघताना तेथील भक्तांना अमरेश्वर मंदिराच्या जीर्णोध्दारासाठी आवश्यक त्या सूचना दिल्या व त्वरित काम सुरु करण्यास सांगितले. कोल्हापूरहून परतल्यावर अमरेश्वर स्थापना करुन मगच गरुडेश्वरी प्रस्थान करु असे भक्तांना सांगून श्री स्वामी भक्तगणांसह नावेने निघाले. भक्त स्त्री-पुरुषांच्या सोबत वाडीहून काही बालभक्त ही या यात्रेत श्रीस्वामीं वरील परम प्रेमामुळे सामील झाले. त्यात बाल, **श्री दत्ता कवीश्वर,** (हेच आपले सद्गुरु प.पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर) दिगंबर हावळे, बापू कोडणीकर अशा ७-८ मुलांचा समावेश होता. प्रवासात इकडे भजन चालू होते व मधून मधून श्रीस्वामी बालभक्तां बरोबर गप्पा विनोद करीत होते. ते म्हणाले, 'आम्हाला मुले आवडतात. पांच पेचवाली मंडळी आवडत नाहीत.' त्यावर 'पांचपेच वाली म्हणजे काय?' असे एकाने विचारले. श्रीस्वामी उत्तरले, 'पंच विषयाचे व पंच कोषांचे पेचात जे सापडलेले आसुरी वृत्तीचे लोक, ते पांच-पेचवाले लोक होत व त्या पेचात न सापडलेले भाविक भक्त ती 'मुले' होत, ती मुले आम्हाला आवडतात.'

नौका प्रवास करीत शेडशाळला थांबली. तेथील इनामदारांनी 'श्रीं'ची पूजा केली. तेथे एक स्त्रीचे अंगात संचार होत असलेल्या समंध पिशाच्चाला 'श्रीं'नी मुक्ती दिली. पुढे ढवळी गावी पोचले. नाव हाकणारे एव्हाना थकले होते. श्रीस्वामी महाराजांनी त्यांना दूध आणायला गावात पाठवले. तेथील गाई आदींचे दूध आधीच काढून झाले होते. तथापी 'श्रीं'नी आज्ञा केली तेंव्हा एक गवळी त्यावर विश्वास ठेवून पुन्हा दूध काढू लागला असता भरपूर दूध पुन्हा त्या गाईने दिले. गुरुचरित्रातील 'वंध्या महिषी दोहन प्रसंगाचीच ही पुनरावृत्ती झाली. 'श्रीं'नी थोडे दूध स्वीकारले व थकलेल्या भक्तांनी दुग्धपान केले व पुन्हा ताजेतवाने होऊन प्रवासास लागले.'

कोल्हापुरला कडेकर नामक भक्ताने प्रेम आग्रहाने श्रीस्वामींना आपल्या घरी नेले व सर्व प्रकारे सेवा करून संतुष्ट केले. अमरापूर देवस्थान निर्माण झाल्यानंतर तेथील जबाबदारी श्रीस्वामी महाराजांनी यांज वरच सोपवली होती. यांचे घरी वास्तव्य असताना एक 'श्रीं'चे जुने भक्त दर्शनाला आले. दृष्टी भेट होताच त्या भक्ताचे डोळे मिटले व ध्यान अवस्था सहजपणे प्राप्त झाली. चाक्षुषी दीक्षा त्यांना मिळाली.

कोल्हापूर व पंचक्रोशी यात्रा भक्तांसह संपन्न झाली. त्या नंतर बरोबर आलेली बरीच भक्तमंडळी श्री स्वामींच्या आज्ञेनुसार परत गेली. पण बाळ-भक्त मंडळी परतायला तयारच नव्हते. श्रीस्वामी महाराजांनी त्यांचेवर कृपाकूर्म दृष्टीने चाक्षुषी दीक्षे द्वारा या बाळ मंडळींचे सर्वतोपरी कल्याण केले व अध्यात्माची गोडी लावली. पालकांनी शाळा बुडते म्हणून यांना जरी बळेच घरी नेले. तरी 'आम्हाला स्वामी महाराजांजवळ पोचवा नाहीतर आम्ही जेवत नाही.' असा बाळ हट्ट धरला. धुंडीराज शास्त्री कवीश्वर म्हणाले, 'की

आमच्या दत्ताची (श्री दत्तमहाराज कवीश्वर) समजूत घालताना आमचे नाकी नऊ आले. पुढे गुरु द्वादशी उत्सवासाठी अमरापूरच्या भक्तांनी 'श्रीं'ना अमरापुरी आणले. तेथे उत्सवात महापूजा, पालखी, प्रसाद भोजनाचा मोठा कार्यक्रम झाला.

त्या वेळी शिरोळचे भक्ता सोबत दोन लहान मुले आली होती. वडील मंडळी स्वामींच्या सेवेत असताना ही मुले खेळत खेळत नदी काठी वाळवंटात गेली व चुकून खोल पाण्याच्या पात्रात गेली व बुडाली. श्रीस्वामी महाराजांनी अंतर्दृष्टीने सर्व जाणून त्यांना सुरक्षित बाहेर काढण्याची लीला केली. पण आपण काही केलेले न समजू देता त्या पालकांना मुले शोधून आणा म्हणून पाठवले. त्यांना तेथे एका साधूने त्या मुलांना खोल पाण्यातून वाचवून बाहेर आणलेले व सावध केलेले दिसले. यांना पाहताच तो साधू मुलांना यांच्या स्वाधीन करुन कुठे गेला कळलेच नाही. कोडोली हे कडेकरांचे शेती वाडीचे गाव. तेथे श्री स्वामी महाराज उसाच्या मळ्यात गेले असताना तेथील ज्या विहिरीचे पाण्याने त्यांनी आन्हिक केले ती विहीर त्या नंतर कधीच कोरडी पडली नाही. संपूर्ण बागेत भरपूर पाणी मिळू लागले. कडेकरांचे घर समृध्दीने परिपूर्ण झाले.

कोडोली जवळच सांगवडे हे नरसिंहाचे स्थान पुरातन देवस्थान आहे. स्वामी महाराजांनी कोल्हापूरहून वस्त्र अलंकार आणवून येथील नरसिंह -लक्ष्मी भगवंताची महापूजा करविली व ब्राम्हण भोजन गावातील सर्व भक्तांना प्रसाद दिला.

इंगळी गावचे देशपांडे सांगवड्याला श्रीस्वामी महाराजांकडे आले. त्यांनी इंगळीला येण्यासाठी प्रेमाचे निमंत्रण दिले. ते स्वीकारुन श्री स्वामी महाराज भक्तगणांसह या इंगळी ग्रामाला गेले. श्री स्वामींची

येथील भक्तांनी अभ्यंगस्नान पूर्वक उत्तम पूजा केली. भजन सेवा ही बरीच केली या भक्तांनी श्रीनृसिंहसरस्वती स्वामी महाराजांची उत्कृष्ट आरती रचून म्हटली. ही खालील दिलेली आरतीच सर्वत्र प्रेमाने म्हटली जाते

## आरती

करितो आरती तुज नीरांजन घेऊनिया हाती ।
सद्‌गुरूराया तू यतिवर्या,
श्रीगुरूराया तू यतिवर्या, नरसिंहसरस्वती ॥धृ॥
नृसिंहवाडी श्रीकृष्णातटि केला रहिवास ।
प्रपंच करिशी परि त्या विषयी असशी उदास ॥
प्रपंच निमित्तां स्वोध्दारासी घातलीस कांस ।
चातुर्थाश्रम घेउनि पावन केले स्वकुळास ॥१॥
दंडावाचून चातुर्थाश्रम तुजवाटे न्यून ।
वासुदेवानंदसरस्वती सद्‌गुरु करुन ॥
सद्‌गुरुहस्ते दंड घेऊनी झालासी पूर्ण ।
जनासि वाटे दत्तात्रेय हा, मनासि वाटे दत्तात्रेय हा,
अवतारचि पूर्ण ॥२॥
योगाभ्यासासाठी गुरु त्वां धरिले मौनाला ।
तो ही पूर्ण करोनी निघसी तीर्थाटनाला ॥
भक्ती स्तविता प्रेमे त्यांच्या जाशी सदनाला ।
भक्तांकडुनी पूजा घेउनि, दासांकडूनी सेवा घेऊनि
देसी मोदाला ॥३॥
इंगळी ग्रामी येउनि आम्हा दीना उद्धरिले ।
निजबोधामृत पाजुनि सकळा भजनी लावियले॥
वृद्धनर-नारी शिशू हे तव भजनी रमले ।
तल्लीन होऊनि गोपाळे तव वंदि पाउले ॥४॥ करितो आरती

इंगळीहून हुप्री, कारदगा, हेरवाड असा प्रवास करीत श्रीस्वामी दत्तजयंतीला अमरापूरी आले. दत्तजयंती उत्सव मोठ्या उत्साहात झाला. दुसरे दिवशी भक्तांसह श्रीस्वामींनी अष्टतीर्थ स्नाने केली. त्यातील कृष्णा पंचगंगा संगम स्थान हे 'प्रयाग' आहे. तेथील स्नानाने पूर्वी संकल्प केलेली दक्षिणेकडील त्रिस्थली (जुगूळ = काशी, कोल्हापूर = गया व नृसिंहवाडीतील संगम स्थान = प्रयाग) या प्रमाणे पूर्ण केली.

पुढे काही दिवस टाकळीला जाऊन पौष शु. द्वितीया या उत्सवासाठी अमरापूरला आले. हा श्रीगुरु नृसिंहसरस्वती स्वामी महाराजांचा कारंजा येथील जन्माचा दिवस आहे. त्यांचा उत्सव अमरापूरला नित्य करायची प्रथा सुरु केली. पुढे हाच उत्सव 'घेवड्याच्या वेलाचा उत्सव' या नावाने याच दिवशी प्रतिवर्षी होऊ लागला.

येथून पुढे गरुडेश्वर प्रवासारंभ झाला. वाटेत मांजरी येथील ब्राम्हणाकडे 'श्रीं'ची भीक्षा झाली. प्रथमतः जितकी मंडळी उपस्थित होती त्यांच्या अंदाजाने स्वयंपाक केला होता. पुरणपोळीचा प्रसाद होता. पण अचानक सुमारे १० ब्राम्हण ऐन भोजनाचे वेळी 'श्रीं'च्या दर्शनाला येऊन पोहोचली. 'श्रीं'नी त्यांना भोजनास बसवले. यजमानांना चिंता पडली की आता, अन्नपूर्ती कशी होणार ? श्रीस्वामी महाराजांनी त्यांची समस्या ओळखून स्वहस्ते गुरुमहाराजांचे तीर्थ पक्कान्नावर शिंपडले व यजमानास पाने वाढण्याची आज्ञा केली. अर्थातच काहीही कमी पडले नाही. गुरुचरित्रातील प्रसंगाची आठवण या प्रसंगाने होते.

पुढे नणदी कुरोळी येथील द्वादश ज्योतीर्लींगाचे दर्शनास 'श्रीं' गेले. येथे पाण्याच्या पात्रात सदा बुडालेली ही शिवलिंगे आहेत.

पाण्यावर ठेवलेले बिल्वपत्र सरळ खाली जाऊन लिंगावर पडते. असा येथे चमत्कारच आहे.

सदलगे ह्या गावी श्री स्वामी महाराजांनी त्यांच्या पूर्वाश्रमीचे पूर्वजांना प्राप्त झालेल्या 'तीन गोटे' प्रसाद रुप त्रिमुर्ती दत्तात्रेयांचे मंदिरात पूजा केली. येथील मूर्तींना किरीट, अलंकार करवून अर्पण केले. तसेच तेथील विठ्ठल मंदिरात श्रीसद्‌गुरु वासुदेवानंदसरस्वती महाराजांच्या पादुका स्थापन केल्या. सदलगेकर भक्तांसोबत वेदगंगेवर स्नान केले. या भक्तांवर 'श्रीं'ची विशेष प्रीती होती.

सदलग्याहून खचनाळ गावी भक्तांनी स्वामी महाराजांना नेले. तेथे नामसप्ताहाने 'श्रीं'ना संतुष्ट केले. 'श्रीं' महाराजांच्या चरण पादुका 'श्रीं'नी दिल्या.

द्रव्य, वस्त्र, भूमी इ. देणे म्हणजे औदार्य असे समजले जाते. पण ते खरे औदार्य नव्हे. ज्या दानानी घेणाऱ्याचे आत्यंतीक कल्याण होईल ते देणे म्हणजे खरे औदार्य ! भक्ती व मुक्ती ही अशी दाने आहेत. या देश संचाराच्या काळात श्री नृसिंहसरस्वती स्वामी महाराज या दोहोंचे मुक्त हस्ते दान देत होते. मंत्र देताना तसेच आपल्या वापरातील वस्त्र पादुका हे सर्व पदार्थ प्रसाद रुपाने देताना त्यातून त्यांचे शक्तीयुक्त खरे देणे म्हणजे अधिकाराप्रमाणे भक्ती व मुक्ती मार्गाचे पथिक बनविण्याचे विश्वकल्याणाचे अवतार कार्य अखंड सुरु होते. वामनराव देशपांडे या भक्ताला विवेक-चूडामणी हा ग्रंथ सांगितला.

एका वेड्या माणसाला ७-८ नारळ फोडून त्यातील पाणी स्वामींनी प्यायला दिले व उत्तम रेशमी वस्त्रे लेवविली. तो पोषाख घालताच असा चमत्कार झाला की तो वेडा इसम श्रीस्वामींचे समोर

कीर्तन करु लागला व आनंदाने प्रभुकीर्ती गाऊ लागला. मूकं करोति वाचालं ! याचा प्रत्यक्ष प्रत्यय आला.

इंगळी मुक्कामी काही भक्तांनी 'श्रीं'ना प्रश्न विचारले त्या वेळी जे संभाषण झाले ते पुढे देत आहे.

भक्त - चित्तशुद्धी म्हणजे काय? व ती कशाने होते ?

श्रीगुरु - मनातील दुर्वासना जाणे ही चित्तशुद्धी होय व ती कर्माचरणाने होते.

भक्त - कर्म कोणते ?

श्रीगुरु - पूजा हेच कर्म. म्हणजेच ईश्वरार्पण बुद्धीने केलेले स्वस्वकर्म.

भक्त - नामाने चित्तशुद्धी होणार नाही काय ?

श्रीगुरु - नामापुढेही कर्म करावे लागते. नामदेवाला कर्म करावे लागले हे माहीत आहे ना ?

भक्त - उपासना कोणती व तिचे फळ काय ?

श्रीगुरु - श्रद्धाभक्तिपूर्वक उपास्य देवतेचे अनुस्मरण ठेवणे ही उपासना होय. हिच्या योगाने चित्ताला तदाकारता येते व देवतासान्निध्य घडते.

भक्त - सगुण साक्षात्कार केंव्हा होतो ?

श्रीगुरु - उपासनामंत्राची जितकी अक्षरे तितके कोटी जप झाला असता.

भक्त - पण नामरुपाचा मेळ पाहिजे ना ?

श्रीगुरु - होय, अवश्य.

भक्त - मृत्यूबद्दल भीति का वाटते ?

श्रीगुरु - देहतादात्म्यामुळे.

भक्त - ती भीती नाहीशी होण्याचा उपाय कोणता?

श्रीगुरु - विचार !

भक्त - देहाबद्दल विचार कसा करावा ?

श्रीगुरु - हा देह दृश्य, जड अन्नविकार अर्थात पांचभौतिक आहे इ.

भक्त - परमेश्वराचा (आत्म्याचा) विचार सोडून देहाच्या विचाराने काय होणार ?

श्रीगुरु - दोघांचाही विचार केला पाहिजे. देहाच्या विचाराने त्याची सत्यता पटते.

भक्त - परमेश्वराविषयी विचार तो कसा ?

श्रीगुरु - परमेश्वर कोण ? त्याचे स्वरुप काय ? हे दिसणारे दृश्यच त्याचे रुप की त्याचेहि आत ते आहे ? इ.

भक्त - ज्ञान म्हणजे काय ? व त्याने काय मिळते?

श्रीगुरु - देहादिक दृश्याचा साक्षी (ज्ञाता) मी सच्चिदानंद आत्मा आहे असे निश्चित कळणे म्हणजे ज्ञान होय. याने अजरामर अशा स्वस्वरुपाचा म्हणजेच परमात्म स्वरुपाचा लाभ होतो व तेणेकरुन अविद्याजन्य देहतादात्म्य सुटून जाऊन मृत्यूभयातून कायमची मुक्तता होते.

हा संवाद गुरुभक्त मास्तर दत्तोपंत इंगळे यांचे कडून मिळाला. ते श्रीगुरुंचे एकनिष्ठ प्रेमळ भक्त होते.

## ॥ श्रीगणेशदत्तामरेश्वरयोगिनी आणि श्रीवासुदेवानंदसरस्वतीपीठ स्थापना ॥

अमरापुरला अत्यंत जुना व मोठा एक अश्वत्थ वृक्ष होता. त्याच्या जवळच पडकासा एक लहानसा कट्टा व त्यावर एक त्याला शोभेसी घुमटी, जेमतेम एका मनुष्याला वाकून पूजा करिता येईल एवढीच जागा होती. त्या घुमटीत एक लहान शिवलिंग व पिंपळाच्या ढोलीत पादुका होत्या. तेथील कुलकर्णी मंडळींपैकी कोणीतरी मंडळी या शिवलिंगावर पाणी घालीत होती. अशी परिस्थिती, दीक्षितस्वामी महाराज तेथे जाण्यापूर्वी होती.

शके१८३७ मधे (म्हणजेच १९१५ साल) दीक्षितस्वामी महाराजांनी शास्त्रीय पध्दतीने आय-व्यय साधून मोठा चौथरा बांधला आणि एक आजीबाई तेथे ठेवून पूजा, नैवेद्य व सांजवात सुरु केली. चातुर्मास समाप्ती नंतर महाराज अमरापुरला सीमोल्लंघना करिता म्हणून आले होते. संध्याकाळी तेथे बरीच मंडळी जमली. एका मोठ्या चिंचेच्या झाडाखाली आसन टाकून महाराज बसले. जवळच रानटी झाडे खूप वाढली होती. मंडळींनी महाराजांना सांगितले की, 'आपण येथे येऊन राहा ही जागा साफ-सूफ करुन देतो व तुम्ही सांगाल त्या पध्दतीप्रमाणे आपण वागतो. पण आपण इथे राहावे असे आम्हास वाटते.' महाराज म्हणाले, 'ईश्वरेच्छा असेल तर होईल तुमच्या मनासारखे.' असे सांगून महाराज संध्याकाळी वाडीला परत गेले. संध्याकाळची उत्सव मूर्तीची पूजा ते नियमाने करीत. कारण ती थोरल्या महाराजांनी त्यांना सांगितली होती. त्यांचा क्षेत्र संन्यास असल्यामुळे तो नियम त्यांनी अमरापुरला जाई पर्यंत पाळला.

दोन-तीन दिवसांनी नित्य क्रम आटोपून काही मंडळींसह ते नावेतून येडूरला वीरभद्राच्या दर्शनाला गेले. तेथे इनामदार यांनी हे

तिथे पोहोचण्यापूर्वीच त्यांची व्यवस्था करून ठेविली व स्वत: स्वागतास हजर होते. बरोबरच्या मंडळींना मोठे आश्चर्य वाटले. आम्ही आज इथे येणार हे यांना अगोदर सांगितले नसता यांनी ही तयारी कशी केली ? थोड्यावेळाने इनामदाराने स्वस्थपणाने सांगितले की, 'काल रात्री एक बैरागी आला होता. तो म्हणाला असा पहात काय राहिलास ? सकाळी एक स्वामी येथे येत आहेत. त्यांची सर्व व्यवस्था ठेव जा. मी जागा झालो व कोण येणार आहेत असा विचार करत तयारी करून ठेविली. महाराजांनी स्वत: येऊन दर्शन दिल्यामुळे अत्यंत समाधान झाले. कुलदेवतेची कृपा म्हणावी म्हणून ही अल्प-स्वल्प सेवा माझ्या हातून घडली.' दुपारी परत येताना जुगुळ व खिद्रापुर स्थानातील देवांची दर्शने घेऊन महाराजांना निघायला उशीर झाला. मध्येच एका ठिकाणी सात-आठ मैल अलीकडे उतरून पायीच वाडीला आले. अशा रितीने त्यांची दक्षिण-त्रिस्थळी यात्रा झाली. उशीर झाल्यामुळे स्वारीची पूजा ओलेत्यानेच केली. याप्रमाणे भाद्रपद वद्य ४ पर्यंत त्यांनी वाडीला पूजा केली. पंचमीला ते जे कोल्हापूरला निघून गेले ते पुन्हा वाडीत आले नाही. कोल्हापूरहून ते गुरुद्वादशीला थेट अमरापुरला आले. तेथे लहानशी एक कुडाची झोपडी बांधली होती. तेथेच महाराज बसत असत. गुरुद्वादशीचा उत्सव आटोपून महाराज कोल्हापूरला हरिभाऊ कडेकरांकडे गेले. दिवाळी तेथेच झाली. नंतर ते आजूबाजूच्या खेड्यातून लोकाग्रहास्तव फिरत होते. कवठे, सांगली, ढवळी, गणेशवाड इ. कितीतरी गावी भक्तानुग्रह करीत पौषात अमरापुरी आले.

या पर्यटन काळात ५-६ वेळा अमरापुरी येऊन स्वामींनी मंदिराचे कामात मार्गदर्शन केले व शेवटी काही काळ तेथे राहून समक्ष सर्व पूर्ण करून घेतले.

कुरुंदवाड च्या नारायण गवंड्याला सर्व सूचना देऊन त्याचे कडून सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या पादुका, षड्भुज दत्तात्रेय बसलेली मूर्ती, अमरेश्वराचे भव्य लिंग, चौसष्ट योगिनींच्या प्रतिकात्मक ८ मूर्ती व श्री महागणपती मूर्ती हे सर्व करवून घेतले. या प्रमाणे मंदिर व देव सर्व तयारी झाली.

चातुर्मासापूर्वी स्थापना झाली पाहिजे म्हणून योग्य अधिकारी व प्रयोग जाणणारे ज्ञानी ब्रह्मवृंदांना पाचारण करण्यात आले. त्यांच्या विचाराने स्थापनेचा मुहूर्त निश्चित झाला. सर्व साहित्याची जुळवाजुळव करुन ज्येष्ठ मासात श्री स्वामी महाराज सर्व भक्तांसह अमरापुरी आले. स्थानिक भक्तांनी मंदिराची रंगरंगोटी इत्यादी केली व सर्व सुशोभित केले. मंडप घातले विद्वान ब्राम्हणांना व सगळीकडील भक्तांना आमंत्रणे पाठवली. स्थापने पूर्वीचे स्थापनांगभूत कर्म, होम आदि यथाशास्त्र संपन्न झाले नंतर -

ज्येष्ठ वद्य सप्तमीचे दिवशी सकाळी प्रहर दिवसा श्रीनृसिंहसरस्वती स्वामीमहाराजांनी श्रीवासुदेवानंद सरस्वतीस्वामी महाराजांच्या पादुका श्रीदत्तमूर्ती, अमरेश्वर लिंग, गणपती व योगिनींची स्थापना शके १८४५ या वर्षी स्वहस्ते केली.

महाराजांचे पूर्वाश्रमीचे मावस बंधू इचलकरंजी येथील श्रीपादराव कुलकर्णी यांचे कडून देवक ठेवण्यात आले. ज्येष्ठ वद्य ७ शके १८४५ (१९२३ साल) रोजी दत्तअमरेश्वर व योगिनी माता श्रीवासुदेवानंद सरस्वती पीठ स्थापित झाले. हे कार्यक्रम कसे तडीस जातील याची श्रीपादरावांना अत्यंत काळजी होती. कारण त्यांच्या सूनबाईंचे पूर्ण मास भरले होते व आश्चर्याची गोष्ट म्हणजे सर्व कार्यक्रम आटोपल्यावर दुसऱ्या दिवशी त्या प्रसूत झाल्या.

स्थापनेच्या वेळेस यथाविधी स्वाहाकार व इतर धार्मिक कार्य पार पडली. या कार्यक्रमाकरिता कुरुंदवाडकर, मिरजकर इ. संस्थानीक येऊन महाराजांचे दर्शन करुन गेले. या आठवड्यात दक्षिणेलाच १२०० रु. लागले. याशिवाय धोतरे, शालजोड्या इ. वस्त्रे देऊन महाराजांनी विद्वानांचा यथायोग्य परामर्ष घेतला. लगेचच थोरल्या महाराजांचा उत्सव ही थाटामाटात पार पडला. गुरु पौर्णिमेचा उत्सव होऊन महाराजांचा अमरापुरचा पहिला चातुर्मास सुरु झाला. या काळात सुध्दा संहिता पारायण इ. काहीना काही धार्मिक कृत्ये सुरु होती. नित्य अमरापुरकर मंडळींचे भजन होत असे. अमरापुरला महाराजांचा मुक्काम असताना बाहेरील मंडळींची सारखी ये-जा चालू असे. महाराज असे पर्यंत या स्थानात ८-१० हजार पात्रांचे अन्नदान झाले.

श्री स्वामी महाराज इचलकरंजीत असताना त्यांनी म्हटले होते की **"स्थापनेच्या वेळी श्रीदत्तप्रभू वाडीतून अमरापूरला पाण्यातून येतील. गुरुचरित्रातील वर्णनात तशी वहिवाट लिहिलेली आहे."**

प्रत्यक्षात स्थापनेच्या दिवशी असे आश्चर्य घडले की त्या ८ दिवसांत कोठेही पर्जन्य वृष्टी नसताना त्या दिवशी कृष्णामाईचे पाणी अचानक भराभर वाढू लागले व शेवटी वाडीच्या मनोहर पादुकांचे वर पाणी आले. अशा प्रकारे श्री स्वामी महाराजांची वाणी ईश्वराने सत्य केली.

स्थापना झाल्यावर श्रीस्वामी महाराजांनी आपल्या जवळचे प्रवासातील फोटो, मूर्ती आदि देव बरोबर घेऊन नावेने मनोहर पादुकांचे समोर पात्रात नाव थांबविली व तेथूनच श्रीपादुकांना सर्व उपचार अर्पण करुन पूजा व आरती केली. स्तोत्र म्हटले व दंड

वंदन केले. नंतर श्रीदत्तप्रभूंचा जयजयकार करीत नावेने अमरापुरी परत आले.

वाडीहून परतल्यावर नवीन स्थापित देवतांची स्वहस्ते महापूजा करुन श्रीअमरेश्वर प्रीत्यर्थ स्तोत्र केले. श्रीदीक्षित स्वामीमहाराज हे श्री.प.प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांचे आत्यंतिक प्रेमी भक्त होते व त्यांचे एकमेव दंडी शिष्य होते. जणू ते काही त्यांचीच प्रतिरुप प्रतिकृतीच होते. त्यांच्या काव्य स्तोत्र रचना या अत्यंत भावगर्भ व मंत्रमय असून श्रीस्वामी महाराजांप्रमाणेच उत्स्फूर्त दिव्यप्रज्ञेने रचल्या गेल्या आहेत. त्यांनी रचलेला हारबध्द श्लोक 'मेशंकेशं' हा श्री.प.प. श्रीटेंबेस्वामी महाराजांची केलेली उत्कट स्तुतीयुक्त प्रार्थना आहे. यांच्या लीला ह्या श्रीगुरु श्रीनृसिंहसरस्वती स्वामीमहाराज व श्रीटेंबे स्वामीमहाराजांच्या लीलांशी साम्य दर्शवणाऱ्या आहेत. त्या ऐकताना श्रीगुरुचरित्राचीच पुनरावृत्ती आहे असे जाणवते.

महाराज ज्यावेळेस तीर्थयात्रे करिता बाहेर जात त्यावेळेस त्यांचे बरोबर कृष्णा पुजारी (वाडी), रामभाऊ कट्टी, दत्ताबाई (ऊर्फ आजीबाई पाठक), यमुताई काकतकर, अष्टेकर कोल्हापुरकर इ. मंडळी असत. **महाराजांनी शेवटी शेवटी योगीचर्या धारण केली होती. याचा उद्देश वाडी बाहेरच्या लोकांचाही उध्दार करायचा होता. अमरेश्वराचे स्थान उदयाला यावयाचे होते हा होता.**

--------*****---------

## अमरेश्वर स्तोत्र

जगज्जन्महेतुं दयापूर्ण सिंधुं ।
भजत्कामधेनुं निधिं सज्जनानां ।
प्रसन्नं शरण्यं श्रुतेः सारभूतं ।
परब्रह्मलिंगं भजस्वामरेशं ॥१॥
सरित्कृष्णवेण्योस्तथा पंचगंगा ।
सरित्संगमेचाऽमरैश्चामरेंद्रः ।
गुरुं प्रार्थ्य भक्त्याऽभज द्योऽमरेशं ।
परब्रह्मलिंगं नमामि स्वतंत्रं ॥२॥
दयासागरोदत्त देवः स्वभक्तान् ।
समुद्धर्तुकामोऽवसद्यस्त्वकामः ।
पुरेचामरेशस्य भुक्त्वा निधिं यो ।
ददौ सोऽ भजच्चामरेशं स्वलिंगं ॥३॥
चतुःषष्ठिदेव्याप्तकामाः परेशं ।
भजत्कल्पवृक्षं भवाब्धेः सुनौकां ।
भजंतीहसर्वार्थदं विश्वनाथं ।
परब्रह्मलिंगं भजस्वामरेशं ॥४॥
ऋषिः सर्ववित्सर्वतीर्थेऽवसत्सोऽ ।
भजत्सर्व तीर्थेश्वरं चामरेशं ।
स्वशिष्याय साक्षात्प्रदर्श्य स्वरूपं ।
परब्रह्मलिंगं त्वनादि स्वरूपं ॥५॥
द्विजः कुष्ठरोगी सुधीः शुक्लतीर्थे ।
तपस्तप्तुकामोऽवसद्बादशाब्दं ।
विकुष्ठो विशुद्धोऽभवद्विददार्यः ।
परब्रह्मलिंगामरेशप्रसादात् ॥६॥

मृकंडर्षिसूनू रहः कृष्णवेण्योः ।
शिवस्याज्ञयायोऽवसद्ब्रह्मनिष्ठः ।
कहोळर्षिसद्व्यासवर्यादिदेवाः ।
परब्रह्मलिंगं भजंतीहनित्यं ॥७॥
अतिप्रेमपात्रः शिवस्यातिभक्तो ।
मखध्वंसकर्ता सुदक्षस्य शास्ता ।
शिवप्रीतये योऽवसद्वीरभद्रः ।
परब्रह्मलिंगं भजत्यादरात्सः॥८॥
वसिष्ठात्रिभृग्वादयः सिद्धसाध्याः ।
सुनंदादिनंदीश्वरा नारदाद्याः ।
भजंतीह भक्त्या परब्रह्मनिष्ठाः ।
परब्रह्मलिंगं भजस्वामरेशं ॥९॥
अमरेश्वर ते नाम वाचि मेऽस्तु सदाशिवं ।
अमरेश्वर ते रुपं हृदि नेत्रे च तिष्ठतु ॥१०॥
अमरेश्वर ते भक्तिः सदा नवविधाऽस्तुमे ।
अमरेश्वर संसारपरपारं नयाशु मां ॥११॥
इति श्रीपरब्रह्मलिंगामरेश्वरस्तोत्रं संपूर्णम् ।

त्या वेळी स्वामी म्हणाले 'पूर्व युगात मोठ मोठ्या ऋषिमुनि योग्यांनी मोठी तपश्चर्या करुन जे फळ मिळविले ते आम्ही येथे अमरापुरात गुरुसेवा करणारांना केवळ एका सेवेने देऊ.' एवं श्रीस्वामी महाराज स्वतः सुध्दा अमरापुरात स्थिर आहेत हे त्यांनीच सांगितले आहे. स्थापने नंतर पुढे ८ दिवसांनीच वासुदेवानंद सरस्वतीस्वामी महाराजांची आषाढ शु.१ ही पुण्यतिथी येत होती. त्या मुळे स्थापना दिवसापासूनच पुण्यतिथी उत्सव सुरु झाला. त्या काळात

सर्व वेद पारायणे तसेच श्रीसद्गुरु वासुदेवानंद सरस्वतीस्वामी महाराज रचित सर्व ग्रंथांची पारायणे, भजन, कीर्तन, संहिता स्वाहाकार, रुद्राभिषेक, महापूजा, ब्राम्हण भोजन इ. कार्यक्रम सुरु होते. प्रतिपदेला श्रीगुरु स्वामीमहाराजांची आराधना झाली. मोठे अन्नदान, संन्याशांना वस्त्रे इ. दिले. श्रीनृसिंहसरस्वती स्वामीमहाराजांचा या वर्षीचा चातुर्मास अमरापुरी झाला. त्या काळात इंगळीच्या वामनरावांना वेदान्त श्रवण घडविले.

आपल्या गुरुमहाराजांच्या ग्रंथांचे पारायण करीत ते अमरापुरात रहात.गुरु ग्रंथावर त्यांचे अतोनात प्रेम होते. ते ग्रंथ नसून गुरुच आहेत, असे ते मानीत. जो कोणाला मंत्रोपदेश द्यायचा तो त्या ग्रंथातून श्लोक, ओवी, वाक्य, शब्द वगैरे घेऊन देत असत. दुसरा देत नसत. गुरुहातीची कोणतीही वस्तु ते अत्यंत प्रेमाने सांभाळीत व ती गुरुवत् मानीत. गुरुमहाराज काय ते एक देव, तीर्थ, मंत्र वगैरे सर्व काही त्यांना वाटे. असे त्यांचे गुरुवरांवर अतोनात प्रेम असे. ते कोठेही गेले तरी तेथल्या महादैवतांची पूजा करीत. पण गुरुमूर्तिची पूजा केल्याशिवाय त्यांना बरे वाटत नसे. म्हणून त्यांनी गुरुमूर्ति प्रवासांत आपल्याजवळ बाळगली होती. कोठल्याही तीर्थराजात त्यांनी जरी स्नान केले तरी त्यांना गुरुतीर्थ मस्तकी घेतल्याशिवाय समाधान वाटत नसे. म्हणून त्यांनी निजगुरुहस्तींचा कमंडलू सतत जवळ बाळगिला होता. त्या गुरुकमंडलूंतले तीर्थ ते मस्तकी घेत तेव्हा आपण तीर्थस्नान केले असे त्यांना वाटे. ते गुरुनामाविण रिते वदन कधी ठेवीत नसत. गुरुचिंतनावाचून दुसरे काही चिंतीत नसत. ते सर्वकाळ गुरुमूर्तीकडे पहातच बसत. गुरुरायाची यात्रा म्हणूनच ते संचार करीत. सर्व क्रिया, कर्म, धर्म त्यांनी गुरुमय केले होते. किंबहुना, आपणच ते गुरुमय बनले होते. गुरुभक्ति कशी असते हे पाहाण्याची इच्छा करणारांनी नृसिंहयतिवरांची मूर्तिच पहावी म्हणजे त्यांना ती प्रत्यक्षच दिसेल.

कोल्हापुरात असताना त्यांनी एका अडलेल्या बाळंतीणीला आपल्या गुरुमहाराजांनी केलेल्या प्राकृत ग्रंथातली एक ओवी मंत्र समजून वाचायला दिली. एकदा वाचल्याबरोबरच ती बाळंत झाली. गुरुवचनावर जशी भावना ठेवावी तसे ते फलद होते, या गोष्टीचा अनुभव त्यांनी सर्वांना दिला.

गुरुरायाचे अंगाऱ्याने त्यांनी प्रेतेसुध्दा जिवंत केली. त्यांनी अमरापुरातच एक चमत्कार दाखविला. रामभाऊ कुलकर्ण्यांचा लहान मुलगा कृष्णा मरणोन्मुख झाला होता. त्याची हालचाल, वाणी वगैरे सर्व बंद पडली. तेव्हा त्याला अखेर श्री गुरुमहाराजांपुढे आणून ठेवला. सर्व इलाज थकल्यावर हातचे पोर गेले असे वाटल्यानंतर निर्वाणीचा सखा गुरुमहाराज त्यांना आठवले. श्रीगुरुनाथांनी आपल्या गुरुरायाचा अंगारा त्या प्रेततुल्य झालेल्या रामपुत्राचे मस्तकी लावला व 'अमरेश्वराला पुजाऱ्याची जरूर आहे. सबब हा मुलगा वाचेल, मरणार नाही.' असे ते म्हणाले. मुलाला घरी न्यायला लावला. घरी जाताक्षणी मुलगा हुशार झाला. बोलू, चालू, खेळू ,जेवू लागला. पुन्हा जिवंत झाला. लोकांना व मायबापांना महाराजांच्या बळाचे आश्चर्य वाटले व ते श्रीगुरुचरणाचे अनन्य दास बनले. त्यांचे आज्ञाधारक शिष्यच बनले.

श्रीगुरुंनी अमरापुरचे महाक्षेत्र बनविले व भक्तिधर्माची स्थापना देवस्थापनेबरोबरच तेथे केली व ब्रह्मकर्माला आणि भगवत्पूजेला सर्वांना लावून त्यांचा उद्धार केला. चातुर्मासभर अखिल भक्त लोकांना भक्तिप्रेमाचा आनंद दिला. शरणागतांचे हेतु पुरविले, परमार्थाचा सुकाळ केला व चातुर्मास संपण्याचे सुमारास भाद्रपदी पौर्णिमेला भागवताचा सप्ताह वाडीत असताना वे.शा.सं. धुंडिराज कवीश्वरांकडून ते जसा करवून घेत तसा अमरापुरांत देखील त्यांनी धुंडिराजांचे चिरंजीव वे.शा.सं. दत्तात्रेय शास्त्री यांचे करवी करविला. भागवताचा सप्ताह करण्याइतकी त्यांची तेव्हा तयारी नव्हती. तथापि

महाराजांनी त्यांनाच सप्ताह करा म्हटले. ‘नुसता मूळ ग्रंथ वाच म्हणजे झाले.’ असे ते त्यांना म्हणाले. महाराजांबरोबर नावेतून गेलेले व कोल्हापुरातून आल्यावर पुन्हा महाराजांकडे जाण्यासाठी रडून आईबापांची त्रेधा करणारे ते हे महाराजांचे प्रिय बाळभक्त दत्तुकवीश्वर चिमुकले शास्त्री महाराजांचे म्हणण्याप्रमाणे लगेच भागवताचा सप्ताह करायला बसले. त्यांनी प्रथमच हे वाचन केले. सात दिवसात सप्ताह पुरा केला. महाराजांनी तो साद्यंत ऐकला व तुष्ट झाले. ‘दत्ता, तू पुढे ज्ञानी होशील, तू माझा प्रिय भक्त आहेस.’ असा त्यांनी दत्तबाळाला आशीर्वाद दिला. त्याचे अंगावर उंची शाल घातली. चांदीचे संध्यापात्र दिले व भागवताची मिरवणूक म्हणून नावेत पोथीसह दत्ताला घेऊन आपण बसले व भक्तांसह भजन करीत कुरुंदवाडला जाऊन सीमोल्लंघन करुन आले.

अमरापूरच्या भजनी मंडळींवर महाराज फार प्रेम करीत. त्यांना खायला, प्यायला, भोजनाला देत. त्यांचे भजन चातुर्मासभर रोज प्रेमाने ते ऐकत बसत. अमरापुरचे चारी वर्ण महाराजांचे भक्त बनले. मुसलमानदेखील महाराजांचे भक्त बनले. एका मुसलमान शाहीराने श्रीगुरु नृसिंहसरस्वती हे साक्षात परवरदिगार आहेत, अशा अर्थाचे कवन केले. महाराज मुसलमानांना देखील प्रेमाने, जेवण देत, प्रसाद देत. त्यांना ते योग्य ती देवस्थानची काही चाकरी देखील सांगत व ते ती करीत.

श्रीवासुदेवानंद दत्त अमरेश्वराची स्थापना होईपर्यंत श्रीस्वामी महाराजांनी दक्षिणेकडील यात्रा केली. तदनंतर आता ते गाणगापूर व नंतर उत्तरखंड यात्रेला निघाले. फलटण मार्गे श्रीगुरु नरसिंहसरस्वती स्वामीमहाराज पुण्याला आले. मुळा-मुठा नदीचं स्नान, ओंकारेश्वराचे पूजन इ. करुन भक्तवर्य दत्तुशास्त्री लाटकर यांचे प्रेमाग्रहास्तव त्यांचे कडे मुक्काम केला.

पुण्यात आल्या बरोबर श्रीगुरुंनी आळंदी, देहू व चिंचवडची यात्रा आपल्या दिंडीगणांसह प्रथम करुन घेतली. पुण्याला जे गुरुमहाराज गेले ते गरुडेश्वरी जाण्याचा तो रस्ताच होता म्हणून गेले. पवित्र क्षेत्र म्हणून काही गेले नसावे कारण ते क्षेत्रात गणलेले नाही. ते क्षेत्र नसून सुद्धा नृसिंहसरस्वती सद्‌गुरु तेथे दोन महिने राहिल्याचे वर्णन आहे. त्यावरुन ते भक्तसंतोषार्थच केवळ तेथे राहिले, असे म्हणणे भाग आहे. निस्त्रैगुण्यपंथी संचरणाऱ्या मुक्त पुरुषांना क्षेत्रे किंवा शहरे दोन्ही सारखीच होत. संपूर्ण मेदिनी ही त्यांना वाराणशीच झालेली असते. नित्यपूत परमात्मे असे श्रीगुरुमहाराज जिथे राहतील ते पवित्र क्षेत्रच होय. परमेश्वराच्या वास्तव्यानेच तर क्षेत्रांना क्षेत्रत्व आलेले आहे, एरवी नाही. संन्यासी चतुर्थ आश्रमी असूनसुद्धा बेदरच्या यवन बादशहाचे वाड्यात देखील गुरुराज गेल्याबद्दलचे वर्णन श्रीगुरुचरित्र ग्रंथामध्ये आलेले आहे. त्या चरित्राप्रमाणेच महाराजांचे देखील वागणे भक्तोद्धारार्थ समजावे. अज्ञानी संन्याशांचे नियम त्यांना लागू नव्हते. विधिनिषेधातीत अशा ब्राम्ही स्थितीमध्ये असणारांना नगरांत राहू नये इ. शास्त्रनिर्बंध नसतो. मुमुक्षु साधकांनासुद्धा निर्बंध नसतो. मग मुक्त अशा सिद्धांना तो कोठचा ? अस्तु -

दत्तुशास्त्री लाटकर हे दत्तभक्त वाडीला प्रतिवर्षी गुरुद्वादशीला येत तेव्हांच गुरुमहाराजांचे ते भक्त झाले होते. त्यांच्या कन्येला पुष्कळ वर्षे योग्य वर मिळत नव्हता. शास्त्रीबुवांनी तिला महाराजांचे चरणी घातली. महाराजांनी तिला दत्ताची उपासना सांगितली. त्याप्रमाणे ती गुरुमहाराजांची भक्ति करु लागली. चमत्कार असा झाला की, गुरुमहाराज पुण्यात असतानाच तिचा विवाहयोग अचानक जुळून आला. शास्त्रीबुवांना व त्या कन्येला मोठा आनंद झाला. नववधूवरांनी श्रीगुरुनाथांची पूजा केली. महाराज कन्येला म्हणाले,

'तुझी कामना पूर्ण झाली ना? आता दत्तोपासना सोडू नको बरे ! अशीच चालीव' श्रीदत्त प्रसन्न झाल्यावर दुर्लभ असे काय आहे? दुर्लभ ते सुलभ करणारे श्रीगुरुमहाराज स्वतःच दत्त होत.

दत्तूशास्त्री व त्यांची पत्नी या उभयतांनी भक्तिभावाने गुरुनाथांची पूजा केली. त्यांना नव्या छाट्या दिल्या. महाराजांना तेच फलाहार देत असत. महाराजांची पूजा करुन त्यांना नमस्कार केल्याशिवाय व त्यांचा आशीर्वादात्मक नारायण शब्द घेतल्याशिवाय शास्त्रिपत्नी अन्नग्रहण करीत नसत. पुढे महाराज जेंव्हा पुणे सोडून निघाले, तेव्हा त्यांनी विनविले की, 'आपण गेल्यावर मी आपल्या मुखातला 'नारायण' शब्द पुन्हा केंव्हा ऐकू शकेन? त्या अमृताने माझी तृप्ति होत होती' महाराजांनी त्यांना सांगितले की, 'तुम्ही आपला नमनाचा नियम देवापुढे चालू ठेवा. तेथे तुमची इच्छा पूर्ण होत राहील' साध्वीने श्रीगुरुमूर्तीची तसबीर देव्हाऱ्यात ठेवली व नित्याप्रमाणे पूजा व नमस्कार तसबिरीलाच ती करु लागली. महाराज वचन दिल्याप्रमाणे 'नारायण' म्हणून तिची तृप्ती करु लागले. ती साध्वी हयात असेपर्यंत रोज तिला महाराज हा असा चमत्कार दाखवीत होते. धन्य ती साध्वी व धन्य तिचा भाव ! माझे नरसिंहसरस्वती गुरुमहाराज हे साक्षात् श्रीदत्तात्रेय भगवानच होत, अशी त्या भक्तिणीची पूर्ण श्रद्धा होती. जशी श्रद्धा तसे फळ.

नरसिंह चिंतामण केळकर हे गुरुमहाराजांचे मिरजेतले इंग्रजी शाळामित्र होत. महाराजांना त्यांनी आपल्या घरी प्रेमाने पूजेला नेले. दोघा नरसिंहांचे प्रेमसंभाषण झाले. केळकर म्हणाले, 'आम्ही प्रपंचात गुंतून पडलो. काय करावे?' महाराज म्हणाले 'तुम्ही प्रवृत्तिरुप राजकारणात शिरलात. आम्ही निवृत्तीरुपी जगत्कारणात गेलो. दोन्हीही पंथ परोपकाररुपी फलदृष्टीने समानच आहेत. तुम्ही देखील लोककल्याण साधणारे सत्पुरुष धन्य आहात' याप्रमाणे दोघांचा

बालमित्रसंवाद झाला. केळकरांनी श्रीगुरुंना केसरी कचेरी दाखविली. न. चि. केळकर यांना त्या काळात साहित्य सम्राट म्हणत असत.

चैत्र शुद्ध प्रतिपदा-गुढीपाडवा, हा दिवस महाराजांचे जन्मोत्सवाचा होय. आप्पा भावे यांनी ती संधि साधली. त्यांनी महाराजांना पुन्हा आपल्या घरी दिंडीगणासह नेले. अभ्यंगस्नान घालून राजोपचारांनी त्यांची पूजा केली व सर्वांसह श्रीगुरुभगवंताला फलाहार दिला. सर्व भक्तगणाला पक्वान्नाचे स्वादिष्ट भोजन घातले. गुरुनाथांपासून त्यांनी आपल्या बंधू व माते सहित तारक उपदेश घेतले. श्रीगुरुंच्या चरणी पादुका घालून त्या पूजेकरिता त्यांच्या कडून मागून घेतल्या. महाराजांनी त्या त्यांना प्रीतीने दिल्या व आपली एक छाटी त्यांना प्रसाद दिली. अप्पांनी गुरुमूर्तींचा हार वगैरे घालून एक सुंदर फोटो काढून पूजेत ठेवला. भागवत म्हणून भावे हे नाव आप्पासाहेबांना अगदी योग्य होय. तीन दिवस भावभोक्ते श्रीगुरु त्यांचे घरी राहिले.

महाराज जिकडे जातील तिकडे त्यांचा वासुदेवानंदांच्या मूर्तीचा देव्हारा रामचंद्र कट्टी हे नेहमी नेत असत. त्यांच्यावर महाराजांची कृपादृष्टी होती. भाव्यांचे घरी एके दिवशी महाराजांची स्वारी प्रसन्न झाली. त्यांनी मुद्दाम कट्टींना जवळ बोलावले व मारुतीचा मंत्र व उपासना पद्धति त्यांना समजावून दिली. प्रीतीने व नीतीने सेवा करणारावर श्रीगुरुनाथ असे प्रसन्न होत असत व न मागता त्यांचे कल्याण त्याचे पदरात घालीत असत. सर्वांचे अंतरीचा भाव ओळखून श्रीगुरु तसे तसे वागत. जसा आरसा तसे प्रतिबिंब. गुरुमूर्ति भावना-परतंत्र असत. परमेश्वर हा भावनापरतंत्रच आहे.

श्री. राजेसाहेब परांजपे यांनी गुरुमहाराजांना आपल्या घरी नेले. त्यांनी पूजा, आरती करुन त्यांचे कडून पत्नीसहवर्तमान गुरुपदेश घेतला. वेदान्त श्रवणाची आवड दाखविताच महाराजांनी

त्यांना विवेक चूडामणी नामक वेदांतग्रंथ निमित्ताला हाती घेऊन स्वानुभवबोध कथन केला.

राजेसाहेबांचे पुतणे दामूअण्णा परांजपे यांनी श्री स्वामीं सह भीमाशंकर यात्रा केली. नाम सप्ताह केला. हा उत्सव राममंदिरात झाला. तुळजापूरचे एक साधक सदाशिवराव परचुरे पुण्याला गुरु अनुग्रह घेण्यासाठी श्रीस्वामीमहाराजांचे दर्शनार्थ आले. त्यांना अनुग्रह देऊन व बोध करुन कृतार्थ केले. हे भक्त पूर्ण पूर्वतयारीचे असल्याने काही गुरुवाक्य कानी पडताच आत्मज्ञानाची अनूभूती प्रत्यक्ष आली. श्रीस्वामींनी पुण्याला खरेदी केलेली पालखी यांनी अमरापुरी पोचवली व तेथे बराच काळ सेवा केली. पुढे त्यांनी संन्यास ग्रहण केला.

राजेसाहेबांचे कडील वास्तव्यात वेद पारायणे चारी वेदांची करविली. त्यांचे कडे जमलेल्या मोठ्या स्त्री समुदायाला श्रीस्वामींनी स्त्रीधर्माचा उपदेश केला. 'पतिसेवा करणे व पतिदेवांचे आज्ञेत राहणे' असे त्यांच्या उपदेशाचे सार होते. या व्यतिरिक्त स्त्रीयांना दुसरे तारक काही नाही. तसेच श्री टेंबे स्वामी महाराज कृत स्त्रीशिक्षेचाही उपदेश केला. आप्पासाहेब भावे यांनी ही श्रीस्वामींची स्वगृही नेऊन पुष्कळ, उत्तम सेवा केली.

पुण्याहून पुढे पुणतांबे क्षेत्रात श्री स्वामी गेले. तेथील गोदास्नान व चांगदेव महाराजांचे पूजन केले व क्षेत्रस्थ ब्राम्हणांना अंगावरची भारी भरजरी शाल प्रसाद म्हणून देऊन टाकली.

तेथून पुढे कारंजा ह्या श्रीनृसिंहसरस्वती दत्तगुरुंच्या जन्मस्थानात श्रीस्वामी भक्तांच्या बरोबर गेले. श्रीगुरुचरित्राचे नायक अंबा-माधव सुत श्रीनरहरी हे श्रीगुरु नरसिंहसरस्वती दत्तप्रभू आहेत. नरसोबावाडी, औदुंबर व गाणगापूर ही यांची स्थाने होत.

**कारंजाला** श्रीगुरुंचे जन्म स्थान (वाड्यातील) पाहिले. तेथे पूजा, प्रार्थना केली. त्या वेळी हल्लीचे श्रीगुरु मंदिर स्थापन झालेले

नव्हते. तथापी श्रीसद्‌गुरु वासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराज व श्रीदीक्षित स्वामी महाराजांनीही **‘हे स्थान पुढे प्रकट होईल’** असे सांगितले होते.

कारंजाहून बडनेरा ह्या श्रीसीताराम महाराज टेंब्ये यांच्या समाधी स्थानी श्रीस्वामी गेले. तेथे पूजा, आरती, स्तोत्र इत्यादी झाले. पादुका स्थापना झाली व तेथील रहिवासी सेवक गण व दर्शनार्थ येणाऱ्या भाविकांसाठी पाण्याची मुबलकता व्हावी म्हणून विहीर खणली. तिचे नांव ‘शांता वापी’ असे ठेवले आहे.

पुढे श्रीस्वामी महाराज अमरावतीला एकवीरा देवीचे स्थानात दर्शनाला गेले. अमरावतीच्या भविक व विद्वान सज्जनांनी श्रीस्वामी महाराजांचा उत्तम सत्कार केला, सेवा केली. श्रीस्वामी महाराजांच्या **विदेही** स्थितीचा बोध होण्यास येथे एक प्रसंग घडला तो असा, चिमोटे नामक सज्जनांनी श्रीस्वामींना घरी आणून त्यांची यथासांग पूजा करण्यास आरंभ केला. प्रारंभी मंगलस्नान घालण्यासाठी ओसरीवरील एका झोपाळ्यावर श्रींना बसविले. घरातील दोन लहान मुले २॥-३ वर्षे वयाची होती. त्यांनाही कौतुकाने झोपाळ्यावर बसविले होते. स्नान सुरु असताना अचानक कडकडा शब्द करीत छताची तुळई झोपाळ्यासह तुटून खाली आली. श्रीस्वामी महाराजांनी त्या मुलांना पोटाशी घेतले व तुळईच्या तुटलेल्या टोकाचा भयंकर आघात स्वशिरावर घेतला. त्यामुळे बोटभर खोल अशी टाळूला जखम झाली. रक्त वाहू लागले. सभोवतालच्या मंडळींनी मुलांना खाली घेतले व धावपळ करुन जखमेत औषध भरु लागले. इतके होत असताना स्वामी महाराज मात्र देहभाव विसरुन समाधी स्थितीत स्वस्थ होते. काही वेळाने उत्थान अवस्थेत आल्यावर सर्वांना विचारु लागले ‘स्नान का बंद केले?’ लोक म्हणाले ‘आपणावर मोठाच आघात झाला आहे’ स्वामी म्हणाले ‘कितपत लागले आहे रक्त वगैरे आले

काय?' लोक म्हणाले 'महाराज ! रक्ताचा तर तलाव झाला आहे. आपण हे असे काय विचारता?' त्यावर स्वामी उत्तरले की 'आम्हाला काही दु:ख होत नाही. स्नान बंद करु नका. पूर्वी प्रमाणेच चालू करा' मंडळींनी पुन्हा उष्णोदक घातले व घाईने सर्व आवरुन दुसऱ्या छाट्या परिधान करुन पूजा स्थानी बसविले. श्रीस्वामी मात्र सतत हसतच होते. पूजा वगैरे जे कर्तव्य असेल ते करुन घ्या ! म्हणाले -

नंतर चिमोटे यांनी गुरु मंत्र घेतला. पुष्कळ मंडळी संध्याकाळ पर्यंत दर्शनास येत होती. त्यांचेशी बोलून समाधान करीत प्रसन्न मुखाने श्रीस्वामी बसलेले होते. त्याच्या चेहऱ्याकडे पाहून एवढी प्राणांत जखम यांना झालेली आहे अशी कल्पनाही कोणाला येत नव्हती.

तेथील शिंगणापूरकर यांना आदले रात्री स्वप्न पडले होते व चिमोटेचे घरावर एक काळपुरुष दिसला व नंतर तो कोणाला तरी घेऊन जाताना दिसला. त्या बालकांचा मृत्यू टाळून स्वामी महाराजांनी ते संकट निवारण करण्यासाठी तो मर्मांतक आघात मुलांना पोटाशी घेऊन स्वत:वर घेतला. पण याची एका शब्दानेही कुणाला जाणीव करुन दिली नाही. श्रीस्वामी महाराज विदेही अवस्थेत होते. ते साक्षात सत्चित्-आनंदरुप ब्रह्मच होते. पुढे ती जखम भरुन येण्यासाठी डॉ. सोमण बरेच दिवस उपचार करीत असत. मस्तकाचे आत मेंदूपर्यंत वस्त्राची वात घालून जेंव्हा ते ती जखम धुवून काढीत, तेंव्हा त्यांना भय वाटे. या यातना स्वामी कसे सहन करतील? असे वाटून ते भूल देऊ का? असे विचारीत. श्रीस्वामी महाराज म्हणत भूल देऊ नका. आम्ही स्वस्थ बसतो तुम्हाला जशी कृती करायची असेल तशी करा. मग डॉ. सोमण तशीच जखम धुवू लागले. आज पर्यंत असे दु:ख सहन करणारा एकही पुरुष आम्ही पाहिला नाही. असे ते म्हणत. एवढी जखम भूल न देता मी वात घालून धूतो, तरी जे अंग सुध्दा हलवित नाहीत, त्यांच्या विदेही स्थितीची तारीफ करावी तेवढी थोडी आहे. महाराज स्वत: सच्चिदानंदघन ब्रह्म होते. सोमणांना

श्रीगुरु स्वामी महाराजांची खरी मुक्त, विदेही, देहरहित स्थिती त्यावेळी समजून आली. त्यांची आनंदयुक्त मुद्रा दुःख दशेतही लोपली नाही व सुख दशेतही वाढली नाही.

या सेवेमुळे डॉक्टरांचेही मोठे कल्याण झाले ते पुढे स्वामींचे निस्सीम, एकनिष्ठ भक्त बनले. या प्रसंगावरुन जीवन्मुक्त मुक्त पुरुषाची लक्षणे श्रीगुरुंच्या अंगी असलेली सज्जनांना दिसून आली. महाराज सिध्द पुरुष आहेत. हे ब्रह्मवित् शिरोमणी साक्षात् श्रीदत्त अवधूत आहे असे मनी बाळगून सोमण, खापर्डे इ. सूज्ञ पुरुषांनी त्यांची आपआपल्या घरी नेऊन महापूजा केली.

हंपी विरुपाक्षजवळ कोपळ या नावचा एक गाव आहे. तेथील कुलकर्णी नावाचे गृहस्थ, थोरल्या मुलाच्या अचानक झालेल्या मृत्युमुळे विरक्त होऊन यात्रा करित फिरत होते. त्यांनी १२ वर्षे उपोषण करुन पायी प्रवास केला. त्यांना दृष्टांत झाल्यामुळे ते टाकळीला श्रीस्वामी महाराजांच्या दर्शनाला आले. त्यांनी श्रीगुरुंना संन्यास दीक्षा देण्याविषयी प्रार्थना केली. त्यांची ती प्रार्थना सद्गुरुंनी मान्य केली व त्यांना दीक्षा दिली. नंतर वाडीचे अधिकारी संन्यासी श्री आठल्येस्वामी यांच्याकडून दंड देववला व सच्चिदानंद स्वामी असे नाव ठेविले.

नंतर हे श्रीस्वामीमहाराजां सोबत अमरापुरला आले व श्री कुलकर्णी यांच्या माडीवर राहू लागले. रोज सकाळी ते महाराजांस वंदन करुन जात असत. श्रीगुरुमहाराजांच्या आज्ञेवरुन त्यांनी पुढे तीर्थयात्रा केली व श्रीस्वामी महाराज गरुडेश्वरला निघून गेले.

दुसरे दिवशी औरवाडला सच्चिदानंद स्वामी नित्याप्रमाणे मंदिरात दर्शनाकरिता आले तेंव्हा त्यांना देवाच्या जागी श्रीस्वामी महाराजांचे दर्शन झाले. प्रत्यक्षात तेंव्हा गुरुमहाराज गरुडेश्वरला गेले होते. महाराज नित्य तेथे आहेतच हे या प्रसंगावरुन सिध्द होते.

अमरावतीहून पुढे प्रवास गरुडेश्वरकडे आरंभ झाला. सोबत डॉक्टर सोमण, श्री रामचंद्र कट्टी व अनसूया बाई सेवेकरी भक्त मंडळी होती. सूरत-भडोच-अंकलेश्वर-नांदोद असा प्रवास झाला. श्रीमंत नांदोदकर राणीसाहेबांनी तेथील लक्ष्मी नारायण मंदिरात मुक्कामाची व्यवस्था केली व सेवा केली. तेथून अमरावतीला तार करुन इतर भक्त मंडळींना गरुडेश्वरला येण्यास कळविले व बैलगाडीने प्रवास करुन स्वामी महाराज गरुडेश्वरला पोचले. गेल्याबरोबर भूमीला वंदन करुन उत्कंठापूर्वक गुरुसमाधी मंदिरात गेले. अत्यंत भावपूर्ण व गहिवरलेल्या अवस्थेत अनन्य भक्तीने हात जोडून सद्‌गुरु वासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराजांचे समोर श्रीस्वामी उभे राहिले. अष्टसात्विक भाव उत्पन्न होऊन प्रेमाश्रू पाझरु लागले. भूमीवर लोटांगण घालून 'त्राहिमाम्' म्हणून वंदन केले.

गरुडेश्वरच्या समाधी दर्शनानंतर, गरुडेश्वर, करोटेश्वर, नारदेश्वर या सह श्रीदत्त दर्शन घेतले. भावावस्थेतच श्री समाधी स्थानी पूजन झाले. जणू त्यांचे गुरुमहाराजांचे सह प्रेमाने संभाषणच सुरु असावे असे पहाणाऱ्यास जाणवत होते. दुसरे दिवशी द्वादशीला पूजा नैवेद्य झाल्यावर श्री स्वामींनी ७ वर्षे उपवासाचा चालवलेला नियम (गुरु दर्शन होई पर्यंतचा) सोडला व भोजन प्रसाद घेतला.

आषाढी पौर्णिमेला क्षौर, दंडासह नर्मदास्नान झाले व हा चातुर्मास श्रीस्वामींनी गुरु महाराजांचे सान्निध्यात केला. श्रीगुरु महाराज व श्रीस्वामी यांची सर्व बाबतीत असलेली गुण समानता सर्वांना जाणवत असे त्यामुळे यांचे वर सर्व भक्तांचे अपार प्रेम जडले होते. अनेकांना या काळात अनुग्रह मिळाला. तथापि श्रीस्वामींचा भाव मात्र एका गुरु सेवकाचाच कायम असे. स्वतः जीवन्मुक्त महात्मा असूनही एका मुमुक्षू साधका प्रमाणे गुरु सेवा अत्यंत तत्परतेने व तल्लीन होऊन सतत करीत असत. शेवटी गरुडेश्वरलाच

देह ठेवावा असा स्वामींचा मानस होता की काय न कळे. पण त्यांना काही काळानंतर श्रीगुरु महाराजांचे प्रमाणेच जबरदस्त अतिसाराचा उपद्रव सुरु झाला व अतिशय दुर्बलता शरीराला आली होती.

श्रीस्वामींची ही अवस्था भक्त गणांना पाहवत नव्हती. शेवटी ते सर्व भक्त गुरु महाराजांना शरण गेले व प्रार्थना करुन दिगंबराचा सप्ताह श्रीस्वामींना प्रकृती स्वास्थ्य लाभ व्हावा यासाठी आरंभ केला. याचा मात्र अनुकूल परिणाम होऊन हळूहळू प्रकृती पूर्ववत् झाली.

बरे वाटू लागल्यानंतर पुनश्च श्रीस्वामी जगदोध्दारार्थ संचार करण्यास श्रीगुरु आज्ञेने गरुडेश्वरहून परत निघाले. प्रथम तिलकवाडा येथे मुक्काम करुन पुढे कर्नाळी येथे गेले. कर्नाळी हे मोठे क्षेत्र आहे. येथे काही दिवस भक्तांसह वास्तव्य झाले.

येथे अन्नपूर्तीची एक लीला श्रीस्वामींनी केली. सर्व ग्रामस्थांना पुरण पोळीचे भोजन देण्याचे ठरवले. पोळ्या करायला मात्र केवळ दोन वृद्ध सेवेकरी स्त्रिया होत्या. पण श्रींच्या संकल्पाने अन्न काही कमी पडले नाही. एका भक्ताने त्या स्त्रियांची परिक्षा पहाण्यासाठी मुद्दाम आग्रहकरुन जास्तीच पोळ्या वाढून त्या संपतील असा प्रयत्न चालविला होता. पण त्यालाच शेवटी फजित व्हावे लागले.

पुढे चांदोदला एक सिद्ध महात्मा श्रीस्वामींच्या भेटीला आले होते. श्रीस्वामींची ब्राम्हीस्थिती ओळखून त्यांनी भगवद् गीतेतील वर्णनात्मक श्लोकाने त्यांची स्तुती केली.

या निशासर्व भूतांना तस्यां जागर्ति संयमी ।
यस्यां जाग्रति भूतानी सा निशा पश्यतो मुने: ॥१॥

श्रीगुरुनाथांनी जसा कृष्णेतून जलप्रवास केला होता. तसाच श्रीनर्मदाजलातून ही केला. शुकाचार्य व व्यास यांची स्थाने पाहून अनसूया आश्रमात गेले. तिथून पुढे सिनोराला गेले. तिथे गणपती व

मार्कंडेश्वर पूजन करुन कबीरवडा मध्ये चक्रतीर्थात स्नान करुन भडोचला आले. गुरुद्वादशीपर्यंत भडोच (भृगू क्षेत्र) येथे वास्तव्य झाले. पुढे श्रीस्वामींची इच्छा उत्तरेकडे यात्रेस जाण्याची होती. परंतू प्रथम बरोबरच्या भक्त-मेळ्याला पुन्हा अमरापुरी पोचवण्याचे आश्वासन त्यांनी दिले होते ते पूर्ण करण्यासाठी परत अमरापूरकडे निघाले. प्रथम मुंबईला रेल्वेने आगमन झाले. येथे डॉक्टर भडकमकरांनी सर्व व्यवस्था पूर्वक सेवा करुन श्रीस्वामींना ठेवून घेतले. श्रीस्वामींना मुंबईच्या मुक्कामात समया, फळे, मोसंब्या सारख्या वस्तू अर्पण केलेल्या त्यांनी सर्व अमरापूरला अमरेश्वराच्या करिता पाठवून दिल्या.

मुंबईच्या भक्तांचे समाधान करुन पुढे श्रीस्वामी पुन्हा पुण्याला आले. तेथून श्रीक्षेत्र औदुंबर ह्या कृष्णाकाठच्या क्षेत्री काही काळ वास्तव्य होते. तेथून अमरापूरला येऊन सर्व भक्तांना अमरेश्वराच्या सेवे विषयी समजावून सांगितले. सांगली इत्यादि भागात काही काळ प्रवास झाले. शिरटी, शिरढ्वाड, इंगळीला आले.

पूर्वी राजूरला वासुदेवानंद सरस्वतींनी सीताराम महाराजांकडून संहिता स्वाहाकार करवीला होता. त्यावेळी तेथे द्वारका पीठाचे जगद्‌गुरु, टाकळीचे दादा महाराज हैद्राबादचे भटजी महाराज वाडीचे नरसिंहसरस्वती स्वामी महाराज इ. अधिकारी मंडळी जमली होती. अशा या अभूतपूर्व संतमंडळींचे व प.प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामींचे दर्शन घेण्याच्या इच्छेने, सोलापूरचे रा. विष्णुपंत पंची हे आपल्या वडील व मातोश्री सह तेथे गेले होते. तेथील तो सोहळा पाहून सर्वांना धन्यता वाटली. श्रीवासुदेवानंद सरस्वतींकडून मंत्रोपदेश घ्यावा अशी त्या त्रिवर्गाची इच्छा होती व त्याप्रमाणे त्यांच्या वडील व मातोश्रींना मंत्रोपदेश मिळाला आणि कार्य बाहुल्यामुळे विष्णू पंतांचा तसाच राहून गेला.

स्वाहाकार आटोपताच टेंबे स्वामी महाराज गरुडेश्वरी निघून गेले. आणि हे परत सोलापूरला आले. आपला हेतू अपूरा राहिल्यामुळे त्यांच्या जीवाला फार तळमळ लागून राहिली. कोणत्या उपायाने आपली भेट होऊन कार्य साधेल हा विचार त्यांचा चालू होता. पुढे थोड्याच दिवसात वासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराजांनी गरुडेश्वरी देह ठेवल्याची वार्ता त्यांच्या कानी आली व त्यांची पूर्णच निराशा झाली.

आता ते नाहीत पण त्यांचे जे पट्टशिष्य दीक्षितस्वामी महाराजांकडून तरी आपण मंत्रोपदेश घ्यावा असा विचार करुन वाडीला जाण्याची ते तयारी करु लागले.

त्याच रात्री त्यांच्या वडील व मातोश्रींच्या थोरले महाराज स्वप्नात येऊन 'तुमच्या मुलाने आमच्या शिष्याकडून उपदेश घेण्याचे जे योजिले आहे ते फार चांगले आहे. आम्हाला पसंत आहे. माझ्या व त्यांच्यात काही भेद नाही'असे हास्य मुखाने सांगितले आणि त्याच वेळी विष्णुपंतांनाही सांगितले, 'तू जो वाडीला जाण्याचा विचार केला आहेस तो फार चांगला आहे. तो व मी भिन्न नाही अर्थात तो माझाच उपदेश असे समज'

दुसऱ्या दिवशी सकाळी प्रत्येकाने आपआपले स्वप्न दुसऱ्याला सांगितले आणि पुढे विष्णुपंत वाडीला निघून आले. त्यावेळी महाराज पंचक्रोशीत भक्तानुग्रहार्थ संचार करीत असल्याचे समजताच इंगळी मुक्कामी जाऊन त्यांचा हेतू सफल झाला.

श्रीपंची, श्रीस्वामींचे अत्यंत एकनिष्ठ व प्रेमी भक्त होते. ते नियमीत वाडीला येणारे होते. यांचा उल्लेख श्री.प.पू. योगीराज गुळवणी महाराजांच्याही चरित्रात आला आहे. श्री गुळवणी महाराज ही सोलापूरी यांचे कडे जात असत. देहपाताच्या वेळीस अनायासेन मरणम् यांना साध्य झाले. वृध्दापकाळी भजन करताना त्यांचा देहपात झाला. हे सुरेल आवाजात भजने म्हणत. अस्तु.

श्री स्वामी नंतर सदलगा, चिक्कोडी करीत कोल्हापूरला आले. तेथून श्रीगुरुमहाराजांच्या पुण्यातिथी उत्सवानंतर वऱ्हाड प्रांतात जाण्याचे ठरले. जाण्यापूर्वी अमरापूरच्या भक्तांना उपदेश करताना अमरापूर माहात्म्य समजावून सांगितले ते असे.

## ''श्रीनृसिंहसरस्वती उवाच''

प्रयागः संगमः ख्यातः । काशिकात्वमरापुरी ।
गयातु गोपुरी ज्ञेया । त्रिस्थली दाक्षिणी स्मृता ॥१॥
वास्वादिदेवाः पितरोर्यमाद्या । रुद्रादि देवा निवसंति सर्वे ।
शुक्लात्परं गोपुरि तीर्थराजं । गोतीर्थमेतत्त्वपरं च रुद्रं ॥२॥
तीर्थं पितृणां च हि तत्र दान- । स्नानादि पुण्यं ह्यमितं च नित्यं ।
तीर्थेश्वराणामुपचारयुक्तं । पूजाफलं सत्सकलार्थवित्वं ॥३॥
गोविंदगोपालकगोविलासी । गोपुण्यतीर्थे च वसत्यकामः ।
गोलोक गोभिः सहितो विलासं । नित्यं स राधारतिकृन्मुकुंदः ॥४॥
एवं देवाश्वामरेशस्य नित्यं । पूजां कृत्वा सर्वतीर्थे वसंति ।
सर्वेशं तं सच्चिदानंद पूर्णं । नित्यं वंदे स्वेष्टदं चामरेशं ॥५॥
सर्वतीर्थात्परं तीर्थं । नामरेशात्परो गुरुः ।
नान्नपूर्णायोगिनीभ्यो भुक्तिमुक्तिविरागदाः ॥६॥
अखिलानि च तीर्थानि ब्रह्माण्डान्तर्गतानि च ।
देवसिद्धेश्वरादीनि । संति तान्यमरापुरे ॥७॥
कैलासवासी गिरिजाविलासी । काशीनिवासी ह्यमरेश्वरोऽसौ ।
श्रीकाशिगंगामणिकर्णिकाश्वाऽ मरापुरे सर्वतीर्थे वसंति ॥८॥
श्रीशान्नपूर्णेशसयोगिनीयुक् । स तिष्ठतीहामरपुर्यजस्त्रं ।
श्रीदत्तदेवोह्युभयर्द्धिसिध्या ऽ मरापुरे काशिपुरेश देवः ॥९॥

अनाद्यनंत: श्रुतिशास्त्रसारो। महान्परानंद चिदेककंद:।
श्री काशिनाथो ह्यमरेश्वरो यो ऽ मरापुरे देव गणान्वितोस्ति ॥१०॥
करीशपन्नगांगोऽसौ। हारी कमललोचन:।
कमलामलपादाब्ज:। श्रीहरिर्गिरिजापति: ॥११॥
नीलांगो गिरिगोगोप गोपी चंदनगोप्रिय:।
सुनंदनंदीगाणेशकुमारतनयप्रिय:।
गंगाशशिवरांग: श्रीमोक्षलक्ष्मीपदप्रद: ॥१२॥
इति अमरापुर माहात्म्यं संपूर्णम्॥

इत्यादिक बारा संस्कृत श्लोक आहेत. त्यांचा संक्षिप्त अर्थ येथे देतो तो असा -

श्रीगुरु म्हणाले, 'भक्तजनहो तुम्हाला श्रीक्षेत्र अमरापुराचे माहात्म्य सांगतो ते ऐका. श्रीकृष्णापंचगंगासंगम, अमरापुर व गोपुर अशी ही दक्षिणेतली त्रिस्थळी आहे. संगम हा प्रयाग, अमरापुर ही काशी व गोपुर (गौरवाड) ही गया समजा. ह्या गोपुरात शुक्लतीर्थाचे वरती कृष्णाप्रवाहात, तीन तीर्थे आहेत. गोतीर्थ, रुद्रतीर्थ व पितृतीर्थ हे तीर्थराज होत. येथे अष्टवसु, अर्यमादि पितर व रुद्रादिक सर्व देव नित्य वसतात. येथे स्नान, दान, जप, तर्पण इत्यादि अनुष्ठाने केल्यास मोठे पुण्य लागते. तीर्थासह येथील देवांचे पूजन केल्याने ब्रह्मज्ञान होऊन मनुष्य सर्वज्ञ होतो. या गोपुरामध्ये राधेवर प्रेम करणारा मुकुंद परमात्मा श्रीगोपालकृष्ण सदासर्वकाळ गोलोकातील कामधेनुसह वास्तव्य करतो. गोतीर्थावर या गोविंदाला सर्व कामधेनु आपल्या दुग्धाचा अभिषेक करतात व त्याला आपले अमृतमय दुग्ध त्या पाजतात. तो गोपालकृष्णहि त्या धेनूचे योग्य परिपालन करतो. गोविंद, गोपाल व गोवृंद गोपुरात सतत क्रीडा करीत राहिलेले आहेत. असे हे गोपुर मोठे महत्वाचे आहे.

हे गोपुरात वर्णिलेले वसुरुद्रपितर इत्यादिक व इंद्रप्रभृति देव अमरापुरात येऊन श्रीवासुदेवानंददत्तामरेश्वराची पूजा भक्तीने करतात. तेथील प्रयागाख्य 'सर्वतीर्थांमध्ये' ते राहतात. अमरेश्वराचे पूजनाने ते सर्व देव अभीष्टाला पावले म्हणून त्यांना अमरापुरातच रहावेसे वाटते. अमरेश्वर हा सर्व देवांचाही देव आहे. भक्तांना तो कल्पतरुप्रमाणे इच्छितप्राप्ति करुन देतो. त्या भक्तेष्टपूरकाला आम्ही अभिवंदन करतो. सत्यज्ञानानंदपूर्ण प्रभु श्रीदत्तामरेश्वर वासुदेवगुरुराज सर्वकाळ अमरापुरात विजय पावत आहेत. श्रीअमरेश्वराहून श्रेष्ठ दुसरा गुरु नाही. 'सर्वतीर्थाहून' श्रेष्ठ असे दुसरे तीर्थ नाही व अमरेश्वरासन्निध राहणाऱ्या अन्नपूर्णा व योगिनी ह्यांच्या सारख्या भुक्ति, मुक्ति, विराग देणाऱ्या दुसऱ्या देवता नाहीत हे निश्चित होय. ह्या अमरापुरामध्ये ब्रह्मांडातली सर्व तीर्थे, सर्व सिद्ध व सर्व देव राहतात. प्रत्यक्ष परमेश्वर जे हरि आणि हर तेच मुख्य येथे वसतात. जे गिरिजाविलासी कैलासाधिपति काशीपुरवासी श्रीशंकर, तेच हे अमरापुरात अमरेश्वर आहेत. म्हणून अमरापुर ही काशी होय व येथे वाहणारी महानदी हीच गंगा होय. ''सर्वतीर्थांत'' मणिकर्णिकाप्रमुख सर्व तीर्थे आहेत ही गोष्ट निःसंशय समजा. अमरापुर हे सर्व देवांचे व सर्व तीर्थांचे आश्रयस्थान आहे, ही गोष्ट आम्ही वारंवार सांगतो. श्रीमहालक्ष्मी, श्रीअन्नपूर्णा व चौसष्टयोगिनी यांसहवर्तमान विधिहरिहरमूर्ति श्रीदत्तभगवान ह्या अमरापुरक्षेत्रात सर्वकाळ नांदत आहेत. ऋद्धिसिद्धि ह्या त्यांच्या पदकिंकरी आहेत. ते दत्तदेव भक्तांना इहपराचा लाभ देणारे भक्तकामकल्पद्रुम होत. तेहतीस कोटि देव त्यांचे आज्ञाधारी होऊन तत्सन्निध राहतात. हे श्रीदत्तात्रेय अमरेश्वर भगवान सर्व श्रुतीचे व सर्व शास्त्राचे सार आहे. हे अमरेश्वरच सर्वव्यापक सच्चिदानंदकंद परब्रह्म समजा. हे श्रीदत्तात्रेय अमरेश्वरच कमळलोचन, कमलचरण, वनमाली श्रीविष्णु

होत. हे अमरेश्वरच गजचर्मांबरधर पन्नगभूषण गिरिजापति श्रीशंकर होत. अमरेश्वर हे नीलांग म्हणजे नीलकंठ हर आणि नीलांग म्हणजे घनश्यामसुंदर हरिदेखील आहेत. ह्या हरिहरमूर्तीला सुनंद, नंदी, गणेश व कुमार हे तनय प्रिय आहेत. अर्थात् ते सुनंदादिक अमरेश्वरासन्निध राहतात. ह्या हरिहरमूर्ति अमरेश्वराला चारा, गाई, गोप, गोपी, अन्न, वस्त्र, घृतदुग्ध, धनादिक प्रिय आहेत. अर्थात् या सर्वांची समृद्धि येथे राहील. अमरेश्वर हे मोक्षलक्ष्मीचे व भोगलक्ष्मीचे कान्त, भक्तांना भोग व मोक्ष देणारे श्रीपाद श्रीवल्लभ श्रीनरसिंहसरस्वती श्रीवासुदेवानंदसरस्वती श्रीदत्त भगवान होत. ह्या अमरेश्वरप्रभूची सुखाची राजधानी असे अमरापुर महाक्षेत्र चतुर्विध पुरुषार्थाचे मूळ पीठ होय. म्हणून याला 'श्रीवासुदेवानंदसरस्वती पीठ' अशी संज्ञा आम्ही दिली आहे. येथे राहणाऱ्या भक्तांना चतुर्विध पुरुषार्थाचा लाभ अनायासे केवळ भजन, पूजन, सेवन मात्राने होईल. कारण भक्तकामधेनु भगवान् श्रीदत्तगुरुराज या स्थानांत अखंडित विराजमान झालेले आहेत. अमरापुर माहात्म्य असे मोठे गहन आहे.'

वऱ्हाडमार्गे पुढे उत्तरेच्या यात्रेला श्रीस्वामी निघाले. जाताना श्रींनी श्रीगुरुस्वामी (प.प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराज) रचित स्तोत्र म्हटले ते असे:-

ऋतकृत्स्वगिरोऽमरोऽभवद्द्विजपत्न्यास्तनयोऽपियोऽभवः ॥
स नृसिंहसरस्वती यतिर्भगवान्मेऽस्ति परा वरा गतिः ॥१॥
प्रणवं प्रपपाठ जन्मतो विजहाराऽल्पदशोऽपि सन्मतः ॥
स नृसिंहसरस्वती यतिर्भगवान्मेऽस्ति परा वरा गतिः ॥२॥
मृतविप्रसुतं व्यजीवयद्य उ वंध्यामहिषीमदोहयत् ॥
स नृसिंहसरस्वती यतिर्भगवान्मेऽस्ति परा वरा गतिः ॥३॥
स्वतनुं यतये व्यदर्शयद्द्विजगर्वं बुरुडाह्वयनाशयत् ॥
स नृसिंहसरस्वती यतिर्भगवान्मेऽस्ति परा वरा गतिः ॥४॥

प्रददौ हि मृतप्रियस्त्रिया अपि सौभाग्यमुयन्नमस्क्रिया ॥
स नृसिंहसरस्वती यतिर्भगवान्मेऽस्ति परा वरा गतिः ॥५॥
स्वमुदेऽभवदन्नवृद्धिकृत्सुवशाया अपि वंशवृद्धिकृत् ॥
स नृसिंहसरस्वती यतिर्भगवान्मेऽस्ति परा वरा गतिः ॥६॥
द्रुरकार्यपि शुष्ककाष्ठतः कुसुरौ येन शुची च कुष्ठतः ॥
स नृसिंहसरस्वती यतिर्भगवान्मेऽस्ति परा वरा गतिः ॥७॥
अमराख्यपुरे च योगिनीवरदो योऽखिलदोस्ति योगिनीः ॥
स नृसिंहसरस्वती यतिर्भगवान्मेऽस्ति परा वरा गतिः ॥८॥

--------*****---------

त्यानंतर श्रीस्वामींनी प्रवासात तळोदीला जात असताना कडोशी नामक स्थानात तेथील पाटलाच्या सांगण्यावरुन 'पांडवांची स्थाने' नावाचा परिसर पाहिला. तेथे एक तीर्थकुंड होते. त्यात पाऊल बुडेल इतकेच पाणी होते. श्रीस्वामी त्या तीर्थात स्नान करण्यासाठी उतरले तोच असा चमत्कार झाला की आतून बुडबुडे सुरु झाले व पाहता पाहता कुंडातील पाणी वाढून बुडीमारुन स्नान करण्या इतके झाले. त्यांत महाराजांनी स्नान केले. तीर्थ देवतेने या प्रमाणे श्रीस्वामींचा सत्कार केला.

पूर्वी एकदा अन्न वृद्धीचा प्रकार श्रींच्या कृपेने घडला होता. तद्वतच एक वेगळी लीला श्रींच्या संचारादरम्यान आष्टे नावाच्या सांगली नजीकच्या गावी घडली होती, ती येथे देत आहे.

या आष्टा गावच्या एका ब्रह्मचारी बुवांना योगाचे पाठ शिकवण्याचे निमित्य श्रींचे काही दिवस भक्त गणांसह वास्तव्य झाले होते. तो मुक्काम संपवून पुढे प्रवासाला निघाल्याच्या दिवशी सर्वजण आपापले सामान सुमान बांधून श्रींचे बरोबर मोटारने प्रवासास जाण्यासाठी तयार होऊन बसले. पण खूप वेळ झाला तरी त्या

दिवशी मोटार आलीच नाही. माध्यान्ह काळ झाला. ग्रामस्थांना या प्रकाराची कल्पना नसावी. कारण श्रींना भिक्षेकरिता आमंत्रण देण्यासही कोणी आले नाहीत. इकडे योगाचे संबंधी ब्रह्मचारी बुवांबरोबर चर्चा करीत श्रीस्वामी शांतपणे बसले होते. भक्तांनी शेवटी उशीर झाल्याचा व श्रींची भीक्षा व भक्तांचे भोजनाची अद्याप काहीच व्यवस्था नसल्याचा प्रकार निवेदन केला. श्रीस्वामी म्हणाले, 'आज ग्रामस्थांना आम्ही पक्वान्न भोजन देणार आहोत' असा श्रींचा संकल्प होतो तोच तेथे एक मनुष्य गाडीभर शिधा साहित्य घेऊन आला. शे-दोनशे माणसे जेवतील इतकी सामग्री आणून त्याने श्रींना अर्पण केली व 'माझी भीक्षा स्वीकारावी' अशी प्रार्थना केली. श्री स्वामींनी लगेच माणसे पाठवून सर्व ग्रामस्थ ब्राम्हणांना सहकुटुंब प्रसादास आमंत्रित केले. त्या प्रमाणे सर्व समाज जमला. केळीच्या पानासकट संपूर्ण तयारी गाड्यावर होती. ग्रामस्थ स्त्रियांनी लगेच पाक सिद्धी सुरु केली. रांगोळ्या गुलालासह उत्तम पंगतीची मांडणी होऊन लाडवाच्या भोजनाचा श्रीस्वामींसह सर्वांनी प्रसाद घेतला.

उमरेड येथे नाईक कुटुंबावर श्रीस्वामींनी कृपा केली आहे. त्यांचे चिमूर गावी त्यांनी श्रीस्वामींना नेले असता तेथील एक डॉक्टर श्रींची परीक्षा पाहावी असा हेतू धरुन दर्शनाला आले. ते पिंडाने नास्तिक नव्हते. पण आधुनिक शिक्षणाच्या प्रभावामुळे श्रद्धाभक्तीची जागा शंकेखोर पणाने घेतलेली होती. त्यांनी वंदन केल्यावर 'नमो नारायणाय' असा उच्चार श्रींनी केला. त्या व्यतिरिक्त काही बोलले नाहीत. डॉक्टर ने मनानेच संकल्प केला की हे स्वामी जर खरोखर अंतर्ज्ञानी सत्पुरुष असतील तर त्यांनी माझ्या मनातील इच्छा जाणून मला शंभर रुपये द्यावेत. तर माझी पूर्ण खात्री पटेल.

काही वेळाने बोलण्याच्या ओघात श्रीस्वामी महाराज कुणाला तरी असे म्हणाले 'दीन दुबळ्यांची सेवा करणारे वैद्य असतात. त्यांना आपणही सहाय्य करावे म्हणजे पर्यायाने आपणाकडूनही ही सेवा

घडते. असे बोलून श्री नाईकांना त्या वैद्याला समोरच्या दक्षिणेतून रु.१०१/- द्यायला लावले. वैद्य महोदय अतिशय खजील झाले. मोकळे पणाने याचना केली. 'गुरुंची परीक्षा पाहणाऱ्याला नरकवास भोगावा लागतो. माझ्या वर दया करुन माझी तशी गती होऊ देऊ नका' अशी प्रार्थना केली. त्या नंतर श्रीस्वामींच्या उपदेशामुळे ते गोर-गरीब, दीन-दुबळ्यांना विनामूल्य उपचार करु लागले. व श्रींनी दिलेल्या दीक्षा मार्गाप्रमाणे उपासना करुन सदाचार संपन्न भक्त होऊन मुक्त झाले. पुढे नागपूर-रामटेक अशी स्थाने करुन पुढे प्रयागला जाण्यास निघाले. तेव्हा श्रीबाबूराव नाईक यांचे वर कृपा केली त्या मुळे त्यांची पुढे उत्तम साधना होऊन ब्रह्मानंदाची प्राप्ती झाली.

प्रयागला पौष अमावस्येपूर्वी दोन दिवस श्रीस्वामी भक्तांसह पोचले. सूर्य ग्रहणाचा पर्वकाळ तेथे साधला श्रीस्वामींचे गुरुबंधू रावबहादुर केशवराव गोरे यांनी दारागंज येथील त्यांच्या निवासस्थानी श्रींची उतरण्याची व्यवस्था आपण होऊन केली.

सूर्यग्रहण पर्वानंतर काही दिवसांच्या वास्तव्यात श्री गोरे यांना उपनिषदांचा पाठ देऊन उपदेश केला. तेथून पुढे काशीला जाणे झाले. शके अठराशे सत्तेचाळीसच्या माघ मासात तेथे पोचले. स्थानिक भोसले राम मंदिर व नंतर गणेश घाटावरील श्रीगणपती मंदिराच्या दुसऱ्या मजल्यावर श्रीस्वामींचे काही काळ वास्तव्य झाले. तेथेही अनेक विद्वानांना ज्ञान दान देऊन उपदेश देऊन कृतार्थ केले. श्री विश्वेश्वराला त्या काळात दोन वेळा अतिरुद्र अभिषेक करविला. प्रत्येक वेळी क्षेत्रस्थ सर्व संन्याशांना आसने, वस्त्र, कमंडलू, दक्षिणा आदि देऊन भरपूर अन्नदान ही करविले.

आषाढी पौर्णिमेला चातुर्मासानिमित्त क्षौरविधि व व्यासपूजेचा उत्सव श्रीगुरुंनी केला. त्या दिवशी क्षेत्रस्थ तारकमठातील सर्व संन्यासी बोलावून सद्गुरुंनी त्यांची पूजा करुन साष्टांग नमस्कार घातले.

श्रीगुरुंचा भक्तिप्रेमा जबरदस्त होता. श्रीगुरुंचे प्रकृति स्वास्थ्य ठिक नसताना देखील त्यांनी 'क्षेत्रस्थ यति हे साक्षात् विश्वेश्वर आहेत' या भावनेने सर्व पूजाविधी केला. भाद्रपद पौर्णिमेला चातुर्मास समाप्ती झाल्या नंतर श्रीगुरुंनी क्षौरस्नान केले व व्यासकाशीला सीमोल्लंघनाला गेले. अश्विन ते माघ ह्या सर्व काळात येणारे सर्व उत्सव श्रीगुरुंनी विधीवत् पूर्ण केले.

अधिक चैत्राचे अखेर श्रीगुरुंनी पंचक्रोशी यात्रा केली. नागपूर प्रांतातले शेकडो भक्त तसेच काशीतील शास्त्री, संन्यासी असा शे-दिडशे समुदाय घेऊन भजन करीत श्रीगुरु यात्रेला निघाले. प्रत्येक मुक्कामावर केली जाणारी धर्मिक कृत्ये सर्वांकडून आश्रमानुसार श्रीगुरु करवून घेत. 'दिगंबराचे भजन' श्रीगुरुंनी यात्रेत सतत चालूच ठेवले.

श्रीगुरुंनी काशीमुक्कामात काशीखंडग्रंथ स्वत: ऐकला व वाचला. या ग्रंथाचे आधाराने 'अमरापुरमहात्म्य' नावाचा संस्कृत ग्रंथ त्यांनी तयार केला व चौसष्ट योगिनींचे स्तोत्र छापून प्रसिद्ध केले. स्वामींनी आपल्या मृदु व उदार स्वभावाने सर्वांची मने जिंकली व त्यांना भक्तिधर्माचरणाने सन्मार्गी लावले. कलीचा वास सद्‌गुरुंच्या जवळ नसल्यामुळे लोकांच्या दुर्बुद्धी लयाला जात व तेथे सद्‌बुद्धीचा उदय होई.

'सत्कर्म केल्यावाचून सुखशांतीचा लाभ नुसत्या शास्त्रपांडित्याने होत नसतो' असे उद्‌गार श्रीगुरुंनी काढले. हे सर्व एका शास्त्रसंपन्न ब्राम्हण गृहस्थाने ऐकले. तो महाराजांना शरण आला व प्रार्थना पूर्वक म्हणाला, 'परमेश्वरा ! मी दरिद्री ब्राम्हण आहे. मला आपल्या दर्शनाने व उपदेश श्रवणाने ब्रह्मकर्म असे अग्निहोत्र ठेवण्याची वासना झाली.' ही त्याची प्रार्थना सद्‌गुरुंनी त्याला यथायोग्य आर्थिक मदत करून पूर्ण केली. श्रीगुरुंच्या कृपाशीर्वादाने तो ब्राम्हण पुढे आहिताग्नि झाला.

भक्तिधर्माची स्थापना श्रीगुरु स्वत: भजन, पूजन, करुन व करवून करीत होते. राधाकिसन नावाच्या पुराण सांगणाऱ्या ब्राम्हणाची इच्छा, त्याच्या कडून भागवत सप्ताह करुन घेऊन पूर्ण केली. श्रीमद् आद्य शंकराचार्यांनी पूर्वी जशी धर्म स्थापना केली तेच कार्य पुढे श्री.प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वतींनी चालू ठेवले. हेच गुरुंचे कार्य श्रीनृसिंहसरस्वती स्वामी महाराजांनीही पुढे चालू ठेवले हे वरील गोष्टींवरुन लक्षात येते.

श्रीदीक्षितस्वामी महाराज हे निरतिशय प्रीती वासुदेवानंद दत्तामरेश्वरावर ठेवीत असत. म्हणून त्यांनी काशीतून 'गंगा' व काशीतले 'लंगडे आंबे' आगगाडीने वासुदेवानंदाच्या पुण्यतिथीकरीता अमरापुरला पाठविले. तसेच अमरेश्वरासाठी बहुमोलाचे वस्त्रालंकार व रुद्राक्षमाळा पाठविल्या. तसेच औरवाड येथील पुजारी व इतर मंडळींसाठी तेथून काही वस्तू पाठविल्या.

श्रीगुरुनाथांच्या वृद्ध भगिनी आत्याबाई काशीत राहून नंतर तेथेच मुक्त झाल्या. नंतर महाराजांपाशी अनुताई सेवा शुश्रुषेला राहिल्या. या महाराजांबरोबर बरेच दिवस होत्या. यांनी महाराजांची सेवा फार दिवस केली आहे. त्यांच्या तापट स्वभावामुळे त्या महाराजांकडे येणाऱ्यांशी कधी कधी रागावून बोलत असत. महाराज रहा म्हणून सांगत असता सुध्दा काही मंडळी या अनुबाईच्या अरेरावीला त्रासून निघून जायची. केव्हा केव्हा महाराज विनोदाने म्हणत असत की, 'अनुताई म्हणजे एक यंत्र आहे. यांच्या तडाख्यातून जो आमचेकडे येईल तोच पास व्हावयाचा,' आम्ही हे यंत्र मुद्दामच जवळ बाळगले आहे. कारण लोकांनी, 'स्वामींची सेवा करणाऱ्या भगिनी भांडखोर आहेत.' असे म्हणून आमचेकडे कोणी येऊ नये. 'हाच हेतू आमचा आहे.' जगापासून उपसर्ग होऊ नये म्हणून ही देखील एक मायाच आहे.

काशीत महाराजांनी कोणाकडे भिक्षेला जाणे बंद केले व आपल्या गुरुमहाराजांच्या नैवेद्यातील प्रसादच ते सर्वांबरोबर घेत असत. दुसऱ्या वर्षी काशीमधे असताना श्रीगुरुंनी उपोषण सुरु केले. फक्त थोडासा फलाहार घेत.

'भक्तिप्रियः श्रीपतिः' असे गुरुमहाराज होते. बापटशास्त्री नावाचे एक गरीब ब्राम्हण गृहस्थ महाराजांना महिना-पंधरा दिवसाला मीठ आणून देत व म्हणत, 'माझी गरीबाची सेवा श्रींनी मान्य करावी' प्रेमाचे भुकेले भगवान ते मीठ त्यांच्या भगिनींकरवी फराळाच्या पदार्थांमधे वापरत असत व प्रीतीने म्हणत 'बापटशास्त्र्यांचे मीठ फारच गोड आहे, त्यामुळे सर्व पदार्थ रुचकर होतात' श्रीगुरुमहाराज काशीत फार दूर जाऊन राहिल्यामुळे महाराष्ट्रातील भक्तांना गुरुविरह दुःसह झाला. परंतु गुरुआज्ञा स्वगृहीच राहण्याची असल्यामुळे ती देखील मोडता येत नव्हती. भक्तवत्सल सर्वांतर्यामी श्रीगुरुंना आपल्या भक्तांची तळमळ समजली. त्यांनी कित्येकांना स्वप्नात दृष्टांत देऊन तर काहींना पत्राद्वारे त्यांना भेटण्याची परवानगी दिली. अमृतासमान ती गुरुवाणी ऐकून नंतर ते भक्तगण त्यांच्या दर्शनासाठी गेले.

ह्या नुकत्याच आलेल्या भक्तमंडळींसमवेत श्रीगुरुंनी पुन्हा पंचक्रोशी यात्रा केली. तेथे त्यांचे प्रकृति स्वास्थ्य बिघडल्या मुळे त्यांनी एका वैद्याचे औषध घेऊन त्याला आशीर्वाद देऊन कृतार्थ केले.

कालांतराने श्रीगुरु आपली सर्व कामे स्वतःच करु लागले. उपोषणामुळे त्यांना अशक्तपणा आला होता. त्यांची क्षीण झालेली प्रकृति पाहून एका भक्तानी त्यांना विचारले, 'गंगेचे उदक आणण्यापासून तर स्वगुरुसेवा व आपली सर्व कार्ये आपणच का करता? हे आम्हांला बघवत नाही' यावर श्रीगुरु म्हणाले, 'आम्ही आजपर्यंत लोकांना त्यांच्या सेवेच्या मोबदल्यात आमचे तप दिले.

लोककल्याणासाठीच हेही तप करीत आहोत' साधकाने लोकांकडून सेवा किंवा मानपान, पूजा वगैरे करून घेऊ नये. घेतल्यास आपले तपोधन त्या लोकांकडे जाऊन स्वत:ची हानी होण्याचा संभव असतो. असाच उपदेश श्रीगुरुंनी वरील वक्तव्याने केलेला आहे. स्वत: ते महासिद्ध होते. त्यांचे ज्ञानमय परम तप अव्यक्त होते. ते संपणारे नव्हते. लोकशिक्षणार्थच त्यांनी ही लीला केली.

अमरापुरातून अमरेश्वराचे पुजारी महाराजांना तेथील वर्तमान पत्राद्वारे काशीत कळवीत असत. त्यांना लिहीलेल्या उत्तरात श्रीगुरुंनी सांगितले, 'पूजाअर्चा त्रिकाळ चांगली चालते, असे सर्वांचे पत्रातून वाचून आम्हाला फारच संतोष होत आहे. **कारण मुख्य त्रिकाळ देवतापूजन चांगले झाले म्हणजे ईश्वरीकृपा होते. ईश्वरीकृपा झाली म्हणजे प्रपंच व परमार्थ हे दोन्ही आनंदाने चालतात' प्रपंच चांगला चालायला सुद्धा ईश्वरीकृपेची गरज लागते.** श्रीगुरुंनी 'योगिनी स्तोत्राच्या प्रति पुजाऱ्यांना पाठविल्या व त्यांचा पूजाविधी, उत्सवाविषयी सर्व गोष्टींचा खुलासा केला.'

चातुर्मास समाप्ती नंतर श्रीगुरु अयोध्येला गेले. १८४८-४९ हे दोन चातुर्मास श्रीगुरुंनी काशीत केले. काशीत असताना ते भक्तांना म्हणत, 'आम्ही आता दूर जाणार आहोत. आम्हाला कोण शोधते ते पाहू?' या गुरुवचनाचा अर्थ लोकांना नंतर समजला. ही त्यांचीच लीला होय. मठाची उपाधी मोक्षाला विघ्न करणारी आहे असे गुरुमहाराज मानीत. म्हणून ते औरवाड ते काशी कुठेच मठात राहिले नाही. पूर्णविदेही ब्रह्मनिष्ठाचे मुगुटमणि श्री नृसिंहसरस्वती सच्चिदानंदघन, अनंत, व्यापक ब्रह्मच आपण आहो असे अनुभवीत असलेले योगीश्वर देहप्रारब्धाचा खेळ त्याचा अंतच पहात राहिले होते. अवतार समाप्ति अयोध्येमध्ये होणार ही गोष्ट ते जाणतच होते. पण भक्तांच्या समाधानार्थ आम्ही काशीला परत येऊ, असे ते त्यांना म्हणाले.

श्रीगुरुमुनी चिटणीसांनी तयार ठेवलेल्या अग्निरथात बसले. क्षेत्रस्थांनी त्यावेळी श्रीगुरुनाथांना नमस्कार केला. त्यांना 'नारायण' आशीर्वाद देऊन श्रीगुरु अयोध्येला शरयूतीरी काळेरामचे मंदिरात येऊन दर्शन घेते झाले. शरयुतीरावरील एका मंदिरतुल्य इमारतीत सद्गुरुंनी निवास केला.

दुसरे दिवशी आश्विनात शारदानवरात्र सुरु झाले. कोणतेही उत्सवाची संधि आली असता श्रीगुरु आपल्या वासुदेवमूर्तीची व वासुदेवपादुकांची थाटाने पूजा अर्चा करीत असत. सर्व उत्सव ते निजगुरुपूजनानेच साजरा करित असत. त्यांची सर्वत्र अभेददृष्टीच असे. 'वासुदेव: सर्वमिति स महात्मा सुदुर्लभ:' असे ज्या महात्म्याचे सुदुर्लभत्व स्मृतिशास्त्र गाते तो 'वासुदेवच' सर्व आहे, असे म्हणणारा महात्मा श्रीगुरुनरसिंहसरस्वती भाग्यवशात सर्वांना लाभले हे आपले भाग्यच आहे. शारदारुपी सद्गुरुंची ते सर्वोपचारांनी पूजा अर्चा करीत. दसऱ्याचे दिवशी मारुती, शरयू, श्रीकाळेराम यांचे महापूजन व नैवेद्य श्रीगुरुंनी केले.

दसऱ्यानंतर श्रीगुरुमुनींची शरीरप्रकृति ज्वराने क्षीण होऊ लागली. काशीहून बाळूपुजारी महाराजांच्या सेवेला आले. ते महाराजांची देवपूजा व त्यांची सेवादेखील करीत त्यांचे संन्निध राहिले. त्यांची सेवा करणाऱ्या अनसूयाताईंनी नामांकीत वैद्य स्वामींसाठी काशीहून बोलावले. त्यांचे औषध श्रीगुरुंना सुरु केले. श्रीगुरुनाथांची इच्छा जेथे अवतार कार्य संपविण्याची झाली तेथे वैद्य काय करणार ! प्रसिद्ध गानतपस्वी रामभक्त विष्णु दिगंबर पलुस्कर बुवा हे त्यावेळी अयोध्येत होते. ते रोज महाराजांच्या दर्शनाला येत. काशीतील भक्तमंडळी त्यांना उपचाराकरीता तेथे येण्याचा आग्रह करीत व अयोध्येतील भक्त तेथे राहण्याचा आग्रह करित होते.

विष्णुपंतबुवांनी, श्रीगुरुवर्य ब्रह्मविद्वरिष्ठ पूर्ण ज्ञानी आहेत, ही गोष्ट समजूनच तुम्ही अयोध्येतून अन्य कोठे जाणे ठरवू नका असे त्यांना म्हटले. देहावसान कोठल्या जरी क्षेत्रात झाले तरी ब्रह्मज्ञानी त्याबद्दल शुभ किंवा अशुभ मानीत नाहीत. त्यांना सर्वच शुभ असते. रामस्वरुप परब्रह्म वस्तूच एक सर्वोत्तम पवित्र आहे. ती पवित्र वस्तूच स्वत: ब्रह्मज्ञानी पुरुष असतो. 'सर्वं खल्विदं ब्रह्म' असे समजणारा तो असतो. असा अभिप्राय विष्णुबुवांनी महाराजांबद्दल जेव्हा त्यांचे पुढे प्रगट केला तेव्हा त्यांना तदनुरुप उत्तर सद्गुरुंनी दिले. ते म्हणाले, 'रामभक्त म्हणजेच राम, असे तुम्ही जे सांगता, ते आम्हाला मान्य आहे. आम्हाला अयोध्या काय किंवा काशी काय, तद्वत शिव काय किंवा राम काय, एक **श्रीगुरुवासुदेव** परब्रह्मच आहे. करिता आम्ही रामरायाचे राजधानीत राहिलो. तुमच्या इच्छेप्रमाणेच केले. दुसरी कडे आता जात नाही' ही गुरुमुखातील वाणी ऐकून विष्णुपंत आनंदित झाले.

अनुताई, यमुताई कवठेकर व बाळु पुजारी ह्या तीन भक्तांनी श्रीगुरु रायांची शुश्रुषा काळजीपूर्वक चालविली होती. अखेरपर्यंत श्रीगुरुंची अहोरात्र सेवा अनूताईंनी केली. सर्व सेवकवर्गात गुरुभक्त अनसूया माता ह्या श्रेष्ठ होत. अशा ज्यांच्यावर श्रीगुरुंनी कृपा केली ते आमच्या साठी गुरुरुपच आहेत. महाराजांचा देह ज्वराने अशक्त झाला होता तरी आपल्या गुरुदेवांची पूजा, आरती श्रीगुरु अंथरुणावर अगदी पडेपर्यंत अगदी स्वत:च करीत. त्यावेळेस ते आजारी आहेत असे वाटायचे नाही. तद्वत देह सुटे पर्यंत त्यांचे बोलणे प्रेममय व सुहास्य मुख असे होते. ध्यानाच्या वेळी जसे ते निर्विकार दिसत तसेच इतक्या ज्वरातही असत. शरीरातील ज्वराने आपण अनुसंज्वरित न होणे हे पूर्ण जीवनमुक्त पुरुषाचेच लक्षण होय.

आत्मानं चेद्विजानीयादयमस्मीति पूरुष: ॥<br>किमिच्छन्कस्य कामाय शरीरमनुसंज्वरेत ॥१॥

यांप्रमाणे श्रुतीने त्याच्या सकळ दु:खाचा अभाव वर्णिला आहे. ज्ञानामृताने व गुरुभक्तिसुधेने तृप्त झालेल्या कृतकृत्य श्रीगुरुयोगीश्वरांना कोणतेच कर्तव्य उरलेले नव्हते. मग ते देहावर येऊन पूर्ववत् इंद्रियांची हालचाल तरी कशाला करतील? ते जे एकदा अखंड आनंदघन राहिले, पुन्हा देहावरच आले नाहीत. अखंड समाधीच त्यांनी लाविली. शके अठराशे एकूण पन्नास, आश्विन वद्य सप्तमीला श्रीगुरु नामरूपरहित पूर्णब्रह्मच झाले. शके १७८८ ते १८४९ (सन १८६६ ते १९२७) हा महाराजांचा जीवनकाल होता.

बाळू भक्ताने ठिकठिकाणच्या गुरुभक्तांना पत्रे पाठविली. त्यांना अयोध्येस बोलावले. उमरेडहून बाबुराव नाईक, नागपूरहून आत्माराम डबरी, अमरावतीहून सोमण व बाळाभाऊ जोशी व नरसोबाचे वाडीहून लक्ष्मणराव बोठे फुलारी यांनी श्रीगुरुंचे पूजेचे देव अयोध्येतून अमरापूरात आणले. असे हे पाच व अनूताई, यमूताई व बाळू हे तीन असे एकंदर आठ भक्त गुरुसमाधिकाळी अयोध्येला होते.

'आम्ही अमरापुरीच आहोत' हे श्रीगुरुंचे वाक्य लक्षांत ठेवू या. श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्री गुरुवर्य श्रीमन् नृसिंहसरस्वती दीक्षित स्वामी महाराजांचे हे संक्षिप्त चरित्र त्याच सच्चिदानंदघन श्रीगुरु परमेश्वराला अर्पण असो.

--------*****---------

## परिशिष्ट

# श्री.प.प.श्री नृसिंहसरस्वती यांनी केलेली स्तोत्रे व आरत्या

नमः श्रीगुरो मेशधीशे दयाब्धे । भयार्तिघ्न तेस्वात्मदो वासुदेव ॥
यतीद् सेवितानंद पादाब्जयुग्मं । सदा मे हृदि स्थास्नुतां यातु देव ॥१॥
भक्तिश्रध्दे देहि मे ते दयालो । दासो दीनो भावतापेन तप्तः ॥
सर्व्यैस्त्यक्तो द्वारि तेऽत्र प्रसंस्थोऽहं मां मातः पालयाऽद्य स्वबालम् ॥२॥
आलोक्य मामच्युत ईश्वरोऽपि । भीतोगमत्सागरसूरशैलान् ॥
सत्यंतथाच तव हृत्कमले स्थितो यः ।
श्रांतः स्वदर्शय यते गुरु वासुदेव ॥३॥
मा भीरिति वचनं मे । देहि दयालो गुरो यतिश्रेष्ठ ॥
नान्यो मे रक्षार्थं । धावति भोः श्रीगुरो जगन्मातः ॥४॥
त्वयि भक्तिं मे वर्धय । दु र्हृत्तम ईश नाशय अशेषं ॥
यच्च तवेष्टं तत्कुरु । मयि भोः सर्वज्ञ वक्तुमसमर्थः ॥५॥
भक्तिं च मे वर्धय भोस्त्वदीये । रुपे तथा नाशय हृत्तमश्च ॥
दुर्वासनाश्च गुरुवर्य दयानिधे ते ।
यच्चेष्टमेव कुरु तन्मयि सार्वभिज्ञ ॥६॥
मा भीश्च भोस्तेऽस्त्वभयं सदैव याचेऽहमेतद्वचनं गुरो ते ॥
अज्ञोऽहमीश करुणाघन वासुदेव । रक्षस्व मां सर्वत एव सर्वदा ॥७॥
प्रसीद मे सागस आर्तबंधो । कारुण्यसिंधोऽनुपामास्त बंधो ॥
बंधो मृषापि व्यथयत्ययंमां । स्वप्नोपमंछिंध्यवसर्वतो मां ॥८॥

--------*****---------

# श्रीवासुदेवानंद-गुरुचरित्रसार

वन्दे श्रीसद्गुरुं दत्तं माधीशं साक्षिणं शिवं । तदीरितेन तत्तुष्टये लिख्यते चरितं गुरोः ॥१॥ श्रीगुरोश्चरितं स्वल्पं रम्यं मंगल पावनं । सारभूतं हि तद्वच्मि ध्यादिशुध्दयै च बालधीः ॥२॥ मानग्रामे मानवा मानहीना प्रत्यग्वाहा निर्मला निर्मलाभाः । बालः स्वज्ञो ब्रह्म गाणेशजोऽभूद्वन्दे दत्तं श्रीगुरुं वासुदेवम् ॥३॥

मौंज्या बंधनमष्टमे गुरुकुलावासो व्रतानां धरो वृत्वा सांगमृचं सुशास्त्रबहुविद्विद्याकलापारगः । मंत्रज्ञो विधिवत्स्वधर्मनिरतः सर्वर्द्धिसिद्धिप्रदः त्वत्पादं सततं नमामि च गुरो रक्षस्व मां बालकम् ॥४॥ स्वार्थं भिक्षान्नपूर्णाकरसुयुजमथो शांतिदांतिप्रदानो विद्वाङ्मेशं हि वृत्वा त्रिविधमृणमपाकृत्य संन्यस्य योगीट् । तीर्थं तीर्थेशपादो व्रजति सुजनहृत्तापदीनार्तिहर्ता वन्दे तं वासुदेवं गुरुकविसदयेड्रक्ष रक्ष स्वबालम् ॥५॥

ससुखगवज्ज्येष्ठामाप्रतिपदि चानन्दवत्सरे विरमे। विरमे ब्रह्मणि सकलो विकलो भूत्वा नतोस्मि तत्पद्मे ॥६॥

कृष्णांत्यपूर्णानंदावत्सरे खे जातवब्दभौ । कृष्णाद्यपूर्णानंदावत्सरे खेजातवब्दभौ ॥७॥ श्रीसद्गुरोश्चरित्रान्तं नो जानन्ति सुरादयः । वागीशा बालवाचात्र प्रीणातु प्रार्थना हि मे ॥८॥

॥इति श्रीवासुदेवानन्द गुरुचरित्रसारं संपूर्णम् ॥

--------*****---------

## आरती अमरेश्वराची

जय देव जय देव दत्ता अमरेशा ।
श्रीपाद श्रीवल्लभ नृसिंह यतिधीशा ॥धृ.॥
मत्स्य कूर्म वराह नृसिंह वामना ।
श्रीरामद्वय कृष्णा बौद्धकल्कीना ॥
दशरुपा शतरुपा अनंतधीनयना ।
अनंतरुपा देवा अनंत करु नमना ॥१॥
अमरापूर ग्रामी अमरेन्द्रदेवा ।
अमरेश्वर पूजने सुखसुदनसुठेवा ॥
पूर्वीचा लाधला यास्तव मुनिदेवा ।
सद्‌भावा मनि ठेवुनि पूजीती गुरुदेवा ॥२॥
गोतीर्थी गोपूरी करुनिया स्नान ।
वंदुनि रुद्रतीर्थी पितृतीर्थी स्नान ॥
शुक्लामरतीर्थी करि नित्य स्नान ।
वर्षांती तत्पूजने देवचि ते जाण ॥३॥
ऐशा या स्थानाचा महिमा वर्णिता ।
शेषादिक थकले वर्णन हे करिता ॥
श्रीव्यास श्रीशंकर मुनिगण या पाहता ।
आनंदितचि होतो नृसिंह यतिचित्ता ॥४॥

--------*****---------

# आरती चौसष्ट योगिनींची

जय जय गजवदनमुखि योगिनिवरदेवि ।
आरति तव पदकमले भो सच्चित्सुखदेवि ॥ धृ. ॥
गजवदने सिंह मुखि गृध्रास्ये देवि ।
काकमुखि वाराहि चोष्ट्रहयग्रीवि ।
शरभमुखि उलूकिके मयूरि शिवरावे ।
विकटानने अष्टवक्र-कोटराक्षि देवि ॥१॥जय.
भो कुब्जे विकटनयन- शुष्कोदरि देवि ।
भो श्वदंष्ट्रे ललज्जिव्हे वानरमुखदेवि ।
ऋक्षाक्षि केकराक्षि बृहत्तुण्ड देवि ।
सुराप्रिये कपालहस्ते रक्ताक्षि देवि ॥२॥जय.
शुकि श्येनि कपोतिके पाशहस्त देवि ।
प्रचण्डचण्डविक्रमे शिशुघ्नि पाहि देवि ।
पापहन्त्रि कालि रुधिरपायिनीशदेवि ।
वसाधया गर्भभक्ष -शवहस्ते देवि ॥३॥जय.
स्थूलकेशि बृहत्कुक्षि चान्त्रमालिनी ।
सर्पास्ये दंदशूक-प्रेतवाहिनी ।
श्रीक्रौंची मृगशीर्षे सुवृषानने ।
व्यात्तास्ये धूमोश्वासे खेचरणे ॥४॥जय.
ऊर्ध्वतापशोषदृष्टी कोटरि योगयुते ।
स्थूलनासिके विद्युत्प्रभे बलाकास्यभाते।
मार्जारि कटपूतनि चाट्टाहासयुते ।
कामाक्षि भो मृगाक्षि मृगलोचनभाते ॥५॥जय.

एवं ते नामारति योगिनि देवि परे ।
प्रकरोतिस धन्योऽभूदत्रामूत्र परे ।
ब्रह्मानन्दे मग्नो भवति च हृद्यपरे ।
तत्ते रुपं दर्शय नृसिंहयत्यवरे ॥६॥जय.

--------*****---------

## आरती श्रीवासुदेवानंदसरस्वतींची

जय जय श्रीमद्गुरुवरस्वामिन् परमात्मन् हंसा ।
वासुदेवानंदसरस्वति आरति तदहंसा ॥ धृ.॥
सोहं हंस: पक्षाभ्यां संचरसि ह्याकाशे ।
वासस्ते खलु लोके सत्ये क्रीडा तव मानसे ॥१॥
मुक्ताहारो ब्रह्मवाहको वैराड्रुपधर ।
भक्तराजहृत्ध्वांततमोहृत्स्वीकुरु मां च हर ॥२॥
पक्षस्यैके वातेनैते भीता: काकाद्या: ।
पलायितास्ते द्रुतं प्रभावाद्भवंति चादृश्या: ॥३॥
एवं सति खलु बालस्तेहं ग्रसित: कामाद्यै: ।
मातस्त्वरया चोद्धर कृपया प्रेषितशांत्याद्यै: ॥४॥
दासस्ते नरसिंहसरस्वती याचे श्रीचरणम्।
भक्तिश्रध्दे वासस्ते हृदि सततं मे शरणम् ॥५॥

--------*****---------

## आरती श्रीवासुदेवानंदसरस्वतींनी रचलेल्या 'दिगंबरा' या महामंत्राचा अर्थबोध करविणारी

दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा ।
आरति हे तव चरणी राहो नतिततति गुरुवरा ॥धृ.॥
दिग्भिर्वेष्टितमंबरमेव प्रत्यग्ब्रह्मेति ।
खं ब्रह्मेति श्रुतिरपि वदति, खं ब्रह्मेति श्रुतिरपि वदति
दिगंबराचेति ॥१॥
दिग्वत्चांबरमेवव्यापक पूर्ण ब्रह्मेति ।
सच्चित्सुखघनमायातीतं, सच्चित्सुखघनमायातीतं
दिगंबरा वदति ॥२॥
श्रीपादवल्लभ नाम प्रापहि नक्रगजेंद्रमिव ।
द्रौपद्यंबरीषचोर, द्रौपद्यंबरीषचोर
ग्रसितद्विजमेव ॥३॥
दिगंबरा गुरु वासुदेव दत्तस्त्वं ब्रह्म ।
कामक्रोधग्रसितं मां लभ, कामक्रोधग्रसितं मां लभ
तथैव झटिति वह ॥४॥
दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा ।
आरति हे तव चरणी राहो नतिततति गुरुवरा ॥धृ.॥

--------*****---------

## आरती श्रीवासुदेवानंदसरस्वतींची

जय जय श्रीमद्गुरुवर देवाधिदेवा ।
पंचारति हे चरणी घडवी मज सेवा, जयदेव जयदेव ॥धृ.॥
वास तुझा ब्रह्मांडी चालक तूं देवा ।
असिसी तूं सर्वांचा आनंदठेवा ॥
वदती वेद सरस्वति न होय हा ठावा ।
का मति माझी नमितों पदिं देई ठावा ॥१॥
सद्दाता तव महिमा वर्णितसे वेद ।
मोक्षाचीं सत्रें हीं ठेविलिं बहुसुखद ॥
अतिदु:खें शक्ति नसे हरि माझा खेद ।
ज्ञानामृत पाजुनि दे अखंड तव पद ॥२॥
लीला अनंत तूझ्या वदतां आनंत ।
चारी साही अठरा पाहतां नच अंत ॥
नारद व्यासमुनींद्र ध्यातां नच येत ।
तो तूं देहा धरुनि देसि करी स्वार्थ ॥३॥
पदि गंगा कटिं शोभे छाटी कौपीन ।
हृदयीं लक्ष्मीकौस्तुभभृगुपद लांछन ॥
दंडकमंडलु हातीं रवींदुसम वदन ।
राहो माझे हृदयीं हेचि सदा ध्यान ॥४॥
आलिंगो त्वङ्‌मूर्ति दिसोच हे नयना ।
ऐको कर्ण गुणातें नामामृत रसना ॥
त्वत्पदसुगंध सदा लागो हा घ्राणा ।
दे परभक्ति श्रद्धा सतत करुं नमना ॥५॥

---------*****---------

## आरती श्रीवासुदेवानंदसरस्वतींची

जयदेव जयदेव पुरुषोत्तममूर्ते जय आनंदमय मूर्ते ।
वासुदेवानंदसरस्वती गुरुकीर्ते ॥धृ.॥
कृष्णावेणी-पंचगंगा- संगमीं ।
येउनि सुरमुनि वंदितश्रीदत्तस्वामी ॥
तो करुणासिंधु हृदयिं सांठविला नामी ।
तद्रूपचि होउनियीं विचरतसां स्वामी ॥१॥
सद्विद्या संपादुनि उपनिषदीं रमला ।
तीर्थे हिंडुनि सर्वां गुरुपदिं रंगविला ॥
गुरुचरितादि ग्रंथामृत हा पाजविला ।
यच्छ्रवणें पठणें हरि हरिभवविधिजाला ॥२॥
श्रीदत्तगुरुयशादशदिशिं गाजविले ।
जगदीश्वरदत्तगुरु हृदिं ज्यांच्या डोले ॥
सुरमुनि गंगा कृष्णा रेवा स्तुति बोले ।
तो हा सद्गुरु यत्पदिं मम मानस रमलें ॥३॥
प्रथमानंदवत्सरिं देहीसा झाला ।
अन्यानंदवत्सरिं विदेहिं हा भरला ॥
मध्यें सर्वानंदमयकायचि गमला ।
तो आनंदमयचि गुरु मद्हृदिं गमला ॥४॥
अठराशें छत्तिसशकिं ज्येष्ठीं कुहू तिथिला ।
आनंद संवत्सरिं स्वानंदी भरला ॥
मंगलदिनिं सवितास्ताऊर्ध्व दिशा घटिला ।
ब्रह्मचि होउनि ब्रह्मीं गुरुपदिं हा बसला ॥५॥
सद्विद्या देउनियां सन्मार्गी लावी ।
द्या तव पदभक्ती जी भवसिंधुस नुरवी ॥
अघौघहारक नामस्मरण मनीं वसवी ।
त्वत्पदकमलरसास्पद नृसिंहहृत्करवी ॥६॥

--------*****---------

# हारबंध श्लोक
## (श्री टेंबेस्वामींची उत्कट स्तुतीयुक्त प्रार्थना)

मेशं केशं सुशंभुं भुवनवनवहं मारहं रत्नरत्नं ।
वंदे श्रीदेवदेवं सुगुणगुरुगुरुं श्रीकरं कंजकंजं ।
मामज्ञं मत्तमर्भं भवदवसुवहं वासना सर्वसंघे ।
मातः पातः सुतस्ते वह रहसि हरे देशिके शिष्य शिष्यं ॥

**अर्थ :-**

भगवान् विष्णु, ब्रह्मदेव व शंकर या त्रिमूर्तिरूप असलेल्या, सर्व वेद व तदुभ्दूत चतुर्दश भुवने धारण करणाऱ्या, (सौंदर्याने) मदनाला पराभूत करणाऱ्या, (स्वयंप्रकाशी अशा उत्कृष्ट) रत्नांतही सर्व श्रेष्ठ ज्ञानगुण संपन्न अशा गुरुंनाही, गुरुस्थानीं असलेल्या (भक्तांना सर्व प्रकारची) वैभवे प्राप्त करुन देणाऱ्या व करांबुजी दंडकमंडलु घेणाऱ्या, कमलाप्रमाणे सुकोमल प्रसन्नवदन अशा देवाधिदेवा (सद्गुरुनाथा) श्रीदत्तात्रेयमूर्ते मी आपणाला अभिवादन करितो. मी षड्रिपु आणि सर्व वासनांच्या समूहांत (सापडल्याने) संसाररूपी अग्नीच्या ज्वालांनी चांगलाच ग्रासला गेलो असून अहंकारमदाने उन्मत्त झालेला असा मी अज्ञ बालक आहे. तूच मला मातापित्यांच्या जागी आहेस व मी तुला पुत्रस्थानी आहे. हे गुरुसार्वभौम श्रीवासुदेवानंद सरसवती सद्गुरो ! तुमचा शिष्य असणाऱ्या मला इथून पुढे माझा अधःपात न व्हावा म्हणून मला हाती घेऊन (जीवनातील महत्तम असे) ज्ञानरहस्य शिकवा.

॥ इति शम् ॥

# गुरु-शिष्य संवाद

(श्री. प. प. नृसिंह सरस्वती दीक्षित स्वामी महाराज यांचेशी शिष्य भक्तांचा संवाद)

**शिष्य :** ज्ञानसमाधि व हठयोगसमाधि यात अंतर काय ?

**स्वामी :** या दोहोत हेच अंतर आहे की हठयोगसमाधि आयस (लोखंडी) सुवर्णासारखी आहे व ज्ञानसमाधि मूल (निसर्गसिद्ध) सुवर्णासारखी आहे. लोखंडी सोने याचा अर्थ किमयेने लोखंडाचे जे कृत्रिम तऱ्हेने बनवितात ते सोने. असले सोने कालांतराने पुन: लोखंड या मूलस्थितीला येते, असा लोकप्रवाद आहे. यास आधार - वृद्धशिक्षेत- **योगे: समाहितसमाहिता मताय:स्वर्णोपमा त्वनुपमा प्रथमा मता य: । तत्राक्षम:स परमां परमात्मदत्तात्रेयाश्रयाद् गतिमियात् सततानुरक्त:।**

**भावार्थ :** योगसमाधीपेक्षा ज्ञानसमाधि श्रेष्ठ असून ती ध्यानाने प्राप्त होते; म्हणून ध्यानाचा अभ्यास केल्याने स्वरुपस्थिति प्राप्त होते. यास उदाहरण- आयस सुवर्ण व मूल सुवर्ण यांचा दृष्टांत वर दिलाच आहे. मूल सुवर्ण कधीहि बदलत नाही, परंतु आयस सुवर्ण कालांतराने मूळ जातीवर जाते.

**शिष्य :** ध्यानयोग सिद्ध झाल्याची खूण काय ?

**स्वामी :** याची खूण आत्मसाक्षात्कार. स्वरूप-स्थिति प्राप्त होणेच.

**शिष्य :** ध्यानयोग धरल्यावर किती काळात हे साध्य आहे ?

**स्वामी :** याला अमुक अशी कालमर्यादा नाही. हे त्या साधकाच्या भूमिकेवर अवलंबून आहे. शास्त्रवचन असे सांगते की,

**मनुष्यत्वं मुमुक्षुत्वं महापुरुषसंश्रय: ।**
**दुर्लभं त्रयमेवैतद् देवानुग्रहहेतुकम्॥** (वि.चू.)

**भावार्थ :** वेदांतसाक्षात्काराला कालमर्यादा नाही. परंतु गुरुप्रसादाने व ईश्वरानुग्रहाने मात्र तो लवकर होणे शक्य आहे. यास दृष्टांत एकाद्याने जसे स्वत:जवळील धन स्वेच्छेने दुसऱ्यास दान देऊन त्यास सधन करुन टाकावे तसे हे आहे. मनुष्यत्व व मुमुक्षुत्व हे असे कालाधीन आहे.

**शिष्य :** बरे ते असो. पण साधकाने तरी दिवसातून किती वेळ हे साधन करावे ?

**स्वामी :** यास कालाचे अमुक एक प्रमाण नाही. सर्वच काल हे करीत राहिले पाहिजे. नुसते ठराविक काम करून वेठ मारण्याने व शपथेतून सुटण्याने हे जमणार नाही. ज्याला खरोखरीच ही अवस्था प्राप्त करून घेणे असेल त्याने **'आसुप्तेरामृते: कालं नयेद् वेदान्तचिन्तया।'** (जीवन्मुक्ति) रोज निजेपर्यंत व जीवात जीव असेपर्यंत हे वेदांतचिंतन केलेच पाहिजे, म्हणजेच तो वेदान्द साक्षात्कार होतो.

**शिष्य :** नुसत्या ईश्वरीप्रसादाने वा देवानुग्रहाने मुमुक्षुत्व येतेच अशी खात्री आहे काय ? किंवा त्यालाहि पुनरपि कालाची जोड लागतेच ?

**स्वामी :** मनुष्यत्व व मुमुक्षत्व ही ईश्वरीप्रसादानेच होतात. तथापि इतके सर्व एकामागोमाग प्राप्त होऊन देवानुग्रह झाला तरी आत्मसाक्षात्काराचा कालहि यावाच लागतो. कारण या गोष्टीला कालाची अनुकूलता असावी लागते. अथवा दुसऱ्या भाषेत बोलावयाचे तर तर या कामाला कालाचा प्रतिबंध निघावा लागतो. उदाहरणार्थ- गर्भाधान झाले तरी मूल अव्यंग परिपूर्ण बनण्यास जी कालाची नवमासाची अवधि ती निसर्गनियमाप्रमाणे मिळालीच पाहिजे. सर्व योनिसंभवास हे अत्यंत आवश्यक कालबंधन आहेच. मनुष्यप्राणीहि योनिसंभव आहेच. अयोनिसंभव अवतारिक महात्म्यांची गोष्ट वेगळी.

**शिष्य :** कालाच्या प्रतिबंधास कारणीभूत कोण ?

**स्वामी :** कालाच्या प्रतिबंधास प्रारब्ध हेच कारणीभूत आहे.

**शिष्य :** मग हा कालाचा बाध निघण्यास उपाय ?

**स्वामी :** यास उपाय अभ्यास व पूर्वसंचितभोग व क्रियमाण न करणे.

**शिष्य :** याशिवाय प्रारब्धनाशास आणखी एखादा उपाय जोडीला आहे काय ?

**स्वामी :** आहे, उपाय आहे, व तो म्हणजे ईश्वरीप्रसाद व सद्‌गुरु अनुग्रह. या दोहोंनी व त्याच्या जोडीला अभ्यासाने ते प्रारब्ध नष्ट होऊ शकते.

**शिष्य :** सद्‌गुरु अनुग्रह व ईश्वरीप्रसाद कशाने होईल ?

**स्वामी :** गुरुपादसेवेने होईल. मात्र ती सेवाहि तशीच एकनिष्ठपणे व अनन्यभावाने झाली पाहिजे.

**शिष्य :** गुरुसेवेने तरी त्यांचा अनुग्रह व प्रसाद आपले मनाप्रमाणे लवकर होऊ शकेल काय ?

**स्वामी :** त्याची खात्री नाही. हे सर्वस्वी त्यांच्या अधीन आहे. त्यांनी मनात आणले तर ते ताबडतोब होऊ शकेल. पण ते त्यांच्या मनात येणे न येणे हे केवळ त्यांच्यावरच अवलंबून राहील.

**शिष्य :** यास आणखी काही उपाय ?

**स्वामी :** यास उपाय एकच. तो हा की, शिष्याने आपल्या नि:सीम सेवेने सद्‌गुरुंचे मन आपल्याकडे वेधून घेतले पाहिजे. तान्ह्या मुलास जशी कडकडून भूक लागली असता टाहो फोडून ते कळवळून रडू लागते व असे होताच त्या तान्हुल्याची माता मग कितीही कामात गर्क असो, ते सर्व काम टाकून आधी त्या आपल्या बालकास स्तनपान करून त्याची भूक शमविते. तसेच हुबेहूब येथे आहे. मूल जोवर हसत खेळत आहे व आपल्याच नादात आहे, त्यास मातेची जरुरी नाही,

तोपर्यंत ती तरी त्यास कशास मुद्दाम उचलून घेईल व पाजील ? म्हणून मुमुक्षूला कडकडीत वैराग्याची भूक लागल्याशिवाय त्या सद्‌गुरुमाऊलीचे चित्त त्याचेकडे वळणारहि नाही व त्यास ज्ञानामृत पाजून त्याची ज्ञानभूक भागविणार नाही यात काय ते समजून घ्यावे. याचा अर्थ गुरूचे चित्त वेधण्याचा सर्व बोजा शिष्यावरच पडतो. गुरु कृपा करीत नाही म्हणून त्यांचेवर रुसून जाणाऱ्या शिष्याचा जो तोटा होतो त्याचे कारण त्यांच्या ठिकाणी गुरुभक्तीचा अभाव असतो हेच होय. मघाशी दिलेल्या शिशुमातेच्या उदाहरणावरून हे नीटपणे कळलेच असेल.

**शिष्य :** होय, मला आतां अगदी बरोबर रीतीने कळले. आम्ही आपली फिर्याद नेल्याशिवाय राजाने तरी आमचेबद्दल चौकशी का करावी : तसेच येथेहि दिसते. बरे ते असो. आता माझे असे म्हणणे आहे की, कोणत्याही उपायाने का होईना जर स्वकर्मानुष्ठानाने अथवा दैववशात् ज्ञान प्राप्त झाल्यास तेवढ्याने भागेल काय ?

**स्वामी :** नाही, तेवढ्याने मुळीच भागणार नाही. तसे असते तर शुकाचार्य हे जन्मत: ज्ञानीच होते, पण तेवढ्याने त्यांचे भागले नाही.

**शिष्य :** तर मग त्यांना काय अधिक करावे लागले ?

**स्वामी :** त्यांना अभ्यास करावा लागला.

**शिष्य :** कसला अभ्यास व तो कशासाठी ?

**स्वामी :** योगाचा अभ्यास व तो स्थितप्रज्ञतेसाठी. ज्ञान झाले तरी त्याचा स्वत:वर अंमल होण्यास म्हणजे ते ज्ञान निरंतर अंगी बाणण्यास हा अभ्यास बराच कालपर्यंत केला पाहिजे. इतका की, कोणत्याही अवस्थेत आपणास एकच हा निदिध्यास लागला पाहिजे. स्थितप्रज्ञता म्हणतात ती यालाच. "**मुक्तिस्तस्य ज्ञानात् तत्त्वाभ्यासात् स च स्थिरे देहे।**" (र.हृ. १०, १०)

**शिष्य :** श्रीशुकाचार्यांनी हा अभ्यास कसा केला व त्यांना कोणता गुरु हा अभ्यास करविण्यास लाभला ?

**स्वामी :** शुकाचार्य जरी उपजत ज्ञानी होते व त्यांचा जन्म होताच ते सर्व टाकून नग्न स्थितीत पळू लागले तथापि तेवढ्याने भागणार नाही हे जाणून त्यांचे वडील श्रीमहर्षि व्यास यांनी त्या शुकाला 'अरे शुका, इकडे ये, तुला कांही उपदेश करावयाचा आहे' म्हणून हाक मारली. पण शुक वृत्तीवर नसल्याने त्यास ऐकूंहि आले नसावे व म्हणून ते निसूर पुढे चालू लागले. शुकांची वृत्ति ज्ञानमय होती. त्यांच्यात जगतांतील भेदभाव नव्हता. म्हणून बापाने पुन: कळवळ्याने हाक मारताच शुकाचे जरी तिकडे लक्ष गेले नाही तरी सर्वजगत्सवरूपी झालेल्या शुकाने म्हणजे आजूबाजूच्या वृक्षलतादिकांनी 'ओ, ओ' म्हणून व्यासांच्या हांकेस प्रत्युत्तरे दिली. शुक पुढे चाललाच होता. त्याने परतूनसुद्धा मागे बघितले नाही. हे पाहून श्रीव्यास इतकेच मोठ्याने ओरडून त्यास म्हणाले की, 'बरे तर, वत्सा, माझे न एकता व मागे न फिरता, पुढे जातोस तर जा, पण एक कर की, तू जाताना विदेही जो जनक राजा त्यास एकवार भेटून जा, व त्यांचे तरी ऐक. ते तुला गुरु शोभण्यासारखे आहे. तूं जरी जन्मत: ज्ञानी असलास तरी गुरुसेवेवाचून व त्यांच्या कृपेवाचून सर्व मोक्षमार्ग व्यर्थ आहे हे ध्यानात असू दे म्हणजे झाले! याप्रमाणे येथून पुढील कथाभाग महाभारतात शुकजनक संवादरूपाने आहेच. पण त्याचे पर्यवसान पुढे असे झाले की, शुकाचार्यास गुरूपदेश घ्यावा लागून उपजत ज्ञान असताहि दृढ अभ्यास करावा लागलाच. तोहि थोडा थोडका नसून बराच कालपर्यंत. यासाठी त्यांनी कडक तपश्चर्या आरंभून स्थितप्रज्ञता अंगी बाणण्यास १०००० वर्षे समाधीत घालविली.

**शिष्य :** आपण मला जो हा सद्‌गुरुमहिमा सांगितलात तो उत्तम रीतेने कळला, व केवळ ज्ञान असूनहि ते अभ्यासावाचून निरर्थक हेहि कळले. पण अभ्यास करण्यास गुरूची आवश्यकता का ? त्यांचे आज्ञेवाचून तो होऊ शकत नाही की काय ? अशी माझी सरळ शंका आहे.

**स्वामी :** गुरूची आवश्यकता आहेच. का की, आपल्या मते कोणतीहि गोष्ट कितीहि बरोबर असली तरी ती तज्ज्ञाने तपासल्याशिवाय खरी नव्हे. उदाहरणार्थ- एखाद्या चित्रकाराने कितीहि कसून एखाद्याचे चित्र रेखाटले असलें तरी ते जोपर्यंत दुसऱ्याने पाहून ओळखता आले नाही तोपर्यंत व्यर्थ. कचित् असेहि होते, चित्रकार ते चित्र रेखीत असता त्यात अगदी तन्मय झालेला असतो, व त्यामुळे आपण केले ते सर्वस्वी बरोबर आहे अशी त्याची समजूत असते. तथापि त्याचेप्रमाणेही समजूत इतरांची होईल तेव्हां खरे. नाहीतर कावीळ झालेल्याला सर्व जग पिवळे दिसत असते म्हणून सर्व खरोखरीच तशा रंगाचे असते काय ? नाही. हा केवळ त्या रोग्याचा पित्तदोष होय. तसेच चित्रकाराचेहि आहे. खुद्द चित्रकारहि आपली तन्मयता थोडा वेळ बाजूस ठेवून आपले चित्र काही काल मध्ये सोडून व काही जागा सोडून मागे जाऊन पुन: आपली कृति नव्या दृष्टीने पाहू लागतो, त्यावेळी त्याला आपल्या राहिलेल्या पूर्व चुका पुन: दिसू लागतात. एरव्ही नाही. इतकेहि करून त्याचे चित्र अगदी निर्दोष होतेच अशी त्याची खात्री नसते म्हणून तर तो पुन: आपणांस सोडून इतरांस ते दाखवीत असतो, त्याला स्वत:ला जरी आपले चित्र चांगले झाले आहे म्हणून मनातून आनंद झालेला असतो, तरी जोपर्यंत तज्ज्ञांनी त्याची परीक्षा करून आपले अभिप्रायाचा शिक्का मारला नाही व ते चांगले झाले असे

म्हटले नाही तोपर्यंत व्यर्थच. पण एकदा का त्यांच्या पसंतीस पडले म्हणजे चित्रकाराचाहि आनंद दुणावतो व त्यालाहि आपली कृति निर्दोष झाल्याचा आनंद वाटतो. हा अनुभव एकवार खुद्द चित्रकारासच विचारून पहा. हीच थेट स्थिति सर्व गोष्टींविषयीची आहे. नामदेवाला वाटले की आपण पूर्ण भक्त तेव्हां आपण पोचलो. पण जेव्हा सर्व संत मंडळी एकत्र बसलेली पाहून गोरा कुंभारांनी सर्वांच्या टपली आपल्या हातातील गाडगे घडवावयाचे थापटणे थोपटले व ही मानवरूपी गाडगी कच्ची की पक्की परीक्षा केली तेव्हां त्यांस आढळले की नाम्या कच्चा ! त्यांनी मग नामदेवास सांगितले की 'बाबारे, तूं अजून कच्चा आहेस, गुरु करून घे. त्यावांचून तुला सद्‌गतिहि नाही व सुटकाहि नाही. पुढे नामदेवांनी गुरूकडून आपला कार्यभाग साधला. म्हणून लक्षात ठेवावे की, आपले ज्ञान सर्वांगपरिपूर्ण होण्यास व ते चोख आहे असे समजण्यास त्याची परीक्षा दुसऱ्याकडून करून घ्यावी लागते व तेव्हांच ते दृढ होते असे समजावे. गुरूची आवश्यकता का आहे हे यावरून कळलेच असेल. व्यवहारातहि हे सोने किती नंबरी आहे हे पाहण्याकरिता आपण सरकारी छापाच्या माणसाकडे अथवा सराफाकडे आपले सोने त्याचा कस, हीण इत्यादि तपासण्याकरिता जात नाही का ? तसेच येथेहि आहे. आपणास समजते असे वाटत असले व ते एक वेळ खरेहि असले तरी त्यावर जगताचा छाप हा बसलाच पाहिजे. नंतर ते सर्वतोपरी सिद्ध झाले असे जाणावे. याप्रमाणे ही गुरूची आवश्यकता असतेच असते. नुसत्या जगाला विचारले अथवा त्याकडे पाहून आपण थोडीहि गोष्ट उचलली व ती शिकलो तरीहि जग हे आपले गुरुच झाले. श्रीदत्तांनीहि चोवीस गुरु असेच केले. यावरून आपणाव्यतिरिक्त जग गुरुस्थानी नव्हे असे कसे म्हणता येईल ?

आपण जगात आहोत तोपर्यंत आपले जगावांचून यत्किंचित्हि चालणार नाही. म्हणून अशा प्रसंगी कोणी आपल्याला योग्य गुरु न मिळाला तर निदान जगद्गुरुस म्हणजे जगद्रूपी गुरूस शरण जाऊन आपला कार्यभाग साधावा. याचा अर्थ निदान जगापासून तरी ज्ञानाचे व अभ्यासाचे धडे घ्यावेत. जन्मत: माता गुरु, पुढे पिता गुरु, पुढे ज्ञानदाता गुरु, पुढे जगद्गुरु व शेवटी परमात्मा गुरु याप्रमाणे एकसारखी पायरी-पायरीने गुरुपरंपरा आहेच. मिळून काय सर्वत्र गुरुमयच आहे. म्हणून गुरूची योग्यता जी साक्षात् परब्रह्माइतकी म्हणून खालील श्लोकात सांगितली आहे ती यासाठीच. **'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वर: । गुरु: साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नम:॥** या श्लोकात सर्वच गुरु म्हणून सांगितले आहे ते एवढ्याकरिता. याप्रमाणे गुरूचे माहात्म्य आहे.

**शिष्य :** मला हे गुरुमाहात्म्य पक्के ठसले. आता मी असे विचारतो की, तो गुरु आहे तरी कसा अथवा असतो तरी कसा हे कळेल काय ?

**स्वामी :** हो, आम्ही स्वत: आमच्या गुरुमहाराजांचे ठायी जे गुण पाहिले आहेत ते तुम्हां सर्वांस ऐकून तरी माहीत असतीलच. नसल्यास त्यांचे एकवार श्रवण करा म्हणजे समजेल अथवा याहिपेक्षा थोडक्यांत म्हणजे श्रीसद्गुरु श्रीमत् परमहंसपरिव्राजकाचार्य वासुदेवानंदसरस्वती यांनी केलेली **'श्रीगुरुस्तुति'** चे एकवार पठण करा म्हणजे झाले. त्यांत ९ श्लोकांत सर्व काही गुरूचे गुण आणलेले आहेत.

## श्रीगुरुस्तुति

जो सत्य आहे परिपूर्ण आत्मा। जो नित्य राहे उदित प्रभात्मा।
ज्ञाने जयाच्या नर हो कृतार्थ। तो पूर्ण आनंद गुरू समर्थ॥१॥
अखंड आत्मा अविनाशि दत्त। तया पदी लाविति जे स्वचित्त।
वित्तभ्रमा सोडिति ते कृतार्थ। तो पूर्ण आनंद गुरू समर्थ॥२॥
जो जागृति स्वप्न सुषुप्तिसाक्षी। जो निर्विकारे सकलां निरीक्षी।
वीक्षी परी ज्यासि नसे निजार्थं। तो पूर्ण आनंद गुरु समर्थ॥३॥
जळी स्थळी सर्वहि वस्तुमाजी। व्यापूनि राहेचि तयासि राजी।
जो ठेवि भावें नर हो कृतार्थ। तो पूर्ण आनंद गुरू समर्थ॥४॥
जे दृश्य ते रूप नसे जयाचे। दृश्यांत राहे अविकारि ज्याचे।
स्वरूप तोची अविनाशि अर्थ। तो पूर्ण आनंद गुरू समर्थ॥५॥
दृश्यासि घेतां नच घेववें जें। स्वरूप तत्स्थ प्रभुचे सुतेजे।
स्वयें प्रकाशे जगि जो परार्थ । तो पूर्ण आनंद गुरु समर्थ॥६॥
असोनि सर्वत्र गुरुप्रसादा। विना न लाभे करितांहि खेदा।
भेदाचि वार्ता करि जो अपार्थ। तो पूर्ण आनंद गुरु समर्थ॥७॥
अनन्य भावे भजतां अनन्य। लभ्य प्रभु जो नच होइ अन्य।
संन्यस्त सर्वैषण तारणार्थ। तो पूर्ण आनंद गुरु समर्थ ॥८॥
मागे तुकाराम तयासि दत्त। दे वासुदेवा करुनी निमित्त।
हे स्तोत्र चिन्मात्रपदा समर्थ। द्याया हराया सकलाघ्यनर्थ॥९॥
गाणगापुरि अठराशे सत्तावीस शकामधी।
उदेयेले स्तोत्र हेंचि आधि व्याधि हरी कुधी ॥१०॥

## गुरुस्तुतीचा भावार्थ

ब्रह्म व आत्मा यांचे ऐक्य, अभेद दाखविण्याकरिता आत्म्यास परमात्मा म्हटलेले आहे. आत्मा हा बह्माप्रमाणेच अविनाशी व पूर्ण आहे. दत्त हे सद्गुरुही असेच आहेत. हा कूटस्थ (निर्विकार) परमात्मा जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तिन्ही अवस्थांस व्यापून आहे व तसाच तो सर्व जगतासही व्यापून दशांगुळे उरला आहे. हा स्वत:

अविकारी असून विकारात सापडण्याजोगा नाही. हा सर्वांना प्रकाशित करतो. पण ज्याचा प्रकाश मात्र घेतां येत नाही. अशा या आत्म्याची प्राप्ति त्याची सद्गुरुप्रमाणे उपासना केल्यावाचून होत नाही. जसे दुधांत तूप असूनही ते दूध विरजून मंथन केल्यावाचून प्रकट होत नाही तद्वत. परंतु हेही कळण्यास गुरुकृपाच हवी व असा गुरु म्हणजेही परमात्माच; म्हणून अशा गुरूची अथवा दत्ताची म्हणजे अद्वैत ब्रह्माची एकभावाने उपासना केली असतां तो शेवटी त्याचे फल जे त्याशी एकरुप होणे ते देतो. एकंदरीत एकानेच एकाची एकभावाने सेवा केली असतां अखेरीस ते एकच ज्याचे त्यास प्रतीत होते असा सिद्धांत. म्हणून परमात्मस्वरूप दत्ताने वासुदेवाला निमित्त करून तुकारामला दिलेले हे स्तोत्र चिन्मात्र पदास नेण्यास म्हणजे आत्माप्रकाश करण्यास समर्थ आहे व त्याबरोबरच ते सर्व आधिव्याधि व कुधी (कुबुद्धि) म्हणजे अज्ञानापासून परावृत्त करून, ज्ञानमात्र केवल स्वरूप करण्यासही समर्थ आहे.

**शिष्य :** मागे आपण ध्यानयोग साधल्याची खूण आत्मसाक्षात्कार म्हणून सांगितलीत तरी तो कशास म्हणावा ?

**स्वामी :** आत्मासाक्षात्काराचे स्पष्ट लक्षण गीतेतच श्रीभगवंतांनी असे सांगितले आहे. ते म्हणतात- '**यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः।**' म्हणजे असा एक परमोत्कृष्ट लाभ की ज्याच्यावर असा दुसरा लाभच शिल्लक उरत नाही तो लाभ.

**शिष्य :** म्हणजे परमोच्च लाभच का म्हणाना की ज्याचे योगे वेदांतमताप्रमाणे निःश्रेयस प्राप्त होते तो असेच की नाही ?

**स्वामी :** होय, तसेच म्हणण्यास हरकत नाही.

**शिष्य :** बरे अशा लाभाचा हेतु काय ? तो साधल्यापासून काय घडते ?

**स्वामी :** ज्यास आत्मसाक्षात्कार होतो अशा आत्मसाक्षात्कारी पुरुषाची सर्व कर्मे मग निरहंकृतीने होऊ लागतात, व ती कर्मे मग

ब्रह्मार्पण होतात. शिवाय एरवी कामिक कर्मे करीत असता त्यांत अहंकार असल्यामुळे त्या कर्मापासून इष्टानिष्ट गोष्टी घडल्या म्हणजे मन सुखदु:खानी बद्ध होते व त्यामुळे जीवात्मा आपण कोण हे अगदीच विसरतो. त्याचा परिणाम तो भ्रमांत पडून आपण केवळ पराधीन आहोत म्हणून त्यास वाटू लागते व त्यामुळे जो अद्वितीय असा केवलानंद तो त्यास उपभोगावयास मिळत नाही. पण निरहंकृति कर्माने त्याची चित्तशुद्धी होऊन त्याचेकडे आपलेपुरते मर्यादित असे कर्तेपण व त्याचा बोजा न राहिल्यामुळे त्याचे मन हलके होते म्हणजे त्याचे मनावरील बोजा उडून जाऊन ते स्वैरगामि अतएव स्वतंत्र होते व त्यास कोणत्याही प्रकारची काळजी, शंका इत्यादि न उरल्यामुळे त्याचे सर्व काही यथासांग चालू लागते. घरांतील वडीलधाऱ्या चालकांवर मुलांचा भर जसा पडलेला असतो व मुलांस जाणून अगर न जाणून कोणत्याहि प्रकारची काळजी न करितां कालक्रमणा सुखाने व आनंदाने करिता येते तसेच येथेहि आहे. ज्याने आपली सर्व कर्मे ब्रह्मार्पण केली त्याची काळजी तो परमात्माच वागवितो व त्यामुळे परमात्म्याचा जो परमानंदाचा ठेवा तोच आत्मलाभ यास उपभोगावयास मिळतो. मग परमात्म्याचा हा अंशभागी असल्याचा त्याचा प्रत्यय असल्यामुळे आपण व परमात्मा एकच स्वरूप आहोत हा त्याला अनुभव घडतो. आत्मसाक्षात्कार म्हणतात तो यालाच. स्वस्वरूपानुभव म्हणतात तोहि हाच. आत्मसमर्पण परब्रह्माचे ठायी केल्याने हा आपोआपच प्राप्त होत असतो. मग मुद्दाम एवढी अहंकृति धरून वांकड्या वळणाने जाण्याचे काय कारण ? बरे इतकेहि करून अशा वांकड्या वळणाने मिळणारा आनंद अमर्याद असतो काय म्हणून विचार केला तर त्याचे उत्तर नाही असेच येते व हे उघडहि आहे. कारण असे पहा की कवडीप्रमाणे संकुचित आकाराची वस्तु लाभल्यामुळे मन जास्त प्रसन्न होईल की दर्यासारख्या अमर्याद

आकाराच्या वस्तुलाभाने मन जास्त गंभीर, प्रफुल्लित व आनंदित होईल ! महासागर हातात आला तर कवडीच काय पण अनंत रत्ने त्या रत्नाकराकडून मिळतील, पण केवळ कवडी घेऊन संतुष्ट होऊ पाहणारास एका कवडीशिवाय महासागरासारखा विविध रत्नांचा आनंद कसा भोगावयास मिळणार ? आद्य शंकराचार्यांचे गुरू श्रीगोविंदपूज्यपाद यांनीहि आपल्या रसहृदयतंत्रांत एका चरणात असेच म्हटले आहे. **'कृपणा: प्राप्य समुद्रं वराटिकालाभ संतुष्टा:।'** (र.हृ. ३.१) भावार्थ- समुद्र लाभत असतां जे केवळ कवडीवरच संतुष्ट होऊन राहतात, म्हणजे हीच आपली इतिकृत्यता समजतात ते केवळ कृपण अतएव दरिद्रीच म्हणण्यास हरकत नाही. म्हणून मनाचा हा संकुचितपणा नाहीसा होण्यास सर्व कर्मे ही अहंकृति टाकून व मन महासागरासारखे गंभीर व अमर्याद करून ते परब्रह्माशी मिसळून त्याच्या एवढे मोठे नव्हे त्यातच समाविष्ट करून मग ती कर्मे केली असता आपल्यास त्याची बाधा न होता महापरमानंद चाखावयास मिळतो. यापेक्षा आतां जगात दुसरा मोठा मोठा तो आनंद कोणता असू शकेल याचा तुमचा तुम्हीच विचार करा. ब्रह्मार्पण कर्मे केल्याने परमपुरुषार्थ घडतो तो हाच. मानवाची हीच इतिकर्तव्यता की त्याने आपले सर्व समर्पण एका परब्रह्माचे ठायी करावे, म्हणजे तो महालाभाचा आयताच वाटेकरी होतो. काय अद्यापि समजले किंवा नाही ? **'निर्हेतुक निरहंकारे ब्रह्मार्पण सर्वंचि होती।'** अशी एक साधूक्तिहि आहे.

**शिष्य :** होय अगदी बरोबर समजले ! समुद्राचा दृष्टांत खरोखरीच मोठा गंमतीचा खरा ! ज्यांत सर्व वस्तु द्रवून जातात, समरस होतात, एकरूप होता, तोच समुद्र अशीच ना याची व्युत्पत्ति आहे ?

**स्वामी :** होय असेच.

**शिष्य :** बरे ! अशा प्रकारच्या पुरुषाची वृत्ति (वागणूक) कशा प्रकारची असू शकते ते समजेल काय ?

**स्वामी :** हो ! अशा तऱ्हेचे पुरुष कसे असतात ते एकनाथी भागवतांत स्पष्टपणाने सांगितले आहे. 'बालोन्मत्तपिशाचाभ: स्मर्तृगामी दयानिधि:।' म्हणजे बाल, उन्मत्त व पिशाच या तीन अवस्थांपैकी कोणच्यातरी एका वृत्तीने त्यांची वागणूक व्यवहारांत असते.

**शिष्य :** पिशाचासारखी वृत्ति म्हणजे ते खरोखरीच पिसाट होऊन राहतात की काय ? कां आपले हे नाटक ?

**स्वामी :** होय, तसेच ! ते प्रत्यक्ष पिशाच होत नाहीत तर लौकिकात दाखविण्यापुरते ते तसे वर्तन करतात. असे पुरुष अशा तऱ्हेच्या प्रत्यक्ष वृत्तीमध्ये असतात असे नव्हे तर ते केवळ असा आभास दाखवितात. याचे कारण त्यास जगताची निरर्थक उपाधि होऊ नये असा त्यांत गर्भित हेतु असतो. तुमच्या पाहण्यांत असे साधु आलेहि असतील किंवा ऐकिवांतहि असतील की ज्यांचे पुढे कोणी दर्शनास अगर विचारण्यास किंवा प्रसादास गेले तर ते खस्कन् अंगावर धावून येतात, शिव्याशाप देतात अगर दगड, धोंडे किंवा काठी उचलून डोक्यात हाणतात. म्हणून असल्या सत्पुरुषांचा तो आंतरहेतु असतो असे समजू नये. त्यांचा हेतु इतकाच की, इतकाही धाकदपटशा दाखवून जे कोणी अखेरपर्यंत "या दिव्यात" टिकतील तेच खरे कडकडीत मुमुक्षु असे त्यास पारखून त्यावर कृपादृष्टि करून त्यांस प्रसाद द्यावयाचा. खरोखर असे दयानिधि पुरुष स्मर्तृगामी म्हणजे सर्वांचे अंतर्याम जाणून त्यांचेवर यथायोग्य दया करणारेच होत. श्रीदत्तमहात्म्यांत अशा तऱ्हेचे पुष्कळ दृष्टांत आहेत. ज्यांत प्रत्यक्ष दत्तांनी चांडाळ, मलंग, भिकारी, उन्मत्त, पिशाचवत्, विषयी, अभिलाषी वगैरे अनेक प्रकारची अमंगल, किळसवाणी अगर उग्ररूपे धारण करून त्यांची सेवा अगर भक्ति करू पाहणाऱ्यास वेळी अवेळी भेडसाविले आहे व त्यांची कसोटी पाहिली आहे. पण जे

कोणी सद्भक्त इतक्याही परीक्षेस उतरून, त्यांचे सन्निध जाऊन पोहोचले आहेत, त्यांचे पाय धरीत आहेत, त्यांची करुणा भाकीत आहेत त्या आर्त जनांवर ते दत्त प्रसन्न झाल्याशिवाय राहिलेही नाहीत. खुद्द एकनाथ स्वामींना तर हा अनुभव आहेच. पण त्यांच्याप्रमाणे दुसऱ्या कित्येक सत्पुरुषांसही हा अनुभव आहे. एकदा तुकोबांना कोणीएक पिशाच्च भेटले असता ते म्हणाले 'काय विठोबा ! तुम्ही आता पिशाच्चाचे रूप धारण केले काय ? काही हरकत नाही. पण अशाने मी तुम्हांस यत्किंचितही भिणार नाही हे ध्यानांत ठेवा. मी तुम्हास ओळखले तुम्ही कोण आहां ते.' याप्रमाणे अनेक दाखले पिशाच्च वृत्तीचे असले तरी तेवढ्यावरुन सत्पुरुषांची वृत्ति खरीच पिशाच्च म्हणून न समजतां, ती भासमात्र म्हणजे वरकरणी असते हे ध्यानात घ्यावे व ते जरी अशी वृत्ति उपाधि होऊं नयेत म्हणून पत्करितात तरी तेवढ्याने निरुपाधिक होतात म्हणजे आपलेमागे उपाधि लावून घेत नाहीत असे समजू नये. जे कोणी खरोखरी आर्त व मुमुक्षु असतात त्यांचे मुक्ततेसाठी व कार्यासाठी ते उपाधि स्वीकारण्यास सज्ज असतात. मात्र मुमुक्षूने त्यांचे चित्त आपलेकडे कसे ओढून घ्यावे व लाभ कसा करून घ्यावा हे त्याचे अभ्यासावर व सेवेवर अवलंबून राहील.

**शिष्य :** दत्त हे त्रिशिर व षड्भुज म्हणतात हे खरे काय ?

**स्वामी :** हो ! ही गोष्ट खरी आहे, पण कृतयुगीची आहे. तीन शिरें सहा हात हे तीन वृत्ति एकत्र मिळाल्याचे रूपक आहे. तथापि तसेच रूप पाहू जाणाऱ्या भक्तास ते तसेही दिसेल. पण कलियुगात अशा त्रिशिर षड्भुज मूर्तींचे दर्शन होणे दुष्प्राप्य आहे. ते या युगात मनुष्याप्रमाणे एकशिर, द्विहस्त व बालोन्मत्त अथवा पिशाच्च वृत्तीने होणारे आहे. अवधूतवृत्ति म्हणतात ती यालाच.

**शिष्य :** आपण जो आत्मसाक्षात्कार मघा म्हणालात त्यात आणखी काही भेद आहे म्हणतात ते काय ?

**स्वामी :** होय. आत्मसाक्षात्कारांत थोडा भेद आहे खरा. सारख्या अभ्यासाने जो सतत आत्मसाक्षात्कार होतो तो सगुण साक्षात्कार होय. वेदांतप्रतिपाद्य तो परोक्ष साक्षात्कार म्हणतात व त्याचा जो प्रत्यक्ष अनुभव तो अपरोक्ष साक्षात्कार.

**शिष्य :** उत्थान म्हणतात ते काय ?

**स्वामी :** उत्थान म्हणजे, काही काल आत्मसमाधीमय अवस्थेत जो गेलेला असतो तो पुन: पूर्वस्थितीवर येतो म्हणजे भानावर येतो. या जगात येतो त्याला उत्थान म्हणावे व साक्षात्कार झाल्यानंतर पुन: पूर्वस्थितीवर येणे तेच उत्थान. आत्मसाक्षात्काराची पराकाष्ठा म्हणजेच स्वतोत्थान होय.

**शिष्य :** आत्मोत्थानाप्रमाणेच परोत्थान म्हणून काही असते की काय ?

**स्वामी :** होय. असते तर ! बरे विचारले. आत्मोत्थान एका जीवात्म्यालाच लागू आहे व परोत्थानाची अवस्था म्हणजेच ईश्वरपण. ही अवस्था म्हणजे ज्ञानाची पराकाष्ठा होय.

**शिष्य :** मला आपल्यास एकदा मुक्त व परब्रह्म यातील अंतर विचारावयाचे होते.

**स्वामी :** काही हरकत नाही. पुढील खेपेस सांगू. कारण आता संध्यावंदनाची वेळ झाली आहे. तेव्हां आज येथेच मुक्काम करू या.

**शिष्य :** मुक्त व परब्रह्म यांत अंतर काय ? परवा आपण याविषयी सांगू म्हटले होते म्हणून पुन: आपल्यास त्याविषयी स्मरण करीत आहे.

**स्वामी :** ठीक आहे. आता वेळही आहे. तेव्हा याविषयी काही विवरण करण्यास हरकत नाही. मुक्त व परब्रह्म ही दृष्टान्तानी सांगावयाची म्हटली तर असे म्हणता येईल. समजा एखादा गृहस्थाश्रमी असावा व तोच पुढे संसारास असार समजून व सर्व संग परित्याग करून संन्यासी व्हावा त्याप्रमाणे हे आहे. म्हणजे संन्यास

स्वीकारल्यावरहि ज्याप्रमाणे पूर्वाश्रमीच्या मुलाबाळांचा संबंध म्हटला तर असून आतां मात्र त्यास तो बाधू शकत नाही त्याप्रमाणे.

**शिष्य :** मुक्तीस किती काल लागेल याचा काही अंदाज आहे काय ?

**स्वामी :** याचा अंदाज कसा करता येईल ? सतत अभ्यास करूनही त्याला कालाचे बंधन आहे हे खरे आहे. तथापि तेवढ्याने गडबडून जाण्याचे कारण नाही. एकदा मनुष्य निराश झाला की मग तो हात पाय गाळून पुढचा उद्योग करण्याचे सोडून देतो; म्हणून निराश न होता क्रमाने सलोकता, समीपता, सरूपता व सायुज्यता या मुक्तीच्या पायऱ्या आस्ते-आस्ते व धीमेपणाने गाठून परब्रह्मपदी जाणे हे जरूर आहे.

**शिष्य :** आपण म्हणता हा मार्ग खरोखरीच फार बिकट असून तो आम्हांसारख्या पामरांना साधणे फार दुष्कर आहे. मला नाही वाटत की अर्धवट साधकांना इतका अवघड जिना चढे तो धीर असेलसा. ते बिचारे ही बिकट वाट पाहून आधीच घाबरतील व कदाचित तो निराशेने सोडूनही देतील. इतका दम धरून अगदी गिरिशिखरावर जाणारा असा क्वचितच महात्मा आढळेल.

**स्वामी :** तेही खरेच. हा मार्ग सावकाशीचा अतएव पिपीलिकामार्ग आहे व यास टप्पे टप्पेही बहुत आहेत. तथापि एवढ्याने निराश होण्याचे कारण नाही. का की ज्याला खरोखरीच तितकी उत्कंठा व तातडी आहे, त्याला नजीकचे मार्ग व नजीकची साधनेही आहेत.

**शिष्य :** तो कोणाचा मार्ग ? व त्याची साधने काय ?

**स्वामी :** अहो असे पहा, मुंबईत सोपान अगर दादर न चढता एकदम पाळण्यात (लिफ्ट) मध्ये बसून श्रम न पडतां त्या त्या मजल्यावर जाता येतेच की नाही ? अथवा आगगाडीपेक्षाहि जलद अशा विमानमार्गे उड्डाण करून नदी, नाले, पूल, डोंगर यांचे अडथळे

न मोजतां एकदम अल्पावधीत हवा तिकडे संचार करता येतोच की नाही ? फार लांब कशाला ? जनावरे वगैरे स्थलचर प्राण्यांना असे जाणे दुष्कर वाटते; पण तीच देवाने घडविलेली विमाने म्हणजे पक्षी कसे भुर्रदिशी उडून जातात ते आपण पाहतोच ना? म्हणून पक्षी, विमाने अगर विजेचे पाळणे याप्रमाणे चट् उड्डाण करता येण्याजोगा एक जवळचा मार्ग आहे. ज्यास विहंगममार्ग असे म्हणतात. मुक्तीस लवकर जाऊ इच्छिणाऱ्याने अशा मार्गाने जाण्यास हरकत नाही. त्याने हा सोपानमार्गाचा क्रम न स्वीकारता विहंगममार्गाने आपली सुटका झट् करून घ्यावी. हा मार्गही अवघड नसून सोपाच आहे; तथापि यात एक महत्वाची गोष्ट आहे.

**शिष्य :** ती काय ? त्यात काही अशीच एखादी अडचण बिडचण नाहीना ?

**स्वामी :** नाही. तसे काही फार म्हणण्यासारखे नाही. पण या मार्गात एक मोठी गोष्ट अशी लक्षात ठेवावी लागते ती ही की, त्याने म्हणजे साधकाने, सद्‌गुरुंचा प्रसाद व ईश्वराचा अनुग्रह होण्यास आपल्या सेवेत बिलकुल खंड पडू देता कामा नये व आपल्या प्रयत्नात कसर करता नये. अशा सेवेने व अशा प्रयत्नाने त्याने आपल्या कर्मरूप क्षेत्रात (शेतात) श्रीगुरु व ईश्वर यांच्या कृपेचे पाटाचे पाणी सहज खेळू शकेल अशा बेताने आपल्या भूमिकेत आगाऊच चर खोदून ठेवण्याची व्यवस्था करून ठेवली पाहिजे. अशी त्याची व्यवस्था झालेली असली म्हणजे सद्‌गुरु त्याच्या भूमिकेतील चरांचे बांध (दरवाजे) केव्हाच फोडून टाकतील व त्यातून आपल्या दयामय पाण्याचे प्रवाह सोडून ते पात्र जलमय करून टाकतील व असे झाल्याने सद्‌गुरुरूपी जलात मग आपणही बुडून जाऊन त्यांच्या स्वरूपी पोहोचू यात आश्चर्य ते कसले ? गुरूची योग्यता व गुरूची आवश्यकता या दृष्टांतावरून पुन्हा एकवार पटण्याजोगी आहे नाही ?

**शिष्य :** मला आपले बिनतोड दृष्टांत ऐकून फारच संतोष वाटला. परवा बसलेली मंडळीहि हेच म्हणत होती की, स्वामी महाराजांची (आपली) सांगण्याची हातोटी फार अपूर्व आहे म्हणून. त्यांनाही आजचे आपले हे भाषण सांगणार आहे व माझी खात्री आहे की हे ऐकून त्यांनाही आनंद वाटलाच पाहिजे. पाहिजे तर आज येथेच पुरे करू या.

--------*****---------

**शिष्य :** काल मी आपले झालेले बोलणे मुक्त व परब्रह्मांतील अंतर याविषयीचे, आमचे सर्व बंधूस सांगितले व माझ्या अटकळीप्रमाणे त्यांनाही काही शंका न येता तो विषय पटून समाधान वाटले. आता त्यांतून एकदोघांच्या मनात काही गोष्टीविषयी आपलेकडून फोड करून घ्यावयाची होती, पण ते, तो विषय आपलेपुढे ठेवण्याविषयी भीड धरतात म्हणून त्यांचे वतीने मीच तो विषय आपलेपुढे मांडतो.

**स्वामी :** ज्ञानाचे बाबतीत भीड ठेवू नये. आपली जखम चव्हाट्यावर बांधल्यावाचून औषध मिळत नाही. असो. काय ? त्यांचे म्हणणे तरी काय ?

**शिष्य :** त्यांचे म्हणणे असे की, आम्ही या व्यवहाराने इतके जखडलेले आहोत की, आमची सुटका कधी काळी होईल की नाही याचीच शंका वाटते. कारण आमचे हातून धड अभ्यासही होत नाही व धड सद्गुरुसेवाही होत नाही. तरी यास आणखी जवळचा काही सुलभ उपाय असल्यास हवा आहे.

**स्वामी :** काही नाही. अशा प्रपंची पुरुषाने दिवसा काय हवा तो आपला व्यवहार करावा. पण रात्री आपणच ठरविलेल्या वेळी थोडा का होईना आत्मानात्मविचार करण्याचा परिपाठ ठेवला तर त्यांचीही सुटका होण्यास हरकत नाही.

**शिष्य :** हा विवेक कसा करावयाचा ?

**स्वामी :** त्याला एक उपाय व तो म्हणजे मी व माझे याचा त्याग करणे, संन्यास करणे.

**शिष्य :** म्हणजे काय ? याची विशेष फोड करून मला हवी आहे.

**स्वामी :** असे पहा, सुषुप्तीत आपणांस सुख मिळते की नाही ?

**शिष्य :** होय, आपल्यास उत्तम गाढ झोप लागली होती हे आपल्यास जागे झाल्यावर कळते व त्याविषयी आनंद होतो.

**स्वामी :** पण सुषुप्तीत मन जरी निद्रित असले तरी आपण म्हणजे आपला आत्माच जागा असतो. म्हणून त्याच्या साक्षित्वामुळे आपल्यास हा आनंद सांगतो येतो. झोपेत असतानाच कोणास हा आंनद त्यावेळी सांगता येईल काय ? व जर येईल तर तो जागाच म्हणावयाचा. मग झोपेत व जागेपणांत अंतर ते काय राहिले ?

**शिष्य :** होय, ते खरेच. जागेपणी आपले मन जागे असते व निद्रेत ते निजलेले असते. पण आत्मा हा उभयावस्थेत जागाच असतो, असाच ना? आपल्या म्हणण्याचा आशय ?

**स्वामी :** होय, तसेच. अगदी तसेच. इतकेचसे काय पण आत्मा चारी अवस्थेततही जागाच असतो व या सर्व अवस्था आत्म्याला लागू नसून मनाच्या मूढ जागृतादि वृत्तीमुळे त्याला लागू आहेत. आत्म्यास बिलकूल लागू नाहीत.

**शिष्य :** या चारी अवस्था कोणत्या व त्यांची लक्षणे काय ?

**स्वामी :** हे पहा. मन जागे असते ती जागृति. निजलेले असते तेव्हां सुषुप्ति. जेव्हा अर्धवट जागे व अर्धवट झोपाळू अशा संदिग्ध अवस्थेत असते तेव्हां स्वप्न व जेव्हां मुळी मनच नाहीसे झालेले, मन लय पावलेले असते तेव्हां अमनस्क अथवा उन्मनी अवस्था म्हणावी. याच अवस्थेला, ती या तिन्हींहून विपरीत, विशेष व महत्वाची म्हणून चौथी अवस्था असे नामाभिधान आहे. जर काही या नरदेहात येऊन

साधावयाचे असेल तर ती हीच अवस्था होय. समाधि स्थिति ती हीच. म्हणून येनकेन प्रकारेण मनाचा लय करणे अवश्य ठरते. मी व माझे सोडल्याशिवाय या मनाचा लयच होऊ शकत नाही. कारण जेथे हे मी व माझे आले तेथे अहंकार व मन सदा जागृत असते व समाधि अवस्थेला तर हे अगदी वावडे आहे. म्हणून मी व माझे सोडले पाहिजे असे जे वर आम्ही म्हटले त्याचे इंगित हेच आहे.

**शिष्य :** मी व माझे कोणत्या अवस्थेत सोडावयाचे ? जागेपणी की निद्रेत ?

**स्वामी :** मी आणि माझे जागेपणी सोडले पाहिजे व सुषुप्तीतही सोडले पाहिजे. प्रथम जागृतीत हा सोडण्याचा अभ्यास केला म्हणजे मग सुषुप्तीतही तो हळूहळू साधू लागतो. मात्र हे खरे की, जागेपेणापेक्षा सुषुप्तीत हा साधणे कठीण आहे. एक वेळ जागेपणी हे करता येईल पण सुषुप्तीत मन निद्रिस्त जरी असले तरी ते मी व माझे या द्विदल बीजाची वासना धरून असतेच. त्या वेळी हे बीज अदृश्य व लयस्थितीत असले तरी त्याचा प्रचंड वृक्ष जागेपणी होऊ लागतो. अनुकूल स्थिति मिळाली की बीजे फोफावतात हा निसर्गसिद्ध नियमच आहे. म्हणून वासनाबीजे अजिबात जळून गेलेली पाहिजेत. भाजलेल्या धान्याप्रमाणे नावाला धान्य हे बी, पण पेरल्यास बिलकूल उपयोग नाही. जळलेल्या सुंभाचा पीळ दिसतो पण ते सुंभ कशास बांधता येईल तर शपथ. म्हणून वासनाबीजे जाळून खाक केली पाहिजेत. मी व माझे हीच ती वासनाबीजे होत. हा देह तो मी व या देहाकरिता जे जे करतो, केले अगर करणार ते माझे, हीच ती भावना.

**शिष्य :** आता मला या मी व माझे या द्विदल बीजाचे कोडे पुष्कळ उलगडले. बरे तर मी आता असे विचारतो की, ज्या अहंकारामुळे मी व माझे जन्माला येते तो अहंकार राहातो तरी कोठे ?

**स्वामी :** बरा प्रश्न विचारला. मध्यंतरी मी हेच सांगणार होतो. याविषयीचा ग्रंथाधार असा आहे- 'नेत्रस्थं जागृतं विद्यात्कंठे स्वप्नं समादिशेत्। सुषुप्तं हृदिस्थं विद्यात्तालौ तुरीयकम्॥' म्हणजे अहंकार शरीरात ठिकठिकाणी असतो. अहंकार म्हणजे या जड देहाविषयीची ममता, ममत्व. हा अहंकार नेत्रात असता जागृतावस्था असते. तो लीन होऊ लागला की, झोप आलीच. हा कंठात गेला की स्वप्नावस्था असते. तो हृदयात गेला की सुषुप्ति व तो तालुस्थानी म्हणजे ब्रह्मरंध्री गेला की तुरीया (उन्मनी) अवस्था होते. पहिल्या तीन ठिकाणी अहंकार ज्या अवस्था करतो त्या अवस्थांत त्याचे स्वरूप शुद्ध नसते. पण तो ब्रह्मरंध्री जाऊन तुर्यावस्था प्राप्त झाली की त्याचे तात्काल शुद्ध स्वरूप बनते. येथे मायेचे स्वरूप असते. येथील अहंकार स्वस्वरूपाचा असतो. बाकीच्या जागेचा अहंकार मायावेष्टित असतो. म्हणूनच आरंभी सांगितल्याप्रमाणे आत मी व बाहेर माझे येवढे टाकले म्हणजे झाले आणि सुषुप्तीत मी, तू व तुझे आणि माझे हे टाकले पाहिजे.

**शिष्य :** जागृति आणि सुषुप्ति ही तरी खरीचना ? व यात मिळणारे सुखही खरेचना ?

**स्वामी :** जागृति ही खरी, पण तीत जेव्हां स्वस्वरुपाचा अनुभव असेल तेव्हा मात्र. स्वप्नस्थिति ही मिथ्या, कारण तेथे स्वरूपाचा अनुभव केव्हांही नसतोच. सुषुप्ति हा व्यवहारांतील सुखाचा अनुभव आहे. सुषुप्तीत स्वरूपाचा अनुभव घडतो. कारण तसे नसते तर मागाहून तरी त्या आनंदाची आठवण का झाली असती ? आणि स्वप्न हा नित्य मिथ्यात्वाचा अनुभव आहे, म्हणून रोजच्या स्वप्न-सुषुप्तीवरून आपण नित्य हाच बोध घ्यावयाचा की ह्या दोन अवस्था म्हणजे सत्य व मिथ्या स्वरूप दाखविणारे दोन गुरु होत.

**शिष्य :** बरे, सुषुप्तीचा आनंद जर खरा तर तो घेता का येत नाही ?

**स्वामी :** का बरें ? तो घेता येतोच. पण तो घेतलेला आठवणीत नसतो इतकेच. आणखी दुसरे असे की तो घेत असतांहि कळत नाही. त्याचे आपणांस भान नसते.

**शिष्य :** सुषुप्तीत तो आनंद कां न कळावा ?

**स्वामी :** तो कळत नाही याचे कारण असे की, कळण्याला कारण जी वृत्ति ती तेथे मुळी शून्य म्हणजे लय पावलेली असते म्हणून. शिवाय दुसरे असे की, तो आनंद घेतांना सुषुप्तीतील अज्ञान त्यावेळी नसले पाहिजे. याचा अर्थ त्यावेळी ज्ञान असेल तरच तो घेता येईल. म्हणून सुषुप्तिकाळी ज्ञान राहण्यासाठी त्याचा सतत अभ्यास केला पाहिजे हा इत्यर्थ.

**शिष्य :** अज्ञान नाश कशाने होईल ?

**स्वामी :** स्वरूपाचे ज्ञान वृत्तीत प्रविष्ट (प्रतिबिंबित) झाल्यावाचून मूळ अज्ञानाचा नाश करू शकत नाही. यास दृष्टांत सूर्यकांत मण्याचा समर्पक आहे. कल्पना करा की, एका बाजूला आत्मप्रकाशरुपी सूर्य व दुसरे बाजूस अज्ञानरूपी कापूस ठेवला व मध्ये वृत्तिरूप सूर्यकांत ठेवला तर त्यायोगे ते अज्ञान जळून दग्ध नाही का होणार ?

--------*****---------

**शिष्य :** मागे आपण, ज्ञानाने आत्मा मुक्त होतो म्हणून म्हटलेत याचा अर्थ तो पुन्हा जन्मरणाचे फेऱ्यात सापडत नाही हाच ना ? का आणखी दुसरा अर्थ आहे ?

**स्वामी :** होय, तोच. ज्ञानाचे योगे आत्म्याची ये-जा म्हणजे जन्ममरण सुटते. वास्तविक आत्मा हा बद्ध नाहीच आहे. पण मनाचे

बंधामुळे आत्म्यावर बंध आहे असा भास होतो. सूर्याचे उष्णतेने उत्पन्न झालेले मेघ सूर्याच्या आड आल्यामुळे जसा सूर्य त्यांनी बद्धता पावल्याचा भास होतो. वस्तुत: तो बद्ध नसतोच. तसेच येथेही आहे म्हणून समजावे.

**शिष्य :** ज्ञानाने जर मुक्तता आहे, तर आम्हांस हे सुखदु:ख का बरे भोगावे लागते ?

**स्वामी :** प्रारब्धामुळे, प्रारब्ध याचा अर्थच प्राक्-पूर्वी आरब्ध म्हणजे हाती धरलेले, आरंभलेले कार्य. आपण सोडलेल्या कर्मरूप बाणाचे फळ आपल्यास मिळालेच पाहिजे. कर्म जसे शुभाशुभ असेल त्याप्रमाणे त्याचे फल, पुण्य, पाप अथवा सुख, दु:ख असेल. यावरून जेथे कर्मच नाही तेथे सुख-दु:खही नाही. मात्र कर्म याचा अर्थ सहेतुक कर्म असाच घ्यावयाचा. जे कर्म अहेतुक ते मुळी कर्मच होऊ शकत नाही. त्यास फार तर सहज कर्म म्हणावे. सहज कर्माचा केव्हाही बाध होऊ शकत नाही. मग ते सहज कर्म शुभ असो की अशुभ असो; काही चिंता नाही. यासाठी भगवद्गीतेत म्हटलेच आहे की, 'सहजं कर्म कौन्तेय सदोषमपि न त्यजेत' याचा अर्थ- अर्जुना ! जे कर्म सहजी आपल्या वाट्यास आले ते मग अशुभ असले तरी बेहत्तर. पण ते टाकू नये. याचे कारण ते मुळी बाधतच नाही. आगंतुक कर्म मात्र बाधते. यास दृष्टांत- शरीराला नाक, कान, डोळे, हात, पाय इ. टेंगळे सहज कर्माने (प्रकृतीने) आली असल्याने त्यांची बाधा होत नाही. उलट, ती काही अंशी सुख देण्यासच कारणीभूत होतात. पण या टेंगळाशिवाय या अवयवावर जर का आगंतुक टेंगळे अगर फोड आले तर ते दु:खदायक होतात. याचे कारण काय तर ती सहजी (प्रकृतीने) आलेली नव्हेत. म्हणून आपण कृत्रिम तऱ्हेने केलेली कर्मे प्रारब्धात गणली जाऊन, ते दृष्ट सुखदु:खात्मक प्रारब्ध आपणांस भोगणे प्राप्त होते.

**शिष्य :** हे प्रारब्ध नाहीसे होण्यास काय उपाय ?

**स्वामी :** हे नसावे असे वाटत असेल तर वासनाबीजांचा क्षयच केला पाहिजे. तसाच मनोनाशाही झाला पाहिजे. कारण वासनेला आधार मुळी मनच.

**शिष्य :** नुसत्या ज्ञानाने वासनाक्षय व मनोनाश होत नाही काय ?

**स्वामी :** होतो, पण तो तात्पुरता होतो. पण पर्जन्यकाळ नसताना धुळीत पडलेली बीजे व कंद, वर्षाकाळाची थंड व अनुकूल हवा लागताच पुन्हा जोराने उठू लागतात. म्हणून नुसते ज्ञान होऊन भागत नाही, तर त्याचा सतत अभ्यास झाला पाहिजे. अभ्यासाने ही बीजे जळून जातात म्हणजे त्यांचे मोड करपून जातात. मग जरी ही बीजे नावाला असली तरी त्यापासून सृष्टि होऊ शकत नाही. म्हणून ज्ञानोत्तरही स्वतंत्रपणे मनोनाश व वासनाक्षयाचा अभ्यास केलाच पाहिजे. मागे एकवार आम्ही सूर्यकांत मण्याचा दृष्टांत देऊन सांगितलेच आहे. त्याची येथे पुनरावृत्ति करून आठवण करतो की, स्वरूपज्ञान वृत्तीत प्रविष्ट झाल्यावाचून व त्याची एकवटलेली प्रखर किरणे अज्ञानरूप कापसावर पडल्याखेरीज ते जळून दग्ध होणार नाही.

**शिष्य :** नुसता वासनानाश याचा व मनोनाशाचा अभ्यास अथवा नुसता ज्ञानाचा अभ्यास केला तर चालणार नाही काय ?

**स्वामी :** चालेल. पण वासनाक्षय, मनोनाश व तत्त्वज्ञान या तिहींचा अभ्यास एकसमयावच्छेदेकरून केल्यास उत्तम. कारण त्याने काम त्वरित होते.

**शिष्य :** आपण जो या तिन्ही गोष्टींचा अभ्यास एककाली झाला पाहिजे म्हणून म्हणता तो कसा ?

**स्वामी :** तो असा की, अंगप्रधानरूपाने.

**शिष्य :** अंगप्रधानरूपाने म्हणजे ?

**स्वामी :** अंगप्रधानरूपाने याचा अर्थ- एकदा ज्ञानाला प्रधान करून म्हणजे महत्व देऊन वासनाक्षय व मनोनाश यांना अंगत्व म्हणजे गौणत्व देणे व दुसऱ्यांदा वासनाक्षय व मनोनाशाला प्रधानत्व देऊन ज्ञानाला अंग करणे. म्हणजे या योगे दोन्हीअंगे खंबीर होतात. याचा विशेष उलगडा हवा असेल तर तो जीवन्मुक्तिविवेक या ग्रंथावरून करून घ्यावा.

**शिष्य :** आम्ही जे ऐकले व वाचले आहे की, ज्ञान, भक्ति व योग असे तीन मुक्तीचे मार्ग आहेत. त्यांत तथ्य कितपत आहे ? म्हणजे तीनही आचरलेच पाहिजेत अथवा यांतून कोणताही एक आचरला तरी चालतो ? व जर एकेकटा मार्ग चालत असेल तर त्या प्रत्येकाचे भिन्नत्व अथवा वैशिष्ट्य काय ? व शिवाय या सर्वांतून सुकर कोणता ? असे माझे एकाच प्रश्नापासून उद्‌भवणारे चार पाच प्रश्न आहेत, त्यांचा कृपा करून उलगडा झाल्यास बरे होईल.

**स्वामी :** हे सर्व प्रश्न एकमेकांच्या गुंतागुंतीचे आहेत. यांत शंका नाही. पण ही गुंतागुंत एकदम सुटणारी नाही. यांतून काही पदर आधी तर काही मागून असे सुटू शकतील. म्हणून सर्व गुंतागुंत सुटेपर्यंत या विषयाचे पूर्ण अनुसंधान राखले पाहिजे.

**शिष्य :** पाहू. आता हे अनुसंधान राखण्याचा प्रयत्न तर करून पाहू.

**स्वामी :** ठीक आहे. प्रथम योगात, ज्ञानात व भक्तीत काय काय साधते व काय काय कमी पडते ते पाहू म्हणजे त्यांचे मार्ग व त्यांचे वैशिष्ट्य या दोहींचा आपोआपच उलगडा होईल. आता क्रमाने योग, ज्ञान व भक्ति घेऊ.

**योग्याचे-** वासनेचे मूळ ज्ञानानेच जळते. कसे, तर मोड भाजलेल्या बीजाप्रमाणे भर्जित बीज ते हेच. म्हणून योग साध्य झाल्यावर त्याने

ज्ञानाचा अभ्यास स्वतंत्र केला पाहिजे. योग याचा अर्थ येथे हठयोग समजावा. यात जळलेले काहीच नसते. योगी हा फक्त पंपाने नळीतील वायू जबरीने वर ओढून व ती जागा निर्वात करून पाण्याचे आकर्षण होते, तद्वत् आचार करतो. म्हणजे देहाचे आकर्षण प्राणाचे (वासनेचे) मनात व मनाचा आत्म्यांत लय जबरीने करतो.

**ज्ञान्याचे :** वासना व मनोनाशाचे मूळ फक्त जळलेले असते. पण त्याचा दृष्ट सुखदु:खात्मक शेंडा मात्र जळलेला नसतो, म्हणजे ओला अथवा जिवंत असतो. पण तो प्रारब्ध-भोगाने नाहीसा होतोच. तथापि त्याने वासनाक्षय, मनोनाशाचा अभ्यास शेंडा जळण्यासाठी स्वतंत्र केला पाहिजे. पण एकाच काळी ज्ञान व मनोनाशाचा अभ्यास केल्यास हे सर्व अज्ञान आमूलाग्र नाश पावते.

**भक्तियोग्याचे :** भक्तियोगाचे पर्यवसान ज्ञानयोगात होते. याचे कारण- 'भक्तेश्च या पराकाष्ठा सैव ज्ञानं प्रकीर्तितम्' असे देवीगीतेतच सांगितले आहे. भक्तीची पराकाष्ठा म्हणजे आत्यंतिकता ते आत्मनिवेदन. ही नववी भक्ति होय. म्हणूनच भक्तियोग्याला ज्ञान्याप्रमाणे वासनाक्षय व मनोनाशाचा अभ्यास करण्याचे कारणच नाही. याचे कारण हेच की त्याच्या संस्काराचा व मनाचा लय आत्मनिवेदन या भक्तीमुळे परमेश्वराच्या ठायी झालेला असल्यामुळे व तो जगतात एका ईश्वरावांचून दुसरे काहीच पहात नसल्यामुळे त्यास या गोष्टींचे कारण पडत नाही. येथे पहाणे किंवा दिसणे ही एक वृत्ति व ती नाही म्हणून मिथ्या मानणे ही दुसरी वृत्ति = अनुवृत्ति. ज्ञानी हा बाहेर अनुवृत्तीने जगत् पाहातो व भक्त हा अंतर्वृत्तीने ईश्वरास पहातो हा दोहोंत भेद. भक्त आपला लय आंधळेपणाने डोळे मिटून करतो. ज्ञानी आपला लय उघड्या डोळ्यांनी करतो. आता भक्त व ज्ञानी हे या जगतास कसे पाहतात म्हणाल तर - भक्तयोगी प्रथम सगुणाला (ईश्वराला) पाहून मग जगत् पाहतो व ते मिथ्या आहे म्हणतो. अर्थात्

त्यास या गोष्टीचे ज्ञान नंतर होते व ते भक्तीच्या पराकाष्ठेने होऊन ईश्वरस्वरूप ज्ञान होते. त्याने जो निर्गुण पाहातो म्हणजे याथात्म्यज्ञान होऊन मग मोक्ष मिळतो. ज्ञानी प्रथम ब्रह्मज्ञान करून घेऊन (निर्गुणाला पाहून) मग जगत् पाहतो. सगुण पाहतो. म्हणजे अन्वयपूर्वक व्यतिरेक पाहणे ज्ञान्याचे तर व्यतिरेकपूर्वक अन्वय पाहणे भक्ताचे. याप्रमाणे योगी, ज्ञानी व भक्त यांची शेवटी एकवाक्यता होते. शेवटी सर्व एकच. एकाच ध्येयाला (मुक्तीला) पोचणारे. भक्त असो, ज्ञानी असोअगर योगी असो त्या सर्वांना कर्म हे पायाप्रमाणे प्रधान आहेच. तो भक्कम नसेल तर त्यावाचून सर्वच डळमळित समजावे. हा सर्वांना पायाभूत आहे. कर्मावांचून काहीच नाही. टिळक आपल्या गीतेच्या टीकेंत तरी हेच प्रतिपादितात व ईश्वर तरी कर्म कोठे नाही करीत ? मात्र त्याचे कर्म त्यास बाधत नाही व आपले मात्र आपल्यास बाधते. याचे कारण, त्याचे कर्म निष्काम किंवा सहज असते. सूर्याचा जसा प्रकाश पडावा त्याप्रमाणे, म्हणून तो करून अकर्ता लेप न झालेला, सगुण सृष्टि करून स्वत: निर्गुण असा आहे.

**शिष्य :** भावना व भक्ति यांत अंतर काय ?

**स्वामी :** भावना म्हणजे एखाद्या गोष्टीविषयी नुसती समजूत. भक्तीची गोष्ट तशी नाही. तीत प्रत्यक्ष क्रिया व तादात्म्य असावे लागते. याहीपेक्षा सोप्या तऱ्हेने सांगावयाचे म्हणजे 'स्वस्वरूपानुसन्धानं भक्तिरित्यभिधीयते' (विवेकचूडामणी) आपण नेहमी आपल्या स्वरूपाच्या ठिकाणीच रत असणे, गढून जाणे हीच खरी भक्ति. आत्मरतीच का म्हणाना. नुसत्या भावनेने भागणार नाही, तर खरीखरी भक्ति म्हणजे स्वस्वरूपानुसंधानच पाहिजे.

**शिष्य :** आम्हांस असा भक्तिपुरस्सर अभ्यास करण्यास नेहमी व्यवहार आड येतो याला काय करावे ? व्यवहार आड येण्याने आमचे हातून अभ्यास होत नाही.

**स्वामी :** व्यवहार तर सांभाळलाच पाहिजे व तो सांभाळूनच सर्व काही परमार्थ केला पाहिजे व हा व्यवहार आमच्या गुरुमहाराजांनी आम्हांस सुद्धा शिकविला. याचा अभ्यास त्यांनी वर्षभर तरी करवून घेतला असेल. 'आधी प्रपंच करावा नेटका । मग परमार्थ साधावा झटका' म्हणून व्यवहार न टाकता दिवसा हवा तो धंदा करून, रात्रीचे नियमित वेळी आपली ध्यान धारणा, उपासना इ. जी काही असेल ती नियमित वेळी करावी व एकदा नियम धरला की तो निमित्तावांचून कधीही मोडता नये. आणखी व्यवहारातील एक मुख्य लक्षात ठेवण्याची गोष्ट ही की, उभयतांतील व्यवहाराची कधीही बाहेर परिस्फुटता न करिता त्याचा उलगडा परस्परांनी एकांतातच करीत असावा, तर तो व्यवहारज्ञ व तो व्यवहार केल्याचे सार्थक. समजले ना ?

**शिष्य :** होय, समजले. मला या व्यवहाराविषयी बरेच दिवसांपासून धास्ती वाटे. वाटे की, परमार्थ साधण्यास व्यवहार सर्वस्वी सांडलाच पाहिजे व त्यावांचून तर पदोपदी नडते. तेव्हां या दोन गोष्टी साधणार कशा म्हणून भारी चिंता वाटे. पण आता त्याचा चांगला उलगडा झाला. मला एकदां आपल्या तोंडून, हा व्यवहार न सोडतां अभ्यास करण्यास काही हरकत नाही हेच पाहिजे होते. असो. आता या आपल्या भाषणाने माझ्या मनाचे समाधान झाले.

**स्वामी :** व्यवहार नडतो कोणास ? ज्याचे मन त्यात लिप्त असते त्यास. जो सदासर्वकाळ व्यवहार करता करता आपले स्मरण ठेवतो त्यास व्यवहार केव्हांही बाधत नाही. सर्व काही असंग राहून कर्म करण्यांतच शहाणपण आहे व खरा योगी तोच म्हणावा. 'कमलपत्रमिव' म्हणजे पाण्यात कमलपत्र जन्मले असून त्यावर पाणी ठरत नाही म्हणजे चिकटत नाही इतके सुळसुळीत व असंग असते.

**शिष्य :** परमार्थ साधनाला ब्रह्मचर्य अवश्य आहे म्हणतात त्याचे कारण काय ? व ते ब्रह्मचर्य कसे असावयास पाहिजे ?

**स्वामी :** खरेच. परमार्थात ब्रह्मचर्य अवश्य आहे. कारण तो हा मुळी त्याचा पायाच. जीव की प्राण. ज्याचे ब्रह्मचर्य ढळले त्याची तपश्चर्या नष्ट झाली व तो अधोगतीलाच गेला म्हणून समजावे. ब्रह्मचर्य म्हणजे ब्रह्मपदाची प्राप्ति. ती होण्यास आपण ऊर्ध्वरितेच झाले पाहिजे. ऊर्ध्वरिते म्हणजे वीर्याचा नाश न करता त्याचे संरक्षण, वर्धन. असे ब्रह्मचर्य सतत १२ वर्षे कडकडीत पाळल्याने आपल्यास एक मेधा नांवाची अत्यंत स्मरणदायी अशी विलक्षण शक्ति प्राप्त होते. जिचे योगाने आत्मज्ञान होणे सुलभ जाते. आता ब्रह्मचर्य कसे आचरावे म्हणाल तर- स्वप्नात अगर मनातही विषयवासना न येणे. शिवाय द्विजांनी ब्रह्मकर्मही केले पाहिजे म्हणजे वेदाध्ययन, शुक्लवृत्ति व अग्निकार्य ही तीन सांभाळलीच पाहिजेत म्हणजे ब्रह्मकर्म होते. वेदाध्ययन = संहिता, ब्राह्मण, आरण ही ७/७ वेळ गुरुमुखेकरून घेणे. शुक्लवृत्ति = पर्याप्त पुरणारी ओली भिक्षा मागणे. अग्निकार्य = निदान एक समिधा तरी घेऊन मंत्र म्हणून अग्नीस आहुती देणे. हे काम पांच मिनिटांतही होऊ शकते. कॉलेजातील मंडळी अथवा गृहस्थ लोक आपल्यास ब्रह्मकर्मास वेळ मिळत नाही म्हणतात म्हणून हे अगदी थोडक्या वेळात संक्षिप्तात होणारे ब्रह्मकर्म सांगितले आहे.

**शिष्य :** महाराज ! आम्हांस हे सर्व करण्यास सोवळे ओवळे राखणे अडचणीचे पडते त्यास काही उपाय आहे काय ?

**स्वामी :** हो, त्यासही उपाय का नसावा ? इच्छा आहे तेथे उपायही मिळतो. नाहीतर न कर्त्याचा वार शनिवार. ज्यास सोवळ्याची अडचण असेल त्याने आपली संध्या ओलेत्यानेच केली म्हणजे झाले. यास ५ मिनिटेही नकोत. मात्र ब्रह्मकर्म करण्याची बुद्धि पाहिजे. आता ब्रह्मयज्ञ

करणे तो पंचमहायज्ञच करावा. हा म्हणजे देव, ऋषि, आचार्य, गुरु, पितर इ. चा होय. हा केल्याशिवाय ब्रह्मकर्म पुरे होत नाही. कां की, ज्याच्या यज्ञामुळे आजही सृष्टि बघण्याचे व तीत राहण्याचे सामर्थ्य आले त्यांची आठवण कृतज्ञता म्हणून आम्ही केली तरच त्यांचे आम्ही उतराई होऊ हे ध्यानात ठेवा.

**शिष्य :** असो. आता येथेच पुरे करावे हे बरे. का की आपल्या संध्यावंदनाची वेळ झाली आहे.

**स्वामी :** नारायण ! असेच रोज येत चला व आपल्या शंका अगर काही विवरण विचारणे असल्यास विचारीत चला. परवांच्या कॉलेजच्या मुलींनीही बरेच प्रश्न विचारले होते व त्यांनाही, नेहमी असे काही तरी आत्मज्ञानविषयक विचारीत जा म्हणून आम्ही सवलत दिली आहे. येतांना तुमच्या मित्रमंडळीसही घेऊन येण्यास हरकत नाही. जा आता उद्या या. आज वेळ फार झाला आहे.

--------*****---------

**शिष्य :** जीवन्मुक्त होण्याला काय काय करायला पाहिजे हे मला एकवार ऐकावयाचे आहे.

**स्वामी :** जीवन्मुक्तीला तीन अभ्यास पाहिजेत.

**शिष्य :** या अभ्यासाने काय फलप्राप्ति ? व ते अभ्यास कोणते ?

**स्वामी :** याने पंच फले मिळतात. ते अभ्यास-तत्त्वज्ञान, वासनाक्षय, मनोनाश. मात्र तिहींचा सहाभ्यास (एकत्र अभ्यास) झाला पाहिजे. याने जी फळे मिळतात ती ही- (१) ज्ञानरक्षा, (२) तप:सिद्धि (३) सर्वसमत्व (४) दु:खनिवृत्ति, (५) सुखाविर्भाव. या अभ्यासाने पांच प्रकारचा अभ्यास होऊन शेवटी स्वरूपसिद्धि प्राप्त होते.

**शिष्य :** योग्यास काय साध्य असते व काय नसते ?

**स्वामी :** योग्याचा मनोनाश व वासनाक्षय झाल्याचे योगाने त्यास स्वरूपसुख समाधियोगाने घेता येते. मात्र त्यांचा वासनाक्षय व मनोनाश समूल झालेला नसून, तो तात्पुरता झालेला असतो. शिवाय त्यास ज्ञान नसले कारणाने त्याचे जन्ममरण सुटत नाही. यास उदाहरण- एखाद्या गारुड्याने किती जरी समाधि लावून दाखविली तरी तो भानावर आल्यावर पैसा मागण्यासाठी हात पुढे करतोच. म्हणून योग्याच्या वासना-मनोनाशाचे मूळ ज्ञानानेच नष्ट व्हावे लागते. भर्जितबीजवत.

**शिष्य :** तर मग ज्ञान्याची स्थिति कशी असते व त्यास काय अधिक करावे लागते ?

**स्वामी :** योग्य विचारलेत. सांगतो ऐका. ज्ञान्याच्या वासना, मनोनाशाचे मूळ आधीच जळलेले असते. पण त्याचा शेंडा मात्र हिरवागार ओला (जिवंत) असतो. हा पुढे प्रारब्धभोगाने सुकून जातो.

**शिष्य :** ज्ञानाचे लक्षण काय व त्याचे फल काय ?

**स्वामी :** ते असे आहे. संशयभावना, असंभावना, विपरीतभावनारहितं यज्ज्ञानं तत् अपरोक्षज्ञानम् । अपरोक्षज्ञानेन कैवल्यम्[१]। परोक्षज्ञानेन (शब्द[२]) ब्रह्मलोकप्राप्तिः। १. केवल = अद्वितीय, २, शब्दज्ञानं = गुरोर्मुखात् वेदान्दश्रवणेन जायमानं ज्ञानं तत्परोक्षज्ञानम्।

**शिष्य :** ज्ञान म्हणजेच मोक्ष ना ? का आपला मोक्ष म्हणजे आणखी निराळ्या ठिकाणी आहे ?

**स्वामी :** प्रत्यग्ज्ञान म्हणजेच मोक्ष. विज्ञान हाच मोक्ष. अथवा 'अज्ञानहृदयग्रंथिनाशो मोक्ष इति स्मृतः' (शिवगीता). अज्ञानमय

हृदयस्थग्रंथि, तिचा जो नाश तोच मोक्ष. मोक्षाची जागा दुसरी नाही. हा काही दुसरीकडे कोठे अगर गावाशिवाचे ठायी नसतो. 'मोक्षस्य न हि वासोस्ति न ग्रामान्तरमेव वा' मोक्ष म्हणजे स्वस्वरूपाचे ठिकाणी झालेली जी ज्ञानवृत्ति ती प्रत्यगात्म्याचे ठिकाणी ठेवली असता अनादिवासनाक्षय होतो व वासनाक्षय म्हणजेच मोक्ष होय. आणखी असे वचन आहे की, 'अहंममेति यो भावो देहाक्षादावनात्मनि। अध्यासोयं निरस्तव्य:' (विवेक चूडामणि) लोकवासना, शास्त्रवासना व देहवासना हाकलल्यावाचून म्हणजे या सर्वांचा अभिमान सोडल्यावाचून स्वरूपज्ञानप्राप्ति नाही व त्यावांचून मोक्षही नाही.

**शिष्य :** असे आपण ज्ञानासंबंधी सांगितलेत त्याप्रमाणे योगासंबंधी कांही स्पष्ट करून सांगाल काय ?

**स्वामी :** योगासंबंधी थोडक्यात उत्कृष्ट माहिती आचार्यकृत **योगातारावली** या ग्रंथात दिलेली आहे. यांत अवघे २८ श्लोक आहेत. त्यांत धारणा कशी करावी ते उत्तम तऱ्हेने सांगितले आहे. तसेच राजयोग धारणेने कसा साधावा हेही उत्कृष्टपणे सांगितले आहे. त्यात आचार्य म्हणतात की, हा राजयोग साध्य केल्याने सर्व काही साध्य होते. त्याच्या सतत अभ्यासाने वासनाक्षय व मनोनाशही होतात. याचे कारण यांत उन्मनी अवस्था प्राप्त होते. 'योगिचित्तमचित्तं स्यात्' म्हणजे योग्याचे चित्त अचित्त होते म्हणजे नाहीसेच होते. जसे मन हे अमनस्क होते त्याप्रमाणे. चित्त साध्य झाल्यावर (स्वाधीन झाल्यावर) खरोखरी पुढे फार थोडे करावयाचे उरते. नाहीच उरत म्हटले तरी एक वेळ चालेल. एका साधूने तर असे स्पष्ट म्हटले आहे की, 'थोडे आहे थोडे आहे । चित्त साध्य झालिया।'

**शिष्य :** ब्रह्मलोक प्राप्तीपर्यंत सातलोक ओलांडावे लागतात म्हणतात तर ते सर्व एकाच उपायाने येतात काय ?

**स्वामी :** एकाच उपायाने नव्हे, पण निरनिराळ्या साधनांचे द्वारे निरनिराळे लोकांपर्यंत जाता येते. उदाहरणार्थ : (१) यज्ञादि उपासना कर्म करणारे स्वर्गलोकांपर्यंत जातात व तेथे त्यांचे पुण्य सरले की परत मृत्युलोकात येतात. 'क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति' (२) नामोपासक जे आहेत ते महर्लोकादिप्राप्तिद्वारां क्रममुक्तीला जातात. ब्रह्मलोकापर्यंत जातात; व म्हणूनच कलियुगात नाममाहात्म्य श्रेष्ठ आहे. कारण या मुक्तीला गेलेला खाली येत नाही. (३) निष्काम बुद्धीने यज्ञकर्मे केली असतां चित्तशुद्धिद्वारां ज्ञानाला साधनीभूत होतात. (४) ज्ञानोपासक जे आहेत त्यांना निराळी गति नाही. त्यांचे प्राण येथेच लीन होतात. ज्ञानसमकाल मुक्त आहे. त्यास देहपातानंतर कैवल्यच. त्याला सत्यलोकादिकांचे गमन नाही. पण (गमनाची जरूर आहे) याप्रमाणे स्वानुभूतिप्रकाशांत सांगितले आहे.

**शिष्य :** तप म्हणजे काय ?

**स्वामी :** तप म्हणजे आलोचन.

**शिष्य :** मागे जे आपण भक्ति, योग व ज्ञान हे तीन रस्ते सांगितलेत ते सर्व कोठपर्यंत जातात ? म्हणजे त्यांचे पर्यवसान कोठे होते ?

**स्वामी :** भक्ति असो, योग असो की ज्ञान असो, सर्वांचे पर्यवसान एकच. एकेच जागी. म्हणजे हे तीनही रस्ते जरी निरनिराळ्या प्रदेशांतून आलेले असले तरी एकाच चव्हाट्याला येऊन मिळतात.

**शिष्य :** या सर्वांच्या साधनांत तात्त्विक भेद आहेत की काय ? असल्यास कोणते ?

**स्वामी :** तत्त्वत: जरी प्रत्येकाच्या साधनांत भेद असले तरी त्यांतील एकांतील काही साधने दुसऱ्यातील कांही साधनांशी जुळतात.

ती आता कोठे जुळतात ते खालच्या मांडणीवरून कळून येईल. भक्तियोग व ज्ञान यांची साधने -

| नवविधाभक्तीची | अष्टांग योगाची | ज्ञानाची |
|---|---|---|
| १. श्रवण | यांत श्रवणाचा अध्याहार आहे. | १. श्रवण |
| २. कीर्तन | १. यम | २. मनन |
| ३. विष्णुस्मरण | २. नियम | ३. निदिध्यास |
| ४. पादसेवन | ३. आसन | फल-स्वरूपसाक्षात्कार |
| ५. अर्चन | ४. प्राणायाम | |
| ६. वन्दन | ५. प्रत्याहार | |
| ७. दास्य | ६. धारणा | |
| ८. सख्य | ७. ध्यान | |
| ९. आत्मनिवेदन | ८. समाधि | |

फल-स्वरूपसाक्षात्कार फ. स्व. सा.

'ज्ञानिभ्योपि मतोधिकः' 'बुद्धेः फलमनाग्रहः' मी योग्याच्या ठिकाणीही नाही व ज्ञान्याच्या ठिकाणीही नाही असे सांगतात तर दोहोंच्या ठिकाणी आहे.

**शिष्य :** ज्ञानप्राप्तीला सुलभ साधने कोणती ?

**स्वामी :** १) साधुसमागम २) सच्छास्त्रश्रवण
३) प्रतिकूलवृत्त्युत्पादन ४) प्राणनिरोध.

**शिष्य :** या सर्वांतून उत्तम कोणते ?

**स्वामी :** या सर्वात पहिल्या प्रतीचे म्हणजे जे साधुसमागम ते व बाकीची साधने उत्तरोत्तर खालोखाल. याचे कारण साधुसमागमाने सद्गुरुकृपा व सद्गुरुकृपेने ईश्वरानुग्रह होतो व या दोहोंनी प्रारब्धास आड आलेला जो कालाचा बांध तोही दूर होतो. एरवी किती जरी अभ्यास केला तरी हा खात्रीने सुटतो असे नाही. म्हणून सद्गुरु

मिळवून त्यांच्या मार्गाने जाणे हा सर्वात सोपा व जवळचा मार्ग होय. याचे कारण, आपल्यास फारसे श्रम करावे न लागतां त्यांच्या ज्ञानसाधनाचा व कृपेचा फायदा मिळतो.

साधुसमागमाचा योग जर आलाच नाही तर त्याचा प्रतिनिधि म्हणून सच्छास्त्रश्रवण धरता येते व मग शास्त्रश्रवण व त्यावर स्वत: मनन, निदिध्यास इ. हाच उपगुरु होय. शास्त्राच्या ठिकाणी दृढ श्रद्धा ठेवून आचरण केल्यानेही काम होते. प्रत्यक्ष रुपये जरी नाहीत, तरी त्याबद्दल हुंडी अथवा नोट चालवून जसे काम होते त्याप्रमाणे. याचे कारण काय तर त्या हुंडीवर मालकाची स्वत:च्या जामिनकीची सही असते. वेदशास्त्रे इत्यादिकांवर ईश्वररूपी सद्‌गुरूचा असा सही-शिक्का असल्याने ती कार्ये होतात असे जाणावे. मंत्रापासून जी सिद्धि मिळते त्याचे कारण हेच की, ते ज्यांचे मुखांतून निघालेले असतात ते पुरुष त्या मंत्राचे द्रष्टे अथवा ऋषि होत व अशा सिद्ध पुरुषांच्या वचनाला बाध न येता त्यांचे मंत्र हुकमी चालावेत अशाविषयी त्या मंत्रावर त्यांचे स्वत:चे आवाहन, प्रेरणा व एक तऱ्हेची शपथ अथवा हमी असते असे म्हटले तरी चालेल. मंत्र ही त्यांची स्वयंप्रेरणेने भारलेली ब्रीदवाक्ये होत. यास बट्टा लागू नये म्हणून त्याचे द्रष्टे त्याविषयी जागृत असतात. मात्र त्याबरोबरच मंत्रसाधकांनी त्या द्रष्ट्याविषयी पूज्य भावना ठेवून तो मंत्र जपावा म्हणजे नि:संशय कार्य घडते. (३) आतां प्रतिकूलवृत्त्युत्पादनाबद्दल सांगावयाचे म्हणजे, ज्या वासना आपले मनात उठत असतील त्या आपल्या कार्याला बाधक असतील तर त्यांचा नाद सोडून त्यांचे विरुद्ध असणाऱ्या वृत्ति व क्रिया आरंभावयाच्या. उदाहरणार्थ- आपल्यास त्यागाचा अभ्यास करावयाचा आहे. पण आंतून लोभाच्या वासना उठत आहेत. त्यावर प्रतिक्रिया म्हणून मुद्दाम दाने देऊन, त्याग अंमलात

आणावयाचा; म्हणजे कालांतराने त्यागबुद्धीची सवय, व्यायामाने जसे शरीरबल वाढते, तशी होऊ लागते. हे एक अडमुठ्या माणसाला जसा दंड तसे, अथवा ओढाळ गाईला जसा लोढणा तसे वर्तन आहे. प्रतिकूलवृत्त्युत्पादन म्हणतात ते हेच. षड्रिपूबद्दल प्रत्येकाविषयी हीच प्रतिकूलवृत्ति धरून त्यांना ठिकाणी आणता येईल अथवा याची दुसरी तऱ्हा म्हणजे हे सर्व विकार आपले ठायी न लावितां त्याचा ईश्वराचे ठिकाणी विनियोग करणे. उदाहरणार्थ- लोभ खरा, पण तो ईश्वराविषीचा. क्रोध करावा तो दुर्वासनेविषयीचा. काम करावा तो ईश्वरप्रीतीचा इ. (४) आता प्राणनिरोध हे जे साधन आहे, ते हटयोगातील आहे. नाक तोंड दाबून दम कोंडला असतां, कुंभक केला असता, प्राणाचा निरोध होऊन मन स्तब्ध होते व त्याचा लय झाला म्हणजे उन्मनी अवस्था व समाधि होते. पण वैद्य जसे अनिर्वाह पक्षी, ऑपरेशन करून रोग कापण्याकडे प्रवृत्त होतात, तसेच हे एक साधन मनाचा रोग कापण्याचे आहे.

--------*****---------